लेखिका परिचय



## डॉ. गौरी चंद्रशेखर चिंचोळकर (हुसे)


व्यवसाय : सहाय्यक प्राध्यापक (CHB), शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला

शिक्षण : एम.ए. (राज्यशास्त्र, इतिहास, मराठी, अर्थशास्त्र), एम.एड्., सेट (शिक्षणशास्त्र), पीएच.डी. (शिक्षणशास्त्र)

**व्यवस्थापकीय कार्यभार :**

१. संचालिका, श्रीमती शांताबाई चिंचोळकर शिक्षण संस्था, वाडेगाव ता. बाळापूर जि. अकोला.
२. सदस्य, होमिओपॅथिक एज्युकेशन सोसायटी, अकोला.
३. सदस्य, डॉ. नानासाहेब चिंचोळकर बहुउद्देशीय संस्था, वाडेगाव ता. बाळापूर जि. अकोला.

प्रकाशित : दैनिक देशोन्नती, दैनिक मातृभूमी व विविध दैनिक वर्तमानपत्रामध्ये लेख प्रकाशित.

संशोधनपर लेख : १० (UGC care listed, peer reviewed journal)

भ्रमणध्वनी : ९९७०२२११२५

ईमेल : gcchincholkar@gmail.com

पत्ता : महात्मा फुले चौक, मु.पो. वाडेगाव ता. बाळापूर जि. अकोला ४४४५०२ (महाराष्ट्र)



सिध्दी पब्लिशींग हाऊस, नांदेड

978-81-996546-6-2


बालकांचे मानसिक आरोग्य व सुजाण पालकत्व

:: लेखिका :: डॉ. गौरी चंद्रशेखर चिंचोळकर (हुसे)

# बालकांचे मानसिक आरोग्य व सुजाण पालकत्व




:: लेखिका ::

डॉ. गौरी चंद्रशेखर चिंचोळकर (हुसे)

# बालकांचे मानसिक आरोग्य व सुजाण पालकत्व

**लेखिका**

**डॉ. गौरी चंद्रशेखर चिंचोळकर (हुसे)**

एम.ए. (इतिहास, राज्यशास्त्र, मराठी, अर्थशास्त्र), एम.एड.

सेट (शिक्षणशास्त्र), पीएच. डी. (शिक्षणशास्त्र)

**सहाय्यक प्राध्यापक (सी एच बी)**

**शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला**

**सिद्धी पब्लिकेशन हाऊस, नांदेड.**

**ISBN NO. 978-81-996546-6-2**

**बालकांचे मानसिक आरोग्य व सुजाण पालकत्व**


- **लेखिका**

**डॉ. गौरी चंद्रशेखर चिंचोळकर (हुसे)**

**सहाय्यक प्राध्यापक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला**

एम.ए. (इतिहास, राज्यशास्त्र, मराठी, अर्थशास्त्र), एम.एड.

सेट (शिक्षणशास्त्र), पीएच. डी. (शिक्षणशास्त्र)

**मो. नंबर: ९९७०२२११२५**



❖ **प्रकाशक**

**सिद्धी पब्लिकेशन हाऊस,**

बेलानगर भावसार चौक, तरोड़ा खु. नांदेड.

मो. नंबर ९६२३९७९०६७

www.wiidrj.com

❖ **मुद्रक**

अनुपम प्रिंटर्स, श्रीनगर, नांदेड.

**प्रथमावृत्ती : २८ जुलै २०२६**


**© सर्वाधिकार लेखिकेच्या अधीन**


**मुखपृष्ठ :** तेजस रामपुरकर

**अक्षरजुळवणी :** सौ. पल्लवी शेटे

**मूल्य** : ४००


(टीप: सदरील ग्रंथातील कोणताही भाग किंवा मजकुराकरीता सदरील लेखक स्वत: जबाबदार राहतील. प्रकाशक जबाबदार असणार नाही.)

## :: शुभेच्छुक ::

**बालकांचे मन असते, अतिशय कोमल**
**जपावे लागते त्याचे, आरोग्य निर्मळ ||**
**आव्हानांच्या या युगात, होताना विकास,**
**सुजाण पालकत्वाचाच, हवा खरा ध्यास !**

याची अनुभूती देणाऱ्या 'बालकांचे मानसिक आरोग्य व सुजान पालकत्व - ताणतणाव, शैक्षणिक विकास, आव्हाने व पालकांची भूमिका' या अत्यंत अभ्यासपूर्ण आणि समयोचित ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात मुलांचे मानसिक आरोग्य जपणे आणि त्यांना योग्य दिशा देणे हे पालकांसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. अशा काळात ताणतणाव व्यवस्थापन, शैक्षणिक विकास आणि पालकांची नेमकी भूमिका यावर मार्गदर्शन करणाऱ्या या ग्रंथाची समाजाला नितांत गरज होती.

हा ग्रंथ केवळ एक पुस्तक नसून, पालकांसाठी एक दीपस्तंभ ठरेल आणि बालकांच्या सुदृढ जडणघडणीत मोलाचे योगदान देईल, यात शंका नाही. तसेच शासनास शैक्षणिक धोरण निश्चितीबाबत योग्य दिशानिर्देश देण्याकरिता सुद्धा सहाय्यभूत ठरेल, असा हा ग्रंथ निश्चितच आहे. लेखकाचे हे कौतुकास्पद पाऊल कौटुंबिक आणि सामाजिक आरोग्यासोबतच बालकांच्या शैक्षणिक प्रगती करिता नक्कीच दिशादर्शक ठरेल.

या मार्गदर्शक ग्रंथाच्या प्रकाशनाबद्दल लेखिका डॉ. गौरी चंद्रशेखर चिंचोळकर, यांचे मनःपूर्वक अभिनंदन ! या ग्रंथाला वाचकांचा भरघोस प्रतिसाद लाभो आणि त्याचा प्रचार-प्रसार

घराघरांत व्हावा, लेखिकेचा ग्रंथ लिहिण्यामागील उद्देश सफल व्हावा, याच सदिच्छा !

ग्रंथाच्या यशस्वी प्रकाशनासाठी आणि पुढील प्रवासासाठी अनंत शुभेच्छा !


शुभेच्छुक

**प्रा. गजानन त्र्यं. शेगोकार**

(सहाय्यक अध्यापक)

गुंफाई, साई मंदिर जवळ, तेल्हारा

जि. अकोला

# :: प्रस्तावना ::

मानवी जीवनाचा पाया बालपणात रचला जातो, असे म्हटले जाते. बालकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, मूल्यसंस्कार, भावनिक स्थैर्य, बौद्धिक क्षमता, सामाजिक समायोजन आणि नैतिक विकास यांची बीजे बालपणातच रोवली जातात. त्यामुळे बालकांचे मानसिक आरोग्य ही केवळ वैयक्तिक बाब नसून कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाशी निगडित असलेली अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. निरोगी शरीराप्रमाणेच निरोगी मन हेही व्यक्तीच्या आनंदी, समृद्ध आणि यशस्वी जीवनाचा मूलाधार आहे. त्यामुळे बालकांच्या मानसिक आरोग्याचा विचार हा आजच्या शिक्षणव्यवस्थेतील आणि पालकत्वातील अत्यंत महत्त्वाचा विषय बनला आहे.

आजचे युग हे विज्ञान, तंत्रज्ञान, माहिती आणि स्पर्धेचे युग आहे. जागतिकीकरण, बदलती सामाजिक मूल्ये, लहान होत चाललेली कुटुंबव्यवस्था, वाढता ताणतणाव, डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव, मोबाईल आणि सामाजिक माध्यमांचा अतिवापर, शैक्षणिक स्पर्धा, पालकांच्या वाढत्या अपेक्षा आणि इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाकडे वाढणारा ओढा या सर्व घटकांचा बालकांच्या मानसिक आरोग्यावर दूरगामी परिणाम होत आहे. अनेक बालके मानसिक तणाव, भीती, असुरक्षितता, न्यूनगंड, भावनिक अस्थिरता, आत्मविश्वासाचा अभाव, एकाग्रतेची समस्या आणि सामाजिक समायोजनातील अडचणी यांना सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत पालकांची भूमिका अधिक संवेदनशील, समंजस आणि जबाबदार बनते.

**"बालकांचे मानसिक आरोग्य व सुजाण पालकत्व : ताणतणाव, शैक्षणिक विकास, आव्हाने आणि पालकांची भूमिका"** हा ग्रंथ अशाच समकालीन आणि अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर आधारित आहे. प्रस्तुत ग्रंथ हा माझ्या मार्गदर्शनाखाली संशोधक डॉ. गौरी चंद्रशेखर चिंचोळकर यांनी पूर्ण केलेल्या पीएच.डी. संशोधन कार्याचे परिष्कृत, विस्तारित आणि वाचकाभिमुख स्वरूप आहे. संशोधन प्रक्रियेदरम्यान त्यांनी विषयाची निवड, साहित्याचा चिकित्सक अभ्यास, संशोधन पद्धतीचा योग्य वापर, माहिती संकलन, सांख्यिकीय विश्लेषण आणि निष्कर्ष मांडणी यामध्ये उच्च दर्जाची संशोधननिष्ठा, वस्तुनिष्ठता आणि शास्त्रीय दृष्टिकोन जपला आहे. त्यामुळे हा ग्रंथ संशोधनाधिष्ठित, विश्वासार्ह आणि उपयुक्त ठरतो.

या ग्रंथामध्ये बालकांच्या मानसिक आरोग्याची संकल्पना, मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक आणि शैक्षणिक घटक, इंग्रजी माध्यमातील शिक्षणाची वैशिष्ट्ये, त्यातील संधी आणि आव्हाने, शैक्षणिक ताणतणावाची कारणे, पालकांच्या अपेक्षांचा बालकांवर होणारा परिणाम, पालकत्वाच्या विविध शैली, मानसिक आरोग्य संवर्धनाचे उपाय, ताण व्यवस्थापनाची तंत्रे, तसेच बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेले सकारात्मक पालकत्व यांचे शास्त्रीय आणि सखोल विवेचन करण्यात आले आहे. संशोधनातील निष्कर्षांच्या आधारे पालक, शिक्षक, शिक्षणप्रशासक, संशोधक आणि शिक्षण धोरणकर्त्यांसाठी उपयुक्त अशा व्यवहार्य सूचना आणि शिफारशीदेखील मांडण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० मध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर, आनंददायी शिक्षणावर, भावनिक स्वास्थ्यावर आणि जीवनकौशल्यांच्या विकासावर विशेष भर देण्यात आला आहे.

प्रस्तुत ग्रंथातील विचार आणि निष्कर्ष या धोरणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत असून शाळा, पालक आणि समाज यांच्यात समन्वय निर्माण करण्यासाठी निश्चितच मार्गदर्शक ठरतील. मानसिकदृष्ट्या सक्षम, आत्मविश्वासपूर्ण, मूल्यनिष्ठ आणि आनंदी विद्यार्थी घडविण्यासाठी पालक, शिक्षक आणि समाज या तिन्ही घटकांची संयुक्त जबाबदारी आहे, हा संदेश हा ग्रंथ प्रभावीपणे देतो.

आज अनेक पालक आपल्या मुलांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्नशील असतात; परंतु शैक्षणिक यशाच्या ध्यासात मुलांचे मानसिक स्वास्थ्य, भावनिक गरजा, संवाद, खेळ, विश्रांती आणि आनंद यांकडे अनेकदा दुर्लक्ष होते. केवळ गुण, स्पर्धा आणि यश यांवर आधारित पालकत्व मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या संतुलित विकासासाठी पुरेसे ठरत नाही. मुलांना समजून घेणे, त्यांच्याशी सातत्यपूर्ण संवाद साधणे, त्यांच्या भावनांचा आदर करणे, अपयश स्वीकारण्याची क्षमता विकसित करणे आणि सकारात्मक वातावरण उपलब्ध करून देणे हेच सुजाण पालकत्वाचे खरे स्वरूप आहे. या दृष्टीने प्रस्तुत ग्रंथ प्रत्येक पालकासाठी आत्मपरीक्षण करणारा आणि दिशा देणारा ठरेल.

संशोधक डॉ. गौरी चंद्रशेखर चिंचोळकर यांनी या विषयाचा केवळ शैक्षणिक अभ्यासच केलेला नाही, तर संशोधनातील निष्कर्षांचे व्यवहार्य रूपांतर करण्याचाही प्रामाणिक प्रयत्न केला आहे. संशोधनाची गुणवत्ता, भाषेची सुलभता, मांडणीतील शास्त्रीयता आणि सामाजिक बांधिलकी यांमुळे हा ग्रंथ संशोधन विद्यार्थी, शिक्षक शिक्षण महाविद्यालये, मानसशास्त्र व शिक्षणशास्त्राचे विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक यांच्यासाठी संदर्भग्रंथ म्हणून निश्चितच उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास आहे.

या ग्रंथाच्या माध्यमातून समाजात बालकांच्या मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढेल, पालकत्व अधिक संवेदनशील आणि सकारात्मक बनेल, तसेच शिक्षण क्षेत्रात बालककेंद्री आणि मानसिक आरोग्यपूरक वातावरण निर्माण होण्यास निश्चितच हातभार लागेल. "आनंदी मन, सुदृढ शरीर, यशस्वी जीवन" हा संदेश प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचविण्याचे सामर्थ्य या ग्रंथात आहे, असे मला वाटते.

या महत्त्वपूर्ण ग्रंथाच्या यशस्वी प्रकाशनाबद्दल संशोधक डॉ. गौरी चंद्रशेखर चिंचोळकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्यांच्या भावी शैक्षणिक, संशोधनात्मक आणि साहित्यिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा व्यक्त करतो. हा ग्रंथ शिक्षणक्षेत्रात मोलाची भर घालेल आणि समाजासाठी उपयुक्त मार्गदर्शक ठरेल, असा मला दृढ विश्वास आहे.

**डॉ. पी. ए. पाटील**
सहयोगी प्राध्यापक
कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

# :: लेखिकेचे मनोगत ::

“**बालकांचे मानसिक आरोग्य व सुजाण पालकत्व : ताणतणाव, शैक्षणिक विकास, आव्हाने आणि पालकांची भूमिका**” हा ग्रंथ लिहिताना मी समोर ठेवलेले उद्देश म्हणजे बालकांचे मानसिक आरोग्य, शैक्षणिक विकासात पालकांची भूमिका, ताण-तणाव व माध्यम निवडीबाबत पालकांमधील संभ्रम हे आहेत. माझा हा ग्रंथ म्हणजे मी शिक्षणशास्त्र या विषयात “इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता आणि त्यांच्या शैक्षणिक विकासाबाबत पालकांच्या जागरूकतेचा चिकित्सक अभ्यास” या विषयावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आंतरविद्याशाखीय अभ्यास (शिक्षणशास्त्र) विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर केलेल्या शोध प्रबंधाचे रुपांतर आहे.

आई-वडील हे विद्यार्थ्यांचे पहिले गुरू आहेत. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये आई-वडिलांचे म्हणजेच कुटुंबाचे योगदान मोलाचे असते. बालकाचा विकास होत असताना त्यांच्या कुटुंबामध्ये त्यांच्यावर संस्कार होत असतात. कुटुंबांमध्ये होत असलेल्या प्रत्येक बाबींचा बालकांच्या व्यक्तिमत्त्वावर कळत-नकळत परिणाम होत असतो. त्यामुळे कुटुंबामध्ये होत असलेली प्रत्येक बाब ही संस्कारात्मक, संस्कारक्षम व बालकांच्या व्यक्तिमत्वास आकार देण्यास पुरक असली पाहिजे. पण आज या धावपळीच्या युगामध्ये व अर्थार्जनासाठी कराव्या लागणाऱ्या दैनंदिन कामामुळे पालकांना आपल्या मुलांकडे लक्ष देण्यास वेळ मिळेनासा झाला आहे. आज विद्यार्थी व पालक यांच्यातील सुसंवाद कमी होत चालला आहे. मुले भावनिकदृष्ट्या अस्थिर बनत आहेत. त्यामुळे त्यांच्यामध्ये अनेक प्रकारच्या वर्तन समस्या निर्माण होत आहेत. परिणामी त्यांच्या

शैक्षणिक संपादणुकीमध्ये, प्रगतीमध्ये अनेक अडथळे निर्माण होत आहेत.

सध्याच्या धगधगत्या स्पर्धेच्या युगामध्ये प्रत्येक जण धावपळ करत आहे. विभक्त कुटुंब पद्धती, नोकरी करणारे आई-वडील, दूरदर्शन, इंटरनेट, सोशल मीडिया यांचा प्रचंड पगडा, संस्कृतीमध्ये होत असलेला बदल, मार्गदर्शन करणाऱ्यांची संख्या कमी इत्यादी कारणांमुळे मुलं एकाकी तसेच कोमेजलेली दिसतात. पालकांना आपल्या पाल्याकडे लक्ष देण्यासाठी वेळ सुद्धा मिळत नाही. बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आजही शिक्षक असफल प्रयत्न करत असतांना दिसतात. पण बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी जबाबदारी शिक्षकांप्रमाणे पालकांचीही असते. बालकांच्या उपजत क्षमता, त्यांची गोडी, गुणवत्ता व गरजा लक्षात घेऊन त्यांचा विकास पालकांना करावा लागतो. तेव्हाच त्यांचे पालकत्व यशस्वी होते.

मराठी माध्यमांच्या शाळेचा सद्यस्थितीचा विचार केला तर पालक मराठी शाळेत मुलांना प्रवेश देण्याबाबत कमालीचे उदासीन आहेत. यामागे विविध कारणे आहेत, इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे ओढा हा अगदी सहजच झालेला नाही त्यामागे ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. आपल्या देशावर झालेले परकीय आक्रमण, परकीय राज्यसत्ता याचे प्रतिबिंब आज स्वातंत्र्य मिळून ७८ वर्ष पूर्ण झाल्यावरही आपणास बघायला मिळतात.

बालपणाचा काळ सुखाचा, निरपेक्ष भावनेने जगलेला असा समजला जाई. एक परीक्षांचे दडपण सोडले तर सरसकट हा काळ मोकळेपणाचा म्हणजे टेन्शन फ्री....! परंतु आजकाल फार वेगळे चित्र दिसू लागले आहे. मुलांच्या पाठीवरती दप्तरांचे ओझे ज्याप्रमाणे वाढत गेले तसेच त्यांच्या मनावरचे ओझे देखील वाढत गेले. त्यांच्या मनात विचारांचा गुंता अधिकाधिक वाढत जात आहे. त्याचे

पर्यावसान म्हणजे वाढता दबाव, दडपण व नैराश्य यामध्ये होत आहे.

सदर ग्रंथात माध्यम निवडीबाबत पालकांमधील संभ्रमाची उकल करण्यात आली आहे. शिक्षणाचं माध्यम इंग्रजी असावं की मराठी ? हा प्रश्न वारंवार विविध ठिकाणी उपस्थित केला जातो. आपल्याला ज्या सुविधा मिळाल्या नाहीत, त्या मुलांना सहज उपलब्ध व्हाव्यात, म्हणून प्रयत्नशील असणारे पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल करतात. जणू काही, उच्च शिक्षणाचं नि राहणीमानाचं ते प्रवेशद्वार असतं.

पालकांच्या अपेक्षा साहजिक उंचावतात आणि मुलांनी आपल्या कुवतीनुसार गुण कमावले तरी ते अपुरे वाटू लागतात. त्यातूनच इतरांना जमतं ते माझ्या मुलांना जमत नाही, ही गोष्ट मनोभंग करते आणि तो सगळा राग, अपेक्षाभंगाचं दुःख मुलावर काढलं जातं. पालकांच्या अशा रोषामुळं मुलं बिथरतात आणि धास्तावतात. त्यांची अभ्यासातील प्रगती खुंटते. एका विचित्र दुष्टचक्रात पालक व मुलं अडकतात. परीक्षेच्या बाबतीतही मुलं व पालक प्रमाणात ताण अनुभवत असतील तरच ते फायद्याचे ठरू शकते; परंतु हा ताण अवाजवी आणि प्रमाणाबाहेर असेल तर त्याचे विपरीत परिणाम नक्कीच होतात. परीक्षा व विद्यार्थी हे नातं अतूट असतं. विद्यार्थी म्हटलं की, तो परीक्षेला सामोरं जाणार हे नक्की; तसेच या स्पर्धेच्या जगात एकेक गुणासाठी झटणंही तेवढंच आवश्यक असतं; परंतु या 'परीक्षेचं' भूत विद्यार्थ्यांच्या बरोबरच त्यांच्या पालकांच्या मानगुटीवरही बसतं. शिक्षक आणि पालक तर 'परीक्षा' ही एक साधारण व नैसर्गिक प्रक्रिया आहे हे पूर्ण विसरून परीक्षेला 'आणीबाणी'चं स्वरूप देतात. यामुळे मुलांवरचा ताण अतिप्रमाणात वाढतो. हा ताण कमी करून, परीक्षेबद्दल

सकारात्मकता वाढवण्यासाठी पालकांनी पुढाकार घ्यावा, त्यासाठी त्यांनी परीक्षेच्या काळामध्ये आपली भूमिका पार पाडावी.

मानसिक ताण कशामुळे उद्भवतो ? ताण हा काही प्रमाणात असतोच ताण आहे म्हणून प्रगती आहे. ताण आहे म्हणूनच आपल्याला स्वतःचं आणि समाजाचं भान आहे. योग्य वर्तन घडून यायचं तर स्वच्छंदी बालमनाला आवर घालावा लागतोच. थोडा ताण निर्माण करण्याचं काम पालकांना करावं लागतंच. पण - असा ताण सकारात्मक असावा. जो ताण नकारात्मकतेकडे घेऊन जाईल असा ताण मुलांच्या मनात निर्माण व्हायला नको. मानसिक ताणाची एक व्याख्या अशीही आहे की बाह्य किंवा आंतरिक कारणांना मानवानं दिलेला शारीरिक, मानसिक किंवा वागणुकीतला प्रतिसाद जेव्हा अपुरा पडतो तेव्हा मानसिक ताण उद्भवतो. मानसिक ताण उद्भवण्याच्या कारणांमुळे जशी बाह्य कारणं असतात, तशी आंतरिक कारणंही असतात.

मुलं म्हणजे सर्वकाळ शिक्षक संचलित / पालक संचलित 'रोबोज' आहेत असं आपण मानतो की काय ? आणि अशा या क्रूर, निर्मम वातावरणाविरुद्ध मुलांनी कोणत्याही प्रकारे विरोध दर्शवला की एक मनुष्य म्हणून त्याला जी प्रतिष्ठा असते ती धुळीला मिळेल अशा शिक्षा वर्गात/ वर्गाबाहेर किंवा घरांतही फर्मावल्या जातात. मुलांची शरीरं आणि मनं आज जायबंदी आहेत ! पण आम्हाला त्याची काय पर्वा ? पालकांचे आणि शिक्षकांचे एकमेव लक्ष्य म्हणजे परीक्षेत मुलांना मिळणारे गुण, शिष्यवृत्त्या, झळकणारी नावं, होणारे सत्कार ! आपल्या अपेक्षांच्या पूर्तीसाठी आपण मुलांना बळी देत आहोत. तसं करण्याचा आपल्याला अधिकार आहे काय ?

सदर ग्रंथात माध्यम निवडीबाबत पालकांमधील संभ्रमाची उकल करण्यात आली आहे. शिक्षणाचं माध्यम इंग्रजी असावं की मराठी ? हा प्रश्न वारंवार विविध ठिकाणी उपस्थित केला जातो. आपल्याला ज्या सुविधा मिळाल्या नाहीत, त्या मुलांना सहज

उपलब्ध व्हाव्यात, म्हणून प्रयत्नशील असणारे पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल करतात. जणू काही, उच्च शिक्षणाचं नि राहणीमानाचं ते प्रवेशद्वार असतं. पालकांच्या अपेक्षा साहजिक उंचावतात आणि मुलांनी आपल्या कुवतीनुसार गुण कमावले तरी ते अपुरे वाटू लागतात. त्यातूनच इतरांना जमतं ते माझ्या मुलांना जमत नाही, ही गोष्ट मनोभंग करते आणि तो सगळा राग, अपेक्षाभंगाचं दुःख मुलावर काढलं जातं. पालकांच्या अशा रोषामुळं मुलं बिथरतात आणि धास्तावतात. त्यांची अभ्यासातील प्रगती खुंटते. एका विचित्र दुष्टचक्रात पालक व मुलं अडकतात.

माध्यम बदलावं तरी अडचण, न बदलावं तरी अधोगती अशा पेचात अडकलेल्या पालकांनी थांबून गंभीरपणे विचार करायला हवा. कदाचित काही कटू पण आवश्यक निर्णय घेऊन त्यातून मार्ग काढायला हवा. मुलांच्या बौद्धिक क्षमतेचा, बुद्ध्यांकाचा विचार, समज आणि आकलनशक्तीची गुणवत्ता यांचा आढावा घेऊन त्यानुसार माध्यमबदलाचा निर्णय घ्यावा. मुलांना मनसोक्त मैदानावर खेळू द्या, टीव्ही, इंटरनेट, व्हिडिओ गेम्स, कार्टून्स नियोजित ठेवावेत, पालकांनी प्रथम स्वतः मधला ताण कमी करावा. मुले तुमचेच अनुकरण करतात, शाळा आणि शिक्षकांशी संपर्क ठेवावा, मुलांना व्यायाम, योग, ध्यानधारणेची सवय लावा. दीर्घश्वसनाने शरीर आणि मन तणावातून बाहेर येण्यास तेवढ्यापुरती मदत नक्कीच होते, घरातल्या माणसांबरोबर, आपल्या आवडीच्या माणसाबरोबर वेळ घालू द्या, भोवताली घडणाऱ्या सामाजिक दुर्घटनांविषयी, बॉम्बस्फोट, दहशतवाद मुलांना शब्दात समजावून सांगा. त्याविषयी मनात अवास्तव भीती निर्माण होऊ नये, कोणत्याही परिस्थितीत मुलांसमोर वादविवाद टाळावेत. मुलांवर त्याचा विपरीत परिणाम होतो, मुलांशी मोकळेपणाने

बोलावे. त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. मुले अस्वस्थ आणि समस्याग्रस्त असताना त्यांना मायेने जवळ घ्यावे, ताण येणे ही नैसर्गिक गोष्ट असल्याने मुलांना दोष देऊ नये. परिस्थिती बदलत असते हा मंत्र मुलांना द्यावा.

सदर ग्रंथात आई-वडिलांच्या मुलांबद्दल असलेल्या महत्त्वाकांक्षेच्या ओझ्याखाली मध्यमवर्गीय घरातली आजची मुलं गुदमरून गेली आहेत. पालकांच्या जगण्यातील ताणतणाव मुलांमध्ये आपसूक झिरपत आहेत. पालक जिंकण्यासाठी स्पर्धेतील घोड्यासारखे धावताहेत आणि बाहेरची सगळी प्रस्थापित व्यवस्था याला मदत करते आहे. अशा वातावरणात मुलाचं 'मूलपण' सांभाळण्याचं, जोपासण्याचं, फुलवण्याचं काम जीव तोडून कसं करायचं, हे सांगण्याचा हा प्रयत्न..!

कोणत्याही समस्येचे एकच कारण आणि एकच उत्तर असू शकत नाही. परंतु तरीही अभ्यासक व विषय शिकविणारे प्राध्यापक यांना या ग्रंथातून दिशा मिळेल असा विश्वास आहे. ग्रंथाचे लेखन अद्ययावत व सविस्तर व्हावे म्हणून अनेक मान्यवर लेखकांची पुस्तके, संदर्भग्रंथ, मासिकांमधील लेख, इंटरनेट इ. माहिती स्त्रोतांचा संदर्भ घेतलेला आहे. त्या लेखकांची मी ऋणी आहे. संदर्भग्रंथांची नावे संदर्भग्रंथ सूचीत देण्यात आली आहेत.

सदर ग्रंथाच्या पानांची मर्यादित संख्या लक्षात घेता संशोधनातील प्रकरण ४ – माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन मधील संपूर्ण प्रश्नांचे आलेख, सारणी व त्यांचे स्पष्टीकरण न करता मोजके, महत्वपूर्ण प्रश्न, सारणी व आलेख यांचेच सादरीकरण केलेले असून ज्या वाचकांना संशोधनातील पूर्ण प्रश्न, सारणी व आलेखांचे स्पष्टीकरण ज्ञात व वाचन करायचे असतील त्यांनी लेखिकेशी संपर्क साधावा.

प्रस्तुत ग्रंथ लेखनासाठी ज्या ग्रंथांची, लेखकांची व वेबसाईट्सची मदत झाली त्या सर्वांच्या ऋणात राहू इच्छिते. सिद्धी पब्लिकेशन हाऊस चे मालक सौ. पल्लवी राजेश उंबरकर यांनी या

ग्रंथाला बोलके मुखपृष्ठ व साजेसे ग्रंथरूप दिले त्यांचे ही आभार व सर्वांच्या सहकार्याने मला हा ग्रंथ आपल्यापर्यंत आणता आला तेव्हा आपल्या सर्वांच्या ऋणात राहणेच मला जास्त आवडेल. सर्वांचा लोभ माझ्यावर राहो ही प्रभूचरणी प्रार्थना.

**डॉ. गौरी चंद्रशेखर चिंचोळकर (हुसे)**

सहाय्यक प्राध्यापक

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला

एम.ए. (इतिहास, राज्यशास्त्र, मराठी, अर्थशास्त्र), एम.एड.

सेट (शिक्षणशास्त्र), पीएच.डी.(शिक्षणशास्त्र)

# ऋणनिर्देश

**“बालकांचे मानसिक आरोग्य व सुजाण पालकत्व : ताणतणाव, शैक्षणिक विकास, आव्हाने आणि पालकांची भूमिका”**, हा ग्रंथ लिहून पूर्ण केल्यानंतर प्रकाशित करताना मला अतिशय आनंद होत आहे. प्रस्तुत ग्रंथाचे लेखनकार्य करत असताना मला प्रेरणा देऊन मार्गदर्शन व सहकार्य केलेल्या सर्व आदरणीय व हितचिंतक व्यक्तीचे ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजते.

सर्वप्रथम माझ्या ग्रंथाकरिता प्रस्तावना करणारे प्रा. डॉ. पी.ए. पाटील, कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी जि. सोलापूर यांचे मार्गदर्शन मिळाले त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

सदरचे ग्रंथलेखन कार्य व्यवस्थित व वेळेत पूर्ण करण्यासाठी मला सतत प्रोत्साहन देणारे, महात्मा ज्योतिबा फुले सारखे खंबीरपणे पाठीशी उभे राहणारे, स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते माझे पती श्री चंद्रशेखर दौलतराव चिंचोळकर, माझे जन्मदाते, प्रेरणास्थान व आदर्श असणारे माझे वडील स्व. श्री छगनराव जयरामजी हुसे यांचे शुभाशीर्वाद, तसेच सदरचे ग्रंथलेखन कार्य पूर्ण करण्यासाठी ज्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य लाभले त्या सर्वांची मी मनस्वी आभारी आहे.

# अनुक्रमणिका

**१. प्रकरण १ – प्रस्तावना ------------------------------------ २४**

१.१ प्रास्ताविक १.२ पार्श्वभूमी १.२.१ भारतातील प्राचीन शिक्षण प्रणाली १.२.२ उत्तर वैदिक काळातील शिक्षण १.२.३ बौद्धकालीन शिक्षण प्रणाली १.२.४ मध्ययुगीन कालखंड १.३ ब्रिटिश कालीन शिक्षण प्रणाली १.३.१ भारतीय शिक्षण व्यवस्थेत इंग्रजी शिक्षणाची सुरुवात १.३.२ मिशनरी शिक्षण १.३.२.१ युरोपियन मिशनऱ्यांचा भारतातील शिक्षण प्रसार १.३.२.२ भारतातील मिशनरी शिक्षणाची ध्येये १.४ ब्रिटिशांचे ईस्ट इंडिया कंपनीद्वारे भारतातील शिक्षण प्रसाराचे कार्य १.४.१ १८१३ चा सनदी कायदा चार्ट १.४.१.१ सनदी कायद्याचे ४३ वे कलम १.४.१.२ १८१३ च्या कायद्यातील शिक्षण विषयक तरतुदी १.४.२ भारतीय शिक्षणात लॉर्ड मेकॉलेचे योगदान १.४.२.१ मेकॉलेकडून १८१३ च्या सनदी कायद्याच्या कलम ४३ चे स्पष्टीकरण १.४.२.२ भारतीय देशी भाषा व इंग्रजी १.४.२.३ भारतीय शिक्षणातील मेकॉलेच्या कार्याचे मूल्यमापन १.४.३ झिरप/पाझर सिद्धांत १.४.३.१ पाझर सिद्धांताचे परीक्षण १.५ शिक्षण हक्क कायदा २००९ १.६ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शिक्षण १.६.१ शाश्वत विकास १.६.२ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० १.७ एकविसाव्या शतकात शिक्षणातील बदलते प्रवाह १.७.१ २१ व्या शतकातील शिक्षणाची उद्दिष्टे १.८ पाल्याच्या शिक्षणाच्या माध्यमाबाबत एकविसाव्या शतकातील पालकांची भूमिका १.९ मातृभाषेतून प्राथमिक शिक्षणाची उपयुक्तता १.१० विद्यार्थ्यांची मानसिकता १.१०.१ मानसिक आरोग्य १.१०.२ पालकांची मानसिकता १.१०.३ मानसिक आरोग्याची लक्षणे १.१०.४ असंतुलित मानसिक आरोग्य १.१०.५ मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे घटक १.११ ओझे

– पालकांच्या अपेक्षांचे की अभ्यासाचे १. १२ मुलांवर पालकत्व शैलीचा प्रभाव १.१३ पालक शिक्षण १.१३.१ बालकांच्या विकासासाठी पोषक वृत्ती पालकांमध्ये आवश्यक १.१३.२ बालकांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी जैविक पालकत्व आणि शैक्षणिक पालकत्व १.१३.२.१ जैविक पालकत्व १.१३.२.२ शैक्षणिक पालकत्व १.१३.३ मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी वडिलांची भूमिका १.१४ विद्यार्थ्यांमधील ताणतणाव १.१४.१ तणावाचे प्रकार १.१४.१.१ बाह्य १.१४.१.२ अंतर्गत १.१४.१.३ ताणाचे व्यक्ती कार्यावर होणाऱ्या परिणामानुसार दोन प्रकार १.१४.१.४ ताणाच्या उपयुक्ततेनुसार ताणाचे प्रकार १.१४.१.५ शिक्षणातील ओझी १.१५ मुलांमधील ताण निर्माण करणारी लक्षणे १.१५.१ शारीरिक लक्षणे १.१५.२ मानसिक लक्षणे १.१५.३ वर्तन विषयक लक्षणे १.१५.४ भावनिक लक्षणे १.१५.५ मुलांमधील ताण ओळखून वेळेतच पालकांनी करावयाच्या गोष्टी १.१५.६ तणावग्रस्त मुलांच्या शैक्षणिक समस्या १.१६ ताणतणावाचे व्यवस्थापन १.१६.१ मुलांमधील ताणतणाव कमी करण्यासाठी उपाययोजना १.१७ मुलांचे मानसिक आरोग्य व पालकांची भूमिका १.१८ संशोधनाची गरज १.१९ संशोधनाचे महत्व १.२० समस्या विधान १.२१ संशोधनाची उदिष्टे १.२२ संशोधनाच्या संकल्पनात्मक व्याख्या १.२३ संशोधनाच्या कार्यात्मक व्याख्या १.२४ संशोधनाची चले १.२५ गृहितके १.२६ संशोधनाची गृहितकृत्ये/परिकल्पना १.२७ संशोधनाची व्याप्ती १.२८ संशोधनाची मर्यादा १.२९ संशोधनाची परिमर्यादा १.३० प्रकरण योजना १.३१ समारोप

**२. प्रकरण २-संबधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा --- ९६**

२.१ प्रास्ताविक २.२ संशोधन साहित्याचा आढावा घेण्याची गरज व महत्त्व २.२.१ संबंधित साहित्याचे स्त्रोत २.३ प्रस्तुत संशोधनातील संबंधित साहित्याचा आढावा २.३.१ मुलांची

मानसिकता आणि कौटुंबिक वातावरणाशी संबधित पुस्तकांमधून घेतलेला आढावा २.३.१.१ शोभा भागवत : सारं काही मुलांसाठी २.३.१.२ लीला पाटील : परिवर्तनशील शिक्षण २.३.१.३ डॉ. राजेंद्र बर्वे : कथा पालकांच्या व्यथा मुलांच्या २.३.१.४ शोभा भागवत : शिक्षण आणि शांती २.३.१.५ श्रुती पानसे : मुलांचे ताण–जबाबदारी पालकांची २.३.१.६ डॉ. श्रीकांत चोरघडे : संगोपन पालकत्वाचे २.३.१.७ रेणू दांडेकर : मुलं घडताना-घडविताना २.३.१.८ गो.द.पाहिनकर : मुलांना बनवा ऑलराउंडर २.३.१.९ डॉ. लता काटदरे : शिक्षणयात्रा २.३.१.१० गो.द.पाहिनकर : मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी २.३.१.११ नसरीन पटेल : आपल्या मुलांच्या समस्या आणि उपाय २.३.१.१२ डॉ. अंजली जोशी : विवेकी पालकत्व २.३.२ शिक्षणाचे माध्यम निवडीबाबत पालकांमधील जागरुकतेबाबत संकेतस्थळावरून घेतलेला संबंधित साहित्याचा आढावा २.३.२.१ डॉ. संयोगिता नाडकर्णी : फुलं कोमेजतांना २.३.२.२ मारिया विर्त : इंग्रजी माध्यमामुळे देश दुर्बल होत आहे  २.३.२.३ प्रदीप जाधव : बदलती मानसिकता – शाळा, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी २.३.२.४ डॉ. अमितकुमार गोईलकर : इंग्रजी माध्यमातील शिक्षण : विचारशून्य अनुकरण की स्वतःची फसवणूक २.३.२.५ गोविंद खुरंगे : सेमी इंग्रजी माध्यमाचे वास्तव २.३.२.६ सायली कुलकर्णी : मुलांची मानसिकता २.३.२.६.१ काही गोष्टी २.३.२.६.२ ग्रोथ माइंडसेट तयार होण्यामागे पालकांची नेमकी काय भूमिका असावी २.३.३ शिक्षणाचे माध्यमाबाबत वर्तमानपत्रात प्रसिध्द लेखांवरून घेतलेला संबंधित साहित्याचा आढावा  २.३.३.१ गौरी चंद्रशेखर चिंचोळकर – मराठी भाषा संवर्धन आणि जागरुकता  २.३.३.२डॉ. अमोल केळकर – तुमचे मुल अभ्यासाचे टेन्शन घेत नाही ना ? २.३.३.३.डॉ. रुपेश मोरे – शाळा टिकल्या तर भाषा बहरेल २.३.३.४ वसंत भोसले – बहुजनांचे उच्चशिक्षण संपले  २.३.३.५किशोर बळी – सरकारी शाळा टिकणार

कशा २.३.३.६ लोकमत परिचर्चा: तर शाळा संकटात, शिक्षकांच्या नोकऱ्या धोक्यात ! २.३.३.७ डॉ. सुखदेव थोरात – इंग्रजी शाळांना परवानगीच देऊ नका ! २.३.३.८ बालाजी देवर्जनकर – सरकारी शाळांना 'टाळे' लावण्याचा 'करेक्ट कार्यक्रम' २.३.३.९ प्रकाश परब – शिक्षणाची भाषा कोणती ? २.३.३.१० डॉ. उमा बच्छाव – स्वमग्न मुलांचा प्रेमळ स्वीकार ! २.३.३.११ वृत्तपत्र बातमी – खाजगी शाळांनी खिसा केला रिकामा, २.३.३.१२ रोशन विनायक बनकर – पंचतारांकित शाळा आणि थकलेला गुरुजी २.३.४ संशोधन विषयाशी संबंधित विविध मासिकांमधून घेतलेला संबंधित साहित्याचा आढावा २.३.४.१ विनोद वाघ – विद्यार्थी : गुणवत्तावाढ उपक्रम २.३.४.२ प्रा. मिलिंद जोशी – तेवती ठेऊया : मराठीची ज्योत ! २.३.४.३ प्र. ना. परांजपे – मराठीचे विद्यापीठ कसे असावे ? २.३.४.४ भारती भगत – मातृभाषेतून शिक्षण गरज व व्याप्ती २.३.४.५ प्रा. नितिन मालाणी – दहा दिवस दप्तरमुक्त शाळा - २.३.४.६ काटकर शिवाजी – मुलांना गुणांच्या मृगजळात अडकवू नका २.३.४.७ प्रहार (शब्दांना सत्याची धार) - सुप्त गुणांची जाणीव २.३.५ संशोधन विषयाशी संबंधित विविध जर्नल मधील प्रकाशित रिसर्च पेपर द्वारा घेतलला संबंधित साहित्याचा आढावा २.३.५.१ अनिता बाळासाहेब भापकर २.३.५.२ कु. स्मिता चिरंजीव पाटील २.३.५.३प्रा. पाटील ईश्वर पोपट २.३.५.४ भारसाकळे २.३.५.५ प्रवीण कोथवडे २.३.५.६ तुकाराम धुमार २.४ संशोधन विषयाशी संबंधित संशोधनांचा आढावा २.४.१ Sania Kulsum २.४.२ Shirley Brice Heath २.४.३ Bedi Jaskiran २.४.४ बबन केशवराव सोनवणे २.४.५ तुकाराम किशनराव काकडे २.४.६ रोकडे ए.के.२.४.७ डारकर आ.अ. २.४.८ शेरेकर ए. एम. २.४.९ सब्बाधी के. २.४.१० तांबे चं.तु. २.४.११ अंजुम आर. २.४.१२ महेर बी.बी. २.४.१३ खामकर स.ब. २.४.१४

मातने स.ब. २.४.१५ जाधव नि.द. २.४.१६ जयमाला पी. २.४.१७ रंगनाथन नमिता २.४.१८ अरोरा आर.के. २.४.१९ जाधव पद्मा २.४.२० महाजन शशिकला २.४.२१ देशमुख सुषमा २.४.२२ कुमार बसंत २.४.२३ पाढी सम्बितकुमार २.५ संशोधनाचे वेगळेपण २.६ समारोप

**३. प्रकरण ३ - संशोधन कार्यपद्धती ----------------------- १८९**

३.१ प्रास्ताविक ३.२ संशोधनाचा अर्थ ३.३ शैक्षणिक संशोधन ३.३.१ शैक्षणिक संशोधनाच्या व्याख्या ३.३.२ शैक्षणिक संशोधनाचे महत्त्व ३.३.३ संशोधनाचे प्रकार ३.३.४ शैक्षणिक संशोधन पद्धती ३.४ सर्वेक्षण संशोधन पद्धती ३.४.१ सर्वेक्षण व्याख्या ३.४.२ सर्वेक्षणाची उद्दिष्टे ३.४.३ सर्वेक्षण अभ्यास विषय ३.४.४ सर्वेक्षणाचे स्वरूप ३.४.५ सामाजिक सर्वेक्षणाचे प्रकार ३.४.६ महत्वाचे सर्वेक्षण प्रकार ३.४.७ प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पद्धती निवडण्याची कारणे ३.४.७.१ सर्वेक्षणाचा अभ्यासविषय ३.५ जनसंख्या ३.६ नमुना-निवड ३.६.१ नमुना निवड अर्थ ३.६.२ नमुना पद्धतीचे स्वरुप ३.६.३ नमुन्याची वैशिष्टे ३.६.४ नमुना निवडीचे आधार ३.६.५ नमुना-पद्धतीचा उद्देश ३.६.६ नमुना-निवडीचे प्रकार ३.७ प्रस्तुत संशोधनातील नमुना निवड ३.७.१ नमुना निवड पद्धती ३.७.२ अकोला जिल्हयातील २८८ शाळांपैकी तालूकानिहाय निवड केलेल्या शाळांची संख्या दर्शविणारा तक्ता ३.७.३ नमुना निवडीची कार्यपद्धती ३.८ संशोधनाची साधने ३.८.१ पदनिश्चयन श्रेणी ३.८.२ प्रश्नावली ३.९ प्रस्तुत संशोधन साधनाची निवड ३.१० प्रस्तुत संशोधन साधनांचे विश्लेषण तक्ते ३.१०.१ उद्दिष्ट क्र. १ करिता संशोधन साधनांचा विश्लेषण तक्ता ३.१०.२ उद्दिष्ट क्र. २ करिता संशोधन साधनांचा विश्लेषण तक्ता ३.१०.३ उद्दिष्ट क्र. ३ करिता संशोधन साधनांचा विश्लेषण तक्ता ३.१०.४ उद्दिष्ट क्र. ४ करिता संशोधन साधनांचा विश्लेषण तक्ता ३.११ प्रस्तुत संशोधनातील पथदर्शक अभ्यास ३.१२ संशोधन

कार्यवाहीचा प्रवाही तक्ता ३.१३ संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही ३.१४ निष्कर्ष व शिफारशीची मांडणी ३.१५ समारोप

**४. प्रकरण ४ - संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन--२१९**

४.१ प्रस्तावना ४.२ विद्यार्थी पदनिश्चयन श्रेणी द्वारा प्राप्त माहितीचे विश्लेषण १. विद्यार्थ्यांचे नकारात्मक कौटुंबिक वातावरण दर्शविणारी सारणी क्र. १ व आलेख क्र. १ चे प्रश्ननिहाय विश्लेषण ४.३ पालक प्रश्नावली द्वारा प्राप्त माहितीचे विश्लेषण ४.४ इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षक प्रश्नावलीचे विश्लेषण ४.५ मराठी माध्यमाच्या शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक प्रश्नावलीचे विश्लेषण ४.६ समारोप

**५. प्रकरण ५ - निष्कर्ष व शिफारशी ------------------------ २३६**

५.१ प्रास्ताविक ५.३ संशोधनाचे निष्कर्ष ५.३.१ उद्दिष्ट क्र. १ - 'इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता व कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास' या उद्दिष्टानुसार विद्यार्थी पदनिश्चयन श्रेणीद्वारे प्राप्त निष्कर्ष ५.३.२ उद्दिष्ट क्र. २ – 'विद्यार्थ्याच्या शैक्षणिक विकासासाठी शिक्षणाचे माध्यम निवडतांना पालकांमधील जागरूकतेचा अभ्यास करणे' या उद्दिष्टानुसार पालक प्रश्नावलीद्वारे प्राप्त निष्कर्ष ५.३.३ उद्दिष्ट क्र.३ – 'इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या भाषिक अडथल्यांमुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेणे' या उद्दिष्टानुसार शिक्षक प्रश्नावलीद्वारे प्राप्त निष्कर्ष ५.३.४ उद्दिष्ट क्र. ४ – 'मराठी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांच्या प्रवेश न घेण्यामागील कारणांचा शोध घेणे' या उद्दिष्टाकरिता मराठी शाळा – मुख्याध्यापक व शिक्षक पदनिश्चयन श्रेणी द्वारा प्राप्त निष्कर्ष ५.४ शिफारशी ५.४.१ विद्यार्थ्यांकरिता शिफारशी ५.४.२ पालकांसाठी शिफारशी ५.४.३ इंग्रजी माध्यमाच्या शिक्षकांकरिता शिफारसी

५.४.४ मराठी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांचे प्रवेश वाढविण्याकरिता शिफारशी ५.४.५ शासनाकरिता शिफारशी ५.५ संशोधनाचे शैक्षणिक योगदान व उपयुक्तता ५.६ पुढील संशोधनासाठी विषय ५.७ समारोप

- **संदर्भग्रंथ** ---------------------------------------------------- २९२

# प्रकरण १
# प्रस्तावना

## १.१ प्रास्ताविक

कोणत्याही देशाच्या विकासात महत्वपूर्ण भूमिका ही मानवसंसाधनाची असते. मानवसंसाधनाचा विकास हा त्या देशातील शिक्षण व्यवस्थेवर अवलंबून असतो म्हणजेच देशाच्या विकासात शिक्षणाची भूमिका अतिशय महत्वाची असते. जगामधील विकसीत देशांचा विकास त्या देशातील उत्कृष्ट शिक्षणव्यवस्थेमुळे झालेला आहे. म्हणूनच शिक्षणपध्दती, शैक्षणिक धोरण, राष्ट्रीय धोरण यावर राष्ट्रीय गरजांचे प्रतिबिंब पडलेले आपल्याला जाणवते. कालानुरुप या गरजा बदलतात. त्यानुसार शिक्षणाची पुनर्रचना करणे ही आवश्यक बाब ठरते. शिक्षण हा मानवी विकासासाठी अतिशय महत्वाचा घटक आहे. शिक्षणामुळेच व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो. शिक्षणाबाबत अनेक तज्ज्ञांनी आपली मते व्यक्त केली आहेत. देशात दिले जाणारे शालेय शिक्षण हे देशाचा पाया असते. पाया मजबूत असल्याशिवाय इमारत मजबूत असू शकत नाही. आजचे अजाण बालक हे उद्याचे जबाबदार नागरीक असतात. देशातील नागरीक हे राष्ट्रीय मुल्य जपणारे, राष्ट्राभिमानी, साहसी, जिज्ञासू, सर्जनशील, राष्ट्रप्रेम जोपासणारे असावे, असे नागरीक घडवणारी परिपूर्ण शिक्षण व्यवस्था निर्माण करणे हे देशाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक असते.

ब्रिटीश राजवटीत आधुनिक शिक्षणपध्दतीचा पाया इ.स. १८१३ च्या सनदेने घातला. हा सनदी कायदा म्हणजे चार्ल्स ग्रँटने

केलेल्या आंदोलनातून मान्यता पावलेला 'चार्टर ॲक्ट' होय. या कायद्यानुसार भारतीयांच्या शिक्षणाची जबाबदारी ईस्ट इंडिया कंपनीकडे सोपविण्यात आली. भारताचे प्रशासकीय अधिकारी लॉर्ड बेंटिक यांनी शैक्षणिक समितीचे अध्यक्ष म्हणून लॉर्ड मेकॉले यांची नेमणूक केली. लॉर्ड मेकॉले यांनी शिक्षणविषयक पाझर सिध्दांत मांडला. या सिध्दांतानुसार शिक्षण फक्त उच्च वर्णीयांना द्यायचे व ते हळूहळू झिरपत झिरपत खालच्या वर्गापर्यंत पोहचेल. त्याचा मुख्य उददेश असा होता की, व्यक्तिचा अशा प्रकारचा समूह तयार करायचा जो की रक्तानी आणि रंगानी भारतीय पण त्यांची आवड, विचारसरणी, नैतिकता, बुद्धिमत्ता इंग्लिश (ब्रिटीश) स्वरुपाची असावी. ब्रिटीश राजवटीत राष्ट्रीय विकास हा शिक्षणाचा हेतू कधीच नव्हता. नोकरदार वर्ग तयार करण्यासाठी शैक्षणिक धोरण आखले गेले. भारतीय शिक्षण व्यवस्था पुर्णपणे बदलून टाकली. राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठी त्यांनी इंग्रजी शिक्षणाचा प्रसार केला आणि भारतीयांनी त्या शिक्षणाचा स्विकार सुध्दा केला. भारतामध्ये आजही इंग्रजांनी निर्माण केलेल्या शिक्षणव्यवस्थेचे प्रतिबिंब बघायला मिळते.

आपल्या देशाला ब्रिटीश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष उलटून सुध्दा आपल्या शिक्षण व्यवस्थेत इंग्रजी भाषेचा प्रभाव कायम आहे. भारतीयांच्या मनात इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिकाधिक वाढलेला दिसतो. पालकांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून बालकांना शिक्षण देणे म्हणजे आपण आधूनिक, प्रगत विचारांचे आहोत अशी भावना वाढीस लागलेली बघायला मिळते. विद्यार्थी शिक्षणव्यवस्थेचा केंद्रबिंदू असून शिक्षण हे 'विद्यार्थी केंद्री' असावे. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करणारी शिक्षण पध्दती असावी.

विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, तर्कशक्ती, जिज्ञासा, आकलन क्षमता वाढीस लावणारी पध्दती आवश्यक आहे. हे उदिष्ट इंग्रजी माध्यमांद्वारे पूर्ण होण्यात अडथळे येतात. विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण देणे हे अधिक परिणामकारक असते. शिक्षणातील संकल्पना विद्यार्थ्यांना स्वभाषेतून लवकर समजतात. त्यांच्यातील जिज्ञासा जागृत होते. आकलन क्षमता विकसीत होते. विद्यार्थ्यांच्या कुटूंबातील व परिसरातील भाषेत शिक्षण दिल्यामुळे अध्ययन सहज, आनंदी होते. विद्यार्थ्यांना ताण येत नाही. जगभरात भाषा व शिक्षणतज्ञांनी केलेले विविध अभ्यास असे दर्शवितात की, मातृभाषेतून मूलभूत शिक्षण मिळाल्यास विद्यार्थी अधिक चांगली प्रगती करतात.

वर्तमानकाळात मराठी माध्यमांच्या शाळेची पालक पाल्याकरिता निवड करत नाहीत. शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातील पालकसुद्धा आपल्या पाल्याचे भविष्य उज्ज्वल व सुरक्षित करण्याच्या आशेने इंग्रजी माध्यमाच्या शाळेची निवड प्रवेशासाठी करतात. मराठी माध्यमाचा शाळेचा दर्जा, गुणवत्ता व भौतिक सुविधा यावर प्रश्नचिन्ह निर्माण करून इंग्रजी माध्यमांच्या शाळा आपल्या व्यवसायाच्या कक्षा रुंदावत आहे. 'गाव तिथे जिल्हा परिषदेची मराठी शाळा' असे चित्र असणारे महाराष्ट्र राज्यात आज 'गाव तिथे इंग्रजी शाळा' असे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. त्याचबरोबर शहरी भागातसुद्धा प्रशस्त मोठमोठ्या शाळांच्या बिल्डिंग बहुतेक सुविधा पालकांना आकर्षित करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा ओढा शहराकडे स्थलांतर अगदी प्राथमिक स्तरापासून येताना दिसतो, ही बाब चिंतेची आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतल्यानंतर निर्माण होणारे शैक्षणिक समस्या, भाषिक अडथळे याविषयी प्रवेश घेताना कुठलाही पालकांमार्फत विचार केलेला नसतो. शालेय शिक्षण मातृभाषेतून

घेतल्यामुळे बालकांच्या आकलनशक्तीस भरपूर चालना मिळते. संकल्पना लवकर समजतात व इंग्रजीसह सर्व विषयांचे उत्तम आकलन होते. मातृभाषेतून शिकल्यामुळे वाचनाची आवड निर्माण होऊन उत्तम ज्ञान, जिज्ञासा निर्माण होते. संशोधन वृत्ती व अभिरुची संपन्न व्यक्तिमत्व तयार होते. याउलट जर बालकांना इतर भाषेतून शिक्षण दिल्यामुळे अध्ययनात अडचणी येऊन बालकांना मानसिक ताणतणाव येतो. याबद्दल पालक जागरूक नसतात. प्रस्तुत संशोधनात स्थानिकभाषा व मातृभाषा शिक्षणासाठी परिणामकारक असते याविषयी जाणीव निर्माण करणे, देशाचा उज्ज्वल भविष्यसाठी उत्तम मनुष्यबळ, व्यक्तिमत्व निर्माण करण्यासाठी प्रस्तुत संशोधन करणे महत्त्वाचे ठरेल. प्राथमिक शिक्षक हा अतिशय महत्त्वाचा टप्पा असतो. त्यात मुलांचा बौद्धिक, मानसिक, भावनिक, शारीरिक विकास होत असतो. त्यामुळे तरुण व प्रौढावस्थेतील अनेक समस्या आपण टाळू शकतो. पण या वयात मुलांना शैक्षणिक ताणतणावाला सामोरे जावे लागते. पालकांच्या अपेक्षा, शिक्षकांची अपेक्षा, शाळेतील गृहपाठ, शिकवणीवर्ग, परीक्षेचे दडपण, स्पर्धेच्या युगात टिकण्याचा ताण, मित्रांचा ताण अशा अनेक गोष्टींचा मुलांवर ताण आलेला असतो. बऱ्याच वेळा मुलं पालकांसोबत शिक्षणाबाबत खुल्या मनाने संवाद करत नाहीत. मनातल्या मनात कुढत राहतात. याकरिता मुलांची मानसिक स्थिती पालकांनी व शिक्षकांनी वेळीच ओळखणे व त्यावर उपाययोजना करणे आवश्यक असते. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये जर काही ताणतणाव किंवा भाषिक अडथळे निर्माण होत असतील तर ते दूर करण्यासाठी यथोचित उपायोजना करून मुलांना तनावमुक्त करणे, यासाठी पालकांमध्ये दृष्टिकोन निर्माण होण्याची आवश्यकता आहे. आज पालकांची मुलांच्या शिक्षणावर भरपूर पैसा खर्च करण्याची मनस्थिती आहे. परंतु पैशाबरोबर मुलांच्या शैक्षणिक प्रगतीत स्वतः वेळ देण्याची आवश्यकता आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना विद्यार्थ्यांची मातृभाषा व शिक्षणाचे माध्यम वेगवेगळे असल्यामुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेण्यासाठी संशोधन कार्य केले. प्रस्तुत संशोधनामुळे विद्यार्थ्यांना अध्ययन करताना कोणत्या शैक्षणिक समस्या जाणवतात याविषयीची वस्तुस्थितीदर्शक माहिती मिळण्यास मदत झाली. तसेच या संशोधनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आकलन, जिज्ञासा, चिकित्सक विचार प्रक्रिया व व्यक्त होण्यात अडथळा निर्माण होऊन संभाषण कौशल्य विकसित न होण्यामागील कारणांचा शोध घेतला. विद्यार्थ्याची मातृभाषा व शिक्षणाच्या माध्यमाची भाषा वेगवेगळी असल्यामुळे निर्माण होणाऱ्या भाषिक अडथळयांची माहिती आणि विद्यार्थ्याची मातृभाषा व शिक्षणाच्या माध्यमाची भाषा वेगवेगळी असल्याने निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेतला. शिक्षण विषयक कुठल्याही योजनेच्या केंद्रस्थानी शिक्षकच असतो. कोणतिही शिक्षण योजना शिक्षकाशिवाय राबवली जाऊ शकत नाही म्हणनू शिक्षकांचे संबंधीत सर्व विषयावर त्याचे सखोल चिंतन हवे. त्यासाठी भरपूर वाचन भरपूर श्रवण करायला हवे. आपल्या दैनंदिन अध्यापनात त्याचा वापर करावा. शिक्षक ही केवळ व्यक्ती नसून संस्काराचे एक विद्यापीठ आहे. विद्यार्थी घडवून एक संवेदनशील नागरिक घडवणे आणि अशा नागरिकांच्या माध्यमातुनू राष्ट्रनिर्मिती व मनुष्य निर्माणाचे कार्य करून शिक्षक खऱ्या अथाने सृजनात्मक साधक असतो.

प्रस्तूत संशोधनात इंग्रजी माध्यमाच्या शाळेत अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना जाणवणाऱ्या समस्यांचा शोध घेणे, इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता आणि त्यांच्या शैक्षणिक विकासाबाबत पालकांच्या जागरुकतेचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला. मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश न घेण्यामागील कारणांचा शोध घेण्यात आला. विद्यार्थी संख्येच्या गळतीमुळे शिक्षक अतिरिक्त होतात. त्यामुळे नवीन शिक्षक भरती न झाल्यामुळे शिक्षक बेरोजगारीची समस्या वाढली. वंचित घटकातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल बालकांना

मोफत मिळणारे शिक्षण देणाऱ्या शाळांची दुरवस्था झाल्यामुळे या शाळा बंद पडत आहेत. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल बालकांना शिक्षणापासून वंचित राहण्याची समस्या निर्माण झाली. करीता प्रस्तुत विषयावर संशोधन करणे आवश्यक आहे.

## १.२ पार्श्वभूमी

### १.२.१ भारतातील प्राचीन शिक्षण प्रणाली

आपली भारतीय संस्कृती जशी प्राचीन आहे, तशीच आपली शिक्षण प्रणाली सुद्धा प्राचीन कालखंडापासून प्रचलित आहे. या काळात गुरुकुल शिक्षण पद्धती होती. इ.स. पूर्व बाराशे पर्यंतचा कालखंड हा साधारणतः या शिक्षण प्रणालीचा होता. या कालखंडालाच ‘ऋग्वेद काल’ असेही म्हणतात. या कालखंडात शिक्षण सर्वांसाठी मुक्त म्हणजे खुले होते ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चारही वर्णातील व्यक्तींना शिक्षण घेण्याचा अधिकार होता. पुरुषाप्रमाणेच स्त्रियांनाही शिक्षणाचा अधिकार होता. ऋग्वेदकालीन शिक्षण प्रणालीत शिक्षणाची ध्येय अत्यंत व्यापक होती. तत्कालीन शिक्षण केवळ पोटार्थी नव्हते, तसेच ते निव्वड पुस्तकी नव्हते. व्यक्तीला अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जाणे हे शिक्षणाचे ध्येय होते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे, सत्य, सेवा, नम्रता, शिस्त, संयम, कष्टाची सवय, धर्मपालनवृत्ती इत्यादी गुणांचे संवर्धन करून विद्यार्थ्यांचा मानसिक व शारीरिक विकास साधने हे शिक्षणाचे ध्येय मानले जाई. गुरुचे गुरुकुलातच वास्तव्य असे. गुरु हा ज्ञानी, चारित्र्यसंपन्न, निपक्षपाती असावा, अशी अपेक्षा असे. शिष्यांची ओळख त्याच्या गुरुवरून होई. शिष्यांच्या चांगल्या वाईट वर्तनाची जबाबदारी गुरुवर टाकली जाई.

### १.२.२ उत्तर वैदिक काळातील शिक्षण

हा कालखंड सुमारे इ. स. पूर्व १२०० ते इ. स. पूर्व ६०० पर्यंतचा मानला जातो. या काळात धार्मिक, राजकीय व सामाजिक जीवनात मोठे बदल घडून आले. या काळात ब्राह्मणांचे महत्त्व वाढले. यज्ञ, धार्मिक विधींचे महत्त्व वाढले. वर्णव्यवस्था ठार झाली. स्त्रियांचे स्थान व दर्जा घसरला. शिक्षण पद्धतीतही महत्त्वाचे बदल

घडून आले. या काळात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला. स्त्रियांच्या शिक्षणावर अनेक निर्बंध घालण्यात आले. त्यानंतर गुरुकुल पद्धती जाऊन आश्रम पद्धती विकसित झाली. आश्रमात वेदशास्त्राबरोबरच नितिशास्त्र, इतिहास, युद्धशास्त्र असे विविध विषय शिकवले जात. आश्रमातील विद्यार्थी आपल्या वर्णाला अनुसरून शिक्षण घेत. या काळात स्त्री शिक्षणाचा मात्र उत्तरोत्तर संकोच होत गेला. राजघराण्यातील स्त्रिया शिक्षण घेत. सामान्य स्त्रिया मात्र शिक्षणापासून वंचित राहिलेल्या दिसतात.

### १.२.३ बौद्धकालीन शिक्षण प्रणाली

प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीच्या विकासातील या कालखंडाला बौद्धकालीन शिक्षण पद्धतीचा कालखंड म्हणतात. साधारणता गौतम बुद्धाच्या बौद्ध धर्माच्या स्थापनेपासून तर सम्राट हर्षवर्धनाच्या राजवटीपर्यंत मानला जातो. हा कालखंड प्राचीन भारतीय शिक्षणात महत्त्वाचा मानला जातो. या काळात प्राथमिक शिक्षण बुद्ध मठात दिले जाई. उच्च शिक्षणासाठी या कालखंडात तक्षशिला, नालंदा, विक्रमशीला इत्यादी मोठ-मोठी विद्यापीठे स्थापन झाली. विद्यापीठांची स्थापना ही प्राचीन भारतीय शिक्षणाच्या विकासातील सर्वात प्रगत टप्पा मानला जातो. या विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना 'द्वार परीक्षा' नावाची अत्यंत कठीण परीक्षा द्यावी लागत असे. बौद्ध संघातून सर्वांच्या संमतीने निवडलेल्या विद्वान व चारित्र्यसंपन्न अशा भिक्षूकडे विद्यापीठाची प्रशासकीय सूत्रे दिली जात. बौद्ध विद्यापीठातून बौद्ध धर्माची शिकवण, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, शिल्पकला, संगीत, खगोलशास्त्र, व्याकरण तसेच इतर धर्माची शिकवण इत्यादी विषय शिकवले जात. हिंदू विद्यापीठात वेदविद्या, खगोल, संस्कृत, व्याकरण, धर्मशास्त्र, कला यांचे शिक्षण दिले जाई. या विषयाव्यतिरिक्त हस्तकला, वास्तुकला, शिल्पकला, विज्ञान, तंत्रज्ञान, औषधोपचार, शल्यचिकित्सा यांचेही शिक्षण दिले जाई. या विद्यापीठात देश विदेशातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असत. या काळातील काही प्रवाशांच्या प्रवासवर्णावरून असा संदर्भ

मिळतो की, या विद्यापीठात जवळजवळ ४००० ते ५००० विद्यार्थी शिक्षण घेत असत.

### १.२.४ मध्ययुगीन कालखंड

साधारण इ. स. १२०० ते इंग्रज भारतात येण्यापूर्वीचा कालखंड हा मध्ययुगीन कालखंड मानला जातो. या काळात शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात आकुंचन झालेले दिसते. ब्राह्मणांच्या वर्चस्वामुळे सर्वसामान्यांना अज्ञानाच्या अंधारात खितपत पडावे लागले. तंत्र-मंत्र व जादूटोणा यांचे प्रस्थ वाढले. अनिष्ट चालीरीती, प्रथा, परंपरा व कट्टर धार्मिक विधी, होम-हवन यांचे प्रमाण वाढले. स्त्रियांच्या वरची बंधने जास्तच घट्ट झाली. त्यांना शिक्षणाची द्वारे पूर्णपणे बंद केली गेली. सर्वसामान्यांचे जीवन अज्ञानामुळे अघोरी प्रथांच्या आहारी गेले. हा कालखंड अंधाकारमय कालखंड म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या काळात महाराष्ट्रात विविध थोर संत होऊन गेले. त्यांनी अज्ञानात खितपत पडलेल्या समाजाला जागृत करण्याचे कार्य केले.

## १.३ ब्रिटिश कालीन शिक्षण प्रणाली

### १.३.१ भारतीय शिक्षण व्यवस्थेत इंग्रजी शिक्षणाची सुरुवात

पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा हा १४९८ साली प्रथम भारतात समुद्रमार्गे आला. त्यानंतर डच, फ्रेंच, पोर्तुगीज आणि इंग्रज लोक भारतात व्यापाराच्या निमित्ताने आले. सन १६०० मध्ये इंग्लंडमधील व्यापाऱ्यांनी पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. इंग्लंडच्या एलिझाबेथ राणीकडून तशी परवानगी मिळविली. भारतामध्ये व्यापार करताना इंग्रजांना अन्य युरोपियन सत्तांशी संघर्ष करावा लागला. या संघर्षात इंग्रजांपुढे पोर्तुगीज, डच, फ्रेंच या युरोपियांचा टिकाव लागला नाही. प्रगत तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या इंग्रजांपुढे शेवटी मराठे, हैदर, टिपू, मुघल या भारतीय सत्तानां देखील हात टेकावे लागले. त्यामुळे भारतात सत्ताविस्ताराची संधी त्यांना मिळाली. २३ जून १७५७ रोजी झालेल्या प्लासीच्या युद्धात इंग्रजांनी बंगालचा नवाब सिराज उद्दोलाचा पराभव केला. इंग्रजांचा हा देशातील पहिला व महत्त्वाचा

विजय होता. प्लासीच्या लढाईने बंगालमध्ये ब्रिटिश सत्तेचा पाया घातला गेला. दिल्लीचा बादशहा शहाआलम, मिर कासीम सुजाउद्दोलाच्या संयुक्त फौजांचा ब्रिटिशांनी बक्सारच्या लढाईत पराभव केला. हे बक्सारचे युद्ध सुद्धा ब्रिटिशांच्या दृष्टीने निर्णायक ठरले.

ब्रिटिशांसोबत इतर युरोपियनांनी आपल्या व्यापारी कंपन्या स्थापन करून भारतात व्यापाराची सुरुवात केली. व्यापाराच्या माध्यमातून त्यांनी आपली स्थिती भक्कम केली. यानंतर त्यांच्या आकांक्षा वाढू लागल्या. त्यांनी भारतात जमिनी देखील खरेदी करावयास सुरुवात केली. भारतात त्यांनी धर्मप्रसाराचे कार्य सुरू केले. त्यांच्या राजकीय आकांक्षा वाढल्या. बदललेल्या परिस्थितीचा युरोपियन लोकांनी फायदा घेण्याचे ठरविले व शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. प्रश्न पडतो की युरोपियन लोकांनी भारतात शिक्षण प्रसाराचे कार्य हाती का घेतले असावे ? याचे उत्तर अगदी सरळ आहे, भारतीय लोक शिकले-सवरले तरच ख्रिश्चन धर्माची तत्वे आणि विचार आकलन करू शकतील. त्यातही ते जर पाश्चिमात्य पद्धतीने शिकले तरच त्यांना ख्रिश्चन धर्माचे तत्वज्ञान आणि विचार अधिक प्रभावीपणे समजतील. म्हणून युरोपियन लोकांनी भारतात धर्मप्रसारासाठी शिक्षण सुरू केले आणि नंतर शिक्षण संस्था स्थापन केल्या. दुसरे एक कारण म्हणजे त्यांना भारतीयांशी शिक्षण आणि शिक्षण संस्थांच्या माध्यमातून जवळचे संबंध प्रस्थापित करावयाचे होते. म्हणून मिशनरी लोकांनी भारतात शिक्षणाची विशेषत: पाश्चिमात्य शिक्षणाची सुरुवात केली.

लॉर्ड विल्यम बेटींकच्या काळात सुधारणावादी मोहीम सुरू राहिली. त्यांनी आर्थिक सुधारणा, न्यायालयीन सुधारणा, राज्यकारभाराच्या सुधारणा, शैक्षणिक सुधारणा व सतीबंदी कायदा इ.स. १८२९, ठग बंदोबस्त, नरबळी याबाबत प्रबोधन, जागृती, कायद्याचा बडगा इत्यादी माध्यमातून सामाजिक सुधारणा केल्यात.

कंपनीने प्रशासकीय सुधारणा व न्यायव्यवस्थेकडेही लक्ष दिले. आधुनिक न्यायपद्धतीचा पाया या काळात घालण्यात आला. महसूल व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी कायमधारा, रयतवारी, महालवारी यासारख्या महसूल पद्धती भारतातील विविध प्रांतात राबवण्यात आल्या. यातून कंपनीने तिजोरी भरण्याचे प्रयत्न केल्याचे दिसून येते. याचा परिणाम भारतीय शेती व शेतकऱ्यावर झाला. भारतीय शेतकरी अधिकच नाडला गेला. ईस्ट इंडिया कंपनीने भारतामध्ये व्यापार करता-करता साम्राज्य निर्माण करून आपली प्रशासन व्यवस्था स्थापन केली. सन १८५७ च्या उठावानंतर कंपनीच्या सत्तेचा शेवट झाला व ब्रिटिश पार्लमेंटची सत्ता १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्याने स्थापन झाली.

**१.३.२ मिशनरी शिक्षण -**

प्राचीन काळापासून भारताचे पाश्चिमात्य देशाशी व्यापारी संबंध होते. भारतातील रेशमी वस्त्र व रत्नांना प्राचीन काळामध्ये परदेशातून मागणी होती. वास्को-द-गामाने जलमार्ग शोधून काढल्यामुळे अनेक व्यापारी कंपन्या भारतात येऊ लागल्या. यामध्ये तीन कंपन्या महत्त्वाच्या होत्या १६०० साली ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी, १६०२ साली डच ईस्ट इंडिया कंपनी व १६६४ फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी या कंपन्यांमध्ये व्यापारी स्पर्धा सुरू होती. त्याचबरोबर शिक्षण प्रसाराचे काम या कंपन्यांनी केले. कंपन्यांच्या शिक्षण प्रसाराच्या कार्याला 'मिशनरी शिक्षण' असे म्हटले जाते.

**१.३,२.१ युरोपियन मिशनऱ्यांचा भारतातील शिक्षण प्रसार :-**

भारतात व्यापाराच्या निमित्याने आलेले युरोपियन भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व धार्मिक परिस्थिती पाहून व्यापाराबरोबरच वेगळा विचार करू लागले. ख्रिश्चन धर्मप्रचारासाठी व राजसत्ता हस्तगत करण्यासाठी ही भूमी सोयीस्कर आहे, याची त्यांना खात्री पटली. यामधील राजकीय अनागोंदी, दारिद्र्य, अज्ञान, धर्म वेडेपणा व अंधश्रद्धा, जाती-जातीतील संघर्ष व वितुष्ट, धार्मिक-शोषण आणि सर्वसामान्य माणसाची दुर्दशा, सामाजिक ऐक्याचा अभाव व विज्ञान निष्ठा, पारंपारिक रूढी, संकेत, अनिष्ट चालीरीती यांच्या विषयी

दुराभिमान या सर्व सामाजिक परिस्थितीचा धार्मिक आणि राजकीय फायदा उठवण्याचा विचार मिशनऱ्यांनी केला व शिक्षण प्रसारसाठी प्रयत्न सुरू केले. शिक्षण संस्था स्थापन केल्या.

### १.३.२.२ भारतातील मिशनरी शिक्षणाची ध्येये :-

१) शिक्षणाद्वारे भारतीयांच्या मनात ख्रिश्चन धर्माविषयी आपुलकी व प्रेम निर्माण करणे.

२) भारतीयांच्या सामाजिक आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणाचा फायदा घेऊन त्यांच्याशी जवळचे संबंध प्रस्थापित करणे.

३) भारतात पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षण संस्था स्थापन करणे.

४) ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी बायबलचे भाषांतर भारतीय भाषात करण्यासाठी शिक्षण प्रसार करणे.

५) भारतातील प्रचलित शिक्षणाबरोबरच पाश्चात्य शिक्षण भारतातील मिशनऱ्यांच्या मुलाबाळांना देणे आवश्यक होते, म्हणून मुलांसाठीची गैरसोय दूर करून त्यांना पाश्चात्य शिक्षण उपलब्ध करून देणे.

६) भारतीयांच्यात धर्मांतर घडवून आणणे व धर्मांतरित लोकांच्या जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी व्यावसायिक शिक्षण देणे.

## १.४ ब्रिटिशांचे ईस्ट इंडिया कंपनीद्वारे भारतातील शिक्षण प्रसाराचे कार्य

ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय शिक्षणाबाबत मूलगामी स्वरूपाचा विचार केला नाही. जेव्हा वेगवेगळे भारतीय लोक किंवा अधिकारी भारतीय शिक्षणाबाबत सुचवत, तेव्हा कंपनीचे अधिकारी सर्वांचे म्हणणे ऐकून घेत. कोणाला दुखवत नसत. संपूर्ण देशभर ईस्ट इंडिया कंपनीचे शिक्षण विषयक धोरण एकाच प्रकारचे नव्हते. काही ठिकाणी भारतीय देशी भाषांना उत्तेजन द्यायचे तर काही ठिकाणी इंग्रजी शिक्षणाचे जाळे पसरायचे. स्थानिक परिस्थितीनुसार शिक्षण विषयक धोरण बदलत असे.

वॉरेन हेस्टिंग्सच्या उत्तेजनामुळे सर विल्यम जोन्स यांनी कलकत्त्याला 'बंगाल एशियाटिक सोसायटी' १७६४ स्थापन केली. अशा प्रकारे ब्रिटिश शासनाकडून पौरात्य शिक्षणासाठी तुरळक प्रयत्न करण्यात आले. इंग्रजी शिकविण्याकरिता भारतीय प्रांतात ठिकठिकाणी शाळा स्थापन करण्याची कल्पना कंपनी समोर मांडण्यात आली. ही कल्पना मांडणारा कंपनीचा मुलकी नोकर सर चार्ल्स ग्रॅंट हा होता. भारतातील अज्ञान नष्ट करायचे असेल तर लोकांना इंग्रजी शिकण्याशिवाय दुसरा मार्ग नाही, असे त्याचे मत होते. इंग्लंडला गेल्यानंतर त्याने ईस्ट इंडिया कंपनीला एक निवेदन सादर केले व भारतात शाळा स्थापन करण्याची मनधरणी केली. त्यात त्याला यश आले नाही. या त्याच्या मुद्द्याचे महत्त्व भारतात वास्तव्यात असणाऱ्या लोकांच्या लक्षात आले. त्यांनी ग्रॅंटच्या सूचनेचे महत्त्व ओळखून मद्रास व बंगाल प्रांतात इंग्रजी शाळा सुरू करण्याचा प्रयत्न चालवला. विल्यम कॅरे या मिशनरी माणसाने बंगालमध्ये शिक्षण क्षेत्रात महत्त्वाचे कार्य केले. सरकारी मदत न घेता कॅरे व त्याच्या मित्रांनी बंगालमध्ये इंग्रजी शिक्षणाचा पाया घातला. ठिकठिकाणी इंग्रजी शाळा सुरू केल्या. बायबलचे बंगाली भाषेत भाषांतर केले. यानंतर डेव्हिड हेअर व राजाराम मोहन राय यांनी हिंदू कॉलेजची स्थापना केली. शिक्षणाबाबतची जागृती लक्षात घेऊन इ. स. १८१३ मध्ये कंपनीने दरवर्षी शिक्षणाच्या विकासाकरिता एक लाख रुपये खर्चाची तरतूद करावी असा आदेश दिला. १८२३ मध्ये बंगालमध्ये शिक्षणाचा विकास करण्यासाठी एक शिक्षण समिती नेमण्यात आली व कलकत्त्याला एका संस्कृत महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

### १.४.१ १८१३ चा सनदी कायदा चार्ट :-

चार्जग्रेडच्या आंदोलनातून मान्यता पावलेला चार्टर ॲक्ट पुढे १८१३ चा सनदी कायदा म्हणून ओळखला जाऊ लागला. या सनदी कायद्यानुसार ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या ताब्यात असलेल्या मूलखाची शिक्षण विषयक जबाबदारी स्वीकारली. या कायद्यानुसार ख्रिश्चन धर्म प्रसारकांना भारतात ख्रिश्चन धर्म प्रसार

करण्याची परवानगी मिळाली. यानंतर भारतात शाळांमधून धर्मप्रसाराबरोबर बायबलची सक्ती करण्यात आली.

**१.४.१.१ सनदी कायद्याचे ४३ वे कलम :-**

१) १८१३ च्या सनदी कायद्याच्या कलम नंबर ४३ नुसार भारतीय लोकांच्या शिक्षणाचे उत्तरदायित्व कंपनीकडे सोपवण्यात आले.

२) या ४३ व्या कलमांमध्ये असे नमूद केले होते की, भारतीयांच्या शिक्षणावर दरवर्षी कमीत कमी एक लाख रुपये खर्च करण्यात यावे.

३) मिशनऱ्यांच्या शिक्षण प्रसाराच्या कार्याला परवानगी देणे.

भारतात ईस्ट इंडिया कंपनीने शिक्षण प्रसाराचे कार्य बंगाल, मद्रास, मुंबई या त्यांच्या वसाहतीच्या ठिकाणी केले. यामध्ये बंगालमध्ये १८२३ साली एक समिती स्थापन करून शक्य असणाऱ्या सर्व मार्गांनी शिक्षण प्रसाराचे कार्य केले. मुंबईमध्ये भारतीय आणि युरोपीय पद्धतीने शिक्षण प्रसार करायला प्रोत्साहन दिले. येथे त्यांनी शिक्षण पद्धतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अनुदान पद्धती सुरू केली. मद्रास प्रांतातील शिक्षण प्रसार फारसा समाधानकारक नव्हता. १८१३ च्या सनदी कायद्यामध्ये कोणत्या प्रकारच्या शिक्षणावर खर्च करावयाचा याचा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे कंपनी सरकारच्या कर्मचाऱ्यांमध्ये वाद निर्माण झाला आणि तोच वाद पाश्चात्य पौर्वात्यवाद म्हणून ओळखला जातो. या वादामध्ये भाग घेणारे दोन घटक होते. त्यातील एक गट पौरात्यवादी व दुसरा गट पाश्चात्यवादी होता. या वादावर निर्णय घेण्यासाठी कंपनीने फार हालचाली केल्या नाहीत. या वादात दहा वर्षे अशीच निघून गेली.

**१.४.१.२ १८१३ च्या कायद्यातील शिक्षण विषयक तरतुदी :-**

कंपनीचा क्षेत्रीय विस्तार वाढत होता. त्यामुळे कंपनीला दुसरी सुचना जारी करणे गरजेचे होते. ३० ऑगस्ट १८३३ मध्ये

भारतीय शिक्षणासंबंधी एक सुचना जारी केली. त्यातील खालील सुचना महत्त्वाच्या आहेत.

१) सर्व देशातील मिशनऱ्यांना आपल्या धर्माचा भारतात प्रसार करण्याची सवलत देण्यात आली.
२) शिक्षणाचे अनुदान १० हजारावरून एक लाख रुपयापर्यंत वाढवण्यात आले.
३) गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलमध्ये चौथा सदस्य म्हणून कायदा सदस्याची नियुक्ती करण्यात आली.
४) या कायद्याच्या सार्वभौमत्वाचा भारतातील शिक्षणावर मोठा प्रभाव पडला.

इसवी सन १८३३ च्या कायद्याला भारतीय शिक्षणाच्या इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले.

### १.४.२ भारतीय शिक्षणात लॉर्ड मेकॉलेचे योगदान :-

१० जून १८३४ ला लॉर्ड मेकॉले गव्हर्नर जनरल कौन्सिलचा कायदेविषयक सल्लागार म्हणून भारतात आला. यावेळी पौरात्यवाद व पाश्चात्यवादाने उग्र रूप धारण केले होते. विश्वास होता की मेकॉले हा वाद चुटकीसरशी सोडवेल. त्याने मेकॉलेला बंगालच्या लोकशिक्षण समितीचे सभापती केले. मेकॉलेने १८१३ च्या ४३ व्या कलमाचा बारकाईने अभ्यास केला. पौरात्य-पाश्चात्य वादावर सुद्धा अभ्यास केला व आपला सल्ला विवरण पत्राच्या स्वरूपात लेखनबद्ध करून २ फेब्रुवारी १८३५ ला लॉर्ड बेटिंककडे पाठवला.

### १.४.२.१ मेकॉले कडून १८१३ च्या सनदी कायद्याच्या कलम ४३ चे स्पष्टीकरण :

१) मेकॉलेनी असे स्पष्ट केले की, शिक्षणावर दरवर्षी एक लाख रुपये कसे खर्च करावेत
याबाबत कोणत्याही प्रकारचा निर्बंध नाही. हा पैसा सरकार आपल्या इच्छेप्रमाणे खर्च करू शकते.

२) भारतीय विद्वान या शब्दाच्या अनुषंगाने संस्कृत पंडित व मुसलमान मौलवीच नव्हे तर यामध्ये इंग्रजी भाषेतील विद्वानांचा सुद्धा समावेश होऊ लागला.
३) साहित्य किंवा वाङ:मय यामध्ये अरबी व संस्कृत भाषेबरोबरच इंग्रजी भाषेचा सुद्धा समावेश होऊ शकतो.

**१.४.२.२ भारतीय देशी भाषा व इंग्रजी :-**

पौरात्यवाद व पाश्चात्य वादामध्ये आपली परखड मते मेकॉलेने मांडली आहेत. मेकॉलेनी एतद्देशिय शिक्षण व साहित्य अध्ययनाला प्रखर विरोध केला आहे. त्याने असे म्हटले की, इंग्रजी ही नवीन ज्ञानाची गुरुकिल्ली आहे तसेच ती भारतीयांवर राज्य करणाऱ्या शासनकर्त्यांची भाषा आहे. इंग्रजी भाषेमुळे भारताचा विकास घडून येईल. त्याचबरोबर स्वतः भारतीय सुद्धा भारतीय भाषांपेक्षा इंग्रजी भाषेमधून शिक्षण घेण्यास उत्सुक आहेत. या पद्धतीने भारतीय भाषांचा अभ्यास कसा निरर्थक आहे हे दाखवून इंग्रजी भाषेला उच्च स्थान दिले.

मेकॉलेच्या विवरण पत्राची स्वीकृती करून लॉर्ड विल्यम बेटिंग्रे ७ मार्च १८३५ ला शिक्षण विषयक जाहीरनामा प्रसिद्ध केला. या शिक्षण विषयक जाहीरनाम्यामध्ये भारतीय शिक्षणाच्या इतिहासात एक वेगळे दालन निर्माण झाले. ब्रिटिश सरकारला या देशातील लोकांना सार्वजनिक शिक्षण देण्याची निश्चित दिशा मिळाली.

**१.४.२.३ भारतीय शिक्षणातील मेकॉलेच्या कार्याचे मूल्यमापन :-**

मेकॉलेच्या भारतीय शिक्षणासंबंधीच्या भूमिकेबाबत वेगवेगळया विद्वानांनी वेगवेगळी मते व्यक्त केली आहेत. काही विद्वानांनी त्याला विकासाच्या मार्गावरील प्रकाश झोत म्हटले आहे, तर काहींनी त्याला सर्व त्रासाचे कारण मानले आहे. मेकॉलेनी इंग्रजी भाषेला अवास्तव महत्त्व देऊन या ठिकाणच्या भाषांना तुच्छ ठरवले आहे. त्याने संस्कृत भाषेला हीन मानले आहे. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. भारतात ब्रिटिशांचे राज्य बळकट करावयाचे असेल तर राज्य चालवण्यासाठी इंग्रजीचे ज्ञान असलेले मनुष्यबळ आवश्यक आहे असे

त्याने स्पष्ट केले. त्याचबरोबर भारतातील लोकांना आचाराने व विचाराने इंग्रज बनवायचे होते. त्यासाठी त्यांनी टोकाच्या भूमिकेतून इंग्रजीची प्रशंसा केली.

प्रिन्सेप कडे जेव्हा मेकॉलेचा जाहीरनामा गेला तेव्हा त्यांनीही मेकॉलेच्या जाहीरनाम्यावर कडाडून टीका केली. प्रिन्सेपनी भारतीयांना एक-देशीय भाषेमधून शिक्षण देण्याचा विचार केला. असे असले तरी भारतीय शिक्षणाला प्राप्त झालेले मेकॉलेचे योगदान नाकारता येणार नाही. त्याच्या जाहीरनाम्यामुळे इंग्रजी शिक्षणाचा पाया या देशाच्या मातीत रुजला गेला. त्याचबरोबर विविध शास्त्राचे व विज्ञानाचे शिक्षण इंग्रजी भाषेतून घेणे जितके सोपे आहे, तितके अन्य भाषा मधून नाही हा विचार मांडण्यात आला.

### १.४.३ झिरप/पाझर सिद्धांत :-

भारतीय शिक्षणाच्या दृष्टीने पाझर सिद्धांत महत्त्वाचा आहे. पाझर किंवा झिरपणे म्हणजे थेंबा-थेंबाने खाली तळापर्यंत जाणे होय. हा पाझर सिद्धांताचा आधार घेत लॉर्ड मेकॉले याने भारतीय शिक्षणाबाबत हेच धोरण राबविण्याचे निश्चित केले. शिक्षण तळागाळातील सामान्य माणसांना प्रत्यक्ष देण्यापेक्षा, ते समाजातील उच्च वर्गाला दिले तर झिरपत-झिरपत ते सामान्य वर्गापर्यंत पोहोचेल, असा युक्तिवाद मेकॉलेनी मांडला. या सिद्धांताला मेकॉलेचा झिरप किंवा पाझर सिद्धांत म्हणतात.

लॉर्ड आर्कलंड यांनी हा सिद्धांत सरकारचे शिक्षण विषयक धोरण म्हणून स्वीकारला. लॉर्ड आर्कलंड यांनी २४ नोव्हेंबर १८३९ च्या आपल्या विवरण पत्राद्वारे अशी घोषणा केली की, सरकारचा उद्देश हा समाजातील उच्च वर्गामध्ये उच्च शिक्षणाचा प्रसार करणे हा असेल. या सिद्धांतामुळे इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाला व ईस्ट इंडिया कंपनीचे कर्मचारी सुद्धा अत्यंत आनंदी झाले. त्यांनी या सिद्धांताचे स्वागत केले.

### १.४.३.१ पाझर सिद्धांताचे परीक्षण :-

लॉर्ड आर्कलंड यांनी ज्या उद्देशाने पाझर सिद्धांत भारतीय शिक्षणामध्ये आणला होता, तो त्याचा उद्देश साध्य झाला नाही.

आर्कलंडला वाटत होते की, उच्च वर्गीयांनी इंग्रजीचे ज्ञान घेतले असते तर ते खालच्या वर्गापर्यंत पोहोचले असते. तसे झाले नाही कारण इंग्रजी शिक्षण घेतलेल्या उच्च वर्गीय लोकांनी फक्त स्वतःचा विचार केला आणि इंग्रजी शिक्षण घेऊन ते कंपनी सरकारचे नोकर झाले. उच्च वर्गातील लोकांनी तळागाळातील लोकांचा विचारच केला नाही. उलट ते इंग्रजांचे भक्त झाले. दैनंदिन जीवन सुद्धा हे शिक्षित लोक इंग्रजांसारखे जगू लागले. इंग्रजांना खुश ठेवणे हा एक धंदाच त्यांनी केला. उच्चवर्गीय श्रीमंत, प्रगत झाले. शिक्षित झाले. याउलट सामान्य लोक अधिक गरीब झाले. मागासलेले, हतबल झाले. उच्च वर्गातील शिकलेल्यांनी तळागाळातील माणसांना शिक्षण मिळूच दिले नाही. उलट त्यांना हलाखीचे जीवन जगण्यास भाग पाडले. यामुळे पाझर सिद्धांत हा भारतात कंपनी सरकारचे शासकीय धोरण म्हणून अधिक प्रभावी होऊ शकला नाही.

## १.५ शिक्षण हक्क कायदा २००९

एप्रिल २००९ साली आर. टी. ई. कायद्याची निर्मिती केली गेली. प्रशासकीय तसेच पालिका शाळांमध्ये ६ ते १४ वयोगटातल्या मुलांना मोफत सक्तीचे व गुणवत्ता पूर्ण शिक्षण दिले जाईल, १४ वर्ष त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत जवळील शाळेत शिक्षण घेण्याचा अधिकार राहील, शिक्षकांच्या संख्येची ग्रामीण व शहरी भागातील तफावत दूर केली जाईल, गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याच्या उद्देशाने प्रशिक्षित शिक्षकांची भरती केली जाईल, डोनेशन व इतर रक्कम आकारली जाणार नाही, प्रवेश देताना मुलाखत तसेच शारीरिक अथवा मानसिक परीक्षा नाही, मान्यता नसलेल्या शाळा चालविण्यास मनाई, रहिवासी दाखला आवश्यक नसेल. तसेच शैक्षणिक वर्षात कधीही शाळेत दाखल केले जाईल, वयानुरूप शिक्षण, शिक्षकांना जनगणना निवडणुका व आकस्मित प्रसंगातील कामाव्यतिरिक्त कुठलेही जास्तीचे काम दिले जाणार नाही. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय शिक्षण आयोगानुसार राष्ट्रीय बालक संरक्षण आयोगाची स्थापना झाली, ११ नोव्हेंबर हा दिवस मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त “राष्ट्रीय शिक्षण दिन” म्हणून साजरा करण्यात येईल.

या सर्वांच्या शिफारशी सूचना लक्षात घेतल्या तर त्या काळातील आणि भविष्यातील योग्य, सुदृढ, संस्कारीत शिक्षण घडविणे, सामाजिक, आर्थिक, राष्ट्रीय विकास घडविणे हेच शिक्षणाचे ध्येय दिसून येते. त्याचवेळी खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृती वारसा जोपासना करणे व आधुनिक ज्ञान विज्ञानाचा उपयोग करणे शक्य होईल. आजचे शिक्षण हे पूर्ण पुस्तके स्वरूपाचे आहे. ठराविक वेळेत पूर्ण पुस्तक उतरून काढणे, त्याला आजकाल परीक्षा म्हटले जाते. पुस्तकाबाहेरील कुठल्याही गोष्टीचा विचार करण्याची मुभा विद्यार्थ्यांना, शिक्षकालाही नसते. त्यामुळे विद्यार्थ्यांची स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता नष्ट होते. स्वतःच्या बुद्धीचा वापर करण्याची संधी न मिळाल्याने विद्यार्थ्यांची खरी गुणवत्ता कळू शकत नाही. पदव्यांना अवास्तव महत्त्व प्राप्त होऊन त्या मिळवण्यासाठी जीवघेणी स्पर्धा सुरू होते. याच कारणामुळे वैद्यकीय, अभियांत्रिकी तसेच अन्य शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रवेश मिळवणे ही आज जिक्रीची गोष्ट होऊन बसली आहे. ज्याचे पाठांतर उत्तम तो हुशार असा गैरसमज रूढ झाला आहे. आज त्यामुळे देशाचे फार मोठे नुकसान होत आहे. आज वाढत्या औद्योगीकरणाच्या परिस्थितीत व्यवसाय आणि प्रात्यक्षिकावर आधारित शिक्षणाची इकडे गरज आहे. परंतु ती गरज पूर्ण होत नाही. पुस्तकी शिक्षणावर जास्त भर दिलेला आढळतो. व्यक्तिविकास हा उद्देश डोळ्यासमोर ठेवल्यास नृत्य, गायन, शिल्पकला इत्यादी कला विभागांचाही शिक्षणात सखोलपणे अंतर्भाव करायला हवा. परंतू या विषयाकडे अजूनही उपेक्षेने पाहिले जाते. शारीरिक, बौद्धिक, मानसिक असा सर्वच विकास साधण्यासाठी शिक्षण पद्धतीत अमुलाग्र परिवर्तनाची गरज आहे. भाकरी मिळवून देणारे, सुसंस्कार घडविणारे, स्वदेश, स्वभाषा, स्वदेशी बांधवांच्या विषयी नितांत अभिमान निर्माण करणारे शिक्षण आहे. भविष्यात व्यक्ती विकासाबरोबरच या व्यक्तीद्वारे समाज विकास होईल व राष्ट्र सर्व दृष्टीने संपन्न होईल, असे शिक्षण मिळणे जरुरीचे आहे.

पाश्चिमात्य शिक्षणामधून स्वातंत्र्य, समता, बंधूता या मूल्यांची ओळख भारतीयांना झाली. धार्मिक शिक्षण मागे पडून धर्मनिरपेक्ष शिक्षणाचा विकास झाला. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांनी समाजातील अनिष्ट प्रथा नष्ट करून समाजात जागृती निर्माण करून समाज सुधारण्याचे कार्य केले. यातून नंतर राष्ट्र प्रेमाची भावना जागृत होण्यास मदत झाली आणि स्वातंत्र्य चळवळ हळूहळू मूळ धरू लागली. इंग्रजांनी त्यांना कारकूनी कामात मदत होईल अशा कारकून निर्माण करणाऱ्या शिक्षणावर भर दिला. मेकाले यांनी शिक्षण विषयक पाझर सिद्धांत मांडला. या सिद्धांतानुसार शिक्षण फक्त उच्चवर्णीयांना द्यायचे व ते हळूहळू झिरपत झिरपत खालच्या वर्गापर्यंत पोहोचेल असा मुख्य उद्देश होता. त्याचा मुख्य उद्देश असा होता की व्यक्तीचा अशा प्रकारचा समूह तयार करायचा, की जो रक्तांनी आणि रंगाने भारतीय पण त्याची आवड, विचारसरणी, नैतिकता, बुद्धिमत्ता इंग्लिश (ब्रिटिश) स्वरूपाची असावी. ब्रिटिश राजवटीत राष्ट्रीय विकास हा शिक्षणाचा हेतू कधीच नव्हता. नोकरदार वर्ग तयार करण्यासाठी शैक्षणिक धोरण आखले गेले. भारतीय शिक्षण व्यवस्था पूर्णपणे बदलून टाकली. राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठी त्यांनी इंग्रजी शिक्षणाचा प्रसार केला आणि भारतीयांनी त्या शिक्षणाचा स्वीकार सुद्धा केला.

### १.६ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शिक्षण

१९४७ ला भारत स्वतंत्र झाल्यानंतर साक्षरतेची गरज सर्वांनाच प्रकर्षाने जाणवली. राज्यघटनेने ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद राज्यघटनेत केली. योजना आयोगाने पण आपल्या पंचवार्षिक योजनेमध्ये शिक्षणाला अग्रक्रम दिलेला दिसतो.

### १.६.१ शाश्वत विकास

२०१५ च्या ऑगस्ट मध्ये १९३ देशांनी शाश्वत विकासाकरिता खालील १७ ध्येयांना मान्यता दिली आहे :

**दारिद्रय निर्मुलन** - सर्वत्र, सर्व स्वरूपतील दारिद्र्य / गरीबी नष्ट करणे.

**भूक निर्मुलन** - भूक नष्ट करणे, अन्नाची सुरक्षितता व सुधारीत पौष्टिकता साध्य करणे आणि शाश्वत शेतीची जाहिरात करणे.

**चांगले आरोग्य** - निरोगी आयुष्याची खात्री करून घेणे आणि सर्व वयोगटांमधील लोकांना स्वास्थ्य राखण्यास मदत करणे.

**दर्जेदार शिक्षण** - सर्वांसाठी सर्व-समावेशित व योग्य शिक्षणाची खात्री करून घेणे आणि सर्वांना आयुष्यभर शिक्षणाच्या सुसंधी मिळवून देण्यासाठी मदत करणे.

**लैंगिक समानता** - लैंगिक समानता साध्य करणे आणि सर्व महिला व मुलींना अधिकार देणे.

**शुद्ध पाणी आणि आरोग्यदायक स्वच्छता** - सर्वांसाठी पाणी आणि आरोग्यदायक स्वच्छता उपलब्ध असल्याची खात्री करून घेणे आणि त्याची व्यवस्था बघणे.

**नूतनीकरण करण्याजोगी आणि स्वस्त ऊर्जा** - सर्वांना स्वस्त, विश्वसनीय, शाश्वत आणि आधुनिक ऊर्जा उपलब्ध असल्याची खात्री करून घेणे.

**चांगल्या नोकऱ्या आणि अर्थशास्त्र** - सर्वांसाठी, कायम चालू ठेवलेली (सस्टेन्ड), सर्वसमावेशक व शाश्वत आर्थिक वाढ , पूर्ण आणि फलदायक कामधंदा / नोकरी आणि योग्य काम मिळवून देण्यास मदत करणे.

**नवीन उपक्रम आणि पायाभूत सुविधा** - विविध शब्दरचना आवश्यक: लवचिक पायाभूत सुविधा उभारणे, सर्वसमावेशक व शाश्वत उद्योगीकरण आणि भरभराटीस सहाय्य करणाऱ्या नवीन उपक्रमांना मदत करणे.

**असमानता कमी करणे** - सर्व देशांमधील व देशांची आपापसातील असमानता कमी करणे.

**शाश्वत शहरे व वसाहती –** शहरे व मानवी समाजांना सर्वसमावेशक, सुरक्षित, संवेदनक्षम आणि शाश्वत बनविणे.

**उपलब्ध साधनांचा जबाबदारीपूर्वक वापर -** साधनांचा शाश्वत उपभोग आणि उत्पादन नमुना याची खात्री करून घेणे.

**हवामानाचा परिणाम -** हवामानातील बदल आणि त्याचे परिणाम निराकारण करण्यासाठी त्वरीत उपाययोजना करणे.

**शाश्वत महासागर -** शाश्वत विकासासाठी महासागर, समुद्र, आणि सागरी साधने जतन करणे व त्यांचा सातत्याने वापर करणे.

**जमिनीचा शाश्वत उपयोग -** विविध शब्दरचना आवश्यक: जमिनीवरील पर्यावरण संस्थेचे रक्षण करणे, त्याची पुनःस्थापना करणे, त्याचा शाश्वत वापर करण्यास मदत करणे, सातत्याने जंगलांची व्यवस्था बघणे, जंगले ओसाड होण्यापासून थांबवणे, जमिनीची धूप थांबवणे व धूप झालेल्या जमिनीची पुनःस्थापना करणे आणि जैवविविधतेची हानी होण्यापासून थांबवणे.

**शांतता आणि न्याय -** शाश्वत विकासासाठी शांतताप्रिय आणि सर्वसमावेशक समाजांना प्रोत्साहन देणे, सर्वांना न्याय मिळवून देणे, सर्व पातळींवर कार्यक्षम, जबाबदार आणि सर्वसमावेशक संस्था स्थापन करणे

**शाश्वत विकासासाठी भागिदारी -** शाश्वत विकासाची पूर्तता करण्याच्या पद्धती सामर्थ्यवान करणे आणि जागतिक भागिदारीमध्ये नवचैतन्य निर्माण करणे.

### १.६.२ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण बालवाडी, अंगणवाडी पासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरांना लागू आहे. यामध्ये महत्त्वाच्या सूचना म्हणजे पाचवी पर्यंतचे शिक्षण मुलांना शक्यतो मातृभाषेतून मिळावे ही यातील एक महत्त्वाची सूचना आहे. इयत्ता सहावी पासूनच विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण घेता येणार ही महत्त्वाची बाब आहे.

सध्याच्या १०+२+३ ऐवजी ५+३+३+४ असा नवा आकृतीबंध लागू होणार आहे.

इसवी सन १९५१ मध्ये भारतात केवळ १८.३ % साक्षरतेचे प्रमाण होते. ते २०११ पर्यंत ७२.९८ % पर्यंत पोहोचले. इ.स. २०१० मध्ये केंद्र सरकारने १४ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींना शिक्षण मोफत व सक्तीचे केले. त्यामुळे शिक्षण प्रसारास मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. सर्वांना शिक्षण मिळावे. त्यासाठी सरकारने अंगणवाड्या, प्राथमिक व माध्यमिक शाळा महाविद्यालय, विद्यापीठे, रात्र शाळा, तंत्रशाळा, औद्योगिक व व्यावसायिक शिक्षणाची केंद्रे, साक्षरता प्रसारासाठी प्रशिक्षण केंद्रे या सर्व संस्थांचे देशभर जाळे उभारले. प्राचीन काळापासून आजतागायत ज्ञान संपादन, चारित्र्य निर्मिती, सामाजिक बांधिलकी, राष्ट्रीय भावना व राष्ट्रप्रेम निर्मिती, नैतिक मूल्यांची जोपासना ही शिक्षणाची महत्त्वाची उद्दिष्टे राहिली आहेत. पण २१ व्या शतकात सत्ता, संपत्ती, रोजगार यांच्या प्राप्तीसाठी शिक्षणास महत्त्व आल्याने वरील उद्दिष्टे शिक्षणात मागे पडत चालली आहेत. नोकरी मिळवणे, निर्वाह चालवणे, करियर घडवणे, व्यक्तिगत महत्त्वकांक्षा पूर्ण करणे इत्यादी उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी शिक्षण घेतले जाते. परीक्षेतील गुणांना शैक्षणिक गुणवत्ता मानले जात आहे. पूर्वी शिक्षण प्रसारासाठी तळमळीने झटणाऱ्या शिक्षण महर्षींची जागा आज भरमसाठ शिक्षण शुल्क व देणग्या घेणाऱ्या शिक्षण सम्राट यांनी घेतली असून त्यांनी शिक्षणाचा बाजार मांडला आहे. जागतिकीकरणात सरकारने शिक्षणावरील अनुदान कमी करून खाजगीकरणावर भर दिल्यामुळे शिक्षण महाग झाले आहे. या सर्व वातावरणात सर्वसामान्य विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### १.७ एकविसाव्या शतकात शिक्षणातील बदलते प्रवाह

शिक्षण सर्वच पातळयांवर विविध स्तरावर विविध क्षेत्रातून बदलत चालले आहे. काळाप्रमाणे जसा समाजात सामाजिक, सांस्कृतिक बदल होत असतो तसा, शिक्षणातही बदल घडून येत असतो. तसाच तो शिक्षण घेण्याच्या पद्धतीत तसेच देण्याच्या पद्धती होत असतो. आता दूरसंचार क्षेत्रात खूप मोठी क्रांती घडून आली

आहे. रेडिओ, टीव्ही, कम्प्युटर, मोबाईल यांच्यात मोठ्या प्रमाणात बदल घडून आले आहेत. या सर्व माध्यमांचा शिक्षणातही मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. जागतिक स्पर्धेत आपल्याला टिकून राहायचे असेल तर, आपल्याला शिक्षणाची एकविसाव्या शतकातील उद्दिष्ट ठरवावी लागतील.

**१.७.१ २१ व्या शतकातील शिक्षणाची उद्दिष्टे**

१. चारित्र्यसंपन्न नागरिक घडवणे शिक्षणाप्रती जागृत विद्यार्थी घडवणे.
२. शिक्षणाचे करियर हे ध्येय न होता ज्ञानप्राप्ती अंतिम उद्दिष्ट असावे.
३. शिक्षण एकांगी न होता बहुआयामी व्हावे.
४. शिक्षणाची घसरलेली गुणवत्ता वाढविली पाहिजे.
५. शिक्षण चार भिंतीच्या आतून बाहेर पडले पाहिजे शिक्षण हे पुस्तकातून बाहेर पडून प्रायोगिक झाले पाहिजे.
६. विद्यार्थ्यांना उपदेशाचे डोस न देता त्यांची शिक्षणाप्रती ओढ निर्माण केली पाहिजे.
७. विविध आभासी गेम्स मधून विद्यार्थ्यांना बाहेर काढले पाहिजे.
८. आपला अभ्यासक्रम आत्ताच्या विद्यार्थ्यांना आकर्षित करू शकतो का याचा शिक्षण तज्ञांनी अभ्यास केला पाहिजे.
९. शिक्षणाप्रती आणि विद्यार्थ्याप्रती तळमळ असणारे शिक्षक घडवले पाहिजेत.
१०. ज्ञान हे गुण किंवा मार्काच्या आतून बाहेर पडून कौशल्याधारित झाले पाहिजे.
११. विद्यार्थी गुण मिळवणारे मशीन नसून त्याच्याही या समाजाकडून अपेक्षा आहेत याची पालक शिक्षक आणि समाजात जाणीव निर्माण केली पाहिजे विद्यार्थ्यांना अपेक्षांच्या ओझ्यातून बाहेर काढले पाहिजे.

१२. विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेली असुरक्षिततेची भावना कमी करून त्यांना विश्वासात घेणारे, जगण्यासाठी उपयोगी असे कौशल्य आधारित शिक्षण दिले पाहिजे.
१३. घोकंमपट्टी, कॉपी, पाठांतर या गोष्टी शिक्षणातून हद्दपार झाल्या पाहिजेत. कला, वाणिज्य आणि विज्ञान या क्षेत्रांचा मेळ शिक्षणातून घालता आला पाहिजे.
१४. मातृभाषेतून शिक्षण हा विद्यार्थ्यांचा मूलभूत अधिकार आहे याची जागृती पालक आणि समाजात निर्माण केली पाहिजे.
१५. शिक्षणात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास झाला पाहिजे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार शिक्षणात व्हावा.
१६. मुळात शिक्षणातून गुणांसाठीची रस्सीखेच थांबली पाहिजे थांबवली पाहिजे मुलांची नैसर्गिक कुवत व आवड लक्षात घेऊन त्यांना शिक्षण दिले पाहिजे.
१७. पालकांच्या अपेक्षांचे दडपण कमी केले पाहिजे. शिक्षण स्वातंत्र्य ही संकल्पना समाजात रुजवली पाहिजे.
१८. एकविसाव्या शतकातील आव्हाने पेलू शकणारे शिक्षण निर्माण केले पाहिजे.
१९. ब्रिटिशांच्या धरतीचे फक्त कारकून बनविणारे शिक्षण स्वातंत्र्यानंतरही चालू आहे ते थांबविले पाहिजे.
२०. विविध स्पर्धा परीक्षांच्या नावाखाली दहा ते बारा बारा तास चालणारे शिक्षण थांबविले पाहिजे.

## १.८ पाल्याच्या शिक्षणाच्या माध्यमाबाबत एकविसाव्या शतकातील पालकांची भूमिका

जननी आणि जन्मभूमी ही निसर्गानेच आपल्याला बहाल केली आहेत.

**"जननी जन्मभूमीस्य स्वर्गादपि गरीयसी !"**

अगदी त्याचप्रमाणे मातृभाषा ही आपल्याला मिळालेले वरदानच आहे. तिचे महत्त्व वेळीच उमगले नाहीत तर काही

निवडक भाषा वगळता देशातील नव्हे जगातील अनेक भाषा नामशेष व्हावयास वेळ लागणार नाही.

आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येक पालकाचे स्वप्न आहे की, आपले मूल हे इंग्रजी शाळेमध्ये शिकले पाहिजे. कारण इंग्रजी ही जागतिक मान्यता मिळालेली भाषा आहे. उच्च शिक्षणासाठी त्याच भाषेचा उपयोग करावा लागणार असल्यामुळे इंग्रजी भाषेतून शिक्षणाला अतिरिक्त महत्व प्राप्त झाले आहे. खरंच इंग्रजीतून शिक्षण घेणे हे इतके आवश्यक आहे का ? इंग्रजी भाषा इंग्रजांनी आपल्या देशात १४ व्या शतकात आणली. म्हणजे त्या आधीच्या काळात आपल्या देशात विद्वान नव्हते का ? आपल्या वक्तव्याने अमेरिका आणि नंतर युरोपला मंत्रमुग्ध करणारे स्वामी विवेकानंद यांनी त्यांचे पूर्ण शिक्षण इंग्रजी भाषेतून घेतले होते का ?

मातृभाषेतून मुलांना शिक्षण देणे अनेक पालकांना कमीपणाचे वाटते. इतर माध्यमांच्या शाळांमध्ये इंग्रजी शिकवण्याचे धडे दिले जातात. परंतु इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मातृभाषा बोलण्यास मनाई केली जाते, शिक्षा केली जाते, हा किती विरोधाभास आहे ? मातृभाषा ही संस्कृतीची जननी आहे. मातृभाषेतून मुलांचा बौद्धिक विकास अधिक होतो. मातृभाषेतून मुलांचे व्यक्तिमत्व घडत असते. याला शास्त्रीय आधारही आहे याविषयी अनेक प्रयोग केले गेले आहेत.

वैश्विक संशोधनाच्या मते, सुरुवातीचे म्हणजे प्राथमिक शिक्षण तरी मातृभाषेतूनच झाले पाहिजे. कमीत कमी ४५ ते ६० शब्द प्रति मिनिट या वेगाने तरी मातृभाषेतून अस्कलित वाचता आले पाहिजेत आणि ते जे वाचत आहेत ते त्यांना समजले देखील पाहिजे आणि अशी क्षमता एकदा प्राप्त झाली की इतर भाषाही सहज अवगत होऊ शकतात. प्राथमिक पायरीतच जर इतर भाषेतून, मातृभाषे व्यतिरिक्त शिक्षण दिल्यास या क्षमतेच्या विकासास अडथळा निर्माण होतो आणि नंतर माध्यमिक शिक्षण घेताना विषय समजून घेणे अवघड जाते.

“Frontier of cognitive neuro science या संस्थेच्या शिक्षण तज्ज्ञ श्रीमती हेलन अॅबाडझीयांच्या निरीक्षणानुसार प्रत्येक व्यक्तीची क्षणिक स्मरणशक्ती” (Short Time Memory) केवळ १२ सेकंदच कार्यरत असते. त्यामुळे या वेळेच्या आत एखादे वाक्य वाचले गेले तरच त्याचा अर्थ समजावून घेऊन, वर्गीकरण करून बौद्धिक ग्रंथालयात जतन करून ठेवणे शक्य होते. त्यांच्या मते एक शब्द, एक किंवा एक पॉईंट पाच सेकंदात वाचला तरच तो योग्य वाचक बनू शकतो. अन्यथा त्याला त्या वाक्याचा अर्थ लागणार नाही.

अशा सावकाश वाचणाऱ्या मुलांना पुस्तकातल्या किंवा शिक्षकांनी शिकवलेल्या विषयाचे आकलन होत नाही. म्हणजेच अशी मुले जी आठ ते नऊ वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण घेत आहेत, ती वस्तूता अशिक्षितच राहतात आणि हे चित्र आपल्या भारतात सर्वसामान्यपणे दिसून येते. ही काही इतर भाषा शिकवण्यावर केलेली टीका नाही. आपले पालक म्हणतात, आमच्या मुलांना मराठी आधीपासूनच येते मग पुन्हा मराठी भाषा का शिकवावी ? इंग्रजी का नाही ? तार्किक दृष्ट्या हे सत्य भासत असले तरीही घोडचूक आहे. आठ वर्षाखालील मुले नवीन भाषा सहज शिकू शकतात. पण संशोधनाने हे दाखवून दिले आहे की जर एखाद्या भाषेवर प्रामुख्याने मातृभाषेवर प्रभुत्व असेल तरच इतर भाषेवरील प्रभुत्व मिळवणे शक्य आहे. म्हणजेच चांगली मराठी, चांगल्या इंग्रजीचा पाया आहे हेच यावरून दिसून येते. भारतातील बऱ्याच जिल्हा परिषद शाळा, महानगरपालिका शाळा ओस पडू लागल्या आहेत आणि यावर उपाय म्हणूनच राज्य शासनांनी पहिलीपासून इंग्रजी शिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. परंतु येथे फार मोठी चूक होत आहे. इंग्रजी महत्त्वाची आहे पण, त्याहीपेक्षा महत्त्वाचे आहे मातृभाषेतून वाचन, आकलन, लेखन !

शिक्षणतज्ज्ञ अॅबाडझी यांनी आणखीन एका प्रयोगावर लक्ष वेधले आहे. झांम्बीयामधे विद्यार्थ्यांच्या एका गटाला पहिलीपासून दोन्ही, स्थानिक व इंग्रजी भाषा शिकवण्यात आल्या. इंग्रजी भाषा

तोंडी स्वरूपात शिकवण्यात आली. दुसऱ्या इयत्तेत ती लेखी व तोंडी स्वरूपात शिकवण्यात आली. याचा निष्कर्ष धक्कादायक होता. दोन्ही भाषेचा निकाल सरासरीपेक्षा कमी लागला. दुसऱ्या एका गटाला पुढील इयत्तामध्ये इंग्रजीची ओळख करून देण्यात आली. त्यांचे लेखन व वाचन क्षमता सरासरीपेक्षा कितीतरी पटीने जास्त होती. या प्रयोगा नंतर हीच पद्धत रूढ झाली. यावरून आपण धडा घेतला पाहिजे.

इंग्रजी शिक्षण निर्विवाद पणे अत्यंत आवश्यक आहे. इंग्रजी भाषा जागतिक स्तरावरील भाषा आहे. इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व व्यक्तीची मिळकत वाढवू शकते. चीनही इंग्रजी शिक्षणाचे धडे घेऊ लागला आहे. परिणामतः प्रत्येक पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमात शिकवण्याचा ध्यास धरू लागला आहे परंतु इंग्रजी भाषा शिकणे आणि सर्व विषय इंग्रजीतून शिकणे या दोन गोष्टींमध्ये गफलत होते आणि मग मुलांना अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे न्यूनगंड निर्माण होऊन बौद्धिक व मानसिक विकास खुंटतो. आत्मविश्वासाला तडा जातो आणि चुकीचे निर्णय घेऊन मानसिक ताणतणाव उद्भवतो. कोणत्याही विषयाचे मातृभाषेतून अधिक आकलन होऊ शकते इतर भाषांमध्ये घोकंमपट्टीच करण्याची शक्यता अधिक असते.

पालकांच्या मनात एक शंका, संभ्रम असतो की, काही विषयातील ज्याप्रमाणे विज्ञान आणि गणितामधील संकल्पना त्यांनी मातृभाषेत अवगत केल्या तरी उच्च शिक्षण घेताना मात्र त्यांना इंग्रजीतून शिकावे लागत असल्याने त्या पुन्हा इंग्रजीतून समजावून घेताना त्रास होतो. शंका रास्तच आहे. तांत्रिक उच्च शिक्षण मातृभाषेतून उपलब्ध नाही हे आपल्या देशाचे दुर्भाग्य आहे. परंतु एवढ्यासाठी मातृभाषेला लाथाडून चालणार नाही. यावर उपाय म्हणजे मातृभाषा आणि इंग्रजी यांचा सुवर्णमध्य साधणारी, नव्याने उदयास आलेली सेमी इंग्रजी शिक्षणाची संकल्पना...! या पद्धतीत मुलांना विज्ञान व गणित हे विषय इंग्रजीतून समजावून दिले जातात. सेमी इंग्रजी पद्धतीने शिक्षण घेतलेल्या मुलांच्या संकल्पना

अधिक स्पष्ट असतात. त्यांचा उपयोग त्यांना उच्च शिक्षण घेताना होतो.

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही २०२० मसुदा समितीने मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व जाणून प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले जावे असा आग्रह धरला आहे.

**१.९ मातृभाषेतून प्राथमिक शिक्षणाची उपयुक्तता**

स्वभाषेचा व संस्कृतीचा ऱ्हास हा गरिबी बेरोजगारी, कौटुंबिक हिंसा, आत्महत्या अशा सामाजिक समस्यांना जन्म देतो. मातृभाषेतून प्राथमिक शिक्षणास प्रोत्साहन देणे हे आता जगमान्य झालेले तत्त्व आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने २१ फेब्रुवारी हा आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन म्हणून घोषित केला आहे. जगभरात भाषा व शिक्षण तज्ज्ञांनी केलेले विविध अभ्यास असे दर्शवितात की, मातृभाषेतून मूलभूत शिक्षण मिळाल्यास विद्यार्थी अधिक चांगली प्रगती करतात. **डॉन लॉग** हा **न्यूझीलंड** मधील एक शिक्षणतज्ज्ञ, त्याने तेथील **मावरी विद्यार्थ्यांचा** एक अभ्यास केला. यात प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून शिकलेले विद्यार्थी आणि हेच शिक्षण केवळ इंग्रजी भाषेतून शिकलेल्या विद्यार्थ्यांच्या पाहणीत त्याला असे आढळून आले की, मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण घेणाऱ्यांची कामगिरी अधिक सरस आहे. अमेरिकेत व्हर्जिनिया राज्यात **जॉर्ज मॅसोन** हे विद्यापीठ आहे. त्यातील एका शोध समितीने १५ राज्यातील २३ प्राथमिक शाळांमध्ये मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक निकालाचे १९८५ पासूनचे सर्वेक्षण केले. आपल्या निष्कर्षात त्यांनी मुलांची शैक्षणिक प्रगती व मातृभाषेतून शिक्षण घेण्याचा थेट संबंध असल्याचे अधोरेखित केले.

मातृभाषेतून शिक्षण घेण्यास आकलनीय व भावनात्मक महत्त्व आहे. **क्लिंटन रॉबिनसन्स** हा **ब्रिटिश भाषा तज्ज्ञ** असे म्हणतो की स्वभाषा सोडून जे अन्य भाषांमध्ये विशेषता प्राथमिक शिक्षण , त्यांना कालांतराने मातृभाषा निरोपयोगी वाटावयास लागते. आज संपूर्ण विश्वात ६००० बोलीभाषा आहेत. त्यापैकी प्रतिवर्षी दहा

भाषा लोप पावत आहेत व अर्ध्या भाषावर त्या लोप पावण्याचे गंडांतर आले आहे.

मानवी जीवनात भाषेला मध्यवर्ती स्थान आहे. भाषा हे स्वपरिचयाचे, स्व-प्रकटीकरणाचे एक माध्यम म्हणून ओळखले जाते. भाषेच्या माध्यमातून लोक संवाद साधतात. विचारांचे आदान प्रदान करतात. स्वभाषेचा ऱ्हास हा गरिबी, बेरोजगारी, कौटुंबिक हिंसा, आत्महत्या अशा सामाजिक समस्यांना जन्म देतो. पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना जर मातृभाषेऐवजी दुसऱ्या भाषेतून शिक्षण लादले तर त्या विद्यार्थ्यांना पुढच्या काळात झगडावे लागते. मातृभाषेतून प्राथमिक शिक्षणास प्रोत्साहन देणे, हे आता जगमान्य झालेले तत्त्व आहे. संयुक्त राष्ट्र संघाने १९९९ पासून २१ फेब्रुवारी हा 'आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन' म्हणून प्रतिवर्षी साजरा करण्याची घोषणा केली हे, त्याचे घोतक आहे.

सन २००० मध्ये डकार येथे जगातील निवडक शिक्षण तज्ज्ञांची बैठक झाली. **डॉक्टर सेलडन शेफर** हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. नोव्हेंबर २०१० मध्ये बँकॉक येथे भाषा शिक्षण व सहस्त्राब्दी विकास लक्ष या विषयावर एक आंतरराष्ट्रीय परिषद झाली. यात जगभरातील ३० देशांमधून ४०० प्रतिनिधी सहभागी झाले होते. दोन्ही ठिकाणी "मातृभाषेतून प्राथमिक शिक्षणाची उपयुक्तता" हाच मुख्य विषय होता. या दोन्ही उपक्रमांमधून काही सामायिक निष्कर्ष ठळकपणे पुढे आले.

१) प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून झाले तर अधिक लाभदायी असते मुलांचा पाया अधिक व्यापक होतो.
२) मुलांमध्ये आत्मविश्वास वाढतो व दुसरी भाषा अवगत करण्यास सुलभ जाते.
३) मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण दिल्यामुळे मुलांच्या शाळा गळतीचे प्रमाण कमी होते.
४) प्राथमिक शिक्षण दुसऱ्या भाषेतून दिल्यास विद्यार्थ्यांना स्वभाषा, संस्कृती इ. विसर पडतो.

पालक इंग्रजी माध्यमांच्या शाळांची निवड मुलांच्या प्रवेशासाठी कुठलाही सारासार विचार न करता करू लागले आहेत. सी.बी.एस.सी. व आय.सी.एस.ई. यांची संलग्नता मिळवण्यासाठी खाजगी शाळा प्रयत्नशील असतात. वस्तूतः घरी विद्यार्थ्यांच्या कानावर न पडलेल्या भाषेत त्यांना एकदम प्राथमिक शिक्षण दिले तर, त्यांच्या शिकण्याच्या पद्धतीवर विपरीत परिणाम होतो. जर पहिली सात-आठ वर्षे शिक्षण मातृभाषेतून मिळाले तर, दोन्ही भाषा ते अधिक चांगल्या गतीने शिकू शकतात. आपल्या समाजाची अशी मानसिकता झाली आहे की, इंग्रजी शिकण्याचा एकमेव पर्याय म्हणजे प्रत्येक गोष्ट इंग्रजीतून शिकणे. वस्तूतः हा समज अतार्किक आहे हे जगभरातून सिद्ध झाले आहे. दक्षिण कोरिया, जपान, जर्मनी, स्वीडन, रशिया, ब्राझील, चीन या देशांचे उदाहरण दिग्दर्शक ठरेल. या देशातील शाळांमधून इंग्रजी अवश्य शिकविली जाते परंतु तेथील शिक्षणाचे माध्यम मात्र तेथील स्थानिक मातृभाषा आहे. या सर्व देशांची अर्थव्यवस्था भारतापेक्षा सरस आहे. त्यांच्या भाषा आज समृद्ध झाल्या आहेत व त्याच भाषांमधून शिकणाऱ्या लोकांना नोबेल पुरस्कार प्राप्त झाले आहेत आणि जागतिक स्पर्धेत त्यांच्या कंपन्या आपला पाय रोवून आहेत.

## १.१० विद्यार्थ्यांची मानसिकता (Mentality /Mindset)

**स्थिर मानसिकता** | **अस्थिर मानसिकता**

### १.१०.१ मानसिक आरोग्य

मानसिक आरोग्य म्हणजे फक्त मानसिक आजार नव्हे तर त्याच्याशी आपले जीवन मूल्य आणि जीवन गुणवत्ता निगडित असते.

### १.१०.२ पालकांची मानसिकता

काही मुले सर्वसाधारण तर काही मुले प्रतिभाशाली असतात. पण बहुतांशी पालक त्यांना सकारात्मक वागणूक देत नाहीत. आधुनिक काळातील पालकांमध्ये मुलांसाठी भौतिक सुविधा पुरवण्याची स्पर्धा सर्वत्र बघायला मिळते. मुलांना वस्तू पुरवणे,

त्यांची सर्व कामे स्वतः किंवा नोकरांकडून करून घेणे यातून सतत त्यांना जपले जाते. त्यामुळे अशी अति पोषक वातावरणात वाढलेली मुले भौतिकवादी आणि भावनात्मकरित्या परावलंबी होतात. काही पालक खूप आक्रमक असतात. त्यामुळे मुले त्यांना घाबरूनच असतात आणि ते ही एक प्रकारची परावलंबन बनते

मानसिकता म्हणजे निर्णयक्षमता, विचार करण्याचा कल शक्ती समजून घेणे, आत्मविश्वास, प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोण होय.

### १.१०.३ मानसिक आरोग्याची लक्षणे

मानसिक आरोग्य लाभलेल्या व्यक्तीमध्ये सर्वसाधारण काही लक्षणे दिसतात.

१. वास्तविकतेचा स्वीकार करतात.
२. काम करण्यात नियमांचे पालन करताना नियमितता दिसते.
३. कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही व्यक्तीबरोबर जुळवून घेण्याची, उत्तम समायोजन क्षमता दिसते.
४. कौटुंबिक जीवना बरोबर समाजाचे काही तरी देणे लागतो, ही सामाजिकतेची जाणीव मानसिक आरोग्य लाभलेल्या व्यक्तीमध्ये असते.
५. विचारांमध्ये परिपक्वता असते.
६. अशा व्यक्तींमध्ये व्यवसायिक समाधान असते.
७. प्रेमाची अभिव्यक्ती दिसून येते.
८. सर्वांना सहकार्य करतात. सहकार्य वृत्ती दिसते.
९. प्रत्येक क्षण आनंदाने जगताना दिसतात. आनंददायी वृत्ती असते.
१०. प्रत्येक परिस्थितीत योग्य निर्णय घेणे, सर्व बाजूंनी विचार करणे ही वृत्ती दिसते.
११. आपल्या प्रत्येक जबाबदारीत, कर्तव्यात रस घेणारी ही व्यक्ती असते.
१२. स्वतः ध्येय उद्दिष्ट ठरवितात. त्याचप्रमाणे कार्य करत असतात, आत्मलक्षी असतात.
१३. सुरक्षिततेच्या बाबतीत आत्मनिर्भर असतात.

१४. कुटुंबातील घटकांशी जुळवून घेण्याची वृत्ती असते.
१५. गरजा, परिस्थिती यात नेहमी सुसंवाद साधतात.
१६. कर्तव्यदक्ष असतात.
१७. तणावग्रस्त परिस्थिती निर्माण झाली तरी तणाव कपातीकरण सहजपणे करतात.
१८. समाधानी असतात.
१९. समस्यांचे निराकरण योग्य पद्धतीने करतात.
२०. सकारात्मक विचार करतात.

### १.१०.४ असंतुलित मानसिक आरोग्य

असंतुलित मानसिक आरोग्य असणाऱ्या विद्यार्थ्यांची वर्तनाबाबत सर्वसाधारणपणे खालील लक्षणे आढळतात.

१. उताविळपणा दिसून येतो.
२. आक्रमकतेचा वाढता आलेख, लवकर राग येतो.
३. चिंतेत असतात.
४. भय-भीती मनात असते ती चेहऱ्यावरही दिसते.
५. निर्णयक्षमता कमजोर किंवा खालावलेली दिसते.
६. मनाची एकाग्रता कमी होते, लक्ष केंद्रित होत नाही.
७. छोट्या छोट्या प्रसंगातून परिस्थितीमुळे ताण निर्माण झाला तर ताणाला सामोरे जाता येत नाही.
८. स्मरण प्रक्रिया कमी होताना दिसते.
९. अपयशाची भीती वाटते.
१०. शिक्षक-विद्यार्थी किंवा विद्यार्थी-विद्यार्थी आंतरक्रिया कमी होताना दिसते.
११. काही विद्यार्थी घरून शाळेत येतात परंतु वर्गात बसत नाहीत.
१२. अभ्यासात सातत्य दिसून येत नाही.
१३. आत्मविश्वास कमी जाणवतो.
१४. नकारात्मक विचार करतात.
१५. असुरक्षिततेची भावना बळावलेली दिसते.
१६. चिडचिडेपणा आढळतो.
१७. वर्तनात लहरीपणा जाणवतो.
१८. दिवास्वप्न पाहतात.

१९. विविध मानसशास्त्रीय संरक्षण यंत्रणा वापरतात.
२०. उदास दिसतात.
२१. कामात वारंवार चुका करतात.
२२. जबाबदारी टाळण्याची प्रवृत्ती दिसते.
२३. शारीरिक सुदृढता दिसत असली तरी सतत अस्वस्थ दिसतात

**१.१०.५ मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे घटक**

कुटुंब सामाजिक घटक शैक्षणिक घटक शारीरिक घटक अनुवंश परिस्थितीजन्य घटक

१) पालकांचे वर्तन १) सामाजिक १) शालेय वातावरण १) शारीरिक व्यंग
२) कुटुंबाची आर्थिक असुरक्षितता २) अभ्यासक्रम २) शारीरिक आजार
व सामाजिक स्थिती २) सामाजिक
३) परीक्षा पद्धती
३) कुटुंबाचा प्रकार तणाव ४) शिक्षकाचे वर्तन
४) कौटुंबिक तणाव
५) कौटुंबिक वातावरण
६) कौटुंबिक शिस्त
७) पालकांच्या अपेक्षा

**१.११ ओझे – पालकांच्या अपेक्षांचे की अभ्यासाचे**

शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या तसेच मुलांकडून असलेल्या अपेक्षांच्या ताणाची चिंता पालकांकडून व्यक्त केली जाते. आपले विद्यार्थी कमालीचे ओझे वाहतात. त्यांची दप्तरे फुगलेली असतात. त्यांना अनेक विषय अभ्यासावे लागतात. मुले अभ्यासात अजिबात मागे पडू नयेत. त्यांनी सतत चांगलेच गुण मिळवावेत आणि दहावीनंतरच्या स्पर्धेची तयारी त्यांनी आधीपासूनच करावी. यासाठी बहुतेक पालक त्यांना अगदी पहिलीपासून खाजगी क्लासेसला पाठवतात. याशिवाय शहरी भागातील पालक आपल्या मुला-मुलींना वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांना बसवितात. त्यासाठी क्लासला पाठवितात. चित्रकला, तबला-पेटी, नृत्य, कराटे, स्विमिंग, बॅडमिंटन, टेनिस, क्रिकेट यापैकी कोणत्या तरी छंदवर्गात घालतात आणि त्यामध्येही आपल्या मुला-मुलींनी चमकदार कामगिरी करावी

अशी अपेक्षा धरतात. इंग्रजी माध्यमाचे आकर्षण वाढत असल्याने पूर्व प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होतो आहे ही चांगली गोष्ट आहे. पालकांच्या दृष्टीने चांगल्या असलेल्या इंग्रजी शाळेतील पूर्व प्राथमिक वर्गात प्रवेश मिळावा यासाठी तयारी करून घेणाऱ्या खाजगी प्री-नर्सरी ही सुरू झाल्या आहेत आणि दोन अडीच वर्षाच्या मुला-मुलींकडून तिथे कविता वगैरे म्हणून घेण्याबरोबरच त्यांना अक्षर ओळखही करुन दिली जाते. शिक्षणाबाबत जागृत झालेला पालक ही समाजासाठी अतिशय चांगली गोष्ट आहे. परंतु हाच जागृत पालक आपल्या आशा-आकांक्षाही मुलामुलींवर लादतो आहे. दुसरीकडे शिक्षण क्षेत्राला सेवा उद्योगाचे स्वरूप देणाऱ्या बाजारपेठीय शक्ती नवनव्या गरजा तयार करीत आहेत आणि पालक त्या मागे धावत आहेत. या साऱ्यामुळे विद्यार्थ्यांवरील ओझे वाढत आहे. हे ओझे वाढत्या अभ्यासक्रमाचे आहे, दप्तराचे आहे, परंतु त्याचबरोबर ते पालकांच्या अपेक्षांचेही आहे.

अभ्यासक्रमाचे ओझे वाढण्याची कारणे गुंतागुंतीची आहेत. भाषा, गणित, विज्ञान, समाजशास्त्र, कला या विषयांचे शिक्षण शाळांतून दिले जाते. भारत हा बहुभाषक असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत एकाहून एक अनेक भाषा शिकाव्या लागतात. कोठारी आयोगाने त्रिभाषा सूत्र सांगितले आहे आणि त्यामुळे महाराष्ट्रात मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषा शिकाव्या लागतात. आठवीनंतर संस्कृतची भर त्यात पडते. काही इंग्रजी माध्यमांच्या शाळातही एवढ्या भाषा शिकाव्या लागतात. गणित आणि विज्ञान या विषयांचा विस्तार आठवीनंतर वाढतो. त्यामुळे अभ्यासक्रम वाढत जातो. समाजशास्त्रात इतिहास, भूगोल आणि नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र हे विषय असतात. त्यामध्ये आता अर्थशास्त्राचीही भर पडली आहे. आठवीनंतर चित्रकलेचाही अभ्यास असतो. वास्तविक यातील एखाद-दुसरा अपवाद वगळता बहुतेक विषय आपल्याकडे वर्षानुवर्षे शिकवले जात आहेत. मात्र काळानुरूप त्यात भर पडत गेली आहे. शिवाय अमुक एक विषय महत्त्वाचा आहे तर, मग करा त्याचा अभ्यासक्रमात समावेश अशी भूमिका आपल्याकडे मांडली आहे. त्यामुळे मूल्यशिक्षण, पर्यावरणशास्त्र

यासारखे विषयही अभ्यासक्रमात येऊन बसले आहे. याखेरीज वाहतुकीच्या नियमांपासून समाजसेवेपर्यंत आणि शेतीपासून औद्योगिक शिक्षणापर्यंतचे अनेक विषय अभ्यासक्रमात असावेत अशी मागणी सतत होत असते. अभ्यासक्रमातील विषय अशाप्रकारे वाढल्याने, त्यासाठीची पुस्तके आणि कार्यपुस्तिका वाढतात. खाजगी शाळांमध्ये क्रमिक पुस्तकांच्या जोडीला खाजगी प्रकाशनांच्या पूरक पुस्तकांचा अभ्यासही विद्यार्थ्यांना बंधनकारक केला जातो. शिक्षण हक्क कायद्याने पहिली ते आठवीपर्यंत अनुत्तीर्ण न करण्याची अट घातलेली असतानाही बहुतेक शाळांत अगदी पहिलीपासून परीक्षांचा बागुलबुवा निर्माण केला जातो आणि बहुतेक पालक या परीक्षांना अतिशय गांभीर्याने घेतात. अशा शाळात दर आठवड्याला कसली ना कसली तरी परीक्षा होत असते. त्यामुळे शाळा, क्लास आणि घर या तिन्ही ठिकाणी मुलांना अभ्यास करावा लागतो. अभ्यासाचे हे ओझे केवळ अभ्यासक्रमाचे नाही तर, सतत परीक्षांच्या तयारीत राहण्याचेही आहे. “आधी अभ्यास आणि नंतर इतर गोष्टी” हे आपल्याकडील अनेक कुटुंबातील ब्रीदवाक्य आहे. मुलांनी परीक्षाची तयारी करावी, चांगले गुण मिळवावेत, गुणांच्या शर्यतीत कधीही मागे राहू नये आणि यामुळेच दहावीला नंतर बारावीला आणि प्रवेश परीक्षेला (सीईटी) चांगले गुण मिळतील. चांगल्या इंजीनिअरींग किंवा मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळेल आणि पुढे अतिशय चांगल्या पगाराची नोकरी मिळून करिअर करता येईल, अशी दूरदृष्टी बहुतेक पालकांची असते. त्यामुळे पहिलीपासून सुरू झालेले हे अभ्यासाचे ओझे काही केल्या कमी होत नाही. उलट वाढत जाते. मग अनेक मुले दहावीनंतर ओझ्याखाली दबतात. आपल्या अपेक्षासाठी आपण मुलांना गमवित आहोत. याची जाणीव मात्र खूपच कमी पालकांना होते. जे काही केले ते मुलांच्या भल्यासाठीच केले आणि करीत आहोत, अशीच त्यांची भावना असते. दूरचित्रवाणीवाहिन्या, इंटरनेट, मोठमोठाले कार्यक्रम, क्रिकेट, बॅडमिंटन खेळात भारतीयांच्या उंचावत असलेल्या कामगिरीमुळे आपल्या मुलांना करिअरच्या वेगळ्या पाय वाटांनी जायला लावणारे पालकही आहेत. ते मग आपल्या मुला-मुलींना अगदी

लहानपणापासून अभिनयाच्या, शास्त्रीय गायनाच्या किंवा तबला वादनाच्या क्लासला पाठवितात. काहीजण नृत्याच्या क्लासला पाठवितात. काही पालक आपल्या मुलांना घेऊन अगदी पहाटे क्रिकेटच्या मैदानात जातात किंवा बॅडमिंटन कोर्टवर जातात. इथेही मुलांच्या आवडीपेक्षा त्यांना यामध्ये कसे उज्वल भवितव्य असू शकते हीच अपेक्षा अधिक असते. यामुळे मुला-मुलींवर ओझे आपण वाढवत असतो. हे त्यापैकी अनेकांच्या गावीही नसते. काही पालकांना आपल्या मुलांनी शास्त्रज्ञ वगैरे व्हावे असे वाटत असते. ते मग त्यांना विविध संस्थांच्या स्पर्धा परीक्षांच्या किंवा ऑलम्पियाडच्या क्लासला पाठवतात. शिक्षणासह सर्व क्षेत्रात बाजारपेठीय शक्ती जोरकसपणे कार्य करत असल्याने त्या पालकांच्या अपेक्षा आणि आकांक्षा फुलविण्याचे काम करतात आणि यामुळे मुला मुलींवरील ओझे मात्र वाढत जाते.

पालकांनी फक्त मुलांच्या बलस्थानांचा शोध घ्यायचा असतो. त्यांना प्रेरणा आणि प्रेम द्यायचं असतं. स्वतःला जाणून घेण्यासाठी त्यांना प्रवृत्त करायचं असतं. त्यांचा आत्मविश्वास जागवायचा असतो. स्वतःमध्ये वसत असलेल्या दिव्यत्वाचा शोध त्यांना घेता येईल अशी परिस्थिती निर्माण करायची असते. खलील जिब्रान यांनी एक सुंदर विचार दिलाय ते म्हणतात, "तुमची मुले ही तुमची मुले नाहीत, जीवनाच्या स्वतःच्याच उत्कट इच्छेची ती मुले आहेत. ती तुमच्या हातून येतात पण तुमच्या पासून नाही आणि तुमच्या बरोबर असली तरी ती तुमची नसतात. तुम्ही त्यांना तुमचे केवळ प्रेम देऊ शकता, तुमचे विचार नाही. कारण त्यांचे स्वतःचे विचार असतात" हे एक अत्यंत तेजस्वी सत्य आहे. मुलांच्या इच्छा आकांक्षांना, त्यांच्या फुलण्याला प्रेरणा द्या, बळ द्या, योग्य वातावरण द्या, साहस द्या, सहवास द्या. खरं म्हणजे तुमच्यासाठी ती एक संधी आहे. तुम्ही ती घेतली पाहिजे म्हणजे भविष्यकाळ तुमच्यावर कृतघ्नतेचा दोषारोप करणार नाही. तुम्ही ही संधी घेतली नाही तरीही ते फुलणारच आहे. तुम्ही फक्त त्यांचे प्रेरक व्हा एवढच. आपल्या मुलाला घडत असताना पाहता तेव्हा नव्या युगाचे जरा भान राहू द्या. त्यांच्या सहवासात भरपूर वेळ घालवावा. पालक हे

आपले मित्र आहेत असं त्यांना वाटलं पाहिजे, तेव्हा ती मुलं खुलतील, स्वतःचं मन तुमच्याकडे मोकळं करतील ही काळाची गरज आहे.

पालकत्व शैली ही मुलांच्या आजच्या आणि भविष्यात त्यांच्या वर्तनावर परिणाम करते. पालक आपल्या मुलांना कसे वाढवतात हे त्यांच्यातील नातेसंबंध निर्धारित करण्यासाठी मदत करतात. प्रत्येक पालकांना आपली मुले नेहमी आनंदी आणि प्रगती करावी अशी अपेक्षा असते. यासाठी बरेच पालक आपल्या मुलांबरोबर अधिक कडक शिस्त बाळगतात. काही मोकळे सोडून देतात. मानसशास्त्रज्ज्ञांच्या मते चांगली आणि प्रभावी पालकत्व शैली नैसर्गिकरित्या येत नाही आणि एक चांगला पालक होण्यासाठी आपणास एक प्रभावी पालकत्व शैलीचे गुणवैशिष्ट्ये माहीत असणे आवश्यक आहे. बुमरिंड (१९७१) या मानसशास्त्रज्ज्ञाने पालकांचे वर्गीकरण त्यांच्या पालकनीतीनुसार खालील प्रमाणे केले आहे.

१. अधिकार गाजवणारे पालक
२. समतोल राखून वागणारे पालक
३. अति मोकळीक देणारे पालक
४. ढवळाढवळ न करणारे पालक

**१) अधिकार गाजवणारे पालक –**

ज्या मुलांचे पालक खूप कडक, अतिशय शिस्तप्रिय म्हणजेच अधिकार गाजवणाऱ्या प्रकारात मोडतात. या पालकांना नेहमीच असा विश्वास असतो की, मुलांनी त्यांचे म्हणणे बिनशर्त ऐकले पाहिजे, असे पालक मुलांना समस्या सोडवणाऱ्या आव्हानांमध्ये सामील होऊ देत नाहीत, तसेच मुलांच्या मतांना किंवा सूचनांना फारसे महत्त्व दिले जात नाही, मानसशास्त्रज्ञांच्या मते अशा पालकत्व शैलीमुळे मुलांचा आत्मविश्वास कमी असतो. मुलांना लाज वाटणे, असुरक्षितता तसेच भीती वाटणे यामुळे बऱ्याच वेळा ते अभ्यास करूनही काही क्षेत्रात मागे राहतात.

अशा पालकांनी मुलांवर काटेकोर लक्ष ठेवण्याऐवजी त्यांच्याशी मोकळेपणाने बोलावे. एकत्र चर्चा करून समस्येचे

निराकरण करावे. मुलांवर शंका घेण्याऐवजी त्यांना स्वातंत्र्य द्या, परंतु त्यांना इतके मुक्त होऊ देऊ नका कि ते निष्काळजी बनतील. पालकांनी संयमी स्वभाव सोडून मुलांवर विश्वास ठेवण्यास शिकले पाहिजे. अति समजावून सांगण्याऐवजी मुलांना त्यांच्या चुकांतून शिकू द्यावे.

२) **समतोल राखून वागणारे पालक –**

काही पालक हे शिस्तीच्या बाबतीत ठाम असतात व त्यातून मुलांच्या वर्तनास योग्य आकार देत असतात. परंतु हे करीत असताना ते अति कठोरपणे वागत नाहीत तर मुलांकडून असणाऱ्या प्रत्येक अपेक्षामागील व कृतीमागील कारणे त्या त्या परिस्थितीत स्पष्ट करतात. त्यामुळे मुले देखील सकारात्मकतेने सर्वकाही स्वीकारतात. पालकांच्या अशा वर्तनामुळे मुलं स्वतः शिस्तबद्ध वर्तन करु लागतात. वेळोवेळी पालकांकडून प्रसंगानुरूप मिळणाऱ्या विविध कारणांच्या स्पष्टीकरणामुळे त्यांच्या प्रत्येक वर्तनामागचे कारण समजून घेण्याची सवय लागते. एवढेच नव्हे तर त्या मुलांमध्ये नेतृत्व गुण विकसित होतात व अनेक वेगवेगळया सामाजिक गटांमध्ये ते सहज मिसळतात व त्या गटांमध्ये प्रियही होतात.

अशा पालकांनी त्यांच्या मुलांना त्यांच्या डोळयांनी जग पाहण्याची आणि समजण्याची संधी द्यावी. मुलांना त्यांची स्वतःची छोटी कामे करून घ्यावीत. म्हणजे ते बालपणापासूनच जबाबदार आणि आत्मनिर्भर बनतील. आपला संयम गमावण्यापूर्वी परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न करावा. शक्यतो गैरवर्तन करू नये. मुलांची तुलना करणे करण्याऐवजी त्यांना सकारात्मक राहू द्यावे. मुलांना समजावताना त्यांच्याशी प्रेम व सौम्यतने वागावे. मुलांबरोबर दर्जेदार वेळ घालवावा. त्यांच्या दैनंदिन कामात सामील व्हावे. मुलांबरोबर चित्रकला करणे, एखादी गोष्ट सांगणे, बगीच्यामध्ये सोबत जाणे यासारख्या गोष्टी मध्ये सामील व्हावे.

३) **अति मोकळीक देणारे पालक –**

पालकांचा असा एक गट आपण समाजामध्ये बघतो, जो मुलांच्या वागण्या-बोलण्याच्या बाबतीत, घरांमधील मुलांच्या वावरण्यास संबंधी तसेच त्यांच्या बाहेर येण्या-जाण्याच्या बाबतीत प्रमाणाबाहेर निश्चिंत असतो. हे पालक आपल्या मुलांना भरपूर मोकळीक देतात. त्यांचा मुलांवर अंधविश्वास असतो. अशा पालकांना आपण अति मोकळीक देणारे पालक म्हणतो. या अतिस्वातंत्र्यामुळे त्यांची मुलं बेछूट प्रवृत्तीचे होतात. त्यांना त्यांच्या भावी आयुष्यात पण कुठलीच बंधने नको असतात. समाजात वावरताना कधी तडजोड करावी लागते, तर कधी नमती घ्यावे लागते, इत्यादी बाबी त्यांच्या लक्षात येत नाहीत. त्यांच्यात संवेदनशीलता कमी असते. म्हणून विशिष्ट प्रसंगी विशिष्ट पद्धतीने वागणे, तसा प्रतिसाद देणे, अनेक सामाजिक प्रसंगात योग्य वर्तन करणे त्यांना जमत नाही.

अशा पालकांनी मुलांसमोर खोटे बोलू नये. असभ्य शब्द वापरू नयेत. मुलांवर दबाव आणण्याऐवजी त्यांच्यात सकारात्मक ऊर्जा भरावी. अपयशानंतर मुलांना ओरडण्याऐवजी यश मिळवण्यासाठी प्रोत्साहित करावे. मुलांकडून अपेक्षा बाळगू नयेत. मुलांवर अतिजास्त दबाव येणार नाही याची काळजी घ्यावी. इतरांशी तुलना करू नये. त्यामुळे न्यूनगंड निर्माण होतो. अगदी लहानशा यशाचेही मुलांचे कौतुक करावे. मुलांकडून चुका झाल्यास त्यांना प्रेमाने समजावून सांगाव्यात.

४) **ढवळाढवळ न करणारे पालक –**

साधारण प्रकारात मोडणाऱ्या पालकांचा एक गट ज्याला आपण उदासीन असं म्हणू शकतो. हे पालक अतिकडक नसतात. त्यांच्या मुलांकडून खूप अपेक्षाही नसतात व मुलाच्या प्रत्येक गोष्टींमध्ये ते खूप लक्षही देत नाहीत. मुलांना जसं वागावं वाटतं तसं वागत असतात. त्यांना ना कडक शिस्त लावण्याची गरज भासते, ना ते मुलांना अति मोकळे सोडतात. या पालकांची मुले ही फारशी महत्त्वाकांक्षी नसतात. गोंधळलेल्या मन:स्थितीतच मोठी होतात. आक्रमक वर्तन कधी करावे, नमते कधी घ्यावे याबद्दल स्पष्टता नसल्याने त्यांच्या वागण्यात आत्मविश्वास नसतो व ते काही

मानसिक गंडाना बळी पडतात. याचा परिणाम त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वावर होतो.

अशा पालकांनी मुलांच्या चांगल्या गुणांची चाचणी घेण्याची जबाबदारी असते. जिथे मुलांना तुमची आवश्यकता असेल तेथे त्यांना पाठिंबा द्यावा. पालकांचे वर्तन मुलांच्या भावनिक आणि मानसिक विकासावर परिणाम घडवून आणते, याचे भान ठेवावे. मुलाने केलेली चुक त्याच्या लक्षात आणून द्यावी. मुलाच्या प्रत्येक इच्छा किंवा हट्ट पूर्ण करू नका. आवश्यक असलेल्या गोष्टींकडे मात्र लक्ष द्या.

## १.१२ मुलांवर पालकत्व शैलीचा प्रभाव

| अधिकार गाजवणारे पालक | समतोल राखून वागणारे पालक | अति मोकळीक देणारे पालक | ढवळाढवळ न करणारे पालक |
|---|---|---|---|
| ▪ आज्ञाधारक आणि अनुरूप बनतात.<br>▪ कमी आत्मविश्वास.<br>▪ कमी आत्मसन्मान.<br>▪ कमी सामाजिक क्षमता. | ▪ मुले आनंदी यशस्वी आणि सक्षम बनतात.<br>▪ उच्च आत्मसन्मान.<br>▪ उच्च आत्मविश्वास.<br>▪ उच्च सामाजिक क्षमता. | ▪ मुले आनंदी असतात पण सक्षम नसतात.<br>▪ उच्च सामाजिक क्षमता परंतु स्वयं-नियमन आणि शैक्षणिक कमकुवतपणा. | ▪ मुले दु:खी आणि क्वचितच यशस्वी बनतात.<br>▪ कमी आत्मसन्मान.<br>▪ कमी आत्मविश्वास.<br>▪ कमी शैक्षणिक यश आणि आयुष्यातील सर्व क्षेत्रात कमी पडतात. |

## १.१३ पालक शिक्षण

### १.१३.१ बालकांच्या विकासासाठी पोषक वृत्ती पालकांमध्ये आवश्यक

सध्याच्या धगधगत्या स्पर्धेच्या युगामध्ये प्रत्येक जण धावपळ करत आहे. विभक्त कुटुंब पद्धती, नोकरी करणारे आई-वडील, दूरदर्शन, इंटरनेट, सोशल मीडिया यांचा प्रचंड पगडा,

संस्कृतीमध्ये होत असलेला बदल, मार्गदर्शन करणाऱ्यांची संख्या कमी इत्यादी कारणांमुळे मुलं एकाकी तसेच कोमेजलेली दिसतात. पालकांना आपल्या पाल्याकडे लक्ष देण्यासाठी वेळ सुद्धा मिळत नाही. बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आजही शिक्षक असफल प्रयत्न करत असतांना दिसतात. पण बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी जबाबदारी शिक्षकांप्रमाणे पालकांचीही असते. बालकांच्या उपजत क्षमता, त्यांची गोडी, गुणवत्ता व गरजा लक्षात घेऊन त्यांचा विकास पालकांना करावा लागतो. तेव्हाच त्यांचे पालकत्व यशस्वी होते.

आपल्या मुलांची मानसिकता, बुद्धिमत्ता, त्यांच्या ठायी असलेल्या सुप्त गुणांची जाणीव, त्यांच्या सवयी, बौद्धिक व शारीरिक क्षमता, त्यांच्यातील गुण-दोष, त्यांची आवड, अभिरुची इत्यादी बाबी पालकांना माहीत असाव्या लागतात. बालकांच्या विकासाच्या अवस्था व टप्पे, प्रत्येक अवस्थेचे वैशिष्ट्ये, विकासात येणारे अडथळे व ते टाळण्यासाठीचे उपाय, विकासाची साधने, व्यक्ती-व्यक्ती मधील आंतरक्रिया, संस्कार व नैतिक मूल्यांचा विकास, लैंगिक शिक्षण, समाजीकरण, मुलांचे छंद, मुलांचे औपचारिक शिक्षण, दुर्बल व प्रज्ञावान मुलांचा विकास, मुलांचा दृष्टिकोण, मुलांची अध्ययन प्रक्रिया इत्यादी घटकांची माहिती पालकांना असणे आवश्यक असते.

पालक आपापल्या परीने आपल्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत धडपडत असतात. पण पालकांना आपल्या मुलांशी कसे वर्तन करावे ? याचे परिपूर्ण ज्ञान नसते. मुलांना लागणाऱ्या वह्या, पुस्तके, कपडे इत्यादी बाबींची पूर्तता केली की आपण आपली जबाबदारी पार पाडली असा बऱ्याच पालकांचा समज असतो. विशेषतः ग्रामीण भागातील पालक दिवसभर राब-राब राबून मुलांचे पालनपोषण करतात. त्यांच्या आर्थिक गरजा भागवत असतात. परंतु जबाबदार पालकत्वाची भूमिका कशी पार पाडावी हे त्यांना समजत नाही.

**१.१३.२ बालकांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी जैविक पालकत्व आणि शैक्षणिक**

**पालकत्व**

आई-वडील हे विद्यार्थ्यांचे पहिले गुरू आहेत. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये आई-वडिलांचे म्हणजेच कुटुंबाचे योगदान मोलाचे असते. बालकाचा विकास होत असताना त्यांच्या कुटुंबामध्ये त्यांच्यावर संस्कार होत असतात. कुटुंबांमध्ये होत असलेल्या प्रत्येक बाबींचा पालकांच्या व्यक्तिमत्त्वावर कळत-नकळत परिणाम होत असतो. त्यामुळे कुटुंबामध्ये होत असलेली प्रत्येक बाब ही संस्कारात्मक, संस्कारक्षम व बालकांच्या व्यक्तिमत्वास आकार देण्यास पुरक असली पाहिजे. पण आज या धावपळीच्या युगामध्ये व अर्थार्जनासाठी कराव्या लागणाऱ्या दैनंदिन कामामुळे पालकांना आपल्या मुलांकडे लक्ष देण्यास वेळ मिळेनासा झाला आहे. आज विद्यार्थी व पालक यांच्यातील सुसंवाद कमी होत चालला आहे. मुले भावनिकदृष्ट्या अस्थिर बनत आहेत. त्यामुळे त्यांच्यामध्ये अनेक प्रकारच्या वर्तन समस्या निर्माण होत आहेत. परिणामी त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये, प्रगतीमध्ये अनेक अडथळे निर्माण होत आहेत. आजच्या पालकांना बालकांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी पालकांच्या दोन भूमिका समतोल पार पाडाव्या लागतात.

### १.१३.२.१ जैविक पालकत्व

मुलांना जन्म देणे, त्यांचे पालनपोषण करणे, त्यांना हवे नको ते बघणे, त्यांच्या शारीरिक व आर्थिक गरजा भागविणे इत्यादी बाबी जैविक पालकत्वामध्ये येतात.

### १.१३.२.२ शैक्षणिक पालकत्व

या अंतर्गत पालक मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांना चांगल्या सवयी लावतात, त्यांच्यावर चांगले संस्कार करतात, मुलांशी आपुलकीचे व प्रेमाचे नातेसंबंध प्रस्थापित करून व त्यांच्याशी वैचारिक देवाण-घेवाण करून त्यांना कार्यासाठी प्रेरित करणे, त्यांच्या शैक्षणिक विकासाकडे सातत्याने लक्ष देणे, मुलांशी अभ्यासाच्या अनुषंगाने विचार विनिमय करणे, अभ्यासेत्तर कलागुणांची मुलांना ओळख करून देतात. आपली मुले हे केंद्रस्थानी ठेवूनच करिअर व वेळेचे नियोजन करणे, घर व शाळा या दोन्ही स्तरावरील मुलांच्या वर्तनाच्या अनुषंगाने शिक्षकांशी चर्चा करणे,

मुलांना त्यांच्या शैक्षणिक व इतर अडचणीत मार्गदर्शन करणे, एवढेच नव्हे तर पालक मेळावे, पालक मार्गदर्शन शिबिरे, कार्यशाळा इत्यादी मध्ये सहभागी होऊन स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करणे इत्यादी कार्य पार पाडताना दिसतात.

आज पालक जैविक पालकत्वाची भूमिका बऱ्यापैकी पार पाडताना दिसतात, पण अज्ञानामुळे किंवा त्याबाबतची परिपूर्ण जाणीव नसल्यामुळे शैक्षणिक पालकत्वाची भूमिका प्रभावीपणे पार पाडताना दिसत नाहीत. मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने जैविक पालकत्वाबरोबरच शैक्षणिक पालकत्वाची भूमिका ही प्रभावीरीत्या पार पाडल्यास मुलांची शैक्षणिक प्रगती समाधानकारक होते. घरामध्ये तसेच शाळेमध्ये एक आवश्यक वातावरण मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित होतो. शैक्षणिक प्रगती करत असताना येणाऱ्या अडचणींवर ते सहज मात करू शकतात व आपली प्रगती साध्य करून घेतात. या सर्वांचा परिणाम म्हणून व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडून येतो.

### १.१३.३ मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी वडिलांची भूमिका

मुलांना जीवनात आई-वडील हे दोन्ही महत्त्वाच्या आहेत. घरकाम करणारी व सतत मुलांच्या सहवास राहणारी ती म्हणजे आई, त्यामुळे त्यांच्यात जवळीक निर्माण होते आणि ते आईसोबत मनमोकळेपणाने गप्पा मारू शकतात. तर वडील मात्र कामाच्या निमित्ताने नेहमी घराबाहेरच राहतात. त्यांचा सहवास मुलांना फार कमी मिळतो. आपणास नेहमी असे दिसून येते की मुले आणि वडील यांच्यात जवळीक निर्माण होत नाही. त्यामुळे मुले वडिलांना थोडेसे घाबरतात. आईकडून मुलांना प्रेम, कौटुंबिक संस्कार मिळतो. वडिलांकडून मुलांना सामाजिक संस्कार मिळत असतो. मुले हे नेहमीच मोठ्यांचे अनुकरण करत असतात. आपल्या वडिलांसारखे बनवण्याचा बरीच मुले प्रयत्न करतात. म्हणून वडिलांनी आपले वर्तन आदर्श निर्माण करणारे ठेवणे अत्यंत महत्त्वाचे असते. वडिलांच्या सामाजिक व कौटुंबिक वर्तणुकीचे मुले अनुकरण करत असतात. मुलांना योग्य संस्कार देण्यामध्ये आईबरोबरच वडिलांची भूमिका महत्त्वाची असते.

## १.१४ विद्यार्थ्यांमधील ताणतणाव

तणाव हा मोठ्या व्यक्तीप्रमाणे लहान मुलांमध्येही बऱ्याच वेळा दिसून येतो. “मुलांना कसला आलाय ताण...!” अस आपण सहज म्हणून जातो. पण प्रत्यक्षात त्यांच्या बालमनावर सुद्धा तणाव बघायला मिळतो व त्याचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर मानसिकतेवर झालेला असतो. यासाठी सजग पालकत्व असणे अत्यावश्यक आहे. तणाव हा आज जगभर भरून राहिलेला शब्द आहे. शिक्षणात, कामात, व्यवसायात, मैत्रीमध्ये, प्रेमामध्ये यासाऱ्या प्रकारच्या नात्यांमध्ये घुसलेला हा तणाव सर्वत्र बघायला मिळतो. तणाव ही तर आज एक वैश्विक समस्या निर्माण झाली आहे. मनुष्य जन्माला येण्याच्या क्षणापासून तर शेवटच्या श्वासापर्यंत कुठल्या ना कुठल्या तणावाखाली असतो. ताणतणाव हा त्याचा पिच्छा सोडत नाही. हे ताणतणाव वेगवेगळया प्रकारचे रूपे घेऊन मनुष्याच्या आयुष्यात समस्या निर्माण करतात. आयुष्याच्या विविध टप्प्यावर तणावाचे स्वरूप बदलत असते व त्याचप्रमाणे त्यांची तीव्रता कमी अधिक होत असते. बालपण, किशोरावस्था व कुमारावस्था, प्रौढावस्था यामध्ये वेगवेगळया तणावाचा प्रत्येकाला अनुभव येत असतो. विविधता आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. आपल्या आयुष्यामध्ये निर्माण होणारे ताण-तणाव यांचे व्यवस्थापन केल्यामुळे त्यांची तीव्रता कमी होते. निर्माण होणाऱ्या ताणतणाव यांना काबूत ठेवून त्यांची प्रखरता काही प्रमाणात कमी करता येते. नाहीतर तणावाचे अनेक परिणाम भोगावे लागतात. आपल्या मुलांना ताणतणावाने ग्रासले आहे हे पालकांना वेळीच कळणे गरजेचे असते. तणावग्रस्त मुलं खूपच एकलकोंडी, आत्मकेंद्री, अकाली प्रौढ होत आहेत असं दिसतं. त्यामुळे त्यांच्या वागण्यात, बोलण्यात बदल झालेला निदर्शनास येतो. मुलांमध्ये होत असणाऱ्या बदलांचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर व मानसिकतेवर प्रतिकूल होत असतो. पालकांनी वेळीच मुलांना विश्वासात घेऊन, प्रेमाने त्यांच्याशी चर्चा करून समस्या जाणून घेतल्यामुळे मुलांवरच्या ताण-तणावांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.

### १.१४.१ तणावाचे प्रकार

**१.१४.१.१ बाह्य -**

ताणतणावाची कारणे - व्यक्तीच्या शारीरिक, मानसिकतेशी संबंधित नसून बाहेरची असतात. वयात येताना होणारे शारीरिक बदल, कौटुंबिक वातावरण, भावंडा बरोबरचे संबंध, कुटुंबातील मतभेद, शालेय अपयश, विभक्त कुटुंब, एक पालकत्व, सावत्र पालकत्व, पालकांचे विवाहबाह्य प्रेमसंबंध, गटामध्ये स्थान प्रस्थापित करण्यात असमर्थता, आर्थिक परिस्थिती, चुकीची व्यवसाय निवड, लैंगिक प्रेरणेचा अभाव, गृहपाठाचे वाढते प्रमाण, पालकांच्या अपेक्षा, परीक्षेबद्दलची भीती, स्व-पणाची कमतरतेची भावना, आत्मविश्वासाचा अभाव, जवळच्या व्यक्तीचा मृत्यू आणि पालक पाल्यातील संवादाचा अभाव, पालकांच्या अपेक्षा, प्रवृत्ती, श्रद्धा, मूल्य, शालेय वातावरण, आयुष्यात आलेले अडथळे, सामाजिक देवाण-घेवाण, दैनंदिन कटकटी इत्यादी

**१.१४.१.२ अंतर्गत -**

जेव्हा कारण बाह्य नसून व्यक्तीच्या शरीराशी, मनाशी संबंधित असतात. जीवनाबद्दलचा दृष्टिकोण, पूर्वानुभव, इच्छा, गरजा, भावना, स्वभाव व सर्व कल्पना, नैराश्यपूर्ण विचार करणे, स्वतःवर टीका करणे, अवास्तव अपेक्षा, प्रत्येक गोष्ट मनाला लावून घेणे, अतिशय ताठरपणा इत्यादी

**१.१४.१.३ ताणाचे व्यक्ती कार्यावर होणाऱ्या परिणामानुसार दोन प्रकार**

**चांगला ताण** : कमी व अल्पशा ताणामुळे व्यक्तीची कार्यक्षमता वाढते, त्यास चांगला ताण असे म्हणतात.

**हानिकारक ताण** - प्रतिकूल परिणाम करणारा ताण म्हणजे हानिकारक ताण होय. त्यामुळे व्यक्तीची कार्यक्षमता कमी होते.

**१.१४.१.४ ताणाच्या उपयुक्ततेनुसार ताणाचे प्रकार**

**उपकारक ताण** - ज्या ताणाचा व्यक्तीला उपयोग होतो म्हणजे फायदेशीर ठरतो, त्याला उपकारक ताण म्हणतात.

**अपकारक ताण** - ज्या ताणामुळे व्यक्तीला त्रास होतो, त्यामुळे नुकसान होते, त्याला अपकारक ताण असे म्हणतात.

**अतिरिक्त ताण** – ताणकारक प्रसंग वाढत जाऊन ज्या प्रसंगांना सामोरे जाण्याची क्षमता कमी पडते, अशा वेळी जे ताण येतात त्यांना अतिरिक्त ताण असे म्हणतात.

**निम्न ताण** – कधी-कधी वेळ भरपूर असतो, पण काय करावे असा प्रश्न पडतो, अशा वेळी जो ताण येतो त्याला निम्न ताण असे म्हणतात.

एकाच वेळी एक व्यक्ती एखाद्या गोष्टीकडे ताण म्हणून पाहतो तर दुसरी व्यक्ती त्याकडे एक आव्हान म्हणून आनंदाने स्वीकार करते. बऱ्याचदा ताणाचे अंतर्गत व बाह्य घटक एकत्र येऊन ताणाचे प्रमाण प्रचंड वाढते. अशा वेळेस मुलांच्या आयुष्यात त्यांच्या पालकांची भूमिका फार महत्त्वाची ठरते. म्हणून पालकत्व हे एक कौशल्य म्हणून शिकण्याची, आत्मसात करण्याची गरज आहे.

**१.१४.१.५ शिक्षणातील ओझी**

**(अ) मानसिक -**

**अध्ययन -** अध्यापन प्रक्रियेतील सहभागात अडचण.

गृहपाठ, चाचण्या, परीक्षा यात मार्गदर्शनाचा अभाव.

बौद्धिकदृष्ट्या कमजोरी, मागासलेपण.

**शिक्षक -** पालकांकडून प्रोत्साहनाचा अभाव.

मित्र, सहाध्यायींकडून सहकार्य, मदत नसणे.

आजार, शारीरिक व्यंग यामुळे न्यूनगंडाची भावना.

शालेय शिस्त, नियम यांचे पालन करण्यास अडचणी.

**(ब) कौटुंबिक -**

कुटुंबाची आर्थिक परिस्थिती कमकुवत.

कुटुंबातील अशिक्षितपणा.

कुटुंबाचे समाजातील स्थान, धंदा यांचा दर्जा.

शालेय गरजा भागविण्यास असमर्थता.

**(क) शारीरिक -**

पुस्तक, वह्या, पाण्याची बाटली, खाऊचा डबा यांचे वजन.

शाळा व घर यामधील अधिक अंतर.

शाळेची अयोग्य वेळ, भर दुपारी चालणे.

खेळ किंवा करमणुकीसाठी वेळ नसणे.

**(ड) शाळेत घालण्याचं वय -**

दोन वर्षं हे मुलाचं शाळेत जायचं वय आहे का ?

या प्रश्नावर थांबून विचार करण्याची खरोखरच गरज आहे. दोनच नाही, तर दीड वर्षाच्या मुलालाही शाळेत घालण्यासाठी आजचे पालक तयार असतात. शाळांकडे तशा विचारणा होत असतात. दीड-दोन वर्षाच्या छोट्याशा मुलांनी शाळेत जावं असं का वाटतं ? याच्या मुळाशी नेमकं काय आहे ? याचे परिणाम काय होतील याचा विचार कोणी केलाय का ? नेमकं कोणत्या वयात मुलांनी शाळेत जावं. early learning संकल्पना शिक्षणतज्ज्ञांनी कशी मांडली होती हे प्रत्येक पालकानं समजून घ्यावं आणि मगच आपल्या मुलांना 'वेळेआधी' शाळेत टाकायचं की नाही ठरवावं.

'Well begun is half done' असं म्हणतात. कोणत्याही गोष्टीची सुरुवात चांगली होणं हे अतिशय आवश्यक असतं. तेच शिक्षणाच्या बाबतीत. ज्या मुलांच शिक्षण योग्य वयात, चांगल्या शाळेत, प्रेमळ शिक्षकांबरोबर सुरू होईल, त्यांची शिकण्यातली गोडी पुढे चांगलीच टिकून राहील. हेच सूत्र पेस्टोलॉजी, फ्रेडरिक फ्रोबेल, मादाम मॉँटेसरी, एरिकसन या तज्ज्ञांनी मांडलंय.

फ्रोबेल यांनी किंडरगार्टनची संकल्पना मांडली. किंडरगार्टन म्हणजे मुलांची बाग. रूढ शिक्षणाला सुरुवात करण्याआधी मुलांनी एकत्र येऊन खेळावं, कारण खेळताना मुलं अतिशय आनंदात असतात. खेळातून मुलांची विविध प्रकारे आपोआपच वाढ होत असते. हे एक प्रकारचं शिकणंच असतं. घर आणि शाळा यामधला दुवा म्हणून किंडरगार्टन असावं.

मादाम मॉँटेसरी यांनी यापुढे जाऊन खेळातून शिक्षण हे सूत्र मांडलं. शिक्षणाची सोपी - मुलांना आवडतील अशी साधनं

असावीत. मुलांनी स्वतःच खेळातून शिकत जावं, शिक्षिका मुलांना प्रेमानं शिक्षणाची गोडी लावतील, मुलांनी एकत्र येऊन खेळावं-गावं-नाचावं, यातून त्यांना शैक्षणिक संकल्पना सहजपणे समजतील. पुढच्या शिक्षणाचा पाया अशा वर्गातून घातला जाईल असा त्यांचा हेतू होता. मुलांना सहा वर्षांनंतर जे शालेय शिक्षण घ्यायचंय त्याची गोडी लावणं हे या वर्गांचं काम असेल. शिक्षणातल्या तज्ज्ञांची मूळ मतं आणि आजचं किंडरगार्टन यांच्या हेतूत केवढा मोठा फरक पडलाय !

किंडरगार्टनचे मिनी, ज्युनिअर, सीनिअर असे टप्पे पडलेत. मिनी के.जी.त अभ्यास नसतो. पण ज्युनिअरमध्ये तो सुरू होतो; आणि सिनिअर के.जी.त व्यवस्थित अभ्यास असतो. ज्युनिअर के.जी. पासून मुलांच्या हातात पेन्सिल देऊन आकडे, अक्षरं गिरवायला सांगितली जातात. एक-दोनदा सांगितल्यावर अक्षर बरोब्बर गिरवता येणं हे अपेक्षितच असतं.

सीनिअरला अभ्यास तर असतोच, गिरवणं, अक्षर काढणं हे असतं. पण 'B' चा आकार जरासा चुकला, 'C' उलटाच काढून ठेवला तर पनिशमेंट असते. एक पानभरून 'C' काढून आणा असा होमवर्क दिलेला असेल आणि एखाद्या ठिकाणी 'C' चुकला तर शिक्षा म्हणून दोन पानं भरून 'C' काढावा लागतो. अशा शिक्षा वयाच्या चौथ्या-पाचव्या वर्षी भोगाव्या लागतात.

अशा प्रक्रियेतून जाणारं मूल कसं शिकेल ? स्वत:साठी शिकेल की टीचरसाठी? दटावून बघणाऱ्या पालकांसाठी की व्हेरी गुड शिक्क्यासाठी? या शिकवण्यातून शिक्षकांना काय अपेक्षित आहे?

मुळात या वयात हातात पेन्सिल घेऊन अक्षर गिरवायला लावणं यात चूक शिक्षकांची आहे. असा सिलॅबस ठेवणाऱ्या

शाळाचालकांची आहे आणि अशा शाळेत मुलाला घालणाऱ्या पालकांचीसुद्धा आहे. मुलांच्या हातात पेन्सिल असावी ती वाट्टेल तशी चित्रं काढण्यासाठी. योग्य वय झालं की त्या चित्रातून सुबद्ध लिपी उमटणारच आहे. त्यासाठी आत्तापासून त्यांच्या मानगुटीवर कशासाठी बसायचं ? ही सगळी घाई-गडबड कशासाठी ? अशा रीतीनं घडवून, ठाकून-ठोकून, मारून-मुटकून तय्यार केलेली पिढी पुढे कसा आकार घेईल हे आज तरी कोणीच सांगू शकणार नाही.

**(इ) अशी शाळा हवी -**

ज्याला किंडरगार्टन म्हणतात किंवा मराठी माध्यमात ज्याला बालवाडी म्हणतात, ती शाळा मुलांना फुलवणारी हवी. मुलांशी खेळणारी, त्यांना खेळवणारी, त्यांना आनंदी ठेवणारी हवी. बागेतल्या खेळण्यांशी खेळताना, झोक्यावर झुलताना, घसरगुंडीवरून घसरताना त्यांना जो मोकळेपणा मिळतो, बागेत गेल्यावर मुलं जशी खुश दिसतात, तशीच या शाळांमध्ये दिसतात का ? मुलांनी या वयात आनंदीच राहावं. वास्तविक त्यांना याच वयात शिस्त लावायची असते. शिस्त लावताना त्यांच्या मनाविरुद्ध वागावं लागतं; पण ते तेवढ्यापुरतंच असावं. या वयात ती आनंदी असली तर त्यांचा तो स्वभाव होऊन जाईल. पण जर या वयात त्यांना कडक शिस्तीच्या शाळेत घातलं तर ती कुरकुर करतील.

एका पातळीवर परिपक्वता यायच्या आधीच जर मुलांना अभ्यासाला बसवलं तर त्यांना कंटाळा येणार हे साहजिकच आहे. हे ज्या शाळेला समजतं ती शाळा चांगली.

ज्याप्रमाणे दहावीची पूर्वतयारी म्हणून आठवी-नववीतच अभ्यास अजून अवघड होतो त्यामुळे दहावीची परीक्षा सोपी वाटते. तीच पद्धत वयाच्या या टप्प्यावर वापरून चालेल का ? पहिलीची पूर्वतयारी म्हणून पूर्वप्राथमिक शिक्षणाकडे बघू नये. मूल जर एक वर्षानंतर चालायला लागत असेल तर आपण सातव्या- आठव्या महिन्यातच त्याला चालायचा आग्रह करतो का ? तसंच हे !

योग्य परिपक्वनाची वाट पालकांनी बघायला हवी. विकासाची पुढची पायरी गाठलेलं मूल कधीच पुन्हा आधीच्या पायरीवर येत नाही. एकदाचालायला यायला लागलं की मूल रांगत नाही. स्पष्ट बोलायला लागलं की बोबडं बोलत नाही, उलट त्याला पुढची गोष्ट शिकायची असते. एक कविता आवडली, म्हणता यायला लागली की दुसरी कविता हवी असते. एक गोष्ट ऐकून पाठ झाली की दुसरी हवी असते. पुढे पुढे जाण्याचा स्वभावच असतो; पण म्हणून मधल्या पायऱ्या गाळू नयेत. मधल्या पायऱ्या गाळल्या तर पुढे जाऊन धडपडणारच.

## १.१५ मुलांमधील ताण निर्माण करणारी लक्षणे

### १.१५.१ शारीरिक लक्षणे

स्नायूंच्या तक्रारी, डोके दुखणे, पोटाचे विकार, मान दुखणे, खांदे, पाठ दुखणे तरी पडणे, सारखा आवंढा गिळणे, डोळे फडफडणे, थरथरणे, शारीरिक कंपण जाणवणे, दातखिळी बसणे, मोर्चा येणे, हृदयाचे ठोके वाढणे, सारखे लघवीला जाणे, गरगरणे, छातीत धडधडणे, तळहाताला घाम फुटणे, धाप लागणे, जुलाब किंवा बद्धकोष्ट होणे, दमा, त्वचेची व त्वचेशी संबंधित आजार, झोपेच्या सवयीत बदल, आळस, अपचन, कंटाळा येणे इत्यादी.

### १.१५.२ मानसिक लक्षणे

एकाग्रतेचा अभाव, स्मरणात ठेवणे अवघड वाटणे, नेहमी लक्षात न राहणे, घाईत असणे, निर्णय क्षमता घालवणे, आत्मविश्वासाचा अभाव, काही गोष्टींना अवास्तव महत्त्व देणे, थकल्यासारखे वाटणे, गोंधळणे, चुका करणे इत्यादी. एखादी गोष्ट अर्धवट सोडणे, भविष्यकालीन योजना करू न शकणे, नेहमी काहीतरी वाईटच होईल किंवा वाईटच घडेल असा विचार करणे, समस्या सोडवण्याऐवजी तिच्याबद्दल जास्त काळजी करत बसणे, हेकेखोर होणे, चिडचिडेपणा, विसराळूपणा, संभ्रम, अकारण भीती, एकाग्रता कमी होणे, स्वतःला दोष देणे इत्यादी.

### १.१५.३ वर्तन विषयक लक्षणे

वेळेचे व्यवस्थापन करू न शकणे, सैरावैरा काम न करताच फिरत राहणे, नेहमीपेक्षा खूप जास्त किंवा खूप कमी खाणे, घाई करणे, मित्र-मैत्रिणींच्या संपर्कात न राहणे, स्वतःच्या समस्यांसाठी इतरांना दोषी धरणे, त्रागा करणे, व्यसनांच्या आहारी जाणे, शरीरावयाची सतत हालचाल करणे, शाळा-महाविद्यालयात जाण्यास तयार नसणे, एखादी कृती सतत करीत राहणे, एकलकोंडेपणा, चोरी करणे, खोटे बोलणे, बेजबाबदारपणा वाढणे इत्यादी.

### १.१५.४ भावनिक लक्षणे

चिडचिडेपणा वाढणे, राग येणे, माघार घेण्याची वृत्ती, स्वतःबद्दल कमीपणा जाणवणे, इतरांबद्दल संशय वाटणे, लहरीपणाने वागणे, अपराधीपणाची भावना, चिंता करणे, निराश होणे, काळजी करणे, भीती वाटणे, सतत निराश, तीव्र संताप, रडू कोसळणे, आंधळेपणा, विचारांचा गोंधळ, वाद घालणे इत्यादी.

### १.१५.५ मुलांमधील ताण ओळखून वेळेतच पालकांनी करावयाच्या गोष्टी.

- ताणास जबाबदार बाह्य घटकांचा प्रभाव कमी करणे.
- ताणाबद्दल अंतर्गत घटकांमध्ये बदल करणे तसेच त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलणे.
- दोन्हीत बदल करणे.

पण एखाद्या गोष्टीकडे तणावात्मक बाब म्हणून पाहतो तेव्हा, त्याला मानसिक, भावनिक, शारीरिक व वाचनिक प्रतिसाद आपोआपच दिला जातो. परंतु त्याच गोष्टीला आपण एखाद्या विशिष्ट वेळेपूर्वी आवश्यक बाब किंवा वेळेची मागणी म्हणून पाहिले तर त्यांची तीव्रता कमी होते. पण ताण हाताळण्यासाठीच्या क्षमता कमी पडत असतील तर शारीरिक व मानसिक संतुलन बिघडू शकते. म्हणूनच ताण निर्माण करणाऱ्या परिस्थितीचा योग्य अर्थ लावायला मुलांना शिकवणे गरजेचे असते. तरच उपलब्ध गोष्टीचा व क्षमतांचा योग्य रीतीने वापर करून मुलं समतोल साधू शकतील.

मुलांच्या मनात तणावपूर्ण विचार येणार नाहीत याची काळजी घेणे तसेच निराश होण्यापासून त्यांना परावृत्त करणे, घरात

खेळीमेळीचे वातावरण ठेवून विनोद बुद्धीचा वापर करून ताण कमी करण्यास मदत करणे, आपल्या दैनंदिन कार्याची तयारी करणे, त्यासाठी मुलांना पूर्व नियोजन करण्यास शिकवणे, मुलांशी सुसंवाद साधणे व पालकांनी आपल्या कामातून वेळ काढून मुलांसोबत वेळ घालवणे, मुलांच्या समोर पालकांनी आपापसातले मतभेद येऊ न देणे, तणावपूर्वक घटनांचा क्रम ठरविणे, शाळेत पोहोचण्यात जाणवणारा तणाव ह्या विविध कारणांमुळे निर्माण होणारा तणाव, अशी निर्णयाकर्तनाची क्रमबद्ध यादी करणे व त्यानुसार मुलांना मानसिकरित्या त्या घटनांना सामोरे जाण्यास तयार करणे, हळूहळू ते अशा गोष्टींचा स्वीकार करावयास शिकतील आणि त्याचा ताण स्वतःवर येऊ देणार नाही. समस्या परिहार कौशल्य मुलांमध्ये विकसित करणे. त्यासाठी रोजच्या जीवनातील काही प्रसंग हेतुपुरस्सरपणे अनुभव त्यांना देणे व त्यामधून मार्ग काढावयास शिकवावे. बुद्धीभ्रमाच्या सरावातून हे कौशल्य सहज अवगत होऊ शकेल. अभ्यास कौशल्य आत्मसात करण्यास शिकविणे तसेच वेळेचे व्यवस्थापन करावयास शिकविणे. मुलांच्या अभ्यासाबद्दल व इतर लहानसहान निर्णय घेताना घरातील पालक व इतर मोठ्या व्यक्तींच्या वागण्या-बोलण्यात एकवाक्यता दर्शवावी. मुलाचे म्हणणेही महत्त्वपूर्ण असते ते ध्यानपूर्वक ऐकणे. त्यातून योग्य वेळी विचारांची योग्य देवाण-घेवाण होण्यास मदत होते. मुलांच्या उपस्थितीत घरातील इतर व्यक्ती टेलिव्हिजनवर चांगल्या प्रतीचे कार्यक्रम बघतील याची काळजी घ्यावी. तसेच हिंसाचार, लैंगिक भावना चाळवणारे प्रसंग बघण्याचे टाळावे व समतोल आहार द्यावा. त्यांना पुरेशी व शांत झोप मिळेल याची काळजी पालकांनी घ्यावी. मुलांच्या समोर नेहमी पालकांनी सकारात्मक बोलावे. त्यांना ध्यानधारणा व शिथिलता शिकवावी.

### १.१५.६ तणावग्रस्त मुलांच्या शैक्षणिक समस्या -

- अतिचंचल.
- डाव्या-उजव्यात चुकणे
- परीक्षेचा ताण.
- लेखन कौशल्यातील अक्षमता.

- वाचन अक्षमता.
- नियमित अभ्यास न करणे.
- शाळेबद्दलचा भयगंड
- अभ्यासाचा पाया कच्चा असणे.
- विधी ग्रहण अक्षमता.
- आकलन शक्ती कमी असणे.
- अंकगणित अध्ययन अक्षमता.
- अक्षर खराब असणे व लेखनाची गती मंद.
- अभ्यासाचा कंटाळा करणे.
- अभ्यासाची धास्ती घेणे.
- अभ्यासाची त्रुटीयुक्त पद्धत.
- तासंतास अभ्यास केला तरी लक्षात न राहणे.
- इंग्रजीमधील स्पेलिंग सतत चुकणे व वारंवार त्यात चुका करणे.
- वाचताना पुष्कळ वेळा चुका करणे व वाचनात येणाऱ्या आकलनाचा अभाव.

### १.१६ ताणतणावाचे व्यवस्थापन

गर्भावस्थेतल्या बालकापासून ते वृद्धापर्यंत सर्वांनाच व्यापून टाकणारी गोष्ट म्हणजे ताण. त्याचे कमी जास्त परिणाम प्रत्येकजण भोगत असतो. प्रगतीसाठी ताण घेणे आवश्यक आहे. पण त्याचा अतिरेक झाला तर त्याचेच रूपांतर शत्रुत होते. तणाव हा मनात येतो, शरीरात उतरतो, कुटुंबावर उमटतो आणि बोलण्यातून दिसतो. प्रत्येकाच्या ताणतणावाची कारणे ही वेगवेगळी असतात. तणाव हा चांगला व वाईट अशा दोन प्रकारचा असतो. वाईट ताण चांगल्या मनावर, शरीरावर वाईट परिणाम करतो तर चांगला ताण आपणास मानसिक बळ ही देतो. आपण वर सांगितल्याप्रमाणे बालकांपासून वृद्धांपर्यंत प्रत्येकाला ताण येतो. मोठी माणसे बोलण्यातून किंवा कृतीतून व्यक्त करतात. तसे लहान मुलांना नाही करता येत. त्यासाठी पालकांनी, घरातील इतर मोठ्या मंडळींनी, शिक्षकांनी मुलांमधील ताण योग्य वेळी ओळखून, त्याचे व्यवस्थापन करून सकारात्मकता निर्माण करावी. जेणेकरून मुलांची बौद्धिक, भावनिक आणि शारीरिक वाढ योग्यरीतीने होईल.

## १,१६.१ मुलांमधील ताणतणाव कमी करण्यासाठी उपाययोजना

१. परिस्थितीही बदलत असते. त्यासाठी आपण तयार राहावे. अशी शिकवण मुलांना द्यावी. त्यामुळे ते परिस्थितीशी जुळवून घ्यायला शिकतील.

२. लहान मुलांसमोर ताणतणावाचे प्रसंग घडू नयेत. अकस्मात घडले तर त्यांच्या मानसिक वाढीला अनुकूल अशा भाषेत त्यांना समजावून सांगावे.

३. पालकांनी अवास्तव अपेक्षा ठेवू नये. अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत तरी चालेल, पण घरात निरोगी आणि खेळीमेळीचे वातावरण ठेवावे.

४. आपल्या मुलांमध्ये इतर मुलांपेक्षा समाजकौशल्य, अभ्यास व जीवनकौशल्य कमी वाटल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. इतर मुलांबरोबर तुलना करत बसू नये.

५. मुलांना त्यांच्या भावना व्यक्त करू द्याव्यात.

६. आहार सकस व पौष्टिक असावा. चमचमीत आणि बाहेरचे पदार्थ शक्यतो टाळावेत.

७. मुलांमध्ये ताणाची लक्षणे आढळल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

८. मुलांना मनसोक्त मैदानावर खेळू द्या.

९. टीव्ही, इंटरनेट, व्हिडिओ गेम्स, कार्टून्स नियोजित ठेवावेत.

१०. पालकांनी प्रथम स्वतःमधला ताण कमी करावा. मुले तुमचेच अनुकरण करतात.

११. शाळा आणि शिक्षकांशी संपर्क ठेवावा.

१२. मुलांना व्यायाम, योग, ध्यानधारणेची सवय लावा. दीर्घश्वसनाने शरीर आणि मन तणावातून बाहेर येण्यास तेवढ्यापुरती मदत नक्कीच होते.

१३. घरातल्या माणसांबरोबर, आपल्या आवडीच्या माणसाबरोबर वेळ घालू द्या.

१४. भोवताली घडणाऱ्या सामाजिक दुर्घटनांविषयी, बॉम्बस्फोट, दहशतवाद मुलांना शब्दात समजावून सांगा. त्याविषयी मनात अवास्तव भीती निर्माण होऊ नये.

१५. कोणत्याही परिस्थितीत मुलांसमोर वादविवाद टाळावेत. मुलांवर त्याचा विपरीत परिणाम होतो.

१६. मुलांशी मोकळेपणाने बोलावे. त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. मुले अस्वस्थ आणि समस्याग्रस्त असताना त्यांना मायेने जवळ घ्यावे.

१७. ताण येणे ही नैसर्गिक गोष्ट असल्याने मुलांना दोष देऊ नये. परिस्थिती बदलत असते हा मंत्र मुलांना द्यावा.

## १.१७ मुलांचे मानसिक आरोग्य व पालकांची भूमिका

- विद्यार्थी व पालक यामधील दुवा
- पालकाचे व्यक्तिमत्व
- कुटुंबातील वातावरण व कौटुंबिक आर्थिक स्थिती
- पालकांची प्रेमळ व सकारात्मक वागणूक
- पाल्याविषयी विश्वास असणारे
- पाल्याची आवड व छंद जोपासणारे
- पाल्याची क्रियाशीलता जपणारे
- पाल्याच्या सुप्त गुणांना वाव देणारे
- मुलांच्या मतांचा सन्मान करणारे
- शैक्षणिक समस्यांची जाण ठेवणारे
- अपयशाच्या प्रसंगी आधार व दिलासा देणारे
- स्पर्धेच्या युगात सहायभूत भूमिका निभावणारे
- पाल्यांचा सर्वांगीण विकास साधणारे

## १.१८ संशोधनाची गरज

१. सद्यस्थितीत मराठी, इंग्रजी आणि सेमी इंग्रजी असे विविध माध्यम उपलब्ध आहेत तसेच प्रत्येक माध्यमाचे फायदे आणि तोटे वेगवेगळे आहेत.

२. विद्यार्थ्याला मातृभाषेतून दिलेले ज्ञान लवकर समजते. मातृभाषेतून दिलेले शिक्षण हे हृदयापर्यंत भिडणारे असते तर इतर भाषेतील शिक्षण हे फक्त मेंदूपर्यंत मर्यादित राहते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे व्यक्तिमत्व समृध्द होते.

३. भाषेविषयी पालकांचे मनात अनेक भ्रामक समजूती आहेत. इंग्रजी ही जागतिक भाषा आहे ही त्यापैकी एक भ्रामक समजूत पालकांच्या मनात स्थिरावलेली आहे. इंग्रजी ही जागतिक भाषा नसून ती पूर्वी इंग्रजांनी राज्य केलेल्या काही देशांत वापरली जाणारी भाषा आहे, याबाबतीत पालकांना पुरेपुर माहिती नसते.

४. इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून शिक्षण घेतल्यामुळे विद्यार्थी उच्च पदावर जातात आणि जीवनमान सुधारते ही भावना समाजात रुढ होतांना दिसते. समाजात आणि पालकांच्या मनात अशा अनेक भ्रामक समजूती रुढ होत आहेत, ह्या प्रकारच्या भ्रामक समजूती आणि गैरसमज दूर करण्यासाठी प्रस्तूत विषयावर संशोधन करण्यात आले.

५. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेताना जागरूक असतात का ? याविषयी सद्यस्थितीतील माहिती जाणून घेण्यासाठी सदर संशोधनाची गरज केले आहे.

६. सध्यास्थितीत मराठी, सेमी इंग्रजी आणि इंग्रजी असे विविध माध्यम उपलब्ध असताना पालक इंग्रजी माध्यमांची प्रवेशासाठी निवड का करतात ? याविषयीची माहिती जाणून घेण्यासाठी सदर संशोधन करण्यात आले.

७. शाळेतील शिक्षणाची भाषा व कुटुंबातील भाषा वेगवेगळी असल्यामुळे निर्माण होणारे भाषिक अडथळे याविषयी पालकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रस्तुत संशोधन करण्यात आले आहे.

८. आपले बालक जागतिक स्पर्धेत कुठेही कमी पडू नये म्हणून पालक सरळ-सरळ इंग्रजी माध्यमांच्या शाळेत घालण्याचा निर्णय घेतात. इंग्रजी काळाची गरज असली तरी त्यासाठी

इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणे हा एक पर्याय नाही. याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी सदर संशोधन केले आहे.

९. विद्यार्थ्याला मातृभाषेतून दिलेले ज्ञान लवकर समजते. मातृभाषेतून दिलेले शिक्षण हे हृदयापर्यंत पोहोचणारे असते तर इतर भाषेतील शिक्षण हे फक्त मेंदूपर्यंत राहते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे व्यक्तिमत्त्व समृद्ध होते, याविषयी पालकांमध्ये व समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी सदर विषयावर संशोधन करण्यात आले आहे.

१०. मुलांना मातृभाषेतून शिक्षण दिले तर त्यांना उच्च शिक्षणात अडचणी निर्माण होते, ही भ्रामक समजूत समाजात स्थिरावलेली दिसते. ही समजूत दूर करण्यासाठी प्रस्तुत विषयावर संशोधन केले आहे.

११. विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण हे अधिक परिणामकारक असते. शिक्षणातील संकल्पना स्व भाषेतून लवकर समजतात व विद्यार्थ्यांमधील जिज्ञासा जागृत होते. आकलन क्षमता विकसित होते. शिक्षण प्रक्रिया आनंदी होते. विद्यार्थ्यांना ताण येत नाही. याविषयी पालकांमध्ये जाणीव वाढीस लावण्यासाठी प्रस्तुत विषयावर संशोधन केले आहे.

१२. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या मातृभाषेवर प्रभुत्व मिळवले तर इतर भाषा अवगत करण्यास व तिच्यावर प्रभुत्व मिळवल्यास कुठल्याही प्रकारचा त्रास निर्माण होत नाही. इतर भाषेवर विद्यार्थी सहज प्रभुत्व मिळवू शकतात. याविषयी पालकांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी प्रस्तुत संशोधन केले आहे.

१३. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी सदर संशोधन केले आहे.

१४. विद्यार्थ्यांची मातृभाषा व शिक्षणाचे माध्यम वेगवेगळे असल्यामुळे निर्माण होणाऱ्या भाषिक अडथळे व समस्यांचा अभ्यास करण्यासाठी सदर संशोधन केले आहे.

१५. इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्माण होणाऱ्या भाषिक अडथळयांच्या कारणांचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन केले आहे.

१६. विद्यार्थ्यास निर्माण झालेले भाषिक अडथळे व समस्या दूर करणे व पालकांना उपाययोजना सुचवण्यासाठी प्रस्तुत संशोधन केले आहे.

१७. विद्यार्थ्यांमध्ये आकलन, जिज्ञासा, चिकित्सक विचार प्रक्रिया व व्यक्त होण्यात अडथळा निर्माण होऊन संभाषण कौशल्य विकसित न होण्यामागील कारणांचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन केले आहे.

१८. विद्यार्थ्यांचा अभ्यास घेण्यात पालकांचा सहभाग व जागृतता वाढवण्यासाठी प्रस्तुत संशोधन केले आहे,

१९. शिक्षकांना विद्यार्थ्यांना अध्यापन करताना कोणत्या शैक्षणिक समस्या जाणवतात ? याविषयी संशोधन केले आहे.

२०. प्रस्तूत संशोधनात स्थानिक भाषा व मातृभाषा अध्ययनासाठी परिणामकारक असते याविषयी पालकांमध्ये जाणिव निर्माण करणे, देशाच्या उज्वल भविष्यासाठी उत्तम मनुष्यबळ, व्यक्तिमत्व निर्माण करण्यासाठी प्रस्तूत संशोधन करण्यात आले आहे.

२१. पालकांच्या अपेक्षा, शिक्षकांच्या अपेक्षा, शाळेतील ताणतणाव, गृहपाठ, शिकवणी वर्ग, परीक्षेचे दडपण, स्पर्धेच्या युगात टिकण्याचा ताण, मित्रांचा ताण अशा अनेक गोष्टींचा मुलांवर ताण आलेला असतो. त्यामुळे त्यांचे मानसिक स्वास्थ स्थिर नसते, ते बिघडल्याचे दिसून येते. त्यामुळे मुले नाराज, रडवलेली, चिडचिड, मुड बदलणे, शैक्षणिक प्रगती खुंटणे, नैराश्य इ. समस्यांनी ग्रासलेले असतात. मुलांची मानसिक स्थिती पालकांनी व शिक्षकांनी वेळीच ओळखणे व त्यावर

उपाययोजना करणे आवश्यक असल्याने प्रस्तुत संशोधन करणे गरजेचे आहे.

२२. मराठी शाळेची होत असलेली दुरावस्था, इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षणाने समाजात प्रतिष्ठा मिळते हा वाढत जाणारा गैरसमज, इंग्रजी माध्यमांच्या वाढत्या शाळेचे समाजावर होत असलेले नकारात्मक परिणाम, शिक्षण क्षेत्रातील वाढती शिक्षक बेरोजगारी व त्याचबरोबर मोफत उत्कृष्ट मिळणाऱ्या शिक्षण व्यवस्थेला बाधा निर्माण करणाऱ्या घटकावर लक्ष वेधण्याकरिता प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

**१.१९ संशोधनाचे महत्व**

१. प्रस्तुत संशोधन विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक यांना उपयुक्त ठरणार आहे.

२. याच संशोधन विषयामध्ये संशोधन करणाऱ्या संशोधकांना उपयुक्त ठरणार आहे.

३. प्रस्तुत संशोधनामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची सद्यस्थिती समजली.

४. प्रस्तुत संशोधनामुळे विद्यार्थ्यांची मातृभाषा व शिक्षणाचे माध्यम वेगवेगळे असल्यामुळे निर्माण होणारे भाषिक अडथळे व समस्यांची माहिती झाली.

५. प्रस्तुत संशोधनामुळे इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्माण होणाऱ्या भाषिक अडथळयांच्या कारणांचा शोध घेण्यात आला.

६. प्रस्तुत संशोधनामुळे विद्यार्थ्यास निर्माण झालेले भाषिक अडथळे व समस्या दूर करणे व पालकांना उपाययोजना सुचवणे शक्य झाले.

७. प्रस्तुत संशोधनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आकलन, जिज्ञासा, चिकित्सक विचार प्रक्रिया व व्यक्त होण्यात अडथळा निर्माण

होऊन संभाषण कौशल्य विकसित न होण्यामागील कारणांचा शोध घेणे शक्य झाले.

८. प्रस्तुत संशोधनामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास घेण्यात पालकांचा सहभाग व जागृतता वाढवण्यासाठी मदत झाली आहे.

९. प्रस्तुत संशोधनामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांना अध्यापन करताना कोणत्या शैक्षणिक समस्या जाणवतात, याविषयी माहिती उपलब्ध झाली.

१०. कुटुंबातील वातावरण मुलांवर होणारे संस्कार विकासासाठी परिणामकारक असते. कुटुंबाची आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती कशी आहे, या गोष्टीचा सुध्दा मुलांच्या विकासावर परिणाम होत असतो. मुलांचा मानसिक व भावनिक विकास हा घरातील प्रेमळ, आनंदी, उदार अंतकरण इ.वर अवलंबून असतो. याविषयीचे आकलन होण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे होते.

११. स्पर्धेच्या युगात पालक आपल्या मुलांवर अपेक्षांचे ओझे टाकत आहेत आणि त्या पूर्ण करतांना विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. मुलांच्या मानसिक आरोग्यासाठी पालकांमधील समज अपसमज दूर करून पालकांमध्ये शैक्षणिक विकासातील जागरूकता वाढविण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे होते.

१२. प्रस्तुत संशोधनामधून इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता आणि मुलांच्या शैक्षणिक विकासाबाबत पालकांची जागरुकता वाढवण्यासाठी संशोधन अभ्यास उपयुक्त ठरले.

१३. लहान मुलांच्या आयुष्यात वाढती जीवघेणी स्पर्धा, समवयीन मित्रांमुळे येणारी दडपणे, प्रसारमाध्यमांचा वाढता प्रभाव, कोरोना काळातील ऑनलाईन शिक्षण पध्दती, मोबाईलचा

वापर, इंटरनेट, AI- कृत्रिम बुद्धिमत्ता यांची शिक्षणात प्राथमिक गरज झलेली आहे. स्मार्टफोनचा वापर काळजीपूर्वक करण्याची शिकवण मुलांना दिली नाही तर त्यांचे आयुष्य उध्वस्त होण्याची शक्यता असते. यासंदर्भात जागरुकता होण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे ठरले.

१४. मुलांना स्मार्टफोन देण्याआधी त्याचा वापर त्यांच्या सोयीसाठी गरजेपूरता, प्रगतीसाठी व्हावा इतकं स्मार्ट त्यांना करायला हवं आणि त्यासाठी पालकही तितके जागरुक असणे आवश्यक आहे. नोकरीमुळे पालकांची मुलांच्या आयुष्यातील अनुपस्थिती, पालक व शिक्षकांना मुलांकडून असलेल्या अवास्तव अपेक्षा या सगळयांचा परिणाम म्हणजे मुलांमध्ये दिवसेंदिवस वाढता मानसिक ताण, असे ताण वेळीच दूर केले नाही तर भविष्यात ते वाढत जावून मुलांचे शारीरिक व मानसिक संतुलन बिघडण्यास कारणीभूत ठरतात.

१५. विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या, गुंड प्रवृत्ती, व्यसनाधीनता अशी अनेक प्रकरणे पाहावयास मिळतात. हे थांबवायचे असेल तर मुलांना तणावापासून दूर ठेवणारी अध्ययन व अध्यापन प्रक्रिया राबविणे, निर्माण करण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे ठरले.

१६. लहान मुलांच्या आयुष्यात तर मानसिक स्वास्थाचे अनन्यसाधारण महत्व आहे. कठीण प्रसंगांचा सामना करण्यासाठी मानसिक सुदृढता महत्वाची असते. पालकांनी आपल्या मुलांची आवड व कुवत पाहून शिक्षणाचे माध्यम निवडणे आवश्यक असते.

१७. बरेचशे पालकांना त्यांचे आयुष्यात इंग्रजी न अभ्यासल्याने अनेक समस्यांना सामोरे जावे लागल्याचा अनुभव पाठीशी

असल्यामुळे आपल्या पाल्याच्या वाटयालाही असा अनुभव येवू नये म्हणूनही पालक आपल्या पाल्याला इंगजी माध्यमाच्या शाळेत शिकविण्याचा आग्रह धरतात.

१८. आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमातील शैक्षणिक संकल्पनांचे आकलन सहपणे होतील का, याचा विचार पालकांनी शाळेत प्रवेश घेण्याअगोदरच करायला हवा. वाढत्या स्पर्धेमुळे सर्वत्र इंग्रजी विषयाचे पर्यायाने इंग्रजी माध्यमाचे महत्व वाढतांना दिसत आहे. त्यामुळे अनेक पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमातूनच शिकवावे असा विचार करतात आणि मग पाल्याची इंग्रजी भाषेतून ज्ञान प्राप्त करण्याची क्षमता नसली तरीही शिक्षणासाठी इंगजी माध्यमांमध्ये आपल्या मुलांचा प्रवेश घेतात. इंग्रजी माध्यमांच्या शाळेचा भरमसाठ असा खर्च आपल्या खिशाला परवडणारा नसूनही आपला पाल्य इंग्रजी माध्यमांच्या शाळेतच शिकला पाहिजे, अशी भुमिका स्विकारतांना दिसतात.

१९. जर मातृभाषेतून शिक्षण दिले तर व्यवसाय आणि नोकरीच्या संधी मिळणार नाहीत असा त्यांचा समज प्रबळ झालेला असतो. मुलांना सुध्दा शैक्षणिक, मानसिक ताणतणाव येतो याकडे पालकांचे दुर्लक्ष होतांना बघायला मिळते.

२०. मातृभाषेतील शिक्षणाला आधूनिक शिक्षणशास्त्राचा भक्कम आधार आहे, युनेस्को ब्रिटीश कौन्सिल देखील मातृभाषेतून शिक्षणाचे समर्थन करतात, याबाबतीत पालक अनभिज्ञ असल्यामुळे इंग्रजी माध्यमाची निवड करतात. मातृभाषेतून शिक्षण देण्याचे महत्व, शिक्षणाची अध्ययन प्रक्रिया याबाबतीत जाणीव निर्माण करून देण्यासाठी पालकांमध्ये जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे.

२१. कुटुंबातील, परिसरातील भाषा आणि शाळेतील अध्ययनाची भाषा यामध्ये कसलेही साम्य नसल्यामुळे मुलांना मानसिक व बौध्दिक ताण येतो. इंग्रजी भाषेतील शब्दांचे अर्थ समजून घेण्यासाठी पाठांतरावर भर दिला जातो व शिक्षणात सहजता न राहता कृत्रिमता निर्माण होते.

२२. पालकांनी मुलांच्या आनंदात सहभागी होवून मुलांचा आनंद व उत्साह वाढवावा, मुलांच्या प्रगतीबद्दल, चांगल्या वर्तनाबद्दल त्यांची स्तुती करावी, ही सकारात्मकता मुलांच्या मानसिकता व्यक्तिमत्व व शैक्षणिक विकासाला पोषक ठरते. मुलांच्या शैक्षणिक विकासाबाबत पालकांची जागरूकता अतिशय महत्वपुर्ण असते.

२३. शासकीय अनुदानित मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये अधिक चांगल्या सुविधा तंत्रज्ञान व आधुनिक शिक्षण पद्धती उपलब्ध नसल्यामुळे समाजात मराठी माध्यमातून मोफत मिळणाऱ्या शिक्षणाकडे पालकांचा व मुलांचा ओढा कमी झालेला आहे. मराठी माध्यमाच्या शाळांकडे पालक व विद्यार्थ्यांचा कल वाढण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे ठरले.

२४. शासकीय अनुदानित मराठी माध्यमाच्या शाळेत अध्ययन प्रक्रिया सुलभ होण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आधुनिक शिक्षण पद्धती उपलब्ध करून दिल्यास या शाळांतील शिक्षण प्रक्रिया आनंददायी होऊन विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक ताणतणाव दूर करण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे ठरले.

२५. शासकीय अनुदानित मराठी शाळा व तेथील शिक्षकांची अतिरिक्त होणारी संख्या ही चिरंतन व शाश्वत विकासाला बाधा आणणारी असून शासकीय मराठी माध्यमाच्या शाळा व तेथील शिक्षक स्थिर ठेवण्यासाठी, शिक्षण क्षेत्रातील बेरोजगारी दूर करण्यासाठीच्या उपाययोजना राबविण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे ठरले.

२६. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील भाषा व कुटुंबातील, परिसरातील भाषा वेगवेगळी असल्यामुळे मुलांना भाषिक अडथळा निर्माण होऊन ताणतणाव निर्माण होतो. मुलांना होत असलेला हा ताणतणाव पालकांच्या लक्षात आणून देणे व यासंदर्भात पालकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रस्तुत संशोधन अत्यंत महत्वाचे ठरले.

## १.२० समस्या विधान

इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता आणि त्यांच्या शैक्षणिक विकासाबाबत पालकांच्या जागरूकतेचा चिकित्सक अभ्यास करणे

## १.२१ संशोधनाची उदिष्टे

प्रस्तूत संशोधनाच्या संदर्भात पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आले.

१. इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता व कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास करणे.

२. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शिक्षणाचे माध्यम निवडतांना पालकांमधील जागरूकतेचा अभ्यास करणे.

३. इंग्रजी माध्यमांच्या शाळेमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या भाषिक अडथळयांमुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेणे.

४. शासकीय, अनुदानित मराठी माध्यमांच्या शाळेत प्रवेश न घेण्यामागील कारणांचा शोध घेणे.

५. इंग्रजी माध्यमांच्या शाळेमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या भाषिक अडथळयांमुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांविषयी उपाययोजना सुचविणे.

## १.२२ संशोधनाच्या संकल्पनात्मक व्याख्या

**शिक्षण :-** “शिक्षण हे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे साधन असून ते केवळ माहिती देणे एवढ्यापुरते मर्यादित नाही तर शहाणपण देण्यासाठी आहे. खरे शिक्षण हे मूल्याधारित असून सत्याचा शोध घेणारे असते".

**- डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन**

म.रा.पा.नि.व अ.सं.मंडळ, पुणे

मानसशास्त्र – वर्ग १२ वी

**विद्यार्थी :-** विद्यार्थी या शब्दाचा अर्थ काहीतरी शिकणारी व्यक्ती असा होतो. विद्यार्थी हा शब्द **'विद्या'** आणि **'अर्थी'** या दोन शब्दांपासून बनला आहे. त्याचा अर्थ **'ज्ञान साधक'** असा आहे. विद्यार्थी कोणत्याही वयाचा असू शकतो, जसे की बाल, किशोर, तरुण किंवा प्रौढ. तथापि, तो काहीतरी शिकत आहे हे महत्वाचे आहे.

**- विकिपीडिया**

**विद्यार्थ्यांची मानसिकता :-** विद्यार्थ्यांची मानसिकता शिकण्याच्या वातावरणात अपयश आणि यशाचा सामना कसा करतात हे सांगते आणि त्यांच्या स्वतःच्या शिकण्याच्या क्षमतेची त्यांची प्रतिमा प्रतिबिंबित करते . यामुळे, ते त्यांच्या प्रेरणा आणि भविष्यात विकसित होणाऱ्या शिकण्याच्या सवयींवर खूप प्रभाव टाकतात.

**- गुगल**, **विकिपीडिया**

**इंग्रजी माध्यम :-** प्राथमिक शिक्षण माध्यम म्हणून वापर करते — विशेषतः जेथे इंग्रजी ही विद्यार्थ्यांची मातृभाषा नाही. ब्रिटीश साम्राज्याच्या उदयामुळे ब्रिटीश वसाहतींमध्ये इंग्रजी भाषेचा प्रसार वाढला आणि यापैकी अनेकांमध्ये ते शिक्षणाचे माध्यम राहिले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर युनायटेड स्टेट्सच्या वाढलेल्या आर्थिक आणि सांस्कृतिक प्रभावामुळे इंग्रजीचा जागतिक प्रसार वाढला आहे, इंटरनेट आणि इतर तंत्रज्ञानाचा झपाट्याने प्रसार झाला आहे. याचा

परिणाम म्हणून, जगभरातील अनेक राज्यांमध्ये जिथे इंग्रजी ही प्रमुख भाषा नाही, तिथे इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत.

**- विकिपीडिया**

**शैक्षणिक विकास :-** शैक्षणिक विकास म्हणजे विद्यार्थ्यांसाठी शिकण्याचे परिणाम आणि शैक्षणिक अनुभव वाढविण्यासाठी शैक्षणिक पद्धती, सिद्धांत आणि प्रतिमानांमध्ये वाढ आणि सुधारणेची प्रक्रिया होय.

**- विकिपीडिया** study.com

**पालकांची भूमिका :-** वाढीच्या सुरुवातीच्या वर्षापासून ते उच्च शिक्षणाच्या तयारीपर्यंत विद्यार्थ्यांच्या जीवनात पालकांची भूमिका व्यापक आहे. मनापासून प्रतिबद्धता, भावनिक आणि सामाजिक पाठबळ आणि आर्थिक बांधिलकी याद्वारे, पालक त्यांच्या मुलाच्या शैक्षणिक परिणामांवर आणि एकूण विकासावर मोठ्या प्रमाणात परिणाम करू शकतात.

**- गुगल सर्च – DreamEducation.org**

**१.२३ संशोधनाच्या कार्यात्मक व्याख्या**

१. **इंग्रजी माध्यम :-** अकोला जिल्ह्यातील ज्या शाळेत मराठी, हिंदी व संस्कृत या विषयाशिवाय सर्व विषय इंग्रजी भाषेमधुन शिकवले जातात. तसेच शाळांना इंग्रजी माध्यमाची शाळा म्हणून मान्यता आहे, अशा शाळांना इंग्रजी माध्यमाची शाळा असे संबोधले आहे.

२. **शिक्षण :-** शिक्षण म्हणजे मुलांवर कुठलीही बाब लादण्याची क्रिया नसून सुप्त शक्तींचा विकास करण्याची प्रक्रिया होय.शिक्षणामध्ये बालकांचा ज्ञानात्मक, भावात्मक, क्रियात्मक असा सर्वांगीण विकास आहे.

३. **मुलांची मानसिकता :-** विद्यार्थ्याची आवड, अभिरुची, मानसिक स्वास्थ, भावनिक स्थैर्य, समायोजन, सुरक्षितता,

स्वप्रतिमा, जीवनमूल्य व गुणवत्ता यालाच संशोधीकीने विद्यार्थ्यांची मानसिकता असे संबोधले आहे.

४. **शैक्षणिक विकास** :- "शैक्षणिक विकास" म्हणजे शैक्षणिक अनुभव, गुणवत्ता आणि अध्यापन आणि शिक्षणाची प्रभावीता सुधारण्याची आणि वाढविण्याची पद्धतशीर प्रक्रिया.

५. **पालकांची जागरूकता :-** पाल्याच्या शैक्षणिक विकासासाठी पालकांचा दृष्टिकोण.

## १.२४ संशोधनाची चले

| स्वतंत्र चले | परतंत्र चले | बाहय चले |
|---|---|---|
| १. अकोला जिल्हा<br>२. तालूकानिहाय ३० टक्के शाळा | १. मानसिकता व जागरूकता | विद्यार्थी<br>पालक |

## १.२५ गृहितके

१. इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश घेण्याकडे सध्या पालकांचा अधिक कल आहे.

२. विद्यार्थी शाळेत आल्यानंतर त्यांची मानसिक स्थिती यथायोग्य असेल तरच परिणामकारक आणि प्रभावी अध्ययन प्रक्रिया घडून येईल.

३. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील भाषा व कुटुंबातील, परिसरातील भाषा वेगवेगळी असल्यामुळे मुलांना भाषिक अडथळा निर्माण होऊन ताणतणाव निर्माण होतो.

४. शासकीय, अनुदानित मराठी माध्यमांच्या शाळेत अत्याधुनिक अशा भौतिक सुविधा, तंत्रज्ञानयुक्त आधुनिक शिक्षण पद्धती उपलब्ध नसल्यामुळे पालकांचा ओढा इंग्रजी माध्यमाकडे वाढत आहे.

## १.२६ संशोधनाची गृहितकृत्ये/परिकल्पना

१. इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची कौटुंबिक भाषा व शाळेतील शिक्षणाची भाषा वेगवेगळी

असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा शैक्षणिक विकासावर होणाऱ्या परिणामांविषयी पालकांमध्ये जागरूकतेचा अभाव आहे.

२. परकिय भाषेपेक्षा मातृभाषेतून विद्यार्थ्यांना अध्ययन घटकांचे आकलन सोपे जावुन संपादणूक वाढते.

**१.२७ संशोधनाची व्याप्ती**

१. प्रस्तूत संशोधन अभ्यासाची व्याप्ती ही अकोला जिल्हयातील शाळांमधून इंग्रजी माध्यमातील प्राथमिक व उच्च प्राथमिक २८८ शाळांमधून लॉटरी पद्धतीने ३० टक्के शाळांची तालुका निहाय निवड करण्यात आली.

२. अकोला जिल्ह्यातील निवड केलेल्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांतील वर्ग ९  वीत शिकणारे विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला.

३. अकोला जिल्ह्यातील निवड केलेल्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांतील वर्ग ७  वीत शिकणारे विद्यार्थ्यांच्या पालकांचा समावेश करण्यात आला.

४. अकोला जिल्ह्यातील निवड केलेल्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांतील शिक्षकांचा समावेश करण्यात आला.

५. अकोला जिल्ह्यातील शासकीय / अनुदानित मराठी माध्यमाच्या शाळेतील १०२ मुख्याध्यापक व शिक्षक यांचा सहेतुक नमुना निवड पद्धतीने समावेश करण्यात आला.

**१.२८ संशोधनाची मर्यादा**

१. प्रस्तूत संशोधनामध्ये अकोला जिल्ह्याची निवड करण्यात आली.

२. इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक यांचा समावेश केला.

**१.२९ संशोधनाची परिमर्यादा**

१. वरील संशोधन हे इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वातावरण व मानसिकतेचा अभ्यास करण्यासंदर्भात परीमर्यादित आहे.
२. सदरील संशोधन हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शिक्षणाचे माध्यम निवडतांना पालकांमधील जागरूकतेचा अभ्यास करण्यापुरते मर्यादित आहे.
३. प्रस्तुत संशोधन हे इंग्रजी माध्यमांच्या शाळेमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या भाषिक अडथळयांमुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेण्यासंदर्भात परीमर्यादित आहे.
४. प्रस्तुत संशोधन हे अकोला जिल्ह्यातील शासकीय अनुदानित मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश न घेण्यामागील कारणांचा शोध घेण्यासंदर्भात परीमर्यादित आहे.
५. सदर संशोधन शैक्षणिक वर्ष २०२२ ते २०२५ पुरते मर्यादित आहे.

प्रस्तूत संशोधनाकरीता शैक्षणिक संशोधन पध्दतीचा उपयोग करून प्राथमिक स्तोत्राद्वारे संशोधनाशी संबधीत माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधकाने निर्मित केलेली पदनिश्चयन श्रेणी, प्रश्नावलीच्या माध्यमातून इंग्रजी माध्यमांच्या शाळातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची मानसिकता आणि पालकांमधील मुलांच्या शैक्षणिक विकासाबाबत व दृष्टिकोणाचा विचार केला आहे.

## १.३० संशोधन प्रकरण योजना

### प्रकरण 1 – प्रस्तावना

प्रकरण १ मध्ये संशोधनाची पार्श्वभुमी मांडण्यात आली आहे. भारतातील ब्रिटिशकालीन शिक्षण पद्धती, शिक्षणासाठीचे विविध आयोग, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शिक्षण तसेच २१ व्या शतकात शिक्षणातील बदलते प्रवाह या संदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच पालक पाल्यांच्या शिक्षणाच्या माध्यमातून

पालकांची भूमिका, मातृभाषेतून प्राथमिक शिक्षणाची उपयुक्तता, याशिवाय विद्यार्थ्यांची मानसिकता, विद्यार्थ्यांवरील पालकांच्या अपेक्षांचे आणि अभ्यासाचे ओझे, मुलांवरील पालकत्व शैलीचा प्रभाव, विद्यार्थ्यांमधील ताणतणाव आणि ताण निर्माण करणारी लक्षणे या संदर्भात सविस्तर मांडणी करण्यात आली. संशोधनाची गरज, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाच्या संकल्पनात्मक व्याख्या, कार्यात्मक व्याख्या, संशोधनाची चले, गृहीतक, संशोधनाचे गृहीतकृत्ये, परिकल्पना, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाची मर्यादा, संशोधनाची परिमर्यादा, या संदर्भात या प्रकरणांमध्ये सविस्तर मांडणी करण्यात आली.

**प्रकरण २ - संबधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा**

प्रस्तूत संशोधनाशी संबधित प्रकाशित झालेल्या पुस्तकांमधील माहिती, मासिके व वृत्तपत्रातील लेख, प्रबंध, शोधनिबंध तसेच इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीचे अवलोकन करण्यात आले. संबधित पुर्व साहित्य व संशोधनाचा आढावा घेवून साहित्य समिक्षा करण्यात आली व प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण मांडण्यात आले.

**प्रकरण ३ - संशोधन कार्यपध्दती**

प्रस्तूत संशोधन कार्याकरीता सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा उपयोग करून प्राथमिक स्त्रातांद्वारे संशोधनाशी संबधित माहिती व ज्ञान प्राप्त केले आहे. संशोधनासाठी निवड केलेल्या नमुनाद्वारे प्रश्नावली, पदनिश्चयन श्रेणी, संशोधीकेद्वारा निर्मित केलेली पदनिश्चयन श्रेणी,  गुगल फॉर्म या साधनांचा उपयोग करून प्राथमिक माहिती मिळविली.

**प्रकरण ४ - माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

प्रस्तूत संशोधनाचे संदर्भात प्राप्त तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी शेकडा प्रमाण या संख्याशास्त्रीय तत्राचा वापर करून

संशोधनासाठी निर्धारित करण्यात आलेल्या उद्दिष्टांनुसार विश्लेषण केले.

**प्रकरण ५ – सारांश, निष्कर्ष व शिफारशी**

प्रस्तूत संशोधनाची सुरूवात करण्यापासून तर निष्कर्ष काढणेपर्यंतच्या केलेल्या कार्यवाहीचा संक्षिप्त परिचय करून देण्यात आला आहे. तसेच संशोधनातून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. पुढील संशोधनासाठी विषय व शिफारशी सुचविल्या.

## १.३१ समारोप

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संशोधन हे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत अध्यायन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्यांचा शोध घेणे, इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता आणि त्यांच्या शैक्षणिक विकासाबाबत पालकांच्या जागरूकतेचा अभ्यास करण्यासाठी आवश्यक पार्श्वभूमीचे सविस्तर विश्लेषण केले. भारतातील ब्रिटिशकालीन शिक्षण पद्धती, शिक्षणासाठीचे विविध आयोग, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शिक्षण तसेच २१ व्या शतकात शिक्षणातील बदलते प्रवाह या संदर्भात सविस्तर आढावा घेतला. तसेच पालक पाल्यांच्या शिक्षणाच्या माध्यमातून पालकांची भूमिका, मातृभाषेतून प्राथमिक शिक्षणाची उपयुक्तता, याशिवाय विद्यार्थ्यांची मानसिकता, विद्यार्थ्यांवरील पालकांच्या अपेक्षांचे आणि अभ्यासाचे ओझे, मुलांवरील पालकत्व शैलीचा प्रभाव, विद्यार्थ्यांमधील ताणतणाव आणि ताण निर्माण करणारी लक्षणे या संदर्भात सविस्तर मांडणी केली. संशोधनाची गरज, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाच्या संकल्पनात्मक व्याख्या, कार्यात्मक व्याख्या, संशोधनाची चले, गृहीतक, संशोधनाचे गृहीतकृत्ये, परिकल्पना, संशोधनाची व्याप्ती,

संशोधनाची मर्यादा, संशोधनाची परिमर्यादा, या संदर्भात या प्रकरणांमध्ये सविस्तर मांडणी केली.

पुढील प्रकरणांमध्ये संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा घेण्यात आला.

***

# प्रकरण २
# संबधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा

## २.१ प्रास्ताविक

संशोधन साहित्याचे पुनरावलोकन म्हणजे पूर्वी झालेल्या संशोधनाचा एक धावता आढावा होय. पूर्वी झालेल्या संशोधनात अप्रकाशित किंवा अपरिचित मुद्यांना लक्षात घेता यावे या दृष्टिकोनातून संशोधन साहित्याच्या सिंहावलोकनाचे अनन्य साधारण महत्व आहे. सामाजिक आंतरक्रिया आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाच्या आधारावर शास्त्रीय संशोधन पध्दतीद्वारे करण्यात येणारे शास्त्रीय अध्ययन संशोधनाची योग्यता सिध्दता करते. संशोधन विषयाचे यथोचित विवेचन व विश्लेषण करण्यासाठी संशोधन साहित्याचे पुनरावलोकन दिशादर्शक ठरते किंवा दिपस्तंभाची भूमिका पार पाडत असते. संशोधन साहित्याचे पुनरावलोकन करताना सामान्यतः विश्लेषणात्मक तथा संशोधनात्मक संदर्भग्रंथ, लघुशोधप्रबंध, सामाजिक प्रकल्प, शोधनिबंध, स्मरणिका, शोध प्रकल्प, शोधपत्रिका इत्यादींचे पुनरावलोकन केले जाते. समकालीन संशोधन प्रक्रियेत आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाचा अवलंब मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यामुळे संशोधकाचा इतर विषय किंवा शास्त्रांशी असलेला परस्पर संबंध तथा सहसंबंधाचे अध्ययन व विश्लेषण करण्यासाठी संशोधन साहित्याचे पुनरावलोकन अतिशय बहुमूल्य स्वरुपाचे ठरते. अर्थात समाजाभिमुख शास्त्रीय संशोधनाची दिशा व दशा स्पष्ट करण्याचे मूलभूत साधन म्हणजे संशोधन साहित्याचे पुनरावलोकन आहे.

ज्ञानाचा शोध घेण्याच्या कृतीशी संशोधनाचा संबंध असतो. या अंतिम ध्येयासाठी संशोधक मुख्य समस्येची निवड करतो आणि संशोधनाच्या विविध साधनांचा अवलंब करतो. आधारसाहित्य संग्रहित करतो व शेवटी संकलित माहितीचे स्पष्टीकरण करुन नवीन

ज्ञान प्राप्त करतो. कोणत्याही संशोधन कार्याला सुरुवात करण्यापूर्वी आपण निवडलेली समस्या प्रामुख्याने नवीन ज्ञानाच्या शोधासंबधी असल्याची खात्री करुन घेणे आवश्यक असते. संशोधकाने निवडलेल्या समस्येचे उत्तर कोणीतरी दुसऱ्याने शोधून काढलेले नाही हे त्याला कसे समजणार? ज्ञानाचा विस्फोट झालेला नाही आणि औपचारिक संशोधन कार्यक्रमासाठी काम करणाऱ्या लोकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली नाही. त्यामुळे एखादा विषय कोणीतरी हाताळलेला आहे की नाही याबाबत निश्चितपणे माहिती देणे अगदीच कठिण आहे. एखाद्या व्यक्तीने पूर्वी जे काम केले आहे त्याची मी पुनरावृत्ती करीत नाही याची खात्री होते.

संशोधन विषयासंदर्भात पूर्वी झालेल्या संशोधनाचा अभ्यास-आकलन व भूमिकाचे व्यक्तीने जर व्यवस्थितपणे अवलोकन केले तर अधिक आत्मविश्वासाने समस्येसंबधी त्याला अभ्यास करता येतो. संबंधीत साहित्याचा आढावा घेतेवेळी संशोधक पूर्वीच्या अस्तित्वात असलेल्या समस्येशी संबंधित वाङ:मय सिंहावलोकन करतात. संशोधन अहवाल (शोध प्रबंध) शोधपत्रिका (जर्नल्स), संदर्भग्रंथ, शोध प्रकल्प, लघुशोध प्रबंध अशाप्रकारच्या वाङ:मयामध्ये संशोधक संशोधन विषयासंदर्भात साम्य, संबंध व अवलंबन विचारात घेतो. त्यामुळे त्याचे अंतर्भूत घटकांचे आकलन वाढते, अचूक, नेमके बनते. थोडक्यात संशोधकाला संशोधन साहित्याच्या अवलोकनामुळे प्रश्नाचे उत्तर शोधण्यास, कृतीसाठी योग्य मार्गाचा, अधिक उपयोगी वा साधक मार्गाचा अवलंब करुन घेण्यास उद्‌दुक्त करतात.

संशोधन साहित्याच्या पुनरावलोकनामुळे संशोधकाला अनेक फायदे होतात. अर्थात दुसऱ्या संशोधकाने यासारखाच प्रश्न कसा हाताळला आहे हे समजते. समस्या कशी सोडवावी, कोणत्या पध्दती व तंत्रे वापरावीत याची सूचना मिळते. संशोधकाला माहित नसलेली नवीन आधार सामग्री उपलब्ध होते. संशोधकाला त्याच्या

क्षेत्रातील माहित नसलेली असामान्य व्यक्ती, तिचे कार्य यांचा परिचय होतो. पूर्व संशोधनामुळे संशोधकाला स्वतःच्या अभ्यासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजेल व तोच किंवा तत्सम प्रश्न सोडविण्यासाठी सहकार्य प्राप्त होते. संशोधकाला पूर्वी ज्ञात नसलेल्या नवीन संकल्पना व प्रणालींचे ज्ञान होतो. स्वतःच्या संशोधन प्रयत्नांचे मूल्यमापन करणे व इतरांच्या कार्याशी त्याची तुलना करणे इत्यादी बाबी संशोधकाला संशोधन साहित्याच्या पुनरावलोकनमुळे सहज स्पष्ट होतात.

**२.२ संशोधन साहित्याचा आढावा घेण्याची गरज व महत्त्व**

१. संशोधन समस्या मर्यादित आणि परिभाषित करण्यासाठी
२. शोध अभ्यासास अधिष्ठान मिळवून देण्यासाठी
३. संशोधनाची पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी
४. उचित संशोधन विषय निवडीकरिता मार्गदर्शन प्राप्तीसाठी
५. संशोधन पध्दती व तंत्रे याचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी
६. संशोधनाची उचित कार्यपद्धती ठरविण्यासाठी
७. संशोधनासाठी उपयुक्त सिद्धांत व परिकल्पनाची मांडणी करण्यासाठी
८. शोध अभ्यासाची गुणवत्ता वाढवण्यासाठी
९. ज्ञानातील गॅप शोधून काढून ते संशोधनातून सोडविण्यासाठी
१०. संशोधनाला सैद्धातिक व संकल्पनात्मक बैठक प्राप्त करून देण्यासाठी
११. परिक्षण योग्य अशी परिकल्पना निवडीसाठी
१२. शोध अभ्यासास उपयुक्त संशोधन साधन निर्मिती करिता
१३. संशोधकांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी
१४. पूर्वीच्या संशोधकांनी केलेला अभ्यास हा विद्यमान साहित्यात काय भर घालू शकतो हे जाणून घेण्यासाठी
१५. मागील संशोधनाच्या शिफारशीबद्दल जाणून घेण्यासाठी

अशाप्रकारे कोणत्याही विषयाच्या संशोधनामध्ये संशोधनाला दिशा देण्यासाठी, उद्दिष्टे, व्याप्ती, मर्यादा ठरविण्यासाठी संबंधित साहित्याच्या आढाव्याचे गरज व महत्त्व असते.

**२.२.१ संबंधित साहित्याचे स्त्रोत**

- प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत - माहिती
- संदर्भ पुस्तके - लेख
- संशोधन अहवाल - एखाद्या विशिष्ट विषयावर लिहिलेला प्रबंध
- ज्ञानकोश
- शब्दकोश
- हस्तपुस्तके
- वार्षिक
- नियतकालिके
- सरकारी दस्तऐवज
- वर्तमानपत्रे
- पत्रके इंटरनेट

**२.३ प्रस्तुत संशोधनातील संबंधित साहित्याचा आढावा**

| अ.क्र. | संबंधित साहित्याचे शीर्षक | संख्या |
|---|---|---|
| २.३.१ | मुलांची मानसिकता आणि कौटुंबिक वातावरणाशी संबधित पुस्तकांमधून घेतलेला आढावा | १२ |
| २.३.२ | शिक्षणाचे माध्यम निवडीबाबत पालकांमधील जागरुकतेबाबत संकेतस्थळ वरून घेतलेला संबंधित साहित्याचा आढावा | ६ |
| २.३.३ | शिक्षणाचे माध्यमाबाबत वर्तमानपत्रात प्रसिध्द लेखांवरून घेतलेला संबंधित साहित्याचा आढावा | १२ |
| २.३.४ | संशोधन विषयाशी संबंधित विविध मासिकांमधून घेतलेला संबंधित साहित्याचा आढावा | ८ |
| २.३.५ | संशोधन विषयाशी संबंधित विविध जर्नल मधील | ६ |

| | | |
|---|---|---|
| | **प्रकाशित रिसर्च पेपर द्वारा घेतलेला संबंधित साहित्याचा आढावा** | |
| २.४ | **संशोधन विषयाशी संबंधित संशोधनाचा आढावा** | २३ |
| | **संबंधित साहित्य व संशोधनांची एकूण संख्या** | ६९ |

## २.३.१ मुलांची मानसिकता आणि कौटुंबिक वातावरणाशी संबधित पुस्तकांमधून घेतलेला आढावा

### २.३.१.१ शोभा भागवत – सारं काही मुलांसाठी :

**पुस्तकाचा सारांश :**

सदर पुस्तकात आई-वडिलांच्या मुलांबद्दल असलेल्या महत्त्वाकांक्षेच्या ओझ्याखाली मध्यमवर्गीय घरातली आजची मुलं गुदमरून गेली आहेत. पालकांच्या जगण्यातील ताणतणाव मुलांमध्ये आपसूक झिरपत आहेत. पालक जिंकण्यासाठी स्पर्धेतील घोड्यासारखे धावताहेत आणि बाहेरची सगळी प्रस्थापित व्यवस्था याला मदत करते आहे. अशा वातावरणात मुलाचं 'मूलपण' सांभाळण्याचं, जोपासण्याचं, फुलवण्याचं काम जीव तोडून कसं करायचं, हे सांगण्याचा हा प्रयत्न...

आपली मुलं कशी आहेत ?

मुलं फार हुशार असतात. घरात त्यांचा अदृश्य व्हिडिओ कॅमेरा सतत काम करीत असतो. आपण जे वागतो ते मूल पाहत असतं, समजून घेत असतं. त्याचा त्याच्या आयुष्यावर बराच परिणाम होत असतो. आमच्याकडे एक चार वर्षांची मुलगी होती. तिला आईचं चित्र काढायला सांगितलं- तिने सुंदर चित्र काढलं. आईचा चेहरा, केस, डोळे काढले; पण कान काढले नाहीत. "का गं. कान का नाही काढले?" असं विचारलं तर “तिला कशाला कान काढू? ती काहीच ऐकत नाही,” असं ती मुलगी म्हणाली.

एकदा एका मुलानी वडिलांचं छान चित्र काढलं होतं आणि त्यावर पाऊस काढला होता. त्याला विचारलं, “बाबा छत्री विसरले

का?” तर म्हणाला, “नाही. आम्हाला ते फार त्रास देतात म्हणून त्यांना पावसात उभं केलंय."

आपलं घर मुलांना काय देत आहे ?

याही प्रश्नाचं उत्तर पालकांनी सतत शोधत राहायला हवं. गांधीजींनी म्हटलं आहे- “सुसंस्कृत घरासारखी कुठली शाळा नाही आणि प्रामाणिक तसेच सदाचारी आई - वडिलांसारखे कोणतेच शिक्षक नाहीत." त्यामुळे आपलं घर सुसंस्कृत हवं. आई-वडील सदाचारी हवेत. प्रामाणिक हवेत. हा खरं तर मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा पाया आहे. प्रेम आणि शांती या दोन गोष्टी अशा आहेत की, त्या घरात नाही मिळाल्या तर संपूर्ण जगात शोधूनही सापडत नाहीत. या गोष्टींचा अनुभव मुलांना घरात यायला हवा. घरातल्या प्रेमासाठी मुलांची पावलं आयुष्यभर घराकडे वळायला हवीत. घर सन्मान देतं.फुलण्यासाठी बळ देतं. घर स्वतंत्र विचार करायला शिकवतं. त्यामुळे घरात एकमेकांचा संवाद चांगला हवा. निरपेक्षपणे इतरांसाठी काम करायला घरानं शिकवावं. घरात मनापासून काम केलं की, बाहेरही माणसं तसंच करतात. चांगल्या कामांचं सातत्य मुलांना घरात अनुभवायला मिळावं. एकदा केलं आणि सोडून दिलं, असं होऊ नये. घरात कष्टांची सवय हवी. त्यामुळे मुलांशी संवाद कायम चांगला ठेवावा; पण ठेवणार कसा, हा प्रश्न सर्व पालकांना सतावत असतो. त्यासाठी शोभा भागवत यांनी एक सूत्र केलं आहे. 'दूध तूप शिरा मासा.'

| | |
|---|---|
| **दु** – दुर्लक्ष करणे | **ध** – धमक्या देणे |
| **तु** – तुलना करणे | **प** – परस्पर निष्कर्ष काढणे |
| **शि** – शिक्के मारणे | **रा** – रागावणे |
| **मा** – मारणे | **सा** – सांत्वन करणे |

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** मुलांच्या कृतीमागील कारणे अभ्यासण्यास मदत झाली.

**२.३.१.२ लीला पाटील – परिवर्तनशील शिक्षण :**

**पुस्तकाचा सारांश :**

या पुस्तकात, मुलांच्या हक्काविषयी जाणीव का महत्वाची आहे याची सविस्तर माहिती दिली आहे. १९८९ साली युनोच्या सर्वसाधारण सभेत सादर केला गेलेलामुलांच्या हक्कांविषयीचा मसुदा या मसुद्यातील पहिल्याच कलमानुसार मूल म्हणजे १८ वर्षांखालील प्रत्येक मनुष्य असं म्हटलं आहे.

ज्या बाबींचा मुलांवर परिणाम होणार असतो, अशा सर्व बाबींविषयी स्वतःचा दृष्टिकोन तयार करण्याचा आणि तो दृष्टिकोन मोकळेपणानं मांडण्याचा हक्क मुलाला आहे. या हक्काची जाणीव ठेवून आपण पालक-शिक्षक वागतो का ? किंबहुना मुलाला हा हक्क आहे याची जाणीव आपल्याला असते का ?

शिक्षणातून मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्य याबद्दलचा आदर मुलांत विकसित व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. शिक्षणामुळं मुक्त समाजव्यवस्थेतील जबाबदार आयुष्यासाठी मुलाची तयारी व्हावी, तसंच शांतता, सहिष्णुता आणि लिंगभेदातील समता याबाबतचं त्याचं आकलन वाढावं अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

१४-२ ह्या कलमात म्हटलं आहे की, "State parties shall respect the rights and duties of the parents to provide direction to the child in the exercise of his/her right in a manner consistent with the evolving capacities of the child."

मुलांच्या वाढत्या क्षमतांच्या विकासात शाळेची मदत होत नाही या अवस्थेतून त्या क्षमतांना योग्य दिशा देण्यासाठी आई शाळेत गेली होती; परंतु पालक म्हणून तिच्या हक्कांचा आणि कर्तव्याचा आदर शाळेकडून केला गेला नाही. मूल म्हणजे केवळ शरीर नसतं. त्या शरीरात एक मन/आत्माही असतो.

विश्रांती आणि फुरसदीचा हक्क - याच संदर्भात कलम ३१ (१) चा उल्लेख योग्य ठरेल.

मुलाला विश्रांती आणि फुरसत घेण्याचा हक्क आहे. मुलं म्हणजे सर्वकाळ शिक्षक संचलित / पालक संचलित 'रोबोज' आहेत असं आपण मानतो की काय ? आणि अशा या क्रूर, निर्मम वातावरणाविरुद्ध मुलांनी कोणत्याहीप्रकारे विरोध दर्शवला की एक मनुष्य म्हणून त्याला जी प्रतिष्ठा असते ती धुळीला मिळेल अशा शिक्षा वर्गात/ वर्गाबाहेर किंवा घरांतही फर्मावल्या जातात. मुलांची शरीरं आणि मनं आज जायबंदी आहेत ! पण आम्हाला त्याची काय पर्वा ? पालकांचे आणि शिक्षकांचे एकमेव लक्ष्य म्हणजे परीक्षेत मुलांना मिळणारे गुण, शिष्यवृत्त्या, झळकणारी नावं, होणारे सत्कार ! आपल्या अपेक्षांच्या पूर्तीसाठी आपण मुलांना बळी देत आहोत. तसं करण्याचा आपल्याला अधिकार आहे काय ?

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** शिक्षक व पालकांच्या हस्तक्षेपामुळे मुलांचे हक्क कशाप्रकारे हिरावून घेतले जातात याविषयी माहिती समजण्यासाठी सदर पुस्तकाचा उपयोग झाला.

**२.३.१.३ डॉ. राजेंद्र बर्वे – कथा पालकांच्या व्यथा मुलांच्या :**

**पुस्तकाचा सारांश :**

सदर पुस्तकात माध्यम निवडीबाबत पालकांमधील संभ्रमाची उकल करण्यात आली आहे. शिक्षणाचं माध्यम इंग्रजी असावं की मराठी ? हा प्रश्न वारंवार विविध ठिकाणी उपस्थित केला जातो. आपल्याला ज्या सुविधा मिळाल्या नाहीत, त्या मुलांना सहज उपलब्ध व्हाव्यात, म्हणून प्रयत्नशील असणारे पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल करतात. जणू काही, उच्च शिक्षणाचं नि राहणीमानाचं ते प्रवेशद्वार असतं.

पालकांच्या अपेक्षा साहजिक उंचावतात आणि मुलांनी आपल्या कुवतीनुसार गुण कमावले तरी ते अपुरे वाटू लागतात. त्यातूनच इतरांना जमतं ते माझ्या मुलांना जमत नाही, ही गोष्ट मनोभंग करते आणि तो सगळा राग, अपेक्षाभंगाचं दुःख मुलावर काढलं जातं. पालकांच्या अशा रोषामुळं मुलं बिथरतात आणि

धास्तावतात. त्यांची अभ्यासातील प्रगती खुंटते. एका विचित्र दुष्टचक्रात पालक व मुलं अडकतात.

माध्यम बदलावं तरी अडचण, न बदलावं तरी अधोगती अशा पेचात अडकलेल्या पालकांनी थांबून गंभीरपणे विचार करायला हवा. कदाचित काही कटू पण आवश्यक निर्णय घेऊन त्यातून मार्ग काढायला हवा. मुलांच्या बौद्धिक क्षमतेचा, बुद्ध्यांकाचा विचार, समज आणि आकलनशक्तीची गुणवत्ता यांचा आढावा घेऊन त्यानुसार माध्यमबदलाचा निर्णय घ्यावा.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** माध्यम निवडीबाबत पालकांच्या मनस्थिती, संभ्रम, मुलांकडून अपेक्षा याविषयी माहिती तसेच पालक प्रश्नावली तयार करण्यास मदत झाली.

**२.३.१.४ शोभा भागवत – शिक्षण आणि शांती :**

**पुस्तकाचा सारांश :**

या पुस्तकात मुलांना येणारा सततचा ताण व अपेक्षा यांचा मुलांच्या क्षमता, शैक्षणिक विकास यांच्यावर होणारा परिणाम याविषयी माहिती दिलेली आहे. मुळापासून उपटलं जाणं याचा अर्थ नैसर्गिक ऊर्जेपासून तुटणं, आधारापासून तुटणं. मुलांची स्वाभाविक शक्ती आणि अर्थपूर्ण खेळांत गुंतून राहण्याची क्षमता हे शिक्षणाचं मूळ साधन आहे, ही गोष्ट शाळा बहुतेक वेळा लक्षात घेत नाहीत. मुलाच्या काही क्षमतांवर अतोनात भर द्यायचा आणि काही क्षमतांकडे पार दुर्लक्ष करायचं हे एकांगी शिक्षण आहे; त्यामुळे मुलाची सर्वांगीण वाढ होत नाही. सततचा ताण आणि अवास्तव अपेक्षा यांच्यामुळे मूल अवलंबून राहायला शिकतं आणि स्वातंत्र्य हरवून बसतं.

'मूल कसं विचार करतं हे समजून घ्यायचं' तर पियाजे या शिक्षणतज्ज्ञानं मांडलेला समांतर विकास व कल्पनाशक्तीच्या विकासाच्या पायऱ्या ही दोन महत्त्वाची साधनं आहेत. पण इतर सर्व साधनांप्रमाणेच या साधनांनाही मर्यादित हेतू आणि अर्थ आहे.

शाळा मुलासमोर कशी येते ? तर सगळी बंधनं, कडक नियमांचे आणि पद्धतींचे अंतर्भूत ताणतणाव हे सगळं घेऊनच. काही शिक्षकांना मूल म्हणजे त्यांच्यातल्या स्वतंत्र शिस्तीला जणू काही भेडसावणारं आव्हान वाटतं. त्यामुळे मुलाला फार हालचाली करता येणार नाहीत असा त्याच्या जागेचा (स्वातंत्र्याचा) संकोच केला जातोच. शिवाय, मानसिक दृष्टीनंही त्याला बंदिस्त केलं जातं. त्यामुळे मुलानं दंगा करणं, शाळेत गोंधळ निर्माण होणं हे सगळं टळतं. वर्गांच्या भिंती, जमिनीला जखडलेली बाकं, पाठ्यपुस्तकांचा जुलूम, परीक्षांच्या सावल्या, नापास होण्याची भीती ही सर्व परिणामकारक शस्त्र मुलाला मुक्त अवकाश नाकारून एका ठिकाणी बांधून ठेवण्याचं काम करतात.

काही काळातच मूल नियमांनुसार वागू लागतं; एवढंच नाही, तर शिक्षकावर अवलंबून राहायला शिकतं, शाळेची चौकट, अभ्यासक्रम यांवर अवलंबून राहतं. यामुळे मुलांचा स्वत:च्या अनुभवांवर, स्वतःच्या साधनांवर विश्वास राहत नाही. सर्वशक्तिमान प्रौढांच्या लेखी चांगलं ठरणं आणि शिक्षा टाळणं हा मग शाळेत जाणाऱ्या मुलांच्या शालेय जीवनाचा हेतूच बनून जातो. जी शाळा एकाच शिक्षण देते, यश मोजायची जिची मोजपट्टी समाजात मोठेपणा मिळवणं ही आहे प्रकारचं ती निश्चितपणे संकुचित दृष्टिकोन असणारी शाळा आहे; कारण अनेक मुले स्वतःच्या अनुभवावर, साधनांवर विश्वास ठेऊन काम करण्याच्या या प्रक्रियेपासून दूरच ठेवली जातात. व्यक्तीचा सन्मान न करणारं शिक्षण, मुलाला स्वत:पासून अ आणिइतरांपासून तोडणारं शिक्षण, जिथे आज्ञाधारकपणा आणि नियम हेच सर्वस्व आहे, असं शिक्षण मुळातच धोकादायक आहे. माणसाचा स्वाभिमान मारून टाकणं, निवडीचं स्वातंत्र्य आणि आत्मविश्वास हिरावून घेणं यामुळे मुलातला स्वतंत्र आवाज दडपला जातो. तो बंड करून उठतो. तो

एकतर आतल्या आत स्वत:चा आत्मघात करतो किंवा बाहेर इतरांवर आक्रमण करतो.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** मुलांचे बंड, आत्मघात व इतरांवर आक्रमण करण्यामागील कारणांची उकल होण्यासाठी सदर पुस्तकाचा उपयोग झाला.

**२.३.१.५ श्रुती पानसे – मुलांचे ताण–जबाबदारी पालकांची :**

**पुस्तकाचा सारांश :**

सदर पुस्तकात जशी क्रिया - तशी प्रतिक्रिया याआधीच्या पिढीतल्या आईला मुलांसाठी द्यायला एवढा वेळ नसायचा, ते एका अर्थानं बरंच होतं की काय, असं कधी कधी वाटतं. कारण 'क्वालिटी टाइम' देण्याच्या नावाखाली त्या 'रिंग मास्टर' तरी होत नव्हत्या. एकच मूल आणि भरपूर अपेक्षा - असं प्रमाण तर आज दिसतंच आहे. याचा मुलांवर येणारा ताण प्रचंड आहे. या वयातल्या मुलांना सांगायचं, बोलायचं कळत नाही म्हणून, नाही तर त्यांनी हे नक्कीच बोलून दाखवलं असतं. त्यांना बोलता येत नाही म्हणून त्यांच्या वागण्यातून त्यांचे ताण प्रगट होतात.

मानसिक ताण कशामुळे उद्भवतो ? ताण हा काही प्रमाणात असलाच पाहिजे. ताण आहे म्हणून प्रगती आहे. ताण आहे म्हणूनच आपल्याला स्वतःचं आणि समाजाचं भान आहे. योग्य वर्तन घडून यायचं तर स्वच्छंदी बालमनाला आवर घालावा लागतोच. थोडा ताण निर्माण करण्याचं काम पालकांना करावं लागतंच. पण - असा ताण सकारात्मक असावा. जो ताण नकारात्मकतेकडे घेऊन जाईल असा ताण मुलांच्या मनात निर्माण व्हायला नको. मानसिक ताणाची एक व्याख्या अशीही आहे की बाह्य किंवा आंतरिक कारणांना मानवानं दिलेला शारीरिक, मानसिक किंवा वागणुकीतला प्रतिसाद जेव्हा अपुरा पडतो तेव्हा मानसिक ताण उद्भवतो. मानसिक ताण उद्भवण्याच्या कारणांमुळे जशी बाह्य कारणं असतात, तशी आंतरिक कारणंही असतात.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** भरपूर अपेक्षा याचा मुलांवर येणारा ताण याविषयीची माहिती समजण्यासाठी सदर पुस्तकाचा उपयोग झाला.

**२.३.१.६ डॉ. श्रीकांत चोरघडे – संगोपन पालकत्वाचे :**

**पुस्तकाचा सारांश :**

या पुस्तकात एकविसाव्या शतकात बुद्धिमत्ता मापन चाचणीपेक्षा मुलांमधील क्षमता ओळखणाऱ्या, त्यांचा भावनिक बुद्ध्यांक जाणून घेणाऱ्या चाचण्यांना महत्त्व जास्त येऊ लागलेलं आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात पुष्कळशा पालकांची मानसिकता अजूनही जुनीच आहे. शाळेत मार्क कमी मिळाले, परीक्षेत गुणानुक्रम घसरला, की पालक मंडळी अस्वस्थ होतात. याचा I. Q. (Intelligence Quotient) म्हणजे बुद्धिगुणांक बघावा, असा आग्रह धरतात. अशी चाचणी करून चुकीचे निष्कर्ष काढून मुलामुलींची बुद्धिमत्ता कमी असल्याचं लेबल लागल्याच्या घटना अजूनही घडताहेत. प्रत्यक्ष बुद्धिमान असलेली मुलं, योग्य प्रोत्साहनानं प्रगती करतात, अशा घटनाही घडत असतात. चुकीनं बुद्धिगुणांक कमी ठरविलेल्या मुलांवर नकारात्मक परिणाम होऊन त्यांचा आत्मविश्वास कमी होतो व शाळेतील प्रगती मंदावू शकते हे पालकांनी लक्षात घ्यावं. परीक्षेतील गुण, बुद्धिगुणांक चाचण्या याला महत्त्व न देता मुलांमधील क्षमता, त्यांचं व्यक्तिमत्त्व, त्यांची भावनिक बुद्धिमत्ता याकडे पालकांनी जास्त महत्त्व द्यावं असा सल्ला जाणकार मानसशास्त्रज्ञ देत असतात.

मागील शतकात जास्त महत्त्व दिलेल्या बुद्धिमत्तेचा गुणांक १८ वर्षानंतर स्थिर राहतो असं शास्त्र सांगतं. भावनिक बुद्धिमत्ता मात्र वाढती राहू शकते. आपलं मूल बुद्धिमान असावं, त्यानं यशस्वी व्हावं ही सगळयाच पालकांची इच्छा असते. त्या दृष्टीनं पालकांचे प्रयत्नही सुरू असतात; पण बहुतांशी पालक मुलामुलींच्या परीक्षांमधील गुणांवर जास्त भर देतात. मुलांच्या प्रेमापोटी व

त्यांच्या यशासाठी मुलांनी अभ्यास करावा, असं दडपण पुष्कळ मुलांवर आणलं जातं. परीक्षेत मिळालेल्या एकेका गुणासाठी मुलांना बोललं जातं, रागवलं जातं, शिक्षा केली जाते, प्रसंगी शाळेत शिक्षकांशी वादावादी केली जाते. यातून मुलांचा गुणवत्तेनुसार प्रगतीचा आलेख वर जाण्याऐवजी खाली जाऊ शकतो. मुलांना अभ्यासाबद्दल नावड, पालकांबद्दल दुरावा निर्माण होऊ शकतो आणि यातून भावनिक बुद्धिमत्तेचा गुणांकसुद्धा घसरू शकतो. लहानपणापासून मुलांना संवादाची सवय असावी, पालकांसोबत आपले विचार, आपल्या इच्छा, आपल्या भावना व्यक्त करण्याची मोकळीक असली, तर मुलं पालकांशी जमवून घेण्याची शक्यता जास्त असते. बाहेरील व्यक्तीसोबतसुद्धा मुक्त संवाद साधण्याची, त्यांना समजून वागण्याची शक्यता वाढते. पालकांनी सुद्धा मुलांच्या भावना समजून घेण्याचा, त्यांना शब्दांमध्ये समजून सांगण्याचा प्रयत्न केलेला असला, तर मुलांचा भावनांशी परिचय व्हायला सोपं जाईल. जुन्या बुद्धिमत्तेच्या व्याख्येनुसार लोक व परिस्थितीशी जुळवून घेणं काय किंवा भावनिक बुद्धिमत्तेच्या व्याख्येनुसार स्वतःच्या व लोकांच्या भावना ओळखून भावनांवर ताबा ठेवून केलेले व्यवहार काय यात भोवतालचे लोक व परिस्थिती यांच्याशी जमवून घेणारा खरा बुद्धिमान ठरतो व यशश्री त्याच्या पायाशी लोळण घेते.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** मुलांना अभ्यासाबद्दल नावड, पालकांबद्दल दुरावा निर्माण होऊ शकतो आणि यातून भावनिक बुद्धिमत्तेचा गुणांकसुद्धा घसरू शकतो. लहानपणापासून मुलांना संवादाची सवय असावी, पालकांसोबत आपले विचार, आपल्या इच्छा, आपल्या भावना व्यक्त करण्याची मोकळीक असली, तर मुलं पालकांशी जमवून घेण्याची शक्यता जास्त याविषयी सविस्तर माहिती मिळाली.

**२.३.१.७ रेणू दांडेकर – मुलं घडताना-घडविताना :**
**पुस्तकाचा सारांश :**

या पुस्तकामध्ये 'यश' हा शब्द फारच महत्त्वाचा आहे. कारण आपण 'पालक' या शब्दाचा अर्थ आपल्या पातळीवर लावत असलो तरी हे यश परीक्षेच्या संदर्भातील आणि शाळेशी संबंधित असतं. मुलं मोठी झाल्यावर या शब्दाचा अर्थ बदलतो. लहान मुलांच्या बाबतीत 'तुला किती टक्के मार्क्स मिळाले. वर्गात कितवा आलास?' याच्या उत्तरावर यश अवलंबून असतं. तर मोठ्या मुलांच्या बाबतीत कोणता 'क्लास मिळाला याच्याशी निगडित असतं. शिक्षण पूर्ण झाल्यावर चांगल्या नोकरीला आहे, पगार चांगला आहे, याच्याशी निगडित असतं. शिवाय यशाबरोबर अपेक्षाही बदलत असतात. लहान मुलांना परीक्षेत 'पहिला नंबर आला पाहिजे' ही प्रत्येक आईवडिलांची अपेक्षा असते. तर मुलं थोड़ी मोठी झाल्यावर 'फर्स्ट क्लास मिळायलाच हवा.' खरं तर डिस्टिंक्शन मिळायला हवी, ही अपेक्षा असते. आणि महाविद्यालयात प्रवेश घेताना यश हे अपेक्षित शाखेत प्रवेश- यावर ठरतं नि प्रवेश मिळून शिक्षण पूर्ण होताना फर्स्ट क्लासने पास झालं पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त होते. इथे नेहमीच्या चाकोरीतल्या 'यशा'चा टप्पा संपतो. 'यश'- वेगवेगळया क्षेत्रातले 'प्राप्य' असले पाहिजे. ते फक्त प्रथम, द्वितीय, तृतीय यात मोजायला नको.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** पालक, मुलांच्या बाबतीत यश परीक्षेच्या संदर्भातील आणि शाळेशी संबंधित असते. मुलांच्या यशाबरोबर अपेक्षाही बदलत असतात. यश वेगवेगळया क्षेत्रातले 'प्राप्य' असले पाहिजे याबाबतीत उपयुक्त माहिती मिळण्यास मदत झाली.

**२.३.१.८ गो. द. पहिनकर – मुलांना बनवा ऑलराउंडर :**

**पुस्तकाचा सारांश :**

या पुस्तकात महत्त्वाकांक्षा म्हणजे काय ? - मुलांमध्ये महत्त्वाकांक्षा रुजविण्यासाठी स्वतःच्या आवडीनुसार जीवनाचे ध्येय निश्चित करून त्याच्या प्राप्तीसाठी उत्कृष्टतेकडे यशस्वीरीत्या जाणीवपूर्वक वाटचाल करण्याची मनस्वी इच्छा म्हणजे महत्त्वाकांक्षा असे म्हणता येईल. महत्त्वाकांक्षेमुळे जीवनाला विशिष्ट अर्थ प्राप्त होतो. जीवन दिशाहिन होऊ नये, वेळ आणि पैसा यांचा योग्य विनियोग व्हावा यासाठी महत्त्वाकांक्षा असणे आवश्यक असते. महत्त्वाकांक्षा निश्चित करताना खालील मुद्यांचा विचार होणे गरजेचे असते.

१. महत्त्वाकांक्षेचे स्वरूप हे त्या व्यक्तीच्या एकूणच व्यक्तिमत्त्वाशी संबंधित असते. अगदीच क्षूद्र किंवा सामान्य व्यक्तिमत्त्व असेल तर ती व्यक्ती क्षूद्र स्वरूपाची महत्त्वाकांक्षा बाळगेल आणि व्यक्तिमत्त्व चांगले असेल ती व्यक्ती उदात्त महत्त्वाकांक्षा बाळगेल म्हणून पालकांनी आपल्या पाल्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण व्यवस्थितरीत्या करायला हवी.

२. मुलांना सकारात्मक आत्मप्रतिमा देणेही तेवढेच आवश्यक आहे.

३. आपल्या पाल्यांच्या क्षमतांची योग्य जाण पालकांना असेल तरच ते त्यांच्या पाल्यांना योग्य महत्त्वाकांक्षा बाळगण्याच्या बाबतीत मार्गदर्शन करू शकतात.

४. महत्त्वाकांक्षी बनण्यासाठी ध्येयवादी असणे आवश्यक असते.

५. अवास्तव महत्त्वाकांक्षा निराशेला जन्म देऊ शकते, पण महत्त्वाकांक्षा नसणे मात्र वाईट.

६. पाल्यांच्याकडे योग्य निर्णयक्षमता असेल तर ते लवकर महत्त्वाकांक्षी बनतात.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** मुलांमध्ये महत्त्वाकांक्षा रुजविण्यासाठी, जीवनाचे ध्येय निश्चित करून त्याच्या प्राप्तीसाठी, जीवन दिशाहिन होऊ नये, वेळ आणि पैसा यांचा योग्य विनियोग

होण्याकरिता आवश्यक विचारांची माहिती मिळण्यास या पुस्तकाची मदत झाली.

**२.३.१.९ डॉ. लता काटदरे – शिक्षणयात्रा :**

**पुस्तकाचा सारांश :**

सदर पुस्तकात मुलांच्या प्राथमिक शाळेतील शिक्षणकाळात त्यांचं भाषाशिक्षण सर्वाधिक महत्त्वाचं असतं. मानवाच्या प्रगतीच्या वाटेवर त्याला एकमेकांशी संवाद साधता यावा, यासाठी आधी भाषा बनत गेली आणि व्याकरणाची नियमावली त्यानंतर बनली. त्यामुळे प्रत्येक बोलीभाषेत आणि संवाद भाषेत तिचं प्रवाहीपण महत्त्वाचं असतं. नियम, व्याकरण यांना सुरुवातीच्या भाषा शिक्षणात दुय्यम स्थान आहे हा महत्त्वाचा मुद्दा आपण लक्षात घ्यायला हवा. आपल्या सर्वांच्या दैनंदिन व्यवहाराच्या देवाणघेवाणीतलं भाषा हे एक प्रभावी साधन असतं. शाळेतील शिक्षणासाठी कोणती तरी एक भाषा माध्यम भाषा म्हणून वापरली जाते. आपल्या इथं काही मुलं हे शिक्षण मातृभाषेतून घेत असतात, तर काही मुलं इंग्रजी भाषेच्या माध्यमातून शिकत असतात.

मूल शाळेत प्रवेश घेण्यापूर्वी कोणती तरी एक भाषा घरी शिकलेलं असतं. बहुधा ती त्याची मातृभाषा असते. हल्ली अनेक कुटुंबांतून आंतरजातीय विवाहांमुळे मुलाच्या आईबाबांची मातृभाषा वेगळी असते म्हणून, किंवा पुढे मुलाला शालेय शिक्षण इंग्रजीतूनच घ्यावं लागणार आहे म्हणून, मुलाला सुरुवातीपासूनच इंग्रजीत बोलायला शिकवलं जातं. जरी घरातील इतर मंडळी, आजी-आजोबा मातृभाषेतून बोलत असले, तरी अनेक पालक या चिमण्या लेकरांना इंग्रजीतून बोलण्याची सक्ती करतात. एकाच वेळी त्या मुलाला इतक्या पोरवयात एकदम दोन विभिन्न भाषा कानावर पडत राहिल्यानं त्या समजून घेताना त्याच्या मेंदूवर खूप ताण पडतो. मूल या वयात जरी दोन्ही भाषा उत्तम समजू शकत असलं, तरी स्वतः बोलताना त्या त्या भाषेतले नेमके शब्द निवडताना

त्याची धांदल उडते आणि परिणामी ते अनेकदा तोतरं बोलू लागतं. मुलाला मातृभाषा आणि इंग्रजी भाषा दोन्ही या वयातच शिकवण्यामागचा पालकांचा हेतू कितीही चांगलाअसला, तरी मुलाला त्याचा असा जाचच होतो. यासाठी अगदी बालवयात मुलाच्या कानावर शक्यतो एकच भाषा पडू देण्याचा प्रयत्न करावा. ते अधिक हितावह ठरतं. प्रत्येक भाषेला स्वतःच्या अशा काही खास लकबी असतात. त्या भाषेच्या पुस्तकी शिक्षणातून शिकण्यापेक्षा ती ती भाषा उत्तम जाणणाऱ्या व्यक्तीशी त्या त्या भाषेत बोलत राहिल्यास अधिक चटकन ध्यानात येतात.

मुलांच्या अवतीभवती जी भाषा बोलीभाषा म्हणून त्यांच्या कानावर पडत असते, ती भाषा तिच्या लकबींसकट, खास तिच्या अशा चालचलणुकीसकट आत्मसात करणं त्यांना सोपं जातं. म्हणूनच मराठमोळ्या वातावरणात आपण मुलांशी इंग्रजीत बोलण्याचा अट्टाहास करणं जेवढं गैर, तेवढंच पाश्चात्त्य देशात कायम राहताना, ती जीवनशैली अंगीकारताना तिथं मुलांबाबत मातृभाषेचा अट्टाहास करणं गैर ठरतं. इथं आणखी एक गोम असते. बरेच पालक स्वतः इंग्रजी माध्यमातून शिकलेले असतात. त्यांनी खूप यशही मिळवलेलं असतं; पण एक संवादभाषा म्हणून त्यांची इंग्रजी भाषेतील शब्दसंपत्ती अगदीच तुटपुंजी असते. विचार करू लागलं तर जाणवतं, की त्यांच्यापाशी ना इंग्रजी भाषेची शब्दसंपत्ती पुरेशी असते, ना मराठीची. आपण जी भाषा संवादभाषा म्हणून वापरतो, त्या भाषेतून आपल्या अपेक्षा, विचार, भावभावना जर यथार्थपणे व्यक्त करता आल्या, तरच आपल्याला त्या भाषेचा उपयोग संवाद साधन म्हणून प्रभावीपणे करता येतो. बालवयात विपुल शब्दसंपत्ती असलेले मूल अवतीभवतीच्या घडामोडींचं आकलन करून घेतल्यावर त्यातले तपशील अधिक स्पष्टपणे मेंदूत नोंदवू शकतं.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** भाषेतून आपल्या अपेक्षा, विचार, भावभावना जर यथार्थपणे व्यक्त करता आल्या, तरच आपल्याला

त्या भाषेचा उपयोग संवाद साधन म्हणून प्रभावीपणे करता येतो. मातृभाषेतील शिक्षणाचे महत्व अधोरेखित करण्यासाठी या पुस्तकाचा उपयोग झाला.

**२.३.१.१० गो. द. पहिनकर – मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी : पुस्तकाचा सारांश :**

शिकवण्यांचे वारे आणि पालक मुलांना कुठल्यातरी शिकवणी वर्गाला पाठविण्याचा बहुतेक सर्व पालकांचा कल दिसून येतो, त्या संदर्भात चर्चा करणे इष्ट ठरेल. अध्ययन ही पूर्णतः अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संबंधित प्रक्रिया असते. केवळ अध्यापन-एकतर्फी अध्यापन कांहीही उपयोगाचे नसते. प्रचलित परीक्षा पद्धती ही विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीचेच प्रामुख्याने मूल्यमापन करते.

मुलांच्या सर्वांगीण विकासाशी या परीक्षांचा काहीही संबंध नसतो. कोणत्याही मार्गाने परीक्षेत मिळविलेले मार्क्स हेच एक परिमाण सर्वत्र चालते, त्यामुळे परीक्षेचे तंत्र शिकविणाऱ्या शिकवणीच्या वर्गाला पाल्यांना पाठविले जाते. “तीन-चार तास पाल्य घराच्या बाहेर राहतात, काहीतरी त्यांच्या कानावर पडतं, तेवढाच त्यांचा वेळ सत्कारणी लागतो, घरी मुलं काहीही करीत नाहीत हो!” अशा आशयाच्या प्रतिक्रिया पालकांकडून ऐकायला मिळतात काही शिकवणी वर्ग संपूर्ण दिवसभर पाच-पाच, सहा-सहा तास चालू असतात. सहा तास शाळा त्यांनतर किंवा त्यापूर्वी सहातास शिकवणी वर्ग, असे १०-१२ तास हे विद्यार्थी फक्त बहिऱ्या श्रोत्याची भूमिका निभावत असतात. बहिरे श्रोते-कर्णबधिर श्रोते हा शब्दप्रयोग मी जाणीवपूर्वक केलेला आहे. त्याचे कारणही अगदी उघड आहे. काही मोजके अपवाद वगळता, वर्गात शिक्षक जे अध्यापन करतात यात मुलांना केंद्रस्थानी न मानता अभ्यासक्रम पूर्ण करणे व परीक्षेची तयारी घेणे हे उद्दिष्ट केंद्रस्थानी असते. अनेक शिक्षण आयोग आले आणि गेले, अनेक विधायक बदल सुचविण्यात आले; पण ते प्रत्यक्ष कृतीत किती प्रमाणात उतरले याचा मात्र

अभ्यासच करावा लागेल. थोडक्यात एका-एका वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता वर्गातील अध्यापन हे एकतर्फी असते (काही अपवाद वगळता) हे मान्यच करावे लागेल.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** अध्ययन ही पूर्णतः अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संबंधित प्रक्रिया असून पालकांचा शिकवणी वर्गाकडे वाढलेला कल याची अतिरिक्त माहिती मिळण्यास या पुस्तकाचा उपयोग झाला.

**२.३.१.११ नसरीन पटेल – आपल्या मुलांच्या समस्या आणि उपाय: पुस्तकाचा सारांश :**

'प्रेरणा मिळवणे व कष्ट करणे' या दोन्ही गोष्टी माणसाच्या आयुष्यात घडण्यासाठी थोड्या प्रमाणात ताणाची गरज असते, ज्याच्यामुळे तो उद्युक्त होऊन काही प्रमाणात धडपड करतो. अशा ताणाला आपण 'सुखद ताण' (Eustress) म्हणतो. हा ताण परिस्थितीला सामोरे जाण्याची प्रेरणा व्यक्तीला देतो, तसेच तिच्यात आत्मविश्वास व सकारात्मकताही वाढवतो.

परीक्षेच्या बाबतीतही मुलं व पालक प्रमाणात ताण अनुभवत असतील तरच ते फायद्याचे ठरू शकते; परंतु हा ताण अवाजवी आणि प्रमाणाबाहेर असेल तर त्याचे विपरीत परिणाम नक्कीच होतात. परीक्षा व विद्यार्थी हे नातं अतूट असतं. विद्यार्थी म्हटलं की, तो परीक्षेला सामोरं जाणार हे नक्की; तसेच या स्पर्धेच्या जगात एकेक गुणासाठी झटणंही तेवढंच आवश्यक असतं; परंतु या 'परीक्षेचं' भूत विद्यार्थ्यांच्या बरोबरच त्यांच्या पालकांच्या मानगुटीवरही बसतं. शिक्षक आणि पालक तर 'परीक्षा' ही एक साधारण व नैसर्गिक प्रक्रिया आहे हे पूर्ण विसरून परीक्षेला 'आणीबाणी'चं स्वरूप देतात. यामुळे मुलांवरचा ताण अतिप्रमाणात वाढतो. हा ताण कमी करून, परीक्षेबद्दल सकारात्मकता

वाढवण्यासाठी पालकांनी पुढाकार घ्यावा, त्यासाठी त्यांनी परीक्षेच्या काळामध्ये आपली भूमिका पार पाडावी.

'परीक्षेचा ताण' कसा ओळखावा ? - ताण हा मानवी शरीराने अप्रिय गोष्टीला दिलेला प्रतिसाद होय. ताण हा शारीरिक, मानसिक व भावनिक जाणिवांचं संमिश्र रूप असतं. ताण जाणवल्यास व्यक्तीला छातीत धडधडतं, घामही फुटू शकतो, खूप काळजी वाटते व एक प्रकारची अस्वस्थता जाणवते. शिवाय डोकं दुखणे, पोट दुखणे, गरगरणे, मळमळल्यासारखं होणे, श्वासोच्छवासाचा त्रास जाणवणे व छातीत दुखणं हे सर्व होऊ शकतं. चिंतेने व काळजीने हातपाय थरथरतात व घाम फुटतो. तसेच तोंडाला चव राहत नाही व व्यक्ती एकतर खूप खात जाते. नाहीतर तिची अन्नावर वासनाच राहत नाही. झोपेचे प्रमाण हे प्रमाणाबाहेर कमी होते, सारखं लघवीला जायला लागतं व पाणीही खूप पिलं जातं. तसेच सारखे शौचास जाणे किंवा बद्धकोष्ठाचा त्रासही होतो. या सर्वांचा परिणाम म्हणजे कोणत्याही गोष्टीमध्ये विशेषतः अभ्यासात लक्ष लागत नाही. व्यक्ती निराश, आक्रमक किंवा खिन्न होते.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** ताण परिस्थितीला सामोरे जाण्याची प्रेरणा व्यक्तीला देतो, तसेच तिच्यात आत्मविश्वास व सकारात्मकताही वाढवतो. शिक्षक आणि पालक तर 'परीक्षा' ही एक साधारण व नैसर्गिक प्रक्रिया आहे हे पूर्ण विसरून परीक्षेला 'आणीबाणी'चं स्वरूप देतात. यामुळे मुलांवरचा ताण अतिप्रमाणात कसा वाढतो याविषयी सविस्तर माहिती या पुस्तकामधून मिळाली.

**२.३.१.१२ डॉ. अंजली जोशी – विवेकी पालकत्व :**

**पुस्तकाचा सारांश :**

सदर पुस्तकात मुलांना वाढविताना येणाऱ्या समस्यांबाबत भाष्य करताना विवेकनिष्ठ मानसोपचारशास्त्र सांगतं, की तुमचं मूल तुम्हांला दुःखी किंवा अस्वस्थ करू शकत नाही. ते फार फार तर

समस्या निर्माण करू शकतं; परंतु आपण दुःखी किंवा अस्वस्थ होतो ते त्या समस्येबाबत बाळगलेल्या अविवेकी दृष्टिकोनामुळे, मुलामुळे नाही, मुलाला येणाऱ्या समस्येला परिस्थिती हातभार लावत असली, तरी ती त्या समस्येचं कारण होऊ शकत नाही. त्या समस्येचं मूळ कारण असतं, आपण मनात रुजविलेला व जोपासलेला अविवेकी दृष्टिकोन !

पालकांच्या मनात मुख्यत: तीन प्रकारचे अविवेकी दृष्टिकोन असतात -

१) पालकांचा स्वत:बाबतचा अविवेकी दृष्टिकोन.

२) पालकांचा मुलाबाबतचा अविवेकी दृष्टिकोन.

३) पालकांचा परिस्थितीबाबतचा अविवेकी दृष्टिकोन.

आपल्यासमोरील समस्या सोडवावयाची असेल, तर पालकांना विचारास प्रवृत्त करून, त्यांच्या मनात ठाण मांडून बसलेल्या वरील अविवेकी दृष्टिकोनाची छाननी करून त्या जागी विवेकी दृष्टिकोनाची प्रतिष्ठापना करणं, हे विवेकनिष्ठ मानसोपचारशास्त्राचं प्रमुख उद्दिष्ट आहे. विवेकी दृष्टिकोन बाळगणारे पालक हे भावनिकदृष्ट्या प्रक्षुब्ध न होता पालकत्वाची जबाबदारी उत्तमप्रकारे निभावून नेतात. मुलांच्या व त्या अनुषंगाने येणाऱ्या पालकत्वाच्या अनेक समस्यांसाठी डॉ. एलिस यांच्या जोडीनं, हॉक, बर्नार्ड, जॉयस, वाइल्ड, ग्रिगर इत्यादी अनेक मानसशास्त्रज्ञांनी हे मानसोपचारशास्त्र यशस्वीपणे अमलात आणलं आहे.

**मानसशास्त्रीय संशोधन** - मानसशास्त्रीय संशोधन सांगतं, की पालकांच्या अशा अवाजवी अपेक्षांमुळे लहान वयातच 'बर्न आऊट' सिंड्रोम आढळून येतो. लहान वयातच जीवनेच्छा आटलेली, उत्साह मंदावलेली, चैतन्य हरपलेली, निरुत्साही व निस्तेज मुलं या सिंड्रोमची शिकार झालेली आढळून येतात. पालकांच्या अवास्तव

अपेक्षांना तोंड देता देता कधीकधी मूल स्वतःकडूनही अशा अपेक्षा ठेवत जातं व त्या पूर्ण झाल्याच पाहिजेत, असा अट्टहास बाळगतं. असा अट्टहास बाळगून त्या अपेक्षा वारंवार धुळीला मिळत गेल्या, तर 'ना मी स्वत:च्या अपेक्षा पूर्ण करत, ना पालकांच्या' अशी दोन्ही बाजूंनी टोचणी लागून न्यूनगंडासारखी आत्मघातकी प्रवृत्ती मुलाच्या मनात जन्माला येऊ शकते. काही वेळा त्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी, कुठल्याही मार्गाने पूर्ण करण्याची मनोवृत्तीही वाढीला लागलेली आढळते. समजा, एखाद्या प्रसंगी मुलाने अपेक्षा पूर्ण केल्या, उदाहरणार्थ परीक्षेत उत्तम गुण मिळवले, तरी समस्या संपत नाहीत. उलट नवीन समस्या सुरू होतात. पालकांच्या मुलांबाबतच्या अपेक्षा अजून उंचावतात व या उंचावलेल्या अपेक्षा पुढील प्रसंगातही त्याने पूर्ण केल्या पाहिजेत; म्हणजेच सतत उत्तम गुण मिळविले पाहिजेत, असा ताण पालक व मूल दोघंही घेत जातात. या दुहेरी ताणामुळे आहे त्या यशाचा आनंदही पालक व मूल घेऊ शकत नाहीत व उलट 'यशाची उज्ज्वल परंपरा मी कायम राखलीच पाहिजे' या चिंतेचा बळी ठरत जातात.

अशा अपेक्षा बाळगणारे पालक हे मुळात दुष्ट नाहीत, वाईट नाहीत. उलट आपल्या मुलाचं चांगलं व्हावं, कल्याण व्हावं अशा इच्छेपोटीच व्याकूळ होणारे हे पालक आहेत. आपल्या मुलांवर त्यांचं आत्यंतिक प्रेमही आहे. आपल्या मुलाला त्रास व्हावा, अशी त्यांची यत्किंचितही इच्छा नाही. हे सर्व करताना मुलांच्या जोडीने त्यांचीही प्रचंड दमछाक, फरफट होतेच आहे. आयुष्याचा मध्य गाठण्याआधीच अनेक शारीरिक व मानसिक व्याधींना तेही बळी पडत आहेत.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** पालकांच्या अवाजवी अपेक्षांमुळे लहान वयातच मुलांमध्ये 'बर्न आऊट' सिंड्रोम आढळून येतो. लहान वयातच जीवनेच्छा आटलेली, उत्साह मंदावलेली, चैतन्य हरपलेली,

निरुत्साही व निस्तेज मुलं या सिंड्रोमची शिकार झालेली आढळून येतात. मुलांना वाढविताना पालकांना येणाऱ्या समस्यांबाबत माहिती मिळण्यास या पुस्तकाची मदत झाली.

**२.३.२ शिक्षणाचे माध्यम निवडीबाबत पालकांमधील जागरुकतेबाबत संकेतस्थळ वरून घेतलेला संबंधित साहित्याचा आढावा**

**२.३.२.१ डॉ. संयोगिता नाडकर्णी (२०१५) यांच्या 'फुलं कोमेजतांना' :**

**संकेतस्थळावरील लेखाचा सारांश :**

या संगणक संकेतस्थळावरील लेखामध्ये 'मुलं म्हणजे देवाघरची फुलं' असे एकेकाळी समजलं जाई. गर्भितार्थ मुलं म्हणजे निरागस, कोमल मनाची व खेडकर अशी मानली जातात. बालपणाचा काळ सुखाचा, निरपेक्ष भावनेने जगलेला असा समजला जाई. एक परीक्षांचे दडपण सोडले तर सरसकट हा काळ मोकळेपणाचा म्हणजे टेन्शन फ्री...! परंतु आजकाल फार वेगळे चित्र दिसू लागले आहे. मुलांच्या पाठीवरती दप्तरांचे ओझे ज्याप्रमाणे वाढत गेले तसेच त्यांच्या मनावरचे ओझे देखील वाढत गेले. त्यांच्या मनात विचारांचा गुंता अधिकाधिक वाढत जात आहे. त्याचे पर्यावसन म्हणजे वाढता दबाव, दडपण व नैराश्य यामध्ये होत आहे. कुठेतरी आशा गमावून मुले नुसतेच आयुष्य रेटत आहेत. तर काही वेळा मुलं इंटरनेट, तंबाखू, दारू यांच्या इ. व्यसनांच्या आहारी जात आहेत असे दिसते. थोडक्यात बालपणीच शारीरिक व मानसिक आजार दिसून येत आहेत. शारीरिक दृष्ट्या मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा असे प्रौढामध्ये दिसणारे आजार आता १४-१५ वर्षाच्या मुला दिसत आहेत. ८-९ वर्षाची मुले देखील ताण घेऊ लागली आहेत. पौगंडावस्थेत क्वचितच आढळून येणारे नैराश्याचे प्रमाण आता तर ३-४ जास्त आहे. आत्महत्येचे प्रकार, प्रयत्न व प्रत्यक्ष आत्महत्या हे दोन्ही पुष्कळ वाढले आहेत. संगणकीकृत जीवनात पालकांशी होणारा संवाद, मित्र-मैत्रिणींशी होणारा बोलका संवाद जाऊन त्याची जागा आता फेसबुक, व्हाट्सअपने घेतली आहे.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** मुलांच्या पाठीवरती दप्तरांचे ओझे ज्याप्रमाणे वाढत गेले तसेच त्यांच्या मनावरचे ओझे देखील वाढत गेले. त्यांच्या मनात विचारांचा गुंता अधिकाधिक वाढत जात आहे. त्याचे पर्यावसन म्हणजे वाढता दबाव, दडपण व नैराश्य यामध्ये होत आहे. याविषयी माहिती या लेखावरून मिळण्यास मदत झाली.

**२.३.२.२ मारिया विर्त (जानेवारी १९ २०१८) 'इंग्रजी माध्यमामुळे देश दुर्बल होत आहे':**

**संकेतस्थळावरील लेखाचा सारांश :**

या मूळ लेखाचे मनोहर नारायणकर यांनी मराठीमध्ये भाषांतर केलेल्या लेखामध्ये आपल्या देशात इंग्रजी माध्यमाच स्तोम वाढलं आहे. पण क्षणभर थांबून त्यामुळे देशातील बालकांचे शिक्षण सुधारलं की बिघडलं ?, याचा विचार करायला कोणाचीच सिद्धता नाही. खरं तर पालकांनी आपल्या ठाम कल्पना बालकांवर लादण्यातून ही अवस्था उद्भवली आहे. इंग्रजी माध्यमामुळे आपल्या बालकांचे शिक्षण सुधारल, हे क्षणभर मान्य करू. ते सत्य असेल तर मग परकीय इंग्रजी माध्यमाची भलावन करणाऱ्यांनी पुढील प्रश्नांची उत्तरे द्यावी. जपानवर १९४५ साली ०२ अणुबॉम्ब अमेरिकेने टाकून हिरोशिमा आणि नागासाकी ही दोन शहरे उद्ध्वस्त केली. त्यानंतर जपानने प्रगतीला आरंभ केला असं म्हणता येईल आणि आपण १९४७ साली स्वतंत्र होऊन आरंभ केला. म्हणजे दोन्ही राष्ट्रांनी पुष्कळसा बरोबर आरंभ केला असं म्हणता येईल. १) मग इतक्या अवधीत जपानने विज्ञानातील ९ नोबेल पारितोषिक मिळवले, तर सर्वात प्राचीन आणि महान भारताला एकही नोबेल मिळवता आलं नाही, ते का ? २) २०१२ साली जगातील सर्वोच्च २०० विद्यापीठांची निवड केली गेली. तेव्हा जपानची ६ विद्यापीठ या यादीत झळकले आणि भारताचं एकही नाही, ते का ? इतकंच कशाला आपल्या महान देशाच्या तुलनेत चिल्लर असणाऱ्या आणि कटाक्षानं आपापल्या भाषेतच शिकवणाऱ्या कॅनडा, स्वित्झर्लंड, सिंगापूर, फ्रान्स, दक्षिण कोरिया, तैवान, बेल्जियम, न्यूझीलंड या देशांच्या विद्यापीठांचीही नावं यादीत आहेत. पण भारताच्या

एकाही विद्यापीठाचं नावं नाही, ते का ? ३) २०१४ साली त्यांनी ४०० विद्यापीठाची निवड केली. तेव्हा जपानची ३६ विद्यापीठ निवडली गेली. तर पुन्हा भारताच एकही विद्यापीठ निवडले गेले नाही, ते का ? याची काही खंत वाटत नाही का ? आपण काय विचार करायचा तो करालच.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** देशात इंग्रजी माध्यमाच स्तोम वाढलं आहे. त्यामुळे देशातील बालकांचे शिक्षण सुधारलं की बिघडलं ? यासोबतच बालक शिक्षणामध्ये करावयाच्या सुधारणांची माहिती मिळण्यास या लेखाचा उपयोग झाला.

**२.३.२.३ प्रदीप जाधव यांच्या संगणक संकेतस्थळावरील 'बदलती मानसिकता – शाळा, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी :**

**संकेतस्थळावरील लेखाचा सारांश :**

या लेखामध्ये शाळा, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी आजकाल सर्रास उच्चारले जाणारे वाक्य "लोकांची मानसिकताच बदलली आहे", "त्यांची मानसिकताच राहिली नाही" हे उच्चारतांना दिसतात. मानसिकतेला इंग्रजीत mindset असं आपण म्हणतो. आता ही मानसिकता जर खरोखर बदलली असेल, तर मग शाळा, विद्यार्थी, शिक्षक, पालक यांची देखील मानसिकता बदलली असावी आणि जर बदलली असेल तर मग याचा 'शिक्षण' या प्रक्रियेवर देखील परिणाम झालेला असेलच. शाळा निवडताना पालकांची मानसिकता बदलली कारण मुलं/विद्यार्थी स्वतः ठरवत नाही की त्याला कोणत्या शाळेत, कोणत्या माध्यमात आणि कोणत्या शिक्षकाकडे शिकायला जायचं ते...!

पालकांची मानसिकता शाळा निवडताना पुढील प्रमाणे बदलली आहे.

१. शाळेची फी किती आहे ? जेवढी जास्त फी, शाळा तितकीच चांगली.
२. शाळेचे माध्यम - इंग्रजी माध्यमाच्या शाळेकडे पालकांचा कल जास्त आहे.

३. शाळेची इमारत, परिसर, येण्याजाण्याची व्यवस्था, सहशालेय उपक्रम.

४. सर्वात महत्वाचे म्हणजे मुलाचा/विद्यार्थ्याचा प्रवेश घेतलेल्या शाळेचे नाव सांगताना समाजात प्रतिष्ठा मिळेल.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** शाळा, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांची मानसिकता व त्याचा 'शिक्षण' या प्रक्रियेवर होणारा परिणाम याविषयी माहिती मिळण्यास तसेच प्रश्नावली निर्माण करण्यास या लेखाचा उपयोग झाला.

**२.३.२.४ डॉ. अमितकुमार गोईलकर, मानसोपचार आणि पेरेटिंग कोच, "इंग्रजी माध्यमातील शिक्षण : विचारशून्य अनुकरण की स्वतःची फसवणूक" :**

**संकेतस्थळावरील लेखाचा सारांश :**

या लेखामध्ये आज इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडून केली जाणारी पिळवणूक ऐरणीचा मुद्दा बनली आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत तुमची मुलं शिकतात. त्या शाळेतील तुमच्या मुलांना शिकविणाऱ्या कामगारांचा शैक्षणिक दर्जा कधी तपासला आहे का ? तिथे मुलांना शिकवण्याच्या कामाला लावलेले कामगार बारावी आणि ग्रॅज्युएट, फार तर पोस्ट ग्रॅज्युएट असे असतात. ते डी.एड., बी.एड. असतात का ? बहुतांशी खाजगी शाळांमध्ये असेच पोटभरून कामगार तुम्हाला दिसतील. त्यातील कित्येकजण तर तरुण आणि अविवाहित असतात. ज्यांना पालकत्व म्हणजे काय ? हे सुद्धा माहित नसते. मग अशा लोकांच्या हातात तुमची मुलं देण तुम्हाला किती योग्य वाटते ?

इंग्लंड, अमेरिका, चीन, जपान, फ्रान्स, इस्त्रायल या सारखी जी प्रगत राष्ट्रे आहेत, त्या राष्ट्रांमध्ये मुलांना त्यांच्या मातृभाषेतच शिक्षण दिले जाते. लक्षात घ्या, मातृभाषेत शिकलेला विद्यार्थी हा कुठल्याही अडोपटेड माध्यमातील विद्यार्थ्यांपेक्षा भावनिक दृष्ट्या अधिक सक्षम असतो. जगातील शिक्षण तज्ञ ओरडून-ओरडून सांगत आहेत की, मुलांना मातृभाषेतून शिकवा, पण आमचे भारतीय आणि खासकरून महाराष्ट्रीयन आणि गोव्यातील पालक इतरांचे आंधळे अनुकरण करून मुलांचे भावविश्व आणि संपूर्ण आयुष्य पणाला

लावत सुटले आहेत. अगदी पहिलीपासून दहावीपर्यंत इंग्रजी माध्यमात शिकलेल्या मुलांना मातृभाषेतील मुलांच्या इतके सुद्धा धड इंग्रजी बोलता येत नाही. मग काय फक्त एबीसीडी शिकायला एवढी वर्ष इंग्रजी माध्यमात मुलांचे बालपण तुम्ही कुस्करून टाकले आहे. शिकण्याचे नैसर्गिक दरवाजे बंद करून तुम्ही मुलांच्या मनाला अवलंबिकत्व शिकवत आहात आणि येत्या पंधरा ते वीस वर्षात इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाचे नुकसान तुम्हाला स्पष्ट दिसेल. आपली कुवत नसतानाही मुलांच्या आंधळया प्रेमापोटी आणि इंग्रजी माध्यमाच्या खोट्या अवडंबराला तुम्ही बळी पडत आहात, हे विसरू नका. मातृभाषेतील शिक्षण नैसर्गिक आहे. मुल ते सहज आत्मसात करतात. मुलांना विषयातील मूलभूत संकल्पना पटकन समजतात. त्यातून मुलांचा आत्मविश्वास व सहज सुलभ शिकण्याची क्षमता वाढते.

एका सर्वेक्षणातून निघालेल्या निष्कर्षानुसार इंग्रजी माध्यमातील बऱ्याच शिक्षकांचे इंग्रजी भाषा विषय ज्ञान कच्चे आहे. ७५ % शिक्षकांनी इंग्रजी आणि इतर विषय सुद्धा शिकविण्याचे औपचारिक शिक्षण घेतलेले नाही. ७५ % शिक्षकांचे मुलांच्या व्याकरणाकडे लक्ष नाही. मुळात त्यांना स्वतःलाच ते येत नाही. मातृभाषेतून शिक्षण हा जागतिक सिद्धांत आहे व जगातील सर्व प्रमुख देशात त्याचे पालनही होते. पण भारतात नेमकी उलट परिस्थिती असून स्वभाषेच्या न्यूनगंडातून ती निर्माण झाली आहे.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** मातृभाषेतील शिक्षणाचे महत्व, इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडून केली जाणारी पिळवणूक, शिक्षकांचा दर्जा, शिक्षणाच्या माध्यमाबाबत शिक्षणतज्ञांची मते इत्यादी विषयी माहिती मिळून प्रश्नावली तयार करण्यास या लेखाची मदत झाली.

**२.३.२.५ गोविंद खुरंगे (मे २१, २०१७) 'सेमी इंग्रजी माध्यमाचे वास्तव' :**

**संकेतस्थळावरील लेखाचा सारांश :**

या लेखात इंग्रजी माध्यमाच्या शाळांना पर्याय म्हणून महाराष्ट्रात सेमी इंग्रजी शाळांच्या धडाका सुरू झाला आहे. परंतु या सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळा मुलांच्या प्रगतीसाठी योग्य आहेत का ? मराठी शाळांमधील घटत चाललेल्या विद्यार्थी संख्येमुळे मंजूर शिक्षकांची पदे कमी होत आहेत. विद्यार्थी संख्या टिकून राहावी व शिक्षकांची पदे कमी होऊ नयेत यासाठी मराठी शाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारणे अत्यंत आवश्यक बनले आहे. तथापि शैक्षणिक दर्जा सुधारण्याचे शिवधनुष्य पेलण्याऐवजी पालकांना इंग्रजी शाळांच्या धरतीवर सेमी इंग्रजी माध्यमाचे गाजर दाखवून विद्यार्थी संख्या टिकवून ठेवण्याचे तकलादू प्रयत्न सध्या करण्यात येत आहेत. त्यातूनच राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषदांच्या अनेक मराठी शाळांचे रूपांतर सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये होतांना दिसत आहे. उदाहरण सांगायचे तर अहमदनगर जिल्ह्याचे घेता येईल. अहमदनगर जिल्ह्यात ३,६४७ शाळांपैकी सुमारे २,९७७ शाळांमध्ये सध्या सेमी इंग्रजी माध्यम सुरू झाले आहे. तसेच राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात हाच प्रकार सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. सेमी इंग्रजी माध्यमाची लागण नगरपालिका, महानगरपालिका तसेच खासगी व्यवस्थापनाच्या अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये ही झालेली दिसत आहे. इंग्रजी माध्यमाची शाळा जवळ उपलब्ध नाही किंवा असली तरी ती आर्थिकदृष्ट्या परवडणारी नाही, म्हणून पालकांना सेमी इंग्रजी माध्यमाची शाळा हा पर्याय चांगला वाटत आहे. तथापि यातील अंतर्गत वास्तव समजून घेतल्यास हा पर्याय म्हणजे आजारापेक्षा इलाज भयंकर अशीच स्थिती समोर येते. म्हणून पालकांचा हा भ्रम दूर होणे आवश्यक आहे.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळा मुलांच्या प्रगतीसाठी योग्य आहेत का ?, मराठी शाळांमधील घटत चाललेल्या विद्यार्थी संख्येमुळे मंजूर शिक्षकांची कमी होत जाणारी पदे, विद्यार्थी संख्या टिकून राहावी व शिक्षकांची पदे कमी होऊ नयेत यासाठी मराठी शाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याची

आवश्यकता इत्यादीबाबत माहिती मिळून या माहितीच्या आधारे प्रश्नावली तयार करण्यास या लेखाची मदत झाली.

**२.३.२.६ सायली कुलकर्णी - मुलांची मानसिकता - संकेतस्थळावरील लेखाचा सारांश :**

या लेखामध्ये पालकत्व – तुम्हाला 'परफेक्ट मुल हवे आहे की प्रगती करणारे, आनंदी' मुल हवे आहे. ग्रोथ माइंडसेट असलेले मुल असेल तर ते मुल जास्त आनंदी असते, प्रगती करते मात्र पालक त्यांच्याशी कसे वागतात, काय बोलतात यावर मुलांची वाढ आणि मानसिकता ठरते.

आज-काल मुलांमध्ये छोट्या-छोट्या कारणांनी सहजच नाराज होण, डीप्रेशनमध्ये जाण, आत्महत्येचे प्रयत्न करण अशा समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. यामागील कारणांचा उहापोह करता आजूबाजूला चालू असलेली रट रेस, इतरांशी सतत स्पर्धा, पालकांचा आणि स्वतःचा स्वतःकडून असणाऱ्या अपेक्षा, परफेक्ट असण्याचा अट्टाहास अशी अनेक कारणे सांगता येतील. पण या सगळया बरोबरीने एक महत्वाच कारण म्हणजे मुलांची असलेली मानसिकता अर्थातच माइंडसेट. एकंदरीत स्मार्ट असण्यापेक्षा (बीइंग स्मार्ट) स्मार्ट दिसण्याला (लुकिंग स्मार्ट) असलेले अवास्तव महत्व बरेचदा एका ठराविक पौलीश्ड साच्यात विचार करायला भाग पाडते आणि यामुळेच अनेक गंभीर समस्या निर्माण होतात.

स्ट्यांडफोर्ड युनिव्हर्सिटी मध्ये मानसशास्त्राच्या प्राध्यापिका म्हणून काम करणाऱ्या डॉ. कॅरल ड्वेक यांनी हजारो मुलांचा अभ्यास केला. त्यांच्यावर मानवी प्रेरणेच्या बाबत विविध प्रयोग केले. यातूनच त्यांनी मानसिकतेचे दोन ठळक प्रकार सांगितले. त्यातील एक म्हणजे, 'निश्चित मानसिकता / फिक्स माइंड सेट' आणि दुसरी म्हणजे 'वाढीची मानसिकता / ग्रोथ माइंड सेट'.

डॉ. कॅरल यांच्या मते फिक्स माइंड सेट असलेली मुले नवीन आव्हाने स्वीकारत नाहीत, सहजपणे हार मानतात, नवीन गोष्टी शिकणे टाळतात, फीडबॅक स्वीकारत नाहीत किंवा ते घेणेच टाळतात, अपयशाकडे पूर्णविराम सारे काही संपले म्हणून बघतात तर ग्रोथ माइंड सेट असलेली मुले पूर्ण प्रयत्नाने नवनवीन गोष्टी

शिकतात, सहजासहजी हार न मानता समस्या सोडविण्याकडे त्यांचा कल असतो. अपयशाकडे स्वल्पविराम म्हणजेच तात्पुरते अपयश म्हणून बघतात. त्यातून शिकतात आणि पुढे जातात.मनमोकळेपणाने इतरांनी दिलेला फीडबॅक स्वीकारतात, आशावादी असतात.

आता तुम्ही म्हणाल हे सगळ पालकांना बरेचदा आपलं मुल परफेक्ट असाव अस वाटत मग पालकांनी मुलांकडून अपेक्षाच ठेवायच्या नाहीत का ? मला अस अजिबात म्हणायचं नाही. मी म्हणेन वास्तव किंवा अवास्तव अपेक्षांच्या पुढे जाऊन मुलांची मानसिकता सकारात्मक होईल अशी अपेक्षा मुलांकडून ठेवायला काहीच हरकत नाही. आपल्या अपेक्षा व्यक्त करत असताना नकळतपणे मुलांकडे चुकीचा मेसेज तर जात नाही ना ? याची प्रयत्नपूर्वक काळजी पालकांनी घेण खूप गरजेचे आहे. जेणेकरून तुमच्या मुलांचा माइंड सेट फिक्स न राहता तो ग्रोथ माइंडसेट होईल.

हे समजून घेण्यासाठी डॉ. कॅरल आणि सहकाऱ्यांनी केलेला एक मानसशास्त्रीय प्रयोग समजून घेऊ. हा प्रयोग फिक्स ग्रेडच्या ४०० मुलांवर करण्यात आला.

१. प्रयोगाच्या पहिल्या टप्प्यात या मुलांना सोपी बुद्धीमत्ता चाचणी देण्यात आली. प्रयोगाच्या दुसऱ्या टप्प्यात त्या चाचणीचा निकाल सांगतांना मुलांचे दोन गट करण्यात आले. पहिल्या गटातील मुलांना निकाल सांगतांना यांची 'क्षमता आणि बुद्धीमत्ता' याबाबत स्तुती करण्यात आली. तर दुसऱ्या गटातील मुलांची त्यांनी केलेल्या प्रयत्नाबाबत आणि कामाच्या पद्धतीची स्तुती करण्यात आली.

२. आता प्रयोगाच्या पुढच्या टप्प्यात या मुलांना दोन पर्याय देण्यात आले. त्यांना चाचणीची निवड करायला सांगितली. यामध्ये पहिला पर्याय अवघड, आव्हान देणारी चाचणी तर दुसरा पर्याय आधीच्या चाचणी सारखीच व सोपी चाचणी निवडायला सांगितली. या टप्प्यावर असे दिसून आले की ज्या

मुलांची त्यांच्या बुद्धीमत्तेसाठी स्तुती केली होती त्या गटातील ६७ टक्के मुलांनी सोप्या चाचणीची निवड केली.
तर ज्या गटातील मुलांची त्यांच्या प्रयत्नांसाठी, कामाच्या पद्धतीसाठी स्तुती करण्यात आली होती त्यापैकी ९२ टक्के मुलांनी अवघड, आव्हान देणाऱ्या चाचणीची निवड केली.

३. याच प्रयोगाच्या शेवटच्या टप्प्यात या सर्व मुलांना सोपी अशी फायनल टेस्ट देण्यात आली. क्षमता व बुधीमत्तेबाबत स्तुती करून ज्या मुलांचा फिक्स माइंड सेट तयार करण्यात आला होता त्या मुलांना -20 % गुणांक मिळाले तर ज्या मुलांचा प्रक्रिया व प्रयत्नासाठी स्तुतीद्वारे ग्रोथ माइंडसेट तयार करण्यात आला होता त्या मुलांची त्यात चाचणीवर +३० % गुणांक मिळवले.

**२.३.२.६.१ काही गोष्टी –**

१. तुमचे मुलांशी होणारे संभाषण त्यांचा माइंडसेट तयार करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावते.
२. चुकीच्या पद्धतीने मुलांना फीडबॅक दिल्यास त्यांचा माइंडसेट न बदलणारा, फिक्स होऊ शकतो. तर योग्य पद्धतीने मुलांना फीडबॅक दिल्यास त्यांचा वाढीचा ग्रोथ माइंडसेट तयार करणे शक्य आहे.
३. ग्रोथ माइंडसेट असणारी मुले प्रयत्न करणारी, आयुष्यातील उतार चढावाचा सामना करू शकणारी, समस्यांना न घाबरता समर्थपणे तोंड देऊ शकणारी, शिकण्यास उत्सुक आणि शैक्षणिक उपलब्धी मिळवणारी असतात.

**२.३.२.६.२ ग्रोथ माइंडसेट तयार होण्यामागे पालकांची नेमकी काय भूमिका असावी ?**

१. मुलांची स्तुती जरूर करा पण ती त्यांनी केलेल्या प्रयत्नासाठी.
२. फायनल रिझल्ट बरोबरीने मुलांना प्रक्रियेचा (प्रोसेसचा) आनंद घ्यायला शिकवा.
३. ग्रोथ माइंडसेट असणाऱ्या मुलांना चांगलेच गुण मिळतील. त्यासाठी त्यांच्या माइंडसेटवर काम करा.

४. मुलांच्या चुका सहजपणे स्वीकारा आणि त्यांना त्या स्वीकारण्यासाठी मदत करा.

५. मुलांना त्यांच्या चुका नक्की दाखवून द्या पण त्या कुशलतेने. चुकांमुळे अपराधीपणाची भावना जागी होऊ देऊ नका.

६. मुलांना त्यांच्या चुकांबद्दल मोकळेपणे बोलायची संधी द्या. त्यासाठी तुमच्या चुकाबद्दलही मुलांपाशी मोकळेपणाने बोला.

७. चुकण साहजिक आहे पण त्यापासून शिकण जास्त महत्वाच आहे हे मुलांना समजू द्या.

८. समस्येवर वेगवेगळे पर्याय निवडून ते पडताळून पाहण्यासाठी प्रयत्न करा.

९. 'प्रयत्न केल्याने बऱ्याच गोष्टी साध्य होतात ? हे मुलांना तुमच्या वागण्यातून शिकवा.

१०. स्मार्ट दिसण्याच्या बरोबरीने (किंबहुना त्याहीपेक्षा) स्मार्ट असण महत्वाच आहे हे आवर्जून सांगा.

११. मुलांपुढे आपल्या अपेक्ष व्यक्त करत असतांना नकळत त्यांच्या मानसिकतेला घाला तर घातला जात नाहीये ना? याबाबत जागरूक रहा.

१२. जसे परफेक्ट पेरेंटिंग नसते तसे परफेक्ट चाईल्डही नसते. परफेक्शनचा अट्टाहास सोडा.

१३. मुलांना इतरांपेक्षा स्वतःशी स्पर्धा करायला शिकवा.

१४. मुलांचा काय पण आपलाही माइंडसेट चेक करा. माइंडसेट बदलता येतो यावर विश्वास ठेवा.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** मुलांची मानसिकता, बालकांची स्वतःहून शिकण्याची प्रक्रिया, मुलांची मानसिकता समजून घेवून त्यांना योग्य शिक्षण देण्यात पालकांची भूमिका आणि त्याकरिता करावयाच्या प्रयत्नांची माहिती मिळण्यास या लेखाचा उपयोग झाला.

**२.३.३ शिक्षणाचे माध्यमाबाबत वर्तमानपत्रात प्रसिध्द लेखांवरून घेतलेला संबंधित साहित्याचा आढावा**

**२.३.३.१ गौरी चंद्रशेखर चिंचोळकर – मराठी भाषा संवर्धन आणि जागरुकता : दैनिक मातृभूमी (२७ फेब्रुवारी, २०२२) - मराठी माध्यमांच्या शाळेतून शिक्षण न घेण्यामागील उदासीनता :-**

**वर्तमानपत्रातील लेखाचा सारांश :**

वर्तमानपत्रातील या लेखामध्ये, मराठी माध्यमांच्या शाळेचा सद्यस्थितीचा विचार केला तर पालक मराठी शाळेत मुलांना प्रवेश देण्याबाबत कमालीचे उदासीन आहेत. यामागे विविध कारणे आहेत, इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे ओढा हा अगदी सहजच झालेला नाही त्यामागे ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. आपल्या देशावर झालेले परकीय आक्रमण, परकीय राज्यसत्ता याचे प्रतिबिंब आज स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाल्यावरही आपणास बघायला मिळतात. व्यापारी म्हणून आलेल्या इंग्रजांनी राज्यकर्ते म्हणून राज्यकारभार केला, त्याच बरोबर आपली शिक्षण व्यवस्था पूर्णपणे बदलून टाकली. त्यांना हवे असलेले शिक्षणाचा प्रसार त्यांनी आपल्या देशात केला आणि आपण त्याचा अंधपणे स्वीकार सुद्धा केला. आजही आपली ओढ त्याच शिक्षणाकडे जास्तीत जास्त आहे. शोकांतिका ही आहे की, आपल्याला आपल्या मातृभाषेतून मिळणाऱ्या शिक्षणाचे महत्त्व समजून घ्यायचे आहे आणि त्याचबरोबर इतरांना सुद्धा पटवून सांगायची जबाबदारी स्वीकारून मराठी भाषेचे संवर्धन करणे आवश्यक आहे. एक अन्यायकारक परकीय भाषा आपण आपल्या पाल्यावर लादत आहोत. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या उंच उंच प्रशस्त इमारती, त्याचबरोबर इतर सुविधा आपले लक्ष वेधत असतात. जागतिक स्पर्धेत टिकायचे असेल तर इंग्रजीशिवाय पर्याय नाही, असा जनमानसात विचार परिपक्व झालेला बघावयास मिळतो. प्रत्यक्षात परिस्थिती काही निराळीच आहे, इंग्रजी जागतिक भाषा नसून या ती पूर्वी इंग्रजांनी राज्य केलेल्या काही देशात वापरली जाणारी भाषा आहे. याबाबत पालक अनभिज्ञ आहेत. भाषेविषयी पालकांच्या मनात अनेक भ्रामक

समजुती जे आहेत. इंग्रजी ही जागतिक भाषा आहे, ही त्यापैकी एक भ्रामक समजूत पालकांच्या मनात स्थिरावलेली आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून शिक्षण घेतल्यामुळे विद्यार्थी उच्च पदावर जातात आणि जीवनमान सुधारते विविध क्षेत्रात त्यांना उच्च पदे मिळतात, नोकरीच्या संधी मिळतात, व्यवसायाच्या संधी मिळतात अशी ही भ्रामक समजूत आणि गैरसमज पालकांच्या मनात रूढ होताना दिसत आहेत. त्यामुळे पालक वर्ग हा इंग्रजी माध्यमांच्या शाळाकडे डोळे झाकून वळलेला दिसतो. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना प्रवेश  दिल्यावर त्यांना मुलांच्या भविष्याची चिंता फारशी जाणवत नाही. मुलांना शिक्षणात, अध्ययन प्रक्रियेत  येणा-या भाषिक अडथळयांमुळे निर्माण होणा-या ताणतणावाकडे दुर्लक्ष झालेले बघावयास मिळते. काही पालक स्वतःला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत शिक्षण न घेता आल्यामुळे ते आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्याचा आग्रह करतात. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून शिक्षण घेतल्यामुळे विद्यार्थी उच्च पदावर जातात आणि जीवनमान सुधारते ही भावना पालकांच्या मनात व समाजात रूढ होत चालली आहे. ह्या प्रकारच्या भ्रामक समजुती आणि गैरसमज दूर करण्यासाठी विविध क्षेत्रातून, प्रसार माध्यमातून जनजागृती करणे आवश्यक झाले आहे. स्वभाषेचे महत्व, मातृभाषेचे महत्त्व आणि मराठी माध्यमाच्या शाळेतून शिक्षण घेऊन यशस्वी झालेले विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या बाबतीत माहिती पालकांपर्यंत विविध माध्यमाच्या सहाय्याने प्रभावशाली पद्धतीने प्रचार आणि प्रसार करणेही आवश्यक आहे. मातृभाषेतून शिक्षणाचा प्रसार व महत्त्व समजावून काम पूर्णपणे यशस्वी होणार नाही. त्याकरिता प्रत्यक्षातं मराठी शाळांची स्थिती सुधारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे आवश्यक आहेत. या मराठी शाळेच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या विविध माध्यमांच्या सहाय्याने सर्वतोपरी प्रयत्न करणे आवश्यक आहेत.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** मराठी माध्यमांच्या शाळेचा सद्यस्थिती, मातृभाषेतून मिळणाऱ्या शिक्षणाचे महत्त्व, इंग्रजी माध्यम भाषेच्या भ्रामक समजुती, मातृभाषेतून शिक्षणाचा प्रसार व महत्त्व इत्यादीविषयी माहिती मिळण्यास या लेखाचा उपयोग झाला.

**२.३.३.२ डॉ. अमोल केळकर – तुमचे मुल अभ्यासाचे टेन्शन घेत नाही ना ? : दैनिक लोकमत (४ फेब्रुवारी, २०२३) :**

**वर्तमानपत्रातील लेखाचा सारांश :**

वर्तमानपत्रातील या लेखामध्ये, परीक्षेच्या काळात वाढतात आत्महत्या - परीक्षेच्या काळात किया अनेकदा निकालाच्या आधीच विद्यार्थ्यांने आत्महत्या केल्याच्या घटना दिसून येतात. तज्ज्ञांच्या मते अनेकदा मुलांच्या मनावरील मानसिक दडपणामुळे किंवा नापास होण्याच्या भीतीमुळे या घटना घडतात.

अभ्यासाचे टेन्शन - शेवटच्या क्षणी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाचे टेन्शन येते. त्यामुळे अशा विद्यार्थ्यामध्ये नापास होण्याची भीती जास्त प्रमाणात असते.

इतर कारणे - अभ्यासाच्या टेन्शनपेक्षा इतर कारणे जास्त असल्याचे तज्ज्ञ सांगतात. मुलांवर पालकांचे प्रेशर राहते. त्यामुळे मानसिक दडपण वाढते, दुसऱ्यांसोबत स्पर्धा, हरणें काय असते हे मुलांना माहीत नसणे, लहानपणापासून असलेले नैराश्य आदी कारणे,

परीक्षेचे टेन्शन कसे घालवाल ? - परीक्षेची सुरुवातीपासूनच करा. नियोजनबद्ध अभ्यास करा. अभ्यासासोबतच क्रीडा आणि इतर गोष्टींमध्येही मुलांची आवड निर्माण करा. मुलांसोबत खेळीमेळीचे वातावरण असायला हवे. शिक्षकांसह पालकांनी मुलांच्या समस्या समजून त्या सोडविण्यासाठी सहकार्य करणे गरजेचे आहे. मुलांचा आत्मविश्वास वाढविणे आवश्यक आहे.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** परीक्षेच्या काळात मानसिक दडपणामुळे, भीतीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या व त्यावरील उपाय याबाबतची माहिती मिळण्यास या लेखाची मदत झाली.

**२.३.३.३ डॉ. रुपेश मोरे – शाळा टिकल्या तर भाषा बहरेल :**

**वर्तमानपत्रातील लेखाचा सारांश :**

वर्तमानपत्रातील या लेखामध्ये, पालकांचे प्रबोधन व्हावे - नवीन शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून शिक्षणाची अपेक्षा व्यक्त केली आहे; पण ही केवळ एक अपेक्षा इथपर्यंतच मर्यादित आहे. प्रत्यक्षात शासन आणि धोरणकर्ते मातृभाषेतून शिक्षणासाठी काही कृती, उपाययोजना करताना दिसत नाहीत. खरं तर हे सर्व शासकीय यंत्रणेने करणे अपेक्षित असेल तरी मला वाटते मराठी भाषाप्रेमी मंडळीनी मातृभाषेतून शिक्षकांचे महत्व शिक्षणशास्त्र आणि मानसशास्त्रीयदृष्ट्या समजावून सांगण्यासाठी चळवळ उभी करायला हवी. मराठी भाषा संवर्धनासाठी फक्त साहित्यिककार्यक्रम किंवा संमेलने घेऊन भागणार नाही. मराठी साहित्यिक, कवी, अभ्यासक, विद्यापीठ व महाविद्यालयातील प्राध्यापक मंडळींनी मातृभाषेतून शिक्षणाचे महत्व समजावून सांगण्यासाठी गावोगावी पालकांच्या प्रबोधन कार्यशाळा घ्यायला हव्यात. ते अधिक परिणामकारक ठरेल.

पालक मराठी शाळांकडे आकर्षित होत नाहीत, यांचे कारण सरकारी आणि अनुदानित शाळांच्या भौतिक सुविधांचा मोठा अभाव आहे. खरे तर ही सरकारची जबाबदारी आहे. पण सरकार उदासीन दिसते. माझ्या मित्राचा मुलगा इंग्रजी माध्यमातून पूर्वप्राथमिक वर्गात शिकत होता. आमच्या त्या मित्राची आपल्या मुलाला मराठी माध्यमाच्या शाळेत शिकविण्याची तीव्र इच्छा होती. आम्ही प्रयत्नपूर्वक एका मराठी शाळेत प्रवेश घेतला. साधारण आठवडाभरानंतर ते मित्र मला म्हणाले की, "मी परत मुलाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकतो आहे. "मी कारण विचारले तर ते म्हणाले, "संबधित मराठी शाळेचे इंग्रजी शाळेच्या तुलनेत भौतिक सुविधांचा अभाव मुलाला जाणवला. त्यामुळे मुलगा ती शाळा नको असे म्हणतो आहे." थोडक्यात, मराठी शाळा आणि इंग्रजी शाळा यांच्यातील भेद हा फक्त भाषा माध्यम, अभ्यास, गुणवत्ता

एवढ्यावरच मर्यादित नाही, तर तो भेद भौतिक सुविधा, स्वच्छता यापर्यंत पोहचला आहे. मराठी शाळांच्या भौतिक सुविधा विकसित करण्यासाठी सर्व मराठीप्रेमींचा दबाव गट निर्माण करायला हवा. शासनाला मराठी शाळांच्या भौतिक सुविधांवर एक कृती कार्यक्रम द्यायला हवा आणि तो प्रयत्नपूर्वक शासनाकडून कार्यान्वित करून घ्यावा. पालकांना आपल्या मुलाला मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेण्याची इच्छा असते; पण चांगल्या मराठी शाळांचे पर्याय अल्प प्रमाणात उपलब्ध असतात. मराठी भाषाप्रेमी साहित्यिक, अभ्यासक, प्राध्यापक आदींनी काही मराठी शाळांचे पालकत्व स्वीकारून भौतिक सुविधा, अभ्यासक्रम, गुणवत्ता या विषयी काम करून काही आदर्श उदाहरणे समोर ठेवली पाहिजेत.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** पालक व विद्यार्थी मराठी शाळांकडे आकर्षित न होण्याची कारणे आणि मराठी शाळांचे पालकत्व स्वीकारून भौतिक सुविधा, अभ्यासक्रम, गुणवत्ता याविषयी सुधारणा करण्याबाबत उपाय याबाबतची माहिती मिळण्यास या लेखाची मदत झाली.

**२.३.३.४ वसंत भोसले – बहुजनांचे उच्चशिक्षण संपले : दैनिक लोकमत (१९ जानेवारी, २०२५) –**

**वर्तमानपत्रातील लेखाचा सारांश :**

वर्तमानपत्रातील या लेखामध्ये, येथे बहुजन याचा अर्थ बहुसंख्याक असा घ्यावा. कारण या शब्दाच्या भोवती राजकारण-समाजकारण खूप जमा झालेले आहे (असंख्य किंवा बहुसंख्य असे समजावे). कारण शिक्षणापासून कोणाला वंचित वगैरे ठेवण्याची कल्पना कालबाह्य झाली आहे. ती कालबाह्य करण्यासाठी शिक्षणाचा विस्तार तथा सार्वत्रिकीकरण करण्याची मोहीम राबविली गेली. इंग्रजांनी देश सोडलेला आहे. त्यांना हाकलून लावले गेले आहे. त्यांच्या भाषेत उच्चशिक्षण देण्याची पद्धत तेव्हा रुजली होती. परिणामी बहुजनास त्या भाषेत शिकणे कठीण होते. म्हणून पदव्युत्तर शिक्षणापर्यंत मातृभाषेचा आग्रह धरला गेला. तो

कालखंडही वेगाने मागे पडला. नव्या तंत्रयुगात प्रत्येकजण माहितीच्या महासागरात उतरला; पण पोहता यायला हवे तरच जगणार आहोत. महासागराचे पाणी नाका तोंडावाटे, एवढेच नव्हे कानावाटेही जात गेले. बुडणाऱ्याला आपण बुडून सागरतळाला जातो आहे, याची जाणीव होणे देखील बंद झाले.

उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्याची कोणतीही योजना नव्या शैक्षणिक धोरणात नाही. ते तयार करणाऱ्यांना तरी आपण काय करतो आहोत का ? याची पुसटशी तरी कल्पना आहे का ? केवळ जुन्याचा बिमोड करण्याचा आनंद घेण्यासाठी नव्या धोरणांचा सांगाडा तयार केला आहे. एमबीबीएसचे शिक्षण मातृभाषेत देण्याचा अट्टाहास म्हणजे अमृत समजून विषाचा पेला हाती घेण्यासारखे आहे. जगाची भाषा इंग्रजी आणि स्थानिक भाषा मातेची आहे. फुकाचा दुराभिमानाचा गंड शमविण्यासाठी असली थेरे करू नयेत. नीटसारखी किंवा जेईईसारखी परीक्षा राष्ट्रीय पातळीवर घेणार. त्याला राज्य मंडळाचा बारावीचा आणि केंद्राच्या सीबीएसई बोर्डाचा विद्यार्थी एकमेकांशी स्पर्धा करणार ? दहावी किंवा बारावीला एकच अभ्यासक्रम तयार करावा. राज्य आणि सीबीएसई असा भेदभाव, म्हणजे नवीन वर्गीय रचनाच आहे. त्यातून गरीबाला शिक्षणच घेता येऊ नये, अशी नवी व्यवस्था आणली आहे. विद्यापीठाच्या भविष्याची चिंता ही ती टिकण्यासाठी नव्हती, तर तरुणांना ज्ञानाची कवाडे बंद करण्याची रचना ढासळते आहे, याकडे लक्ष वेधण्यासाठी होती.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** शिक्षणाचा विस्तार तथा सार्वत्रिकीकरण करण्यासाठी मोहीम, उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्याची योजना याकडे लक्ष वेधण्यासाठी या लेखाचा उपयोग झाला.

**२.३.३.५ किशोर बळी – सरकारी शाळा टिकणार कशा : दैनिक लोकमत (२३ फेब्रुवारी, २०२५) वर्तमानपत्रातील लेखाचा सारांश :**

वर्तमानपत्रातील या लेखामध्ये, आजची प्राथमिक शिक्षणाची अवस्था पाहिली आणि खेड्यापाड्यातल्या तसेच शहरातल्याही सरकारी शाळांची आणि खासगी व्यवस्थापनाच्या मराठी शाळांची स्थिती पाहिली की मन अस्वस्थ झाल्यावाचून राहत नाही. रयतेच्या भल्यासाठी झटणाऱ्या स्वराज्याचं स्वप्न छत्रपती शिवरायांनी पाहिलं होतं, फुले, शाहू. आंबेडकरांनी त्या स्वप्नाला दिशा दिली. सावित्रीबाई फुले ह्या माउलीने मुलींच्या शिक्षणासाठी सर्वस्व समर्पित केलं. ज्या उपेक्षित घटकांसाठी हे महामानव लढले, त्यांच्यासाठी असलेल्या शाळांची अवस्था पाहून जीव कासावीस झाल्यावाचून राहत नाही.

जिल्हा परिषद, नगरपरिषदेच्या शाळा त्याचप्रमाणे कित्येक दशकांपासून सामान्यांची लेकरे शिकविणाऱ्या खासगी व्यवस्थापनाव्या मराठी शाळा ओस पडत चालल्या आहेत. अपेक्षित पटसंख्येअभावी या शाळा बंद होणार असल्याची चर्चा सातत्याने कानावर पडत आहे. सरकारी पातळीवर अधून-मधून ताली तयारी चाललेली देखील दिसते. समूहशाळांचा घाट घालून खेडयापाडयात, वाटधावस्त्यांमध्ये असलेल्या ह्या शाळा बंद करण्याचा सरकारी प्रयत्न डोक वर काढत आहे. अशा परिस्थितीत गोरगरिबांचे शिक्षण संपते की काय, अशी शंका घेण्यास वाव आहे. शिक्षक मुख्यालयी राहतात का ?' आणि 'शिक्षकांची मुले कुठे शिकतात ?' हे दोन प्रश्न विचारले म्हणजे शिक्षकांना गप्प करणे सोपे जाते.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** आजची प्राथमिक शिक्षणाची अवस्था, सरकारी शाळांची आणि खासगी व्यवस्थापनाच्या मराठी शाळांची स्थिती समजण्यासाठी या लेखाचा उपयोग झाला.

**२.३.३.६ लोकमत परिचर्चा – तर शाळा संकटात, शिक्षकांच्या नोकऱ्या धोक्यात ! : दैनिक लोकमत (२८ फेब्रुवारी, २०२५) – वर्तमानपत्रातील लेखाचा सारांश :**

वर्तमानपत्रातील या लेखामध्ये, शिक्षक संख्या मोठ्या प्रमाणात घटणार, शिक्षक संघटनांचा आरोप - विद्यार्थी संख्या कमी

झाली तर ताबडतोब शिक्षकाचे पद रिक्त करण्यात येते. जर विद्यार्थी संख्या वाढली, पायाभूत पद असूनसुद्धा नवीन पद मिळत नाही. विद्यार्थी संख्या कमी झाल्यावर ते पद कमी न करता त्या पदाला तीन वर्षे संरक्षण देण्यात यावे.

१५ मार्च २०२४ चा जीआर म्हणजे, २००१ च्या शिक्षण हक्क अधिनियमाला हरताळ फासणार आहे. या निर्णयामुळे ० ते २० पटसंख्येच्या शाळा बंद पडतील. त्यामुळे गरीब व बहुजन वर्गातील विद्यार्थ्यांचे नुकसान होईन. त्यामुळे शासनाने हा जीआर मागे घ्यावा, अशी मागणी आहे.

० ते २० विद्यार्थी पटसंख्या असलेल्या शाळेत शिक्षकच नाही, तर शाळा कशी चालणार ? चुकीचे धोरण शासन राबवीत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बदल स्वीकारला पाहिजे. असे असले तरी, कोणत्याही निर्णयाच्या माध्यमातून शिक्षक, विद्यार्थी आणि शाळांवर बंधने आणणे घातक आहे. पालकांच्या खिशावर दरोडा घालणारा हा जीजार रद्द करावा.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बदल स्वीकारला पाहिजे. असे असले तरी, कोणत्याही निर्णयाच्या माध्यमातून शिक्षक, विद्यार्थी आणि शाळांवर बंधने आणणे घातक आहे. याबाबत माहिती मिळण्यास या लेखाची मदत झाली.

**२.३.३.७ डॉ. सुखदेव थोरात – इंग्रजी शाळांना परवानगीच देऊ नका ! : दैनिक लोकमत (९ मार्च, २०२५) –**

**वर्तमानपत्रातील लेखाचा सारांश :**

वर्तमानपत्रातील या लेखामध्ये, मातृभाषेतून शिक्षण दिल्यास विद्यार्थ्यांना एखादा विषय समजून
घेऊन ते ज्ञान आत्मसात करणे सोपे जाते. त्यामुळेच अमेरिका, युरोप, जपानसारख्या आशियाई देशांमध्ये त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. तथापि, हे देश इंग्रजीचे महत्त्व लक्षात घेता विद्यार्थ्यांना एक भाषा म्हणून इंग्रजी शिकण्याची संधीही उपलब्ध

करून देतात. आपल्या देशानेही मातृभाषेतून शिक्षणाचे धोरण स्वीकारले आहे. परंतु आपण हळूहळू या धोरणापासून दूर जाऊ लागलो. आपण इंग्रजी माध्यमाच्या शाळांनापरवानगी दिली, तसेच महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याचे धोरण कायम ठेवले. आजघडीला राज्यातील सुमारे ३० टक्के शालेय विद्यार्थी इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेत आहेत. शहरी भागात है प्रमाण ५५ टक्के एवढे आहे, तर उच्च उत्पन्न गटामध्ये हे प्रमाण ७६ टक्के आहे. उच्च शिक्षण संस्थांमध्ये हे प्रमाण ५४ टक्के आहे.

राज्यात मराठी भाषा शाळा व महाविद्यालयांमध्ये मोठ्या स्वरूपात शिक्षणाचे माध्यम होण्यासाठी मराठी माध्यमाच्या शाळांचा विस्तार करणे आवश्यक आहे. इंग्रजी माध्यमाच्या सरकारी शाळांचे हळूहळू मराठी माध्यमात रूपांतरण करावे लागेल. तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळांना नव्याने परवानगी न देण्याचे धोरण अंगीकारणे आवश्यक आहे.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** मातृभाषेतून शिक्षण दिल्यास त्याचे होणारे फायदे, मराठी माध्यमाच्या शाळांचा विस्तार करण्याची आवश्यकता, इंग्रजी माध्यमाच्या शाळांना नव्याने परवानगी न देण्याचे धोरण अंगीकारण्याची आवश्यकता या बाबींची माहिति मिळण्यास या लेखाची मदत झाली.

**२.३.३.८ बालाजी देवर्जनकर – सरकारी शाळांना 'टाळे' लावण्याचा 'करेक्ट कार्यक्रम' : दैनिक लोकमत(११ मार्च, २०२५) – वर्तमानपत्रातील लेखाचा सारांश :**

वर्तमानपत्रातील या लेखामध्ये, नव्या निकषांचे निमित्त पुढे करून शिक्षक भरतीच करायची नाही. यातली मेख अशी की, शिक्षक नाहीत म्हणून विद्यार्थीही नाहीत, या कारणांनी एकदा सरकारी शाळांना टाळे लागले की, भांडवलदार इंग्रजी शाळा सुरू करतील. तिथे मुलांना दाखल करण्यावाचून पालकांपुढे दुसरा कुठला पर्यायच उरणार नाही. अनेक उपक्रमशील शिक्षक आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने ग्रामीण भागातील सरकारी शाळांचे रुपडे

पालटण्याची चळवळ महाराष्ट्रात सुरू आहे. सुरुवातीच्या 'इंग्रजी' चकमकाटाला भुललेले आणि नंतर अपेक्षाभंग पदरी आलेले पालक खासगी शाळेतून मुलांना काढून सरकारी शाळांची वाट धरत आहेत. असे आशावादी चित्र असताना मुद्दाम आणलेले संचमान्यतेचे हे नवे निकष म्हणजे सरकारी शाळांसाठी परतीचे दारच कापले जाण्यासारखे आहे. हे नवीन सामाजिक संकट सरकार का जन्माला घालत आहे ? शिक्षक, शाळांना वाचविण्यासाठी समाज कधी उभा राहाणार ?

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** नव्या निकषांचे निमित्त पुढे करून शिक्षक भरतीच करायची नाही, शिक्षक नाहीत म्हणून विद्यार्थीही नाहीत. मुलांना इंग्रजी माध्यमात दाखल करण्यावाचून पालकांपुढे दुसरा कुठला पर्यायच शिल्लक उरला नाही. सुरुवातीच्या 'इंग्रजी' चकमकाटाला भुललेले आणि नंतर अपेक्षाभंग पदरी आलेले पालक खासगी शाळेतून मुलांना काढून सरकारी शाळांची वाट धरत आहेत. असे आशावादी चित्र असताना मुद्दाम आणलेले संचमान्यतेचे नवे निकष म्हणजे सरकारी शाळांसाठी परतीचे दारच कापले जाण्यासारखे आहे, याबाबत सविस्तर माहिती या लेखाद्वारे मिळालेली माहिती संशोधनासाठी उपयुक्त ठरली.

**२.३.३.९ प्रकाश परब – शिक्षणाची भाषा कोणती ? : दैनिक लोकमत (१६ मार्च, २०२५) –**

**वर्तमानपत्रातील लेखाचा सारांश :**

वर्तमानपत्रातील या लेखामध्ये, ‘युनेस्को’च्या एका अहवालानुसार जगभरातील सुमारे ४० टक्के मुले आजही मातृभाषेतील शिक्षणापासून वंचित आहेत. विशेष म्हणजे विकसनशील व अविकसित देशांत हे प्रमाण ९० टक्के इतके आहे. स्थलांतर, दारिद्र्य, सदोष भाषाधोरण अशी अनेक कारणे यामागे आहेत. वेगवेगळया कारणांसाठी स्थलांतर करणाऱ्या लोकांना त्यांच्या मातृभाषेतून शिकण्याची संधी मिळत नाही हे एक वेळ

आपण समजू शकतो. पण, स्थलांतर न करताही मातृभाषेऐवजी इंग्रजीसारख्या परभाषेतून शिक्षण घेण्याचे प्रमाण भारतातही वाढलेले आहे. २०२० च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात किमान पाचव्या इयत्तेपर्यंत भातृभाषेतील शिक्षणाची त बहुभाषिकतेची शिफारस केलेली असली तरी प्रत्यक्षातील व्यवहार मात्र विपरीत आहे.

'मातृभाषेतून शिक्षण' ह्या संकल्पनेवर होणे अगदी अपरिहार्य होते. अर्थार्जनाचे उद्दिष्ट साध्य करायचे तर जी भाषा अर्थार्जनासाठी उपयोगी पडणार नाही किंवा फार उपयोगी पडणार नाही तिच्यातून शिक्षण कशासाठी घ्यायचे असा प्रश्न पालकांना पडलेला आहे. शिक्षणाचा हा उदिष्टबदल अंतिमतः ना शिक्षणाच्या हिताच आहे ना समाजाच्या हिताचा. मात्र, हा उद्दिष्टबदल सरळ केल्याशिवाय जसा खरा समाज घडणार नाही व माध्यमभाषेच्या निवडीचे हे उलटे चक्रही सरळ होणार नाही. इंग्रजी ही रोजगाराची, आर्थिक संधीची भाषा असल्यामुळे मुलांची भौतिक प्रगती अवश्य होईल. तशी उदाहरणेही आपल्याला दिसतात. पण, मुळात पैसे मिळवणे, खूप पैसे मिळवणे यासाठी शिक्षण आहे काय ? कोणतेही मूल स्वभाषेतून करू शकेल एवढी कामगिरी परभाषेतून करू शकेल काय ? याचे उत्तर नाही असे आहे. परंतु, प्रगतीच्या,विकासाच्या संकुचित व केवल अर्थकेंद्री कल्पनांमुळे आपण इंग्रजीचा द्वितीय भाषेऐवजी प्रथम भाषा म्हणून स्वीकार करू लागलो आहोत. त्याचे व्यक्तिगत, सामाजिक, तात्कालिक, दूरगामी परिणाम आपण अजिबात लक्षात घेत नाही. इंग्रजी माध्यमात शिकून परदेशांत मोठ्या पदावर काम करणारा युवावर्ग आपल्याला दिसतो, पण हजारो, लाखो मुलांना हे अनैसर्गिक माध्यमांतर न पेलल्यामुळे शिक्षणाला कायमचा रामराम करावा लागतो याकडे कोणाचेच लक्ष नसते. अलीकडे इंग्रजी माध्यम न पेलल्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळांकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणही वाढत आहे. मात्र, इंग्रजी

माध्यमाकडून पुन्हा स्वगृही परतण्याला सामाजिक प्रतिष्ठा नसल्यामुळे अनेक मुलांना ही माध्यमकोंडी सहन करावी लागते. युनेस्कोच्या ताज्या अहवालात मातृभाषेतील शिक्षणाअभावी विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचा व त्याच्या दूरगामी परिणामांचाही निर्देश आहे.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** इंग्रजीचा द्वितीय भाषेऐवजी प्रथम भाषा म्हणून स्वीकार केल्याने त्याचे व्यक्तिगत, सामाजिक, तात्कालिक, दूरगामी परिणाम, मातृभाषेतील शिक्षणाअभावी विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचा व त्याच्या दूरगामी परिणामांची माहिती प्रस्तुत संशोधनासाठी अत्यंत उपयुक्त ठरली.

**२.३.३.१० डॉ. उमा बच्छाव – स्वमग्न मुलांचा प्रेमळ स्वीकार ! : दैनिक लोकमत (१० एप्रिल, २०२५) –**

**वर्तमानपत्रातील लेखाचा सारांश :**

वर्तमानपत्रातील या लेखामध्ये, बहुतांश स्वमग्न मुलांची बौद्धिक क्षमता चांगली असते, पण भाषा दोष आणि वर्तवणूक दोष असल्यास या मुलांना मुख्य प्रवाहाच्या शाळेत अडचणी येतात. मात्र, योग्य वयात काळजी घेतली तर अनेक स्वमग्न मुलं मुख्य प्रवाहाच्या शाळेत शिक्षण घेऊ शकतात. या साऱ्यात कुठल्याही थेरपिस्ट किंवा डॉक्टरपेक्षा महत्त्वाची भूमिका ही पालकांची असते.

पूर्वी मुलांना सांभाळायला घरात अनेक माणसं असायची, जसे आजी, आजोबा, मामा, मावशी, आत्या, ताई, दादा व शेजारची माणसेही. पण आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळे हेच हरवले आहे. कुटुंब लहान झाली आहेत. आई-बाबा दोघेही नोकरी- व्यवसायात गुंतलेले, मग मुलाला सांभाळायला एक वेगळेच बेबीसीटर सापडले मोबाइल फोन. बाळ रडलं की दाखवा मोबाइल, बाळाला शिकवायचंय, चित्र दाखवायचंय की दाखवा मोबाइल असे सर्रास घडते. त्यामुळेही ऑटिझमसारखी समस्या समाजात झपाट्याने वाढते आहे.

त्यामुळे स्वमग्न मुलांच्या बाबतीत कुठल्याही उपचारापेक्षा पालकांचा स्वीकार, सहभाग आणि सकारात्मकता सगळयात आवश्यक ठरते. आपले मूल स्वमग्न आहे असे निदान झाले तर ते पालक जितक्या लवकर स्वीकारतील तितकी मदत मुलाला लवकर मिळेल. पालकांनी हे स्वीकारले पाहिजे की आपले हे मूल अपंग नव्हे तर देवाने दिलेले एक वरदान आहे. आपण त्याला स्वीकारले पाहिजे. आणि पालकांसह हाच विचार जर प्रत्येक डॉक्टर, थेरपिस्ट, शिक्षक, यांच्यासह समाजाने जोपासला तर येणाऱ्या काळात ऑटिझमकडे बघण्याचा दृष्टिकोन नक्कीच बदलेल. ही मुलेही एक सुंदर समृद्ध आयुष्य जगू शकतील, अशी आशा आहे.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** स्वमग्न मुलांची बौद्धिक क्षमता, स्वमग्न मुलांच्या बाबतीत कुठल्याही उपचारापेक्षा पालकांचा स्वीकार, सहभाग आणि सकारात्मकता याची आवश्यकता याबद्दल लेखातून मिळालेली माहिती संशोधनात मुलांच्या मानसिकतेचा अभ्यास करण्यास उपयुक्त ठरली.

**२.३.३.११ वृत्तपत्र बातमी – खाजगी शाळांनी खिसा केला रिकामा, मग सरकरीत शिका : दैनिक लोकमत (१ सप्टेंबर, २०२५) –**
**वर्तमानपत्रातील लेखाचा सारांश :**

वर्तमानपत्रातील या लेखामध्ये, महाराष्ट्रात शिक्षण हा आता समान संधीचा हक्क न राहता खर्चाची शर्यत ठरू लागला आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या (NSS) ८०व्या फेरीत करण्यात आलेल्या व्यापक मॉड्युलर शिक्षण सर्वेक्षणानुसार, सरकारी शाळांत शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याचा वार्षिक खर्च केवळ ३,००० रुपये इतका आहे. पण, पालकांनी जर मुलांना खासगी विनाअनुदानित शाळेत घातले तर त्याच विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठी त्यांना तब्बल २८ हजार ७४१ रुपये मोजावे लागतात.

असमानतेची दरी - शैक्षणिक शुल्कातील तफावत हा असमानतेचा ठळक पुरावा आहे. सरकारी शाळा - खर्च कमी, पण

दर्जा व सुविधा मर्यादित. अनुदानित शाळा - खर्च मध्यम, तरीही सरकारी शाळांपेक्षा पाचपट. खासगी शाळा - उच्च फी, वाहतूक, युनिफॉर्म, इन्फ्रास्ट्रक्चर, पालकांचा खिसा मात्र रिकामा.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** सरकारी शाळा, अनुदानित शाळा, खासगी शाळा यांचा खर्च, दर्जा, सुविधा याबाबतीत तुलनात्मक माहिती या लेखाद्वारे मिळाली. ही माहिती पालक, शिक्षक यांची जागरुकता तपासण्यासाठी संशोधनात उपयोगी ठरली.

**२.३.३.१२ रोशन विनायक बनकर – पंचतारांकित शाळा आणि थकलेला गुरुजी : दैनिक देशोन्नती (५ सप्टेंबर, २०२५) –**

**वर्तमानपत्रातील लेखाचा सारांश :**

वर्तमानपत्रातील या लेखामध्ये, गुरुजी ते सर - एक प्रवास : १९८० च्या दशकात शिक्षकांना गुरुजी म्हणून हाक मारली जायची. ते केवळ अभ्यासाचे धडे देणारे नव्हते, तर विद्यार्थ्यांच्या जीवनशैलीपासून गावातील सामाजिक कार्यापर्यंत मार्गदर्शन करणारे होते. अगदी गावातील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत गुरुजींचा शब्द हा निर्णायक असायचा. त्यांचा पोशाख साधा, जीवनशैली शिस्तबद्ध आणि विद्यार्थ्यांशी वागणूक आपुलकीची असे. त्या काळातील शिक्षणात साधेपणाचा गंध आणि संस्कारांचा ठेवा होता. आज २०२५ मध्ये तेच गुरुजी आता सर किंवा टिचर झाले. संगणक, इंटरनेट, स्मार्ट बोर्ड यांच्या साहाय्याने ते जागतिक ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवू लागले. आधुनिकतेचा हा प्रवास आवश्यक असला, तरी 'गुरुजींच्या आत्मीयतेचा आणि संस्कारप्रधान शिक्षणाचा गंध आज हरवतोय का?' हा प्रश्न निर्माण होतो.

शिक्षणाच्या व्यापारीकरणात शिक्षकांची भूमिका - पूर्वी शाळा ही समाजसेवेचा भाग मानली जायची; पण गेल्या दोन-तीन दशकांत शिक्षण हळूहळू उद्योग बनले आहे. महागड्या फी, कोचिंग क्लासेस, रँक आणि टक्केवारीवर भर यामुळे शिक्षणाचा

व्यापारीकरणाकडे झुकलेला चेहरा दिसतो. विद्यार्थ्यांना 'ग्राहक' आणि पालकांना 'गुंतवणूकदार' मानले जाते. या पृष्ठभूमीवर शिक्षकांची खरी भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. त्यांना फक्त अभ्यासक्रम पूर्ण करणे पुरेसे नाही, तर विद्यार्थ्यांच्या मनात मूल्याधारित शिक्षणाचे बी पेरणे आवश्यक आहे. व्यापारीकरणाच्या या लाटेत शिक्षकच समाजाला सांगू शकतात, की शिक्षण हे केवळ व्यवसाय नाही, तर जीवनाला दिशा देणारी प्रक्रिया आहे.

पंचतारांकित सुविधा पण गुणवत्तेचा ऱ्हासः आज अनेक शाळा पंचतारांकित हॉटेलप्रमाणे सजल्या आहेत. वातानुकूलित वर्गखोल्या, प्रोजेक्टर, रोबोटिक्स लॅब, डिजिटल लायब्ररी या सर्व सोयी आहेत. पालक या सुविधा पाहून भारावून जातात; पण प्रश्न असा आहे की या सगळया बाह्य आकर्षणामागे शिक्षणाची खरी गुणवत्ता टिकून आहे का?

खासगी शाळांमधील शिक्षक – कंपनी कामगाराप्रमाणेः खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये शिक्षकांची स्थिती अनेकदा कंपनीतील कर्मचाऱ्यांसारखी असते. पगार कमी, निकालाचा प्रचंड दबाव, पालक आणि व्यवस्थापनाच्या अपेक्षा या सगळयात शिक्षकांना केवळ 'रिझल्ट मशीन' समजले जाते. त्यामुळे त्यांचा आत्मसन्मान आणि अध्यापनातील सर्जनशीलता कमी होते. खरा शिक्षक हा फक्त विषय शिकवणारा नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शिल्पकार आहे; पणजेव्हा त्याला लक्ष्य, नफा आणि निकालाच्या चौकटीत बांधले जाते, तेव्हा त्याच्या अध्यापनातील उत्साहावर परिणाम होतो. शिक्षकाला कंपनी कामगाराप्रमाणे वागवणे म्हणजे शिक्षणाच्या आत्म्यालाच तडा देणे होय.

शासकीय शाळांतील शिक्षकांवर कार्यालयीन कामांचा भारः जिल्हा परिषद, नगरपरिषद व महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षकांची भूमिका दुहेरी झाली आहे. एकीकडे विद्यार्थ्यांना

शिकवायचे, तर दुसरीकडे विविध सरकारी कामे- जनगणना, निवडणूक ड्युटी, सर्वेक्षणे, नोंदी ठेवणे- यात मोठा वेळ जातो. त्यामुळे त्यांच्या मुख्य कामाला म्हणजे ज्ञानदानाला कमी वेळ मिळतो. या कामांमुळे शिक्षकांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्यायचे असेल, तर शिक्षकांचा वेळ फक्त वर्गात आणि विद्यार्थ्यांसोबतच जावा. अन्यथा शासकीय शाळा फक्त कागदपत्रे आणि प्रशासकीय कामांचे केंद्र बनून राहतील.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** शिक्षकांच्या आत्मीयतेचा आणि संस्कारप्रधान शिक्षणाचा गंध आज का हरवतोय, शिक्षणाच्या व्यापारीकरणात शिक्षकांची भूमिका, खाजगी शाळांतील पंचतारांकित सुविधा पण गुणवत्तेचा -हास, खासगी शाळांमधील शिक्षकांची कंपनी कामगाराप्रमाणे अवस्था, शासकीय शाळांतील शिक्षकांवर कार्यालयीन कामांचा भार इत्यादी या लेखातील माहिती संशोधनात शिक्षक, मुख्याध्यापक प्रश्नावली तयार करणे व शिक्षणाची वस्तुस्थिती मांडण्यासाठी उपयुक्त ठरली.

### २.३.४ संशोधन विषयाशी संबंधित विविध मासिकांमधून घेतलेला संबंधित साहित्याचा आढावा

#### २.३.४.१ विनोद वाघ – विद्यार्थी : गुणवत्तावाढ उपक्रम

**मासिकामधील लेखाचा सारांश :**

मासिकामधील या लेखात, आज खासगी मराठी शाळा, सरकारी शाळा, काही अपवाद वगळता बंद पडत असल्याचे चित्र सर्वत्र दिसत असताना दिल्लीतील सरकारी शाळा मात्र दर्जेदार होताना दिसत आहेत. शिक्षण व्यवस्थेतील शिक्षक-पालक हे महत्त्वाचे घटक लक्षात घेऊन त्यांच्या सहकार्याशिवाय, त्यांना कार्यप्रवण केल्याशिवाय शिक्षणक्षेत्रात कोणताही बदल करणे अशक्य आहे, हे जाणून घेत आणि त्याला राजकीय इच्छाशक्तीची जोड देत दिल्लीचे शिक्षणमंत्री मनीष सिसोदिया यांनी सरकारी शाळांचा दर्जा सुधारला. शिक्षणक्षेत्रातील त्यांच्या या अभिनव प्रयोगाची

देशभरात चर्चा आहे. शिक्षणक्षेत्रात असा आमूलाग्र बदल घडवून आणत, सरकारी शाळांचा कायापालट झाला आहे. सध्या दिल्लीमध्ये जवळपास १०२९ सरकारी शाळा असून त्यातून २ लाखांहून अधिक मुले शिक्षण घेत आहेत. उत्तम पायाभूत सुविधा, चांगल्या वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय आदींच्या माध्यमातून सरकारी शाळांना सक्षम बनविण्याचा आराखडा शिक्षण मंत्रालयाने आखला आहे. त्यातून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा त्यांचा उद्देश आहे.

दिल्लीच्या शाळांतील उपक्रम - १) आर्थिक तरतूद - दिल्ली सरकारने आपल्या एकूण अंदाजपत्रकाच्या २५% रक्कम शिक्षणासाठी राखीव ठेवली. अर्थात दिल्ली सरकारकडे शिक्षण आणि आरोग्य हे दोनच विषय असल्याने त्यांना हे शक्य झाले आहे. २) कंत्राटी शिक्षक वेतनवाढ- दिल्लीतील शाळांमध्ये जवळपास २२ हजार कंत्राटी शिक्षकांना नियमित शिक्षकांइतके वेतन सुरू केले. सर्व शिक्षकांना टॅब खरेदीसाठी प्रत्येकी पंधरा हजार रुपये दिले. शिक्षक हजेरीपत्रक, निकालपत्रक यासाठी त्याचा वापर करू लागले आहेत. ३) शिक्षकांच्या कामाचा भार कौटुंबिक सर्वेक्षण, जनगणना आदी अनेक अशैक्षणिक कामांतून शिक्षकांची मुक्तता केली. केवळ निवडणुकीच्या राष्ट्रीय कर्तव्यासाठी त्यांना पाठविण्याचे-ठरवले. ४) शिक्षक-पालक महामेळावा - पालकांना शाळेच्या कामकाजात सहभागी करून घेणे, शिक्षक मुख्याध्यापक यांच्याविषयीची भीती दूर होणे, आपल्या पाल्याच्या भवितव्याविषयी चर्चा करणे या हेतूने शिक्षक-पालक महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. पालकांच्या जागृतीसाठी टीव्ही, रेडिओ, मोबाईल आदी माध्यमातून जनजागृतीही करण्यात आली. ५) प्रेरक शिक्षक संकल्पना-शाळेत सुदृढ शैक्षणिक वातावरणाची निर्मिती करणे, त्यांचे नियंत्रण, निरीक्षण आणि परीक्षण करणे इत्यादी भूमिका प्रेरक शिक्षकांनी पार पाडल्या. ६) मालमत्ता व्यवस्थापक- मुख्याध्यापकांना शैक्षणिक

कार्यात जास्तीत जास्त लक्ष देता यावे या हेतूने शाळा परिसर स्वच्छता व दुरुस्तीसाठी स्वतंत्रपणे मालमत्ता व्यवस्थापकाची नेमणूक केली. ७) ध्यानधारणा- दिल्लीतील शाळांमध्ये आनंदवर्गात घेतला जाणारा सजग ध्यानधारणा हा महत्त्वाचा पैलू आहे. सजग ध्यानधारणेच्या माध्यमातून विदयार्थ्यांना मन एकाग्र करणे आणि ते तसेच टिकवून ठेवणे, आपल्या मनातील विचारांकडे तटस्थतेने पाहणे या विषयी शिकवले जाते. सुरुवातीची ५ मिनिटे आणि शाळा सुटतानाची २ मिनिटे ध्यानासाठी राखून ठेवलेली असतात. आठवड्यातून एकदा ४५ मिनिटांचा संपूर्ण वेळ ध्यानासाठी व त्यावर चर्चा करण्यासाठी राखून ठेवला जातो. विदयार्थी त्यांना आलेल्या अनुभवांविषयी यावेळी चर्चा करतात. थोड्याच दिवसांत असे लक्षात आले की, बाह्य आवाज, शारीरिक बदल यामुळे मुले विचलित न होता केवळ मनात येणाऱ्या व जाणाऱ्या विचारांवर लक्ष केंद्रित करायला शिकली. थोडक्यात ही मुले त्यांच्या प्रत्येक कृतीकडे सजगतेने पाहायला शिकली. यामुळे मुलांमधील परस्पर संबंधातही सुधारणा दिसू लागली.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** शिक्षण व्यवस्थेतील शिक्षक-पालक हे महत्त्वाचे घटक लक्षात घेऊन त्यांच्या सहकार्याशिवाय, त्यांना कार्यप्रवण केल्याशिवाय शिक्षणक्षेत्रात कोणताही बदल करणे अशक्य आहे हे जाणून घेणे आणि त्याला राजकीय इच्छाशक्तीची जोड दिल्यास सरकारी शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी करावयाच्या उपाययोजना व कार्यवाहीबाबत मिळालेली माहिती संशोधनासाठी उपयोगी ठरली.

**२.३.४.२ – प्रा. मिलिंद जोशी – तेवती ठेऊया : मराठीची ज्योत ! – मासिकामधील लेखाचा सारांश :**

मासिकामधील या लेखात, आपल्याकडे भाषेचा संबंध ओठापुरता मर्यादित समजला जातो. भाषा ओठातून येण्यापेक्षा ती पोटातून येणे गरजेचे आहे. जेव्हा त्या भाषेत ती भाषा बोलणाऱ्या भाषकाचे पोट भरण्याचे सामर्थ्य असेल, तेव्हाच ती पोटातून येईल. भाषेचा प्रश्न केवळ अस्मितेशी निगडित असतो असे नाही. तो

अस्तित्वाशीच जास्त निगडित असतो, त्यामुळे मराठी हा विषय घेऊन करीअर करू इच्छिणाऱ्या मुलांना, केवळ पदवी देणे, एवढ्याच कामात विदयापीठांनी धन्यता न मानता, त्यांच्या पोटाचा प्रश्न सुटावा, यासाठी नोकरीच्या आणि व्यवसायाच्या संधी त्यांच्यासाठी कशा निर्माण होतील, याकरिता थोडेचौकटीबाहेर जाऊन उदयोग-व्यवसाय क्षेत्राशी समन्वय साधला पाहिजे. त्यानुसार अभ्यासक्रमात बदल केले पाहिजेत. असे प्रयोग इतर सर्व ज्ञानशाखांमध्ये आज होत आहेत. भाषेचे शिक्षण म्हणजे केवळ ललित साहित्याचे शिक्षण नव्हे. व्यवहारात भाषा कशी वापरली जाते, शास्त्रीय लेखनात भाषेचे रूप कसे असते, विविध व्यवसायांत भाषा कशी वापरतात, साहित्यकृतींमध्ये भाषेची अभिव्यक्ती कशी होते, याचे शिक्षण दिले गेले पाहिजे.

साक्षेपी समीक्षक आणि अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांनी 'समाज आणि भाषा' या लेखात समाजाच्या भाषेसंदर्भातल्या अनास्थेवर बोट ठेवले आहे. ते लेखात म्हणतात, "लोकमान्य टिळकांनी गीतारहस्य मराठीत लिहिले, ते मूलभूत समीक्षा किंवा गीताभाष्य मानले जाते; म्हणून जगभरचे गीताभ्यासक मराठी शिकतात व लोकमान्य टिळकांचे भाष्य समजून घेण्याचा प्रयत्न करतात. आपला समाज आणि आपली मराठी भाषा दोन्हीही अजून वसाहतिक पूर्वग्रहाचे बळी आहेत. तो पूर्वग्रह म्हणजे इंग्रजीशिवाय तरणोपाय नाही. हे खोटे नाही; पण मराठी समाजाला मराठीशिवाय तरणोपाय नाही, हे आपण स्वतःच्या मनावर व इतरांच्या मानसिकतेवर बिंबवले पाहिजे. समाजाला भाषा असतेच. काही भाषा मरतात हा इतिहास आहे. त्या मृत भाषांचा समाज नष्ट होतो. मात्र त्यातील संचित टिकून राहते. ग्रीकांचे ज्ञानविज्ञान अरबांनी जपले, म्हणून टिकले. मराठीत

टिकण्यासारखे आहेच आहे; पण त्यासाठी उद्या अरबांची मदत घेण्याची वेळ येऊ नये एवढंच !

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** व्यवहारात भाषा कशी वापरली जाते, शास्त्रीय लेखनात भाषेचे रूप कसे असते, विविध व्यवसायांत भाषा कशी वापरतात, साहित्यकृतींमध्ये भाषेची अभिव्यक्ती कशी होते, याचे शिक्षण कसे दिले गेले पाहिजे याविषयीची या लेखातील माहिती संशोधनासाठी उपयुक्त ठरली.

**२.३.४.३ – प्र. ना. परांजपे – मराठीचे विद्यापीठ कसे असावे ? – मासिकामधील लेखाचा सारांश :**

मासिकामधील या लेखात, २० डिसेंबर, २०२३ हा मराठीच्या दृष्टीने ऐतिहासिक दिवस ठरेल;
कारण त्या दिवशी महाराष्ट्राच्या विधान सभेत मराठी विद्यापीठाचा कायदा संमत झाला. मराठीसाठी स्वतंत्र विद्यापीठ व्हावे अशी अनेक दशकांपासूनची मागणी होती. दरवर्षी भरवण्यात येणाऱ्या मराठी साहित्य संमेलनामध्ये मराठी विदयापीठाची मागणी करण्यात येत असे. महाराष्ट्र राज्याच्या भाषा सल्लागार समितीने मराठी विदयापीठाच्या स्थापनेची शिफारस केली. या समितीचे अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी आपल्या अहवालात या विदयापीठाच्या संकल्पनेची तपशीलवार मांडणी केली होती. त्यांनी या कल्पनेचा पाठपुरावा करणाऱ्याअनेकांनी असे गृहीत धरले होते, की या विदयापीठात इतर विदयापीठांत शिकवले जाणारे सर्व अभ्यासक्रम उदाहरणार्थ, पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, संगणक विज्ञान - मराठीतून शिकवले जातील; पण यामुळे अशा विदयापीठाच्या तयारीसाठी व स्थापनेसाठी किती तयारी करावी लागेल आणि त्यामध्ये किती काळ जाईल, याची त्या मंडळींना कल्पना आली नसावी. मराठीतून हे शिक्षण देता यावे म्हणून मराठी ग्रंथ निर्मिती मंडळाची स्थापना झालेली होती, पण त्यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांना फारसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे ते मंडळही

काही वर्षांनी गुंडाळण्यात आले. हे लक्षात घेता सर्व विषयांची पाठ्यपुस्तके मराठीतून उपलब्ध करणे, ते सर्व विषय मराठीतून शिकवणारे प्राध्यापक मिळवणे किंवा तयार करणे, प्रयोगशाळा, ग्रंथालय इत्यादी पायाभूत सुविधा निर्माण करणे यामध्ये किती काळ जाईल, हे सांगता येणार नाही.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून शासनाने एक समिती नेमली आणि त्या समितीने २००-२५० पृष्ठांचा अहवाल तयार केला. तो अहवाल दिल्ली दरबारात दाखल करण्यात आला. त्यासाठी वेगवेगळ्या संघटनांकडून ठराव करण्यात आले, पंतप्रधानांना पत्रे पाठवण्यात आली. ज्ञानेश्वरपूर्वकालीन मराठीचे स्वरूप काय होते, ती महाराष्ट्राच्या कुठल्या भागात प्रचलित होती, तिच्यात कोणते ग्रंथलेखन झाले याचा विदयापीठांच्या मराठी विभागांनी धांडोळा घेतला पाहिजे. त्याची पाठ्यपुस्तके तयार केली पाहिजेत. याच्या तुलनेत इंग्रजीचे उदाहरण पाहण्यासारखे आहे. इ.स. ५०० ते ११०० या ६०० वर्षांत जी इंग्रजी बोलली व लिहिली जाई, तिला अँग्लो-सॅक्सन म्हणत आणि तिचा अभ्यास भारतातल्या सगळ्या विदयापीठांत होत असे. त्यामुळे ओल्ड इंग्लिश (अँग्लो-सॅक्सन) म्हणजेच आजच्या इंग्लिशची मातृभाषा किंवा पितृभाषा होती आणि तिला दीड-दोन हजार वर्षांचा इतिहास आहे हे इंग्रजी शिकणाऱ्या सर्वांना माहीत आहे.मराठीच्या बाबतीत असे म्हणता येईल का ? मराठीच्या विद्यापीठामुळे ही त्रुटी पूर्ण होऊ शकेल आणि मग मराठी माणसांना मराठीच्या अभिजातपणाचे महत्त्व कळेल.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** मराठी भाषा व माध्यमाचे महत्व तसेच पाठ्यपुस्तके मराठीतून उपलब्ध करणे, सर्व विषय मराठीतून शिकवणारे प्राध्यापक मिळवणे किंवा तयार करणे, प्रयोगशाळा, ग्रंथालय इत्यादी पायाभूत सुविधा निर्माण करणे ही संशोधनासाठी उपयुक्त असणारी माहिती मिळाली.

**२.३.४.४ – भारती भगत – मातृभाषेतून शिक्षण गरज व व्याप्ती :**

**मासिकामधील लेखाचा सारांश :**

मासिकामधील या लेखात, देशातील प्रत्येक बालकांपर्यंत पायाभूत साक्षरता न्यायची असेल, तर त्यासाठी त्यांच्या मातृभाषेत त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे असे नवीन शैक्षणिक धोरणातसुद्धा नमूद केलेले आहे. जी भाषा मुलाच्या कानांवर सहज पडते, अशी कुटुंबातली असेल किंवा परिसरातली असेल, ती भाषा मूल चटकन आत्मसात करते आणि त्यातून व्यक्त होणे हेसुद्धा मुलाला सोपे जाते. तसे वातावरण असेल, तर मूल एका वेळी सरमिसळ न करता दोन-तीन भाषा सहज शिकू शकते. त्यातून त्यांचा भाषिक विकास तर साधला जातो; शिवाय भावनिक विकासही होतो. मातृभाषेत बोलताना मुलाला सुरक्षित वाटते, व्यक्त झाल्याचे समाधान मिळते आणि त्यामुळे आत्मविश्वास वाढतो. मुलाची ज्ञानभाषा आणि मातृभाषा यांच्यामध्ये सुंदर दुवा साधला जाऊन त्याचे मातृभाषेतून शिक्षण नीट होऊ शकते. मातृभाषाच नीट येत नसेल, तर त्याला इंग्रजी ही माध्यम भाषा आणि ज्ञानभाषा म्हणून एकदम स्वीकारायला लावणे योग्य नाही. शाळेव्यतिरिक्त त्यांच्या कानांवर कुठेही इंग्रजी भाषा पडत नसेल, तर इंग्रजी न आल्यामुळे त्यांच्या आत्मविश्वासाला तडा जाण्याची शक्यता असते. स्वतःला नीट व्यक्त होता येण्याचे माध्यमच उपलब्ध नसेल, तर असे मूल मारून मुटकून पास होईल; पण शिक्षणप्रक्रियेमधला आनंद घेऊ शकणार नाही.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** पायाभूत साक्षरतेसाठी मातृभाषेतील शिक्षणाचे महत्व, मातृभाषाच नीट येत नसेल, तर त्याला इंग्रजी ही माध्यम भाषा आणि ज्ञानभाषा म्हणून एकदम स्वीकारायला लावणे योग्य नाही. याबाबत सविस्तर माहिती या लेखातून

**२.३.४.५ – प्रा. नितिन मालाणी – दहा दिवस दप्तरमुक्त शाळा :**

**मासिकामधील लेखाचा सारांश :**

मासिकामधील या लेखात, शिक्षणाला आणि त्यातून मिळणाऱ्या ज्ञानाला व्यावहारिक शहाणपणाची जोड असणे किती आवश्यक असते, हे पूर्वापार आपल्या संस्कृतीने ओळखले होते. यानंतर गुरुदेव रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी यांनी शिक्षणाला व्यावसायिक शिक्षणाची जोड असायलाच हवी, तरच शिक्षण हे व्यक्तीच्या उन्नतीचे साधन होऊ शकेल, याचा आग्रह धरला. फक्त पुस्तकी ज्ञान देणारे आणि व्यावसायिक नसलेले शिक्षण घेऊन युवक दिशाहीन आणि बेरोजगार होण्याचा मोठा धोका असतो. शेती, कार्यानुभव असे विषय याच उद्देशाने अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहेत.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (२०२०) इयत्ता सहावीपासून विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण अनिवार्य केले असून हा बदल नक्कीच स्वागतार्ह आहे.पुस्तकी ज्ञानासोबत व्यावसायिक शिक्षणाची गरज आणि महत्त्व पालकांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागणे आवश्यक आहे.

वस्तुनिर्मिती, सुतारकाम, इलेक्ट्रिक फिटिंग, प्लम्बिंग अशी कामे स्वतः करून पाहणार आहेत. त्यासाठी 'दहा दिवस दप्तरमुक्त शाळा' हा उपक्रम राबवला जाणार आहे. या दहा दिवसांत मुले त्यांनी निवडलेल्या व्यवसायाची प्रात्यक्षिके कुशल कारागीर किंवा व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली करायची आहेत, यात विदयार्थ्यांचा फायदा होईल. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थी स्वावलंबी होण्यास प्राधान्य देण्यात येत असून भवितव्याच्या दृष्टीने त्याच्या कारकिर्दीला योग्य वळण मिळण्यास मदत होणार आहे. यातून देशाला आवश्यक ते कुशल मनुष्यबळ मिळून उदयोग व रोजगारनिर्मिती होईल. शिक्षणाचा उद्देश फक्त नोकरी मिळवणे हा न राहता विदयार्थ्यांमध्ये उदयोजकीय क्षमतांचा विकास करणे हाच राहील. २०२०च्या नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात असेही म्हटले

आहे, की २०२५पर्यंत शाळेत शिकणाऱ्या विदयार्थ्यांपैकी कमीतकमी ५०टक्के विद्यार्थी व्यावसायिक शिक्षण घेतील.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** शिक्षणाला आणि त्यातून मिळणाऱ्या ज्ञानाला व्यावहारिक शहाणपणाच्या जोडीची आवश्यकता, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (२०२०) इयत्ता सहावीपासून व्यावसायिक शिक्षण अनिवार्यतेबाबत सविस्तर माहिती ही संशोधनासाठी उपयुक्त ठरली.

**२.३.४.६ – काटकर तात्यासाहेब शिवाजी – मुलांना गुणांच्या मृगजळात अडकवू नका –**

**मासिकामधील लेखाचा सारांश :**

मासिकामधील या लेखात, आज आमची सगळी शिक्षणव्यवस्था दहावी व बारावीच्या निकालाच्या भोवती फिरताना दिसते. खरे गुणवान व गुणवत्ताधारक या व्यवस्थेत टिकून राहतात हेही सत्य आहे. इतिहासात डोकावून पाहिले, तर गुणांच्या मोजपट्टीत न बसणाऱ्यांनी आपल्या गुणवत्तेच्या बळावर पराक्रमाची शिखरे उभी केली आहेत. गुण महत्त्वाचे आहेतच, पण गुणवत्ता त्याहूनही अधिक मोलाची आहे; कारण गुणवत्तेशिवाय गुणांचे खरे मोल कळत नाही. गुणवत्ता म्हणजे कार्यक्षमता, हुशारी आणि प्रामाणिकपणा या तीन गुणांचा समुच्चय होय. विदयार्थ्यांनी शिकणे महत्त्वाचे आहे. काय व कसे शिकावे, त्यासंबंधी निवडीचे स्वातंत्र्य त्यांना दया. तुमच्या इच्छा व आकांक्षा त्यांच्यावर लादण्याचा प्रयत्न करू नका.

केवळ दहावी-बारावीत ९०%, ९९% गुण मिळाले म्हणजे समोरची वाट सहज पार करता येईल असेही नाही. आज बारावीनंतर JEE, CET, NEET, CPD, Foundation, GET अशा अनेक परीक्षांना महत्त्व आल्याने बारावीच्या टक्केवारीला महत्त्व राहिले नाही. स्पर्धेच्या जगात टिकण्याची क्षमता अंगी असायला हवी. जीवघेण्या स्पर्धेत काही कोवळे जीव दुबळे ठरतात.

त्यांचा स्वतःवरचा विश्वास कमी होतो. स्वत:मधील 'मी' ओळखावा, त्यानंतर आपल्या आवडीनुसार दिशा ठरवावी आणि ज्या क्षेत्रात जायचे त्याचा विचार करावा.

आज पालकांच्या पाल्याबाबतीत खूप अपेक्षा आहेत. पालक मुलांच्या क्षमता, ज्ञान, कौशल्य यांचा विचारही करत नाहीत. अर्धवट माहिती, अपुरे ज्ञान, कमी कष्टात दणदणीत पॅकेज मिळवण्याच्या मोहात पालक अडकले आहेत, त्यामुळे मुलांच्या व आपल्या आयुष्यात गुणांना नको तेवढे महत्त्व देऊन गुणांच्या स्पर्धेत ते पाल्यांना पळवतात. मुलांनी काय करावे,काय करू नये, कोणता कोर्स करावा एवढेच नाही, तर काय खावे यांचा निर्णयही पालकच घेत असल्यामुळे मुलांमधील निर्णयक्षमता कमी झालेली दिसते.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** विदयार्थ्यांनी शिकणे महत्त्वाचे आहे. काय व कसे शिकावे, त्यासंबंधी निवडीचे स्वातंत्र्य त्यांना देणे, इच्छा व आकांक्षा त्यांच्यावर लादण्याचा प्रयत्न न करणे, मुलांच्या क्षमता, ज्ञान, कौशल्य यांचा विचार करणे ही माहिती संशोधनासाठी उपयुक्त ठरली.

**२.३.४.७ प्रहार (शब्दांना सत्याची धार) - सुप्त गुणांची जाणीव :**

**मासिकामधील लेखाचा सारांश :**

मासिकामधील या लेखात, शिक्षण हे मानवी जीवन उमलविण्याचे साधन आहे. त्यातून कोमेजणे सुरू झाले तर पुन:श्च विचार करण्याची गरज निर्माण होते. विद्यार्थ्यांना शिक्षणातील ताणतणावातून होणारी अस्वस्थ मानसिकता थोपवण्यासाठी, पावले उचलण्यासाठी वेळीच शिक्षण पद्धतीत आवश्यक ते बदल करून उपाययोजना करणे फायदेशीर ठरते. शिक्षणात परीक्षा आणि गुण यांच्या दबावातून आणि पालकांच्या अपेक्षांच्या ओझ्याने मुले तणावात आहेत. त्याचबरोबर सर्वच व्यवस्था शिक्षणाच्या मूलभूत अर्थापासून दूर जात आहेत. शाळा देखील गुण आणि खोट्या प्रतिष्ठेसाठी प्रयत्न करू लागल्याने विद्यार्थी टोकाची पावले उचलू

लागली आहेत. गेले काही वर्ष विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचा आलेख वाढतो आहे.

**विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास म्हणजे शिक्षण**

विद्यार्थ्यांमध्ये जे दडले आहे ते बाहेर काढणे म्हणजे शिक्षण होय. रस्किनच्या उपपत्तीनुसार प्रत्येक दगडात एक मूर्ती दडलेली आहे. त्या दगडातील नको असलेला भाग फक्त मूर्तीकाराने दूर करायचा असतो. म्हणजे ती मुर्ती देखणी व सुंदर तयार होत असते. शिक्षणात यापेक्षा काही जास्त अपेक्षा नाही. विद्यार्थी जाणून घेणे, त्याचा कल लक्षात घेऊन अध्ययन अनुभव देणे, विद्यार्थ्यांची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक पृष्ठभूमी जाणून घेऊन अनुभवाची रचना केली तर, शिक्षणातील रस आपोआप वाढेल. विद्यार्थ्यांच्या सुप्त शक्तीला शिक्षणात उपयोगात आणण्याची क्षमता नसेल तर, विद्यार्थी त्या शक्तीचा विनियोग अन्य मार्गाने करतात. शिकण्यात मन रमले तर बेशिस्तीचा प्रश्न, धाक आणि मारहाणीने मिटण्याची शक्यता नाही. अशा स्वरूपात विद्यार्थी जेव्हा प्रतिसाद देतात तेव्हा तो बदलाचा भाग असतो. विद्यार्थ्यांना रागावून, मारहाण करून शिक्षणात गुणवत्ता आणता येत नाही. शिक्षणाचा मार्ग विद्यार्थ्यावरील प्रेमातून जात असतो. विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील नाते जितके भक्कम असेल तितके शिकणे गुणवत्तापूर्ण होते. धाक नको तर, आधार हवा. त्यासाठी आईच्या ममत्वाने शिक्षण प्रवास घडवावा लागेल. म्हणून शिक्षण हक्क कायद्यात शिक्षेस प्रतिबंध करण्यात आला आहे.

शिक्षणाने बदलाच्या मागे न लागता परिवर्तनाच्या दिशेने जाण्यासाठी विचार पेरणी करावयाची असते. विद्यार्थ्याला गुण कमी पडले असतील तर त्याला केवळ विद्यार्थी जबाबदार आहे असे नाही. त्याला एखादा घटक समजला नसेल तर तो घटक नव्या अध्ययन अनुभवाने पुन्हा रुजवायला हवा असतो. त्यासाठी शिक्षणाच्या प्रवाहात सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यातून प्रत्येक टप्प्यावरती विद्यार्थी प्रगती जाणून घेणे, मागे पडलेल्या क्षेत्रात त्याला मदत करणे अपेक्षित आहे. मात्र मूळच्या विचारप्रक्रियेकडे दुर्लक्ष होत असल्याने यासारख्या

प्रसंगांना सातत्याने सामोरे जावे लागते, हे लक्षात घ्यायला हवे. कोणतीही परीक्षा ही केवळ विद्यार्थी काय, कसा, किती शिकला आहे, हे जाणून घेण्याचे साधन आहे.

शाळांची गुणवत्ता विद्यार्थ्यांच्या व व्यक्तिमत्वाच्या विकासापेक्षा गुणांच्या टक्केवारीवर मोजली जात आहे. त्यामुळे शिक्षकही तणावात येत आहेत. त्यातून मारहाणीचे प्रसंग उद्भवतात. विद्यार्थ्यांना गुण हेच शिक्षणाचे व जीवनाचे अंतिम सत्य आहे असे वाटू लागल्याने कमी गुण म्हणजे जणू जगण्यास पात्र नाही असे समजले जाऊ लागले आहे. सामाजिक व्यक्त होणे वाढले असले तरी त्यात आभासी स्वरूप आले आहे. अपमान गीळण्याचे शिकविणे राहून जात आहे. अतिरिक्त काळजीने विद्यार्थी अपंग बनत आहेत. घरातील आजी-आजोबा यांचे स्थान हरवत चालले आहे. विभक्त कुटुंब पद्धतीने मानसिक, भावनिक भरणच होत नाही. त्यामुळे विद्यार्थी असे टोकाचे पाऊल उचलताना दिसत आहेत. मुलांच्या भौतिक गरजा पूर्ण होतात, मात्र भावनिक भरणाच्या रितेपणाने छोटासा नकार देखील मुलांच्या जिव्हारी लागतो आहे. त्यातून मुलांच्या आत्महत्या वाढत आहेत. शिक्षण हे जीवन उमलण्याचे, फुलविण्याचे साधन आहे. त्यातून कोमेजणे सुरू झाले तर एकूणच विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्तता –** विद्यार्थी जाणून घेणे, त्याचा कल लक्षात घेऊन अध्ययन अनुभव देणे, विद्यार्थ्यांची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक पृष्ठभूमी जाणून घेऊन अनुभवाची रचना केली तर शिक्षणातील रस आपोआप वाढेल, शाळांची गुणवत्ता विद्यार्थ्यांच्या व व्यक्तिमत्वाच्या विकासावर ठरविणे इत्यादी माहिती संशोधनासाठी उपयुक्त ठरली.

**२.३.५ संशोधन विषयाशी संबंधित विविध जर्नल मधील प्रकाशित रिसर्च पेपर द्वारा**

**घेतलेला संबंधित साहित्याचा आढावा**

**२.३.५.१ अनिता बाळासाहेब भापकर (फेब्रुवारी २०१४) "शिक्षक व विद्यार्थी ताण व्यवस्थापन" International MultiDisciplinary**

**e-Jounral मध्ये प्रकाशित या Research Paper मध्ये** ताणतणावाविषयीची कारणे व संशोधन केले आहे. मुलांवरील वातावरणीय ताणाचे विश्लेषण करताना

१. कुटुंबातील वातावरण - घरातील वातावरण, खेळीमेळीचे नसेल, प्रसन्न नसेल, आई-वडिलांचे सतत मतभेद, वाद व भांडणे होत असतील त्यामुळे मुले कायम भेदरलेली व घाबरलेली दिसतात. त्यामुळे अभ्यासात लक्ष लागत नाही. या भांडणामुळे आपले आईवडील वेगळे होतील का ? आपल्याला कोणाजवळ रहायला मिळेल ? याच तणावाखाली मुले सतत राहतात.

२. अपरिचित वातावरणाची भीती - मुलांना अपरिचित वातावरणाची प्रामुख्याने भीती वाटते. उदा. वडिलांची नोकरीच्या निमित्ताने वेगवेगळया ठिकाणी होणारी बदली, नवीन शाळा, नवीन परिसर, नवीन मित्र-मैत्रिणी कसे भेटतील ? या गोष्टींचा ताण मुलांवर येत असतो.

३. पालकांच्या अवास्तव अपेक्षा - पालकांच्या अवास्तव अपेक्षा यांचा ताण मुलांवर येत असतो. उदा. वडिलांना असे वाटते की पैशाअभावी मी इंजिनियर होऊ शकलो नाही पण, माझ्या मुलाने मात्र इंजिनियर होऊन माझी ही अपुरी इच्छा पूर्ण करावी. आई-वडिलांच्या अवास्तव अपेक्षांच्या ओझ्यामुळे मुलांच्या मनावर खूप ताण येतो.

४. कुटुंबातील समस्या - कुटुंबातील आई अथवा वडिलांचे छत्र हरपले असेल त्यामुळे वाटणारी भविष्याची चिंता, त्याचबरोबर घरातील वाद-विवाद या सर्व गोष्टींमुळे मुलांवर ताण असतो.

५. आर्थिक समस्या - आर्थिक परिस्थिती नाजूक असणाऱ्या मुलांना हव्या त्या गोष्टी वेळेवर मिळत नाहीत. जसे शारीरिक, मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत.

२.३.५.२ **कु. स्मिता चिरंजीव पाटील (सप्टेंबर २०१८) "विद्यार्थ्यांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय आणि शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेच्या सज्जतेची गरज" या विषयावरील संशोधनामध्ये** विद्यार्थ्यांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय आणि

शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता महत्त्वपूर्ण आहे. म्हणून विद्यार्थ्यांचा सामाजिक, मानसशास्त्रीय आणि शैक्षणिक समस्या हाताळण्यासाठी शाळेच्या सजतेच्या गरजेबाबत चर्चा केली आहे. प्रत्येक बालकाच्या समस्या वेगवेगळया असतात. शाळेतील विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक समस्या, मानसशास्त्रीय समस्या आणि सामाजिक समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. त्यामुळे शाळेची सज्जता गरजेची आहे.

१) शाळेची सज्जता - प्रस्तुत संशोधनात शाळेची सज्जता म्हणजे शालेय स्तरावरच शिक्षण घेत असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक समस्या, मानसशास्त्रीय समस्या आणि सामाजिक समस्या त्वरित आणि प्रभावीपणे हाताळण्यासाठीची शाळेच्या भागधारकांची, प्रशासक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांची तयारी होय

अ) मानसशास्त्रीय समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता - प्रस्तुत संशोधनात मानसशास्त्रीय समस्या हाताळण्यासाठी शाळेची सज्जता म्हणजे शालेय स्तरावरच शिक्षण घेत असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना येणाऱ्या वर्तन समस्या, सवयी संबंधित समस्या आणि भावनिक समस्या या मानसशास्त्रीय समस्या त्वरित आणि प्रभावीपणे हाताळण्यासाठी शाळेच्या भागधारकांची, प्रशासक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांची तयारी होय.

i) वर्तन समस्या म्हणजे यामध्ये स्वयंप्रेरित, निष्क्रिय, प्रतिक्रिया असेल. गुंडगिरी, लाजाळू, एकांतप्रिय, चोरी करणे, अति चळवळया, चावणे आणि दंगा करणे यांचा समावेश होतो.

ii) सवयी संबंधित समस्या म्हणजे  नखे चावणे, केस खेचणे, डोके आपटणे, स्वतःला मारणे किंवा चावणे. मुलांवरील विचित्र सवयी, दोष, खोटे बोलणे इ. वैशिष्ट्ये यांचा समावेश होतो.

iii) भावनिक समस्या म्हणजे भावनिक अस्वस्थ, भावनिक अक्षमता यांचा समावेश होतो. भावनिक अस्वस्थ म्हणजे चिंता व दुःख आणि भीती यांचा समावेश होतो. भावनिक अक्षमता म्हणजे राग, आक्रमकता, नैराश्य यांचा समावेश होतो.

विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक समस्या जसे कौशल्य कमतरता, अभ्यासाचा कंटाळा करणे, परीक्षेचा ताण, अध्ययन अक्षमता या समस्या जर दूर करण्यास शाळा सज्ज असेल तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व फुलते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास होण्यासाठी शाळेची सज्जता गरजेची आहे. विद्यार्थ्यांची कौशल्य कमतरता जाणून घेण्यासाठी त्याचे निदानात्मक चाचणीद्वारे मूल्यांकन करून निदान झाल्यानंतर त्यावर उपचारात्मक अध्यापन देणे, शैक्षणिक साहित्याचा वापर करून कौशल्य कमतरता कमी करण्याचा प्रयत्न करणे, संप्रेषण कौशल्य विकसित करण्यासाठी त्याला त्याच्या मनातील विचार व्यक्त करण्यास संधी देणे, अधिक तासिका घेऊन शिकविणे, विविध उपक्रमांचे आयोजन करणे, मनोरंजनात्मक पद्धतीने शिकविणे, शैक्षणिक खेळ घेणे, मनोरंजनात्मक पुस्तकांचा वापर करणे, कवायती घेणे, विद्यार्थ्यांच्या मनात अभ्यासाप्रती सकारात्मक दृष्टिकोण विकसित करणे, विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा ताण दूर करण्यासाठी व्यवस्थापन कार्यशाळा, योग्य अभ्यासाची सवय विकसित करण्यास वेळ व्यवस्थापन कसे करावे हे शिकवण्यासाठी शाळेची सज्जता गरजेची आहे.

**२.३.५.३ प्रा. पाटील ईश्वर पोपट (ऑक्टोबर २०१८) “किशोरवयीन विद्यार्थ्यांमधील ताण-तणाव - शिक्षकांची समर्पक भूमिका” Review of Research या Journal मध्ये प्रकाशित रिसर्च पेपर** मध्ये विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणाऱ्या ताणतणावाविषयी सविस्तर वर्णन केले आहे. विविधता हा आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. आपल्या आयुष्याचा केंद्रबिंदू आहे. हे जरी आपण शहाणपणाने मान्य केले, तरी तणाव जोपर्यंत आपल्या काबूत आहे, तोवरच सर्व ठीक असतं. नाहीतर तणावाचे अनेक परिणाम आपल्याला भोगावे लागतात. मुलांच सर्व काही सुरळीत चाललंय असं पालकांना वाटत असतानाच अचानक एखाद्या दिवशी शालेय समुपदेशकांच्या किंवा शाळेतून पालकांना आपल्या मुलाला तणावाने ग्रासले आहे, असा संदेश मिळतो, तेव्हा त्यांना मोठा धक्का

बसतो. या अवस्थेत मुलं खूपच एकलकोंडी, आत्मकेंद्री, अकाली प्रौढ होत आहेत असं दिसतं. पण त्यामुळे वयानुसार अनुभवांमधून येणारी परिपक्वता अभावानेच आढळते. जसजसं वय वाढत जाईल तसतशी मुलं वाढणं हे स्वाभाविक असतं. खेळणारी, बागडणारी, गाणी, गोष्टी, गंमती सांगणारी राहिली नाहीत. हल्ली त्यांनी सकाळपासून रात्रीपर्यंत शाळा, क्लास, खेळ, छंद, वर्ग ह्या सगळयातून पालकांनी जखडूनच टाकल आहे. यांच्या मते प्रत्यक्ष आजारपण किंवा अपघात यामुळे दरवर्षी जेवढ्या व्यक्ती मृत्युमुखी पडतात, त्यापेक्षाही ताणाला यशस्वीपणे सामोरे न जाता आल्यामुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या अधिक आहे.

शालेय वातावरणामुळे निर्माण होणारे ताण-तणाव – प्रेम/आकर्षण, आंतर वैयक्तिक संबंध, व्यसनाधीनता, शालेय कामकाज, गरीबी/श्रीमंती, अभ्यासाचे ओझे, अवघड विषय, शालेय वातावरणात मुलांमध्ये असणारी भांडणे, विविध स्पर्धा, शोषण, परीक्षा, मोबाईल, इंटरनेट,

तणावाचे परिणाम - मारामाऱ्या करणे, आत्महत्या, शारीरिक इजा करून घेणे, वारंवार आजारी पडणे, एकाग्रता न होणे, एकांतात राहणे, शैक्षणिक घसरण, नैराश्याच्या गर्तेत जाणे, विचार न करता निर्णय हानिकारक, व्यसनाधीनता, प्रतिकार क्षमता कमी होणे, घरातून पळून जाणे इ.

**२.३.५.४ भारसाकळे (२०१३) : औरंगाबाद शहरातील मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांमधील भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास. इंडियन स्ट्रेम्स रिसर्च जर्नल. मध्ये प्रकाशित रिसर्च पेपर :** मराठी आणि इंग्रजी माध्यमातील मुलांच्या सर्जनशील बुध्दीचा तुलनात्मक अभ्यास करणे या संशोधनाचे उद्दिष्ट्य होते. प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी यांनी औरंगाबाद शहरातील १६ ते १८ वर्षे वयोगटातील मराठी माध्यमातील ५६ आणि इंग्रजी माध्यमातील ५६ अशा एकुण ११२ स्त्रि- पुरुष न्यादर्शाची निवड करण्यात आली होती. सर्जनशील बुध्दीचे मापन करण्यासाठी Emotional Intelligence Scale चा वापर करण्यात आला. जी अनुकुल हायडे,

सज्यात पेठे आणि उपिंदर धार यांनी तयार केली. माहिती विश्लेषणासाठी A 2 x 2 Factorial design चा टापर केला गेला. संशोधनाअंती असे निष्कर्ष निघाले की मराठी माध्यम आणि इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशील बुध्दीमध्ये कसलही सार्थक फरक दिसुन आला नाही. परंतु दोन्ही माध्यमातील मुलांच्या तुलनेत मुलीमध्ये सार्थक फरक आढळला. मुलांच्या तुलनेत मुलींमध्ये सर्जनशील बुध्दी जास्त असल्याचे दिसुन आले. कोमल अली हुसेन आणि रुकसाना कौसर (२०१२) यांनी माध्यमिक शाळेतील मुलांच्या शैक्षणिक ताण तणाव आणि मानसिक तंदुरुस्तीमधील सहसंबंध पाहिला. या संशोधन अभ्यासासाठी लाहोर शहरातील शासकीय शाळेतील १०० विद्यार्थ्यांना न्यादर्शन म्हणुन निवडले.

**२.३.५.५ प्रवीण कोथवडे (२०१४) इंग्रजी आणि मराठी भाषेतील आत्मसन्मानाचा सहसंबंधित अभ्यास माध्यम डी.टी.एड विद्यार्थी शिक्षक, संशोधन विश्लेषणासाठी जीजेआरए ग्लोबल जर्नल आयएसएसएनएन २२७७-८१६०. खंड ०१. अंक-७, जुलै २०१४ :** प्रविण कोथावडे यांनी मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या सवयींवर संशोधन केले. प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी त्यांनी उत्तर महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील मराठी आणि इंग्रजी माध्यमातील प्रत्येकी 50- 50 असे 100 विद्यार्थी निवडले होते. या संशोधनसाठी त्यांनी डॉ. पलसाने यांची study habit scale वापरली होती. वरील संशोधनातुन त्यांना पुढील निष्कर्ष प्राप्त झाले मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या सवयी इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या सवयी इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या सवयीपेक्षा चांगल्या होत्या. दोन्ही गटातील अभ्यासाच्या सवयी आणि शैक्षणिक संपादणुकीतील सहसंबंध पाहिला असता मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांचा गुणांक इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांपेक्षा काही फरकाने जास्त असल्याचे दिसुन आले. तसेच तिसरा निष्कर्ष असा निघाला की दोन्ही गटातील अभ्यास करण्याच्या सवयी वेगवेगळया होत्या.

**२.३.५.६ तुकाराम धुमार (२०११) शैक्षणिक चिंता: इंग्रजी आणि मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांमधील तुलनात्मक अभ्यास : .** तुकाराम धुमार यांनी इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक चिंतेच्या घटकांचा तुलनात्मक अभ्यास केला. शैक्षणिक चिंता विद्यार्थ्याच्या शैक्षणिक यशातील एक असाधारण बाब आहे. त्याकडे ते दुलर्क्ष करु शकत नाहीत. मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांतील चिंतेची तुलना करणे हे या संशोधनाचे प्रमुख उद्दिष्टे होते. या संशोधन अभ्यासासाठी त्यांनी ६० मुलांमध्ये तुलना केली. तुलना करत असतांना इंग्रजी आणि मराठी माध्यमातील मुलांची आणि मुलींची संख्याही समान ठेवली. शैक्षणिक चिंतेचे मापन करण्यासाठी Academic Anxiety Scale for children : singh and Gupta (१९७१) चा उपयोग केला. तुलनात्मक फरक पाहण्यासाठी t- test संख्याशास्त्रीय परिमाण वापरले. त्यांच्या अभ्यासानुसार असे आढळुन आले की इंग्रजी माध्यमाच्या मुलांमध्ये मराठी माध्यमातील मुलांच्या तुलनेत शैक्षणिक ताणाची पातळी कमी असल्याचे दिसुन आले.

## २.४ संशोधन विषयाशी संबंधित संशोधनाचा आढावा

### इंग्रजी भाषेतील पी.एचडी. स्तरावरील संशोधनाचा आढावा

**२.४.१ Sania Kulsum (2020) - A Study of Teaching – Learning process in English language classrooms within broader perspectives of home environment, school ecology and hidden curriculum**

**BACKGROUND -**

Environment plays a crucial role in the life of human beings right from the moment of conception through the later part of their lives. Human development at all ages and stages is shaped by a dynamic and continuous interaction between individual and immediate environment. Virtually every aspect of human development is affected by the environment and experience that is encountered in a cumulative fashion. It is evident that environment modifies

and interacts with heredity to shape the personality of an individual and determines the degree to which its maximum potential will be realised. Anatomical characteristics are usually inherited and it is well recognised that environmental factors, including diet, functional habits and training, can affect a given organism in many ways, including the creation of organic structures that influence strength, stamina, agility, intellect, personality characteristics, adjustment and ultimately performance.

**HOME ENVIRONMENT**

Learning is a cognitive and complex procedure which begins at birth and continues throughout life. Family is the primary socialisation agency and parents are the first teachers for their children, therefore they have a strong influence on their children's learning. According to Crow and Crow (1965) "Home is the primary unit of society. The composition of different relationships makes it a unit, and these relationships (parents, brothers and sisters, etc.) play a significant role in the life of a child from childhood to adulthood, and it is the home which determines a child's personality. Home affects not only the future of a child's existence, but also its behaviors, values and personalities."

**OBJECTIVES**

1. To study the home environment of the learners with respect to English as second language.

2. To understand the relationship between home environment and ESL through the study of :

A (i) Socio Economic Status of the learners

(ii) Proficiency of the learners in ESL

B Systematic selection of case studies from both the sampled schools.

3. To study the school ecology with reference to ESL teaching learning specific to :

(a) Infrastructural Facilities available in the school for teaching learning of ESL

(b) Transaction of the ESL curriculum

(c) Teacher's perception on aspects related to teaching of ESL
(d) Parental role and aspirations on Learning of English.
4. To examine the prevalence of hidden curriculum in ESL within the sampled
schools.

**MAJOR FINDINGS OF THE STUDY**

**Parental Support for ESLL -**

1. The majority of parents always encourage learners to learn English.
2. Majority of parents reward children on performing consistently well in English.
3. Parents provide for private tutor/coaching to help learners in English studies or to improve their English skills.
4. Some parents Provide English story books/Novels to read at home while some parents also do not do so.
5. Parents encourage learners to participate in the school activities specifically related to the English Language such as Debate, elocutions, poem recitation, Essay Writing skit, etc.
6. Parents make efforts to explore ways to improve learners' English skills at home.
7. Most parents don't think that watching English movies/cartoons/animations at home is a waste of time and does not help in the improvement of English skills.

**Parental Involvement in ESLL -**

1. It was observed that the trends across both the schools were quite similar.
2. Almost all parents take extra care about learners' preparations and revisions during exam time.
3. Homework and assignments were monitored by my parents/elder siblings at home in the majority of cases.
4. The majority of learners reported that speaking English with parents & siblings at home helped in reducing their hesitation in practicing the language.

5. In almost half of the cases, parents regularly met the English teacher at school to discuss learners' progress and weak area in English.
6. Most parents frequently discussed with the private tutors about learners' progress in English.
7. Most parents spare time from their busy schedule to help improve learners' problem areas in English
8. Parental involvement in developing learners' English skills is a motivating factor for the majority of learners.
9. Parents in the majority of cases do not mock learners for making mistakes while attempting to speak English at home.

**२.४.२ Shirley Brice Heath’s Ways with Words (1983) Language, Life and Work in Communities and Classrooms .(Language and culture).**This work is a detailed summary of the ethnographic study of the families living in three groups on the Carolinas Piedmont Plateaus, America, by Shirley Brice Heath. For nearly 10 years during the 1970’s, Heath was living, working, and playing with the people of three communities “Roadville” and “Trackton” and with the neighbouring middle class “townspeople.” The author focused her research on the patterns of the language development in two distinct cultural environments. The author attempted to trace the interdependence between the cultural environment children grow up in and the development of their language competencies as well as the ways in which these competencies are developed. The work is considered as a significant contribution of the author in the development of the modern linguistic as well as anthropology.

Shirley Brice Heath explores two cultures and aims to understand how children living in these cultures learn their language skills, and what techniques and approaches adults use to improve their children's language skills. For the two cultures mention her book the author uses pseudo names. Roadville and Trackton are among those

communities. In this regard, it is important to emphasise the fact that Shirley Brice Heath takes into account a dynamic socio-cultural context of the children who are the subjects of the study. To put it more specifically, she examines two working-class groups, i.e. groups with lower social status levels, and compares them with the townspeople, who serve them.

The author thus expands the view of language development from a limited, scientific view of language development as a process of learning specific speech, writing and reading skills to the view of language development process as a dynamic process influenced by the cultural context in which basic language skills and competencies are acquired. Thus, the author introduces readers into both communities. Shirley Brice Heath initially describes in depth the social setting in which children grow up and develop their language skills. She examines cultural values and customs in both cultures, analyses the social status of the children's families, who are the subjects of her study, and the climate of schooling. In this regard, it is important to emphasise the attention of the author to the social atmosphere of children outside their families and to the life of children within the family and their relationships with their community members and their relatives.

**Language at Home across all three communities**

The author argues that the people of the town include a different attitude towards the children. They see children as potential birthday conversationalists and mothers are primary caregivers, while fathers also perform breadwinner functions. The towns people use the baby talk and question-answer routine to speak to their babies during the language learning period.

In addition, the townspeople are more interested with reading and writing, and they strive to mirror the school's standards. They prepare their children for schooling in a way, and seek to lay the groundwork for

their language skills using written sources to incorporate in their own oral or written content. Reading and writing are tasks that all members of this group engage in for work and leisure.

**Language in school played out differently**

The ways of learning about written materials and asking and answering questions in school seem very normal to the kids of the townspeople, because that is what they have grown up with. However, as Heath points out, "the townspeople 's ways are far from normal for the children of Trackton and Roadville, and they do seem odd indeed." Students from Roadville typically do better than students from Trackton when showing "linguistic trends equated with school readiness" (Heath 343). But the difficulties that children from both groups face are inevitably unfeasible to sustained academic achievement. Teachers as learners In the concluding chapters of the book, Heath takes what she has observed and implies it to the educators of the Roadville and Trackton children. In this way, teachers are again becoming learners so that they gain new insight into how their students handle their language and their expectations and probably get more knowledge about their students as well as the development of languages, effectively or not. This new insight allows educators to make major pedagogical improvements that enable students to integrate their culture, home, and school lives. Such new awareness of the connections between language patterns in schools, neighbourhoods, and homes has profound consequences not just at local level in these societies, but on a broader continuum of social understanding. The author finishes her book by emphasising the significance in the teaching process of taking into account the cultural context of the students.

**Basil Bernstein's Code Theory (Language and Social Class)**

Basil Bernstein (1924 –2000) was a linguist who analysed one of the ways in which the dynamics of social class and language affects learner outcomes in school.

Bernstein investigated the language of the working class. Working class children do not perform as well in school as the middle class children. Bernstein wondered whether this was due to language deficiencies. His `linguistic deficit theory' proposed that working class children use a ‘Restricted code’ as contrasted with middle class students who speak an ‘Elaborated code’. Restricted code is characterised by sentences of few words, and fewer subordinate clauses in the construction of the sentences. Middle class children use an elaborated code, using longer sentences, this enabled them to handle information more efficiently and thus do well at school. Bernstein also viewed working class children as being unable to defer gratification. Middle class children are prepared to put a lot of effort into their studies, in the knowledge that they will be able to get a decent job in the end. On the other hand, Bernstein felt that working class children would not be willing to work hard atschool, because they would not be prepared to wait for a long term goal, instead they preferred short term goals. This would explain why many left school as soon as they could and went out to work.

Thus, Bernstein analyses one of the ways in which the dynamics of social class and language affects learner outcomes in school.

Perhaps the problem lies with schools. Many schools use the middle class elaborated codes, so children who also use these codes would get more out of education.

Bernstien’s code theory can work well as the theoretical foundation of educational research exploring complex teaching and learning phenomena. His code theory can illuminate how the school can act as a strong independent force in shaping a student’s identity and essentially, their view of the world: students develop values

within the culture of the school through contradictory and paradoxical practices -external global market forces and pedagogies are becoming more market-oriented. Bernstein's theory proposes the deficit hypothesis i.e. economic disadvantage retards children's development, which causes them to do poorly in school.

२.४.३ **Bedi Jaskiran (2020) English Language in India: A Dichotomy Between Economic Growth and Inclusive Growth.** This work is unique in its attempt to introduce English language learning into the field of economics of education. The book offers a commendable view of the economic gains implied by mastering English language skills. It suggests that learning English has major economic advantages on the job market in India , making it a source of economic inequality. The author examines how English language skills functions as human resource. Investigates the language-relationship and economic indicators such as employment, household income and state growth. The author asserts that the English language, despite being one of the many languages and spoken only by a few, has an under-researched but obvious understanding of the Indian economy and education sectors. A common Indian citizen is aware that India's "good" schools and colleges are focused on English, and the job market in India (perhaps the private or public sector) needs predominantly English-speaking skills. The media stresses that the value assigned to language could disadvantage non-English speakers at the level of education and labour market, further paving the way for class differentiation. A productive relationship with this language is also shared by the state-level development in India. In particular, the response of GDP growth to physical capital investment is higher than that of English- speakers in the states. In addition, English directly impacts state growth in the service sector and indirectly – through physical capital – affects growth in the manufacturing sector. Given that India has gained most

from the growth of the service sector, it is fair to assume that English really has a positive role to play in India's economic growth. The study estimates the economic return on wages in India to the English language skills, and the first to deduce the economic relationship of the language to sectors and state growth.

**मराठी भाषेतील पी.एचडी. स्तरावरील संशोधनाचा आढावा**

**२.४.४ बबन केशवराव सोनवणे (नोव्हेंबर २०२१) - परभणी जिल्ह्यातील पालकांची पाल्यांविषयी शैक्षणिक अपेक्षा, चिंता व अनास्था आणि पाल्यांची शैक्षणिक प्रगती-एक अभ्यास या विषयावरील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

**प्रस्तावना –**

पालकांची पाल्यांविषयी असलेली शैक्षणिक अपेक्षा, चिंता व अनास्था आणि शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीकोनातून विचार केला असता आपल्याला असे लक्षात येते की, पालकांच्या आपल्या पाल्याविषयी असलेल्या अपेक्षा खूप मोठ्या प्रमाणात असतात. अपेक्षांची परिपूर्तता पाल्यांच्या शैक्षणिक काळात झाली नसल्याने पालकांना चिंता आणि ताण पडतो. पाल्य अपयशी झाला तर त्याचे खापर पालक त्यांच्यावरच फोडत असतात. पालक आपल्या पाल्याविषयी परिपूर्णपणे जागरूक नसतील तर त्याचा परिणाम पाल्यांच्या एकूणच शैक्षणिक प्रगती व गुणवत्तेवर जाणवतो. सदरील विषयाची निवड ही पालकांची पाल्याबद्दल असलेल्या अपेक्षा, त्यांचे स्वरूप, त्यांचे मापन आणि मूल्यमापन करण्यासाठी निवडला असून पालकांच्या अवास्तव अपेक्षा, त्यातून पाल्यांवर होणारा परिणाम आणि दोन्ही घटकातून निर्मित होणारी चिंता व पाल्यांची अनास्था ही वेगवेगळया प्रकारे समन्वयित होत असते.

**उद्दिष्टे**

१. परभणी जिल्ह्यातील पालकांची पाल्यांविषयी शैक्षणिक अपेक्षांचा अभ्यास करणे.
२. परभणी जिल्ह्यातील पालकांची पाल्यांविषयी चिंता या घटकाचा अभ्यास करणे.

३. परभणी जिल्ह्यातील पालकांची पाल्यांविषयी अनास्था या घटकाचा अभ्यास करणे.
४. परभणी जिल्ह्यातील पालकांची पाल्यांविषयी शैक्षणिक प्रगतीचा अभ्यास करणे.
५. पालकांना त्यांच्या पाल्यांच्या प्रगतीसाठी उपाय योजना सुचविणे.

**निष्कर्ष**

१. शहरी भागातील माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या पाल्यांची शैक्षणिक प्रगती ही ग्रामीण भागाच्या तुलनेने ४१ ते ६० % या स्तरावर २९.७५ % कमी असल्याचे आढळून आले आहे.
२. गट क्र. अ वरून असे दिसून येते की, बहुतांश (५५.४५ %) ग्रामीण भागातील पालकांना आपल्या पाल्याविषयी असलेल्या अपेक्षा शहरी भागापेक्षा जास्त असल्याचे आढळून आलेले आहे.
३. गट ब वरून असे दिसून येते की, बहुतांश (५७.९७ %) ग्रामीण भागातील पालकांना आपल्या पाल्याविषयी असलेल्या चिंता शहरी भागापेक्षा जास्त असल्याचे आढळून आलेले आहे.
४. गट क वरून असे दिसून येत की, बहुतांश (५९.८९ %) ग्रामीण भागातील पालकांना आपल्या पाल्याविषयी असलेल्या अनास्था शहरी भागापेक्षा जास्त असल्याचे आढळून आलेले आहे.

**पालकांसाठी शिफारस**

१. पालकांनी पाल्यांची शैक्षणिक चिंता करण्यापेक्षा त्यांच्या शैक्षणिक घटकांकडे लक्ष द्यावे.
२. पालकांनी पाल्यांची शैक्षणिक अनास्था दूर करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत.
३. पालकांनी मुलांपेक्षा मुलींच्या शैक्षणिक अपेक्षांवर पूर्णपणे लक्ष केंद्रित करावे.
४. पालकांनी पाल्यांच्या शैक्षणिक अपेक्षाविषयी जास्तीची अपेक्षा ठेवू नये.

५. पालकांनी पाल्यांच्या शैक्षणिक चिंता न करता त्यांच्या क्षमतेनुसार शैक्षणिक कार्य करू द्यावे.
६. पालकांनी पाल्यांच्या शैक्षणिक अनास्था न बाळगता पाल्यांमधील अनास्था समुपदेशनाद्वारे दूर करावी.
७. पालकांनी पाल्यांची शैक्षणिक प्रगती ही फक्त त्यांच्या क्षमता व गुणवत्तेवरुन ठरवावी.

**पाल्यांसाठी शिफारशी**

१. विद्यार्थ्याने त्यांची शैक्षणिक चिंता न करता अभ्यासावर लक्ष द्यावे.
२. विद्यार्थ्याने शैक्षणिक अपेक्षा ह्या स्वतःच्या क्षमतेनुसार ठरवाव्यात.
३. विद्यार्थिनींनी त्यांची शैक्षणिक अनास्था ही ठेवू नये.

**२.४.५ तुकाराम किशनराव काकडे – इंग्रजी आणि मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांची शारीरिक सुदृढता आणि शैक्षणिक ताणतणाव या घटकांचा तुलनात्मक अभ्यास या संशोधन विषयात स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

**प्रस्तावना -**

शारीरिक सुदृढता प्राप्त करण्यासाठी खेळ खेळणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु आज विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयी उदासीनता दिसून येते. प्रत्येक पालक आपल्या मुलांना फक्त अभ्यासाकडेच लक्ष केंद्रित करताना दिसतात आणि खेळाकडे दुर्लक्ष करतात. उलट खेळामुळे मुलांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होईल असा त्यांचा समज झाला आहे. आज अभ्यासामुळे करिअर घडविता येते, असा एक समज झालेला आहे. पण खेळामुळे शरीर, मन, सुदृढ राहते हे पालक विसरू लागले आहेत. **"शरीर मध्यां खलुधर्म"** ही उक्ती पालक जवळजवळ विसरलेच आहेत. त्यातच इंग्रजी माध्यमाचे मूळ पालकांच्या डोक्यात शिरले आहे. आपले मूलं इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकावे असे प्रत्येक पालकांना वाटत आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या बाह्य अंगांचा झगमगाटाने, महागड्या गणवेश याची पालकांना त्याचबरोबर शालेय मुलांना देखील भुरळ

घातली आहे. त्यामुळे इंग्रजी समजून घेण्याची कुवत असेल...नसेल, शुल्क परवडणारे असेल...नसेल, पात्रता असेल... नसेल, हे माहीत नसताना देखील प्रत्येकाला आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेतच शिकवावयाचे आहे. मोठ्याप्रमाणे लहान मुलांनासुद्धा असेच वाटत आहे. हे मोठ्या माणसांना बोलण्यातून आपल्या, कृतीतून व्यक्त करता येतो. तसे लहान मुलांना येत नाही. त्यासाठी पालकांनी घरातील इतर मोठ्या मंडळींनी आणि शिक्षकांनी मुलांना येणारा ताण वेळीच ओळखून त्यावर योजना किंवा ताण व्यवस्थापन करावे. ज्या गोष्टी विशेष वाटत नाही, त्या गोष्टी मुलांमध्ये ताण निर्माण करू शकतात. मित्र-मैत्रिणी, स्पर्धा परीक्षा, पालकांची अपेक्षा, इतरांबरोबर केलेली तुलना, न झेपणारा अभ्यासक्रम, खेळाचा व व्यायामाचा अभाव अशा कितीतरी गोष्टीमुळे लहान मुलांमध्ये ताण निर्माण होतो. मुलांवर वाईटच परिणाम होतो असे नाही. नकारात्मक ताण मुलांवर वाईट परिणाम करत असून सकारात्मक ताण मुलांवर योग्य तो चांगला परिणाम करतो. तो त्याचा विकास करण्यास मदत करतो. त्यामुळे मुलांचा विकास होईल. म्हणून जीवनात यशस्वी व्हावे, जीवनातील प्रत्येक गोष्टीचा मुलांनी आनंद घ्यावा असे वाटत असेल तर, मुले ताणतणावापासून मुक्त असणे गरजेचे आहे हे संशोधनातून सिद्ध केले आहे.

**उद्दिष्टे**

१. इंग्रजी आणि मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या शारीरिक सुदृढता घटकांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
२. इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक ताण-तणावांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
३. इंग्रजी आणि मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या शारीरिक सुदृढता घटकांचे मापन करणे.
४. इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक ताण-तणावाचे मापन करणे व त्याची नोंद करणे.

शैक्षणिक ताणताणाव मापनासाठी डॉ. झाकीर अख्तर यांची शैक्षणिक ताणतणाव मापन प्रश्नावली भरून घेण्यात आली.

मिळालेल्या प्राप्तांकाचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान. प्रमाण विचलण, टी-टेस्ट यासारख्या संख्याशास्त्रीय परिमाणांचा उपयोग करण्यात आला व त्यावरून तुलना केली असता शारीरिक सुदृढता घटकात तसेच शैक्षणिक ताणतणाव घटकात सार्थक तुलनात्मक फरक आढळून आला.

**निष्कर्ष**

१. इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या विद्यार्थ्यांच्या वेग या शारीरिक सुदृढतेचे घटकात तुलनात्मक फरक आहे.
२. इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या विद्यार्थ्यांच्या दिशाभिमुखता या शारीरिक सुदृढतेच्या घटकात सार्थक तुलनात्मक फरक आहे.
३. इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या विद्यार्थ्यांच्या ताकद या शारीरिक सुदृढतेच्या घटकात सार्थक तुलनात्मक फरक आहे.
४. इंग्रजी आणि मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या दमदारपणा या शारीरिक सुदृढतेच्या घटकात सार्थक तुलनात्मक फरक आहे.
५. इंग्रजी आणि मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या तोल या शारीरिक सुदृढतेच्या घटकात सार्थक तुलनात्मक फरक आहे.
६. इंग्रजी आणि मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक या घटकात सार्थक तुलनात्मक फरक आहे.

**२.४.६ रोकडे ए.के., (मे २००५), कौमार्यवस्थेतील विद्यार्थ्यांची बुध्दिमत्ता, सामाजिक व आर्थिक स्तर, शैक्षणिक चिंता, व्यक्तिमत्व, समायोजन आणि शैक्षणिक संपादन यांच्या संबंधाचा अभ्यास, पीएच.डी., संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती**

**उद्दिष्टे**

१. शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील वर्ग ९ वी मध्ये अध्ययन करणाऱ्या मुले व मुली यांच्या बुध्दिमत्तेचा शोध घेणे.

२. शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील वर्ग ९ वी मध्ये अध्ययन करणाऱ्या मुले व मुली यांच्या सामाजिक स्तराचा शोध घेणे.
३. शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील वर्ग ९ वी मध्ये अध्ययन करणाऱ्या मुले व मुली यांच्या आर्थिक स्तराचा शोध घेणे.
४. शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील वर्ग ९ वी मध्ये अध्ययन करणाऱ्या मुले व मुली यांच्या शैक्षणिक चिंतेचा शोध घेणे.
५. शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील वर्ग ९ वी मध्ये अध्ययन करणाऱ्या मुले व मुली यांच्या व्यक्तिमत्व व समायोजनाचा शोध घेणे.
६. शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील वर्ग ९ वी मध्ये अध्ययन करणाऱ्या मुले व मुली यांच्या बुध्दिमत्ता आणि शैक्षणिक संपादनातील सहसंबंधाचा शोध घेणे.

**निष्कर्ष**

१. शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा समाजिकस्तर आणि शैक्षणिक संपादणूक यात अपमात का होईना सार्थ आहे.
२. प्रहरी मुले व ग्रामीण मले यांचा समाजिक स्तर आणि शैक्षणिक संपादणूक यात सार्थ सही नाही.
३. शहरी मूर्ती व ग्रामीण मुली यांचा समाजिक स्तर आणि शैक्षणिक संपादणूक यात सार्थ सही नाही.

**२.४.७ २०५३ डारकर आ.अ. (डिसेंबर २००६), कनिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्याची भावनिक अष्मिता व सामाजिक समायोजन क्षमता यामधील सहसंबंधांचे विश्लेषणात्मक अध्ययन, पीएच.डी. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**

**उद्दिष्टे**

१. विद्यार्थ्याच्या भावनिक बुद्धिमतीचे मापन करण्याकरीता भावनीक बुध्दिमत्ता मापिका तयार करणे.

२. विद्यार्थ्याची भावनिक बुद्धिमत्ता आणि सामाजिक समायोजन क्षमता यांच्यातील सहसंबंधाचे विश्लेषणात्मक अध्ययन
३. विद्यार्थ्याची सामाजिक समायोजन क्षमतचा शोध घेणे.
४. विद्यार्थ्याच्या भावनिक बुद्धिमतेनुसार समाजिक समायोजन क्षमतेच्या विकासाकरिता उपाययोजना सुचविणे.

**निष्कर्ष**

१. सारणी क्र. ५१ च्या अध्ययनावरुन कनिष्ठ महाविद्यालयीन विद्याथ्र्यांच्या भावनिक बुध्दिमत्तेचे मध्यमान ३५८.६० आणि विद्यार्थीनींच्या भावनिक बुध्दिमत्तेचे मध्यमान २९९.४० आहे. यावरुन कनिष्ठ विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या भावनिक बुध्दिमत्तेमध्ये लक्षणी फरक आढळून येतो.
२. कनिष्ठ महाविद्यालयीन ग्रामीण विद्यार्थ्यांच्या भावनिक बुध्दिमत्तेचे मध्यमान ३७०.८७ आणि शहरी विद्यार्थ्यांच्या भावनिक बुध्दिमत्तेचे मध्यमान ३६४.९४ इतके आहे. म्हणून कनिष्ठ महाविद्यालयीन ग्रामीण विद्यार्थी आणि शहरी विद्यार्थी यांच्या भावनिक बुध्दिमत्तेमध्ये लक्षणीय फरक आढळून येतो.
३. कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या समाजिक समायोजन क्षमतेचे मध्यमान ८७.६७ आणि विद्यार्थीनींच्या सामाजिक समायोजन क्षमतेचे मध्यमान ८३.०८ आहे. म्हणून विद्यार्थी आणि विद्यार्थीनींच्या सामाजिक समायोजन क्षमतेमध्ये लक्षणीय फरक आढळून येतो.

**२.४.८ शेरेकर ए. एम., (मे २००७), अमरावती विभागातील माध्यमिक शाळेतील वर्ग ९ च्या विद्यार्थ्यांची भावनीक बुध्दिमत्ता, शालेय समायोजन, शैक्षणिक संपादन प्रेरणा यांचा तुलनात्मक अभ्यास, पीएच.डी., संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती**

**उद्दिष्टे**

१. अमरावती विभागातील ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील वर्ग ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या भावनीक बुध्दिमत्तेचे मापन करणे.

२. अमरावती विभागातील ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील वर्ग ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या समायोजनाचे मापन करणे.
३. अमरावती विभागातील ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील वर्ग ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या संपादन प्रेरणेचे मापन करणे.
४. अमरावती विभागातील ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील वर्ग ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या शालेय समायोजनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.
५. अमरावती विभागातील ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील वर्ग ९ वी च्या विद्याथ्र्यांच्या संपादणूक प्रेरणांचा तुलनात्मक अभ्यास.

**निष्कर्ष**

१. 'स्व' जागरुकता, भावनात्मक स्थैर्य, संबंध व्यवस्थापन, स्व-विकास मान्यता, इतरांच्या सुखाविषयी व कल्पना विषयी वर्तन या घटकांमध्ये शहरी मुले व मुली यांच्यात सार्थ फरक आढळला नाही.
२. ग्रामीण मुली व शहरी मुली यांच्या भावनीक व सामाजिक समायोजनात सार्थ फरक आढळला नाही परंतू शैक्षणिक समायोजन ग्रामीण मुलींपेक्षा शहरी मुलींचे प्रमाण अधिक होते. त्याचप्रमाणे सर्व सामान्य शालेय समायोजनात सार्थ फरक नव्हता.
३. शहरी व ग्रामीण मुली यांच्या शैक्षणिक संपादन प्रेरणेत सार्थ फरक आढळून आला नाही.
४. ग्रामीण मुले व ग्रामीण मुली यांच्या शैक्षणिक संपादन प्रेरणेत सार्थ फरक नव्हता.

**२.४.९ सब्बाधी के., (ऑक्टोबर २००७), The study of relationship between Depression and Academic Achievement in graduate and postgraduate student, Ph.D., University of Pune, Pune**

**उद्दिष्टे**

१. उदासीन पदवी व पदवीत्तर विद्यार्थ्यांचे वय, लिंग, आई-वडिलांचे शिक्षण, विवाहित, परीक्षा गुण या वरुन शेकडेवारीचा शोध घेणे.
२. उदासीनतेचा पदवी व पदवीत्तर विद्यार्थ्यांचे वय, लिंग, आई-वडिलांचे शिक्षण, विवाह, परीक्षा गुण या वरुन स्तर निश्चित करणे.
३. उदासीनता आणि शैक्षणिक संपादणुकीचा सहसंबंध गुणकाचा शोध घेणे.

**निष्कर्ष**

१. पदवी व पदवीत्तर विद्यार्थी उदासीन असतात.
२. उदासीनता व शैक्षणिक संपादणूक यांच्यात सहसंबंध दिसून येतो.
३. उदासीनता मानसिक रोग आहे.

**२.४.१० तांबे चं.तु., (जुलै २००८), उस्मानाबाद जिल्हयातील उच्च माध्यमिक स्तरावरील विज्ञान शाखेतील अकरावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची वैज्ञानिक अभिवृत्ती व वैज्ञानिक अभियोग्यता व शैक्षणिक संपादणूक यांचा तुलनात्मक अभ्यास, पीएच.डी., सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**उद्दिष्टे**

१. अकरावीतील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक अभिवृत्ती व वैज्ञानिक अभियोग्यता यांचा सहसंबंधात्मक अभ्यास करणे.
२. अकरावीतील विज्ञान शाखेतील शहरी विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक अभिवृत्ती व रसायनशास्त्र विषयातील शैक्षणिक संपादणूक यांचा अभ्यास करणे.
३. अकरावीतील विज्ञान शाखेतील ग्रामीण विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक अभिवृत्ती व रसायनशास्त्र विषयातील शैक्षणिक संपादणूक यांचा अभ्यास करणे.

४. अकरावीतील विज्ञान शाखेतील ग्रामीण विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक अभिवृत्ती व भौतिकशास्त्र विषयातील शैक्षणिक संपादणूक यांचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष**

१. परिशिष्ट क्र.१९ वरुन असे दिसून येते की, विज्ञान शालेखतील अकरावीतील विद्याथ्यांची वैज्ञानिक अभिवृत्ती व वैज्ञानिक अभियोग्यता यातील सहसंबंध गुणक ०.२६ आहे. म्हणजे विज्ञान शाखेतील अकरावीत विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक अभिवृत्ती व वैज्ञानिक अभियोग्यता यामध्ये असणारा सहसंबंध धन स्वरुपाचा आहे व तो निश्चित असा आहे. परंतू तो अत्यंत अल्प असा आहे.

२. परिशिष्ट क्र.१९ वरुन असे दिसून येते की, विज्ञान शाखेतील अकरावीतील शहरी विद्यार्थ्यांची वैज्ञानिक अभिवृत्ती व वैज्ञानिक अभियोग्यता यातील सहसंबंध गुणक ०.३७ आहे म्हणजे विज्ञान शाखेतील अकरावीतील शहरी विद्यार्थ्यांमध्ये असणारा वैज्ञानिक अभिवृत्ती व वैज्ञानिक अभियोग्यता यामध्ये असणारा सहसंबंध धन स्वरुपाचा आहे. तो निश्चित असा आहे. परंतू अत्यंत अल्प असा आहे.

३. परिशिष्ट क्र. १९ वरुन असे दिसून येते की, विज्ञान शाखेतील अकरावीतील ग्रामीण विद्यार्थ्यांची वैज्ञानिक अभिवृत्ती व वैज्ञानिक अभियोग्यता यातील सहसंबंध गुणक ०.१९ आहे. म्हणजेच विज्ञान शाखेतील ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक अभिवृत्ती व वैज्ञानिक अभियोग्यता यामध्ये असणारा सहसंबंध धन स्वरुपाचा आहे तो अगदी कमी असल्याने दुर्लक्ष करण्याजोगा असा आहे.

**२.४.११ अंजुम आर., (२००९), A Study of Achievement, study habit and TV viewing behaviour of secondary school students of Aurangabad district in relation to mothers educational status, Ph.D., Dr.Babasaheb Ambedkar University, Aurangabad**

**उद्दिष्टे**

१. आईच्या शैक्षणिक स्तराचा अभ्यास.

२. मुलांचा टि.व्ही. विषयक वर्तनाचा अभ्यास.

३. मुलांची सवय आणि त्यांची सामाजिक संपादणूकीचा अभ्यास.

**निष्कर्ष**

१. शिक्षित व अशिक्षित आईच्या सवयीत सार्थ फरक आहे.

२. मुलांची सवय आणि सामाजिक संपादणूक यांच्यात सार्थ फरक नाही

३. मुलांची टि.व्ही. विषयक सवीयचा परिणाम मुलांच्या सामाजिक संपादणूकीवर होतो.

**२.४.१२ महेर बी.बी., (नोव्हेंबर २०१०), A Study of correlation between the attitude, job values and the personality traits of teacher educators in Marathwada region, Ph.D., Dr. Babasaheb Ambedkar University, Aurangabad**

**उद्दिष्टे**

१. शिक्षक प्रशिक्षणार्थीचे कल, व्यवसाय मूल्ये आणि व्यक्तिमत्वाचे गुणतत्त्व याचे वय, लिंग आणि शैक्षणिक पात्रता यांच्या आधारे मापण करणे.

२. कल, व्यवसाय मूल्ये आणि व्यक्तीमत्व गुणतत्वे यांच्यातील वय, लिंग, शैक्षणिक पात्रता आणि अनुभव यानुसार फरक शोधणे.

३. कल व्यवसाय मूल्ये आणि व्यक्तीमत्व गुणतत्वे यांच्यातील संबंधाचा शोध घेणे.

**निष्कर्ष**

१. मोठ्या प्रमाणात शिक्षक प्रशिक्षणार्थीचा कल व्यवसायाकडे आहे. शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांमध्ये व्यक्तीमत्वाची क्रियाशिलता, उत्साह अशा प्रकारचे गुणतत्वे आहेत.

२. कल आणि व्यवसाय मूल्यामध्ये लिंग, पात्रता आणि अनुभव यामध्ये फरक दिसून आला नाही परंतू वयामध्ये फरक दिसून आला.
३. मोठ्या प्रमाणात शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांमध्ये व्यवसाय मूल्ये कमी प्रमाणात आढळून आले.

**२.४.१३ खामकर स.ब., (डिसेंबर २०१०), A Study of the relationship between stress and academic achievement and the coping mechanisms adopted by socially disadvantaged children studying in X standard, Ph.D., Shivaji University, Kolhapur**

**उद्दिष्टे**

१. विविध प्रकारच्या जातींचा मुलांवर येणाऱ्या विविध प्रकारच्या ताणांचे सामाजिक दुष्परिणामांचा शोध.
२. विविध जातींच्या मुलांवर येणाऱ्या ताणाचा सामाजिक दुष्परिणामाचा तुलनात्मक अभ्यास.
३. मुलांवरील सामाजिक दुष्परिणामाचा शैक्षणिक संपादणूक आणि ताण यांच्यातील सहसंबंधांचा गुणात्मक अभ्यास करणे.

**निष्कर्ष**

१. अनुसूचित जातीतील मुलांमधील ताण इतर जातीतील मुलांपेक्षा जास्त आहे.
२. शैक्षणिक संपादणूक आणि ताण यांच्यात सार्थ सहसंबंध आहे.
३. सामाजिक आर्थिक दर्जा आणि ताण यांच्यामध्ये असार्थ फरक आहे.

**२.४.१४ मातने स.ब., (मे २००९), बार्शी तालुक्यातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी व सामाजीक - आर्थिक परिस्थिती यांचा परस्पर संबंध: एक अभ्यास, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**उद्दिष्टे**

१. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयीचे मापन करणे.
२. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची सामाजिक-आर्थिक परिस्थिती अभ्यासणे.
३. अभ्यास सवयी व सामाजिक आर्थिक परस्थिती यांच्यामधील परस्पर संबंध अभ्यासणे.

**निष्कर्ष**

१. चांगल्या अभ्यास सवयी असलेल्या विद्यार्थ्यांची उत्तम, असमाधानकारक व अति असमाधानकारक अभ्यास सवयी असलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा जास्त आहे.
२. विभक्त कुटुंबातील मुलांच्या अभ्यास सवयी संयुक्त कुटुंबातील मुलांच्या अभ्यास सवयीपेक्षा चांगल्या आहेत.
३. उत्तम सरासरी व असमाधानकारक अभ्यास सवयीमधील मुलांची संख्या ही मुलींपेक्षा जास्त आहे.

**२.४.१५ जाधव नि.द., (मे २०१४), माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांचा होणारा परिणाम, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**उद्दिष्टे**

१. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी शाळांमधून राबवल्या जाणाऱ्या अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांचा अभ्यास करणे.
२. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी शाळांमधून राबविल्या जाणाऱ्या अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांतील शिक्षकांच्या भूमिकेचा शोध घेणे.
३. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी कॅटेल यांची बालकांची व्यक्तिमत्व प्रश्नावलीनुसार अभ्यासानुवर्ती कार्यक्रम विकसीत करणे.

**निष्कर्ष**

१. इयत्ता ९ वी च्या वर्गात सर्वाधिक शिक्षक अभ्यासानुवर्ती कार्यक्रम आयोजित करीत होते.
२. सर्व शिक्षकांच्या मते अभ्यासानुवर्ती कार्यक्रमात विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प पध्दत, वक्तृत्व स्पर्धा, संगणक प्रशिक्षण, निबंध स्पर्धा हे कार्यक्रम उपयुक्त ठरतात.
३. अभ्यासानुवर्ती कार्यक्रमाच्या कार्यवाहीत शिक्षकांना विद्यार्थ्यांची सखोल माहिती मिळते.

**२.४.१६ Joymalya P., Saha. B., And Mondal B.C., (December, 2014), Adjustment of Secondary School students with Respect to Gender and Residence, American Journal of Educational Research**

**उद्दिष्टे**

१. कौटुंबिक समायोजन, शालेय समायोजन, समुह समायोजन, एकूण समायोजन यांचा लिंग आणि स्थानानुसार तुलनात्मक अभ्यास.
२. कौटूंबिक समायोजन, शालेय समायोजन आणि समुह समायोजनानुसार प्रतिसंवादांच्या परिणामाचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष**

१. कुटुंबामध्ये मुलगा आणि मुलगी यांना समान वागणूक द्यावी व घरामध्ये मुला-मुलींना बोलण्याचे स्वातंत्र्य द्यावे.
२. शालेय स्तरावर एन.एस.एस. किंवा एन.सी.सी. या सारख्या उपक्रमांचे आयोजन करावे. जेणेकरुन विद्यार्थ्यांना समायोजन साधता येईल.
३. स्वतःचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी व मानसिक समाधानासाठी विद्यार्थ्यांच्या भावना, विचार, मत शालेय प्रशासन अधिकाऱ्या समोर मांडण्याची परवानगी द्यावी.

**२.४.१७ Ranganathan, Namita (1988). The study attempts to understand the phenomenon of childrens stress. Ph.D., University of Pune.**

**उद्दिष्टे**

१. वर्तनाशी संबंधित ताणाचा अभ्यास करणे.

२. ताण आणि शैक्षणिक संपादन यांच्या मधील स्वभाव व त्याची विशालता यांच्या संबंधाचा अभ्यास करणे.

३. शाळेचा प्रकार, लिंग, वर्ग या परिवर्तकाचा परिस्थितीतील ताण आणि शैक्षणिक कार्य यावरील परिणामाचा अभ्यास करणे.

४. शालेय संघटनात्मक वातावरणाचा ताण आणि शैक्षणिक कार्य यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष**

१. ताणाशी संबंधित लक्षणे पुढील घटकाबाबतीत दिसतात मनोकारक लक्षणे, मानसिक लक्षणे, स्वप्रतिमा लक्षणे, अवधानातील लक्षणे संघर्ष व क्रोध

२. मुलींपेक्षा मुलांमध्ये ताण जास्त आढळून आला.

३. लिंगभेदानुसार मुलांपेक्षा मुलीमध्ये चिंता प्रकटीकरणाविषयी भीती मानस व शारीरिक प्रतिकिया

या विषयी शालेय चिंता जास्त दिसून आली. मात्र मुलांपेक्षा मुलीमध्ये आत्मविश्वासाचा अभाव मात्र कमी आढळला.

**२.४.१८ Arrora, R. K. (१९५१) Interactional effect of creativity and intelligence on emotional stability, personality adjustmentant, academic achievement, Ph.D., University of Pune,**

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. भावनिक स्थिरता, व्यक्तिमत्त्व समायोजन व शैक्षणिक संपादन यांच्यावर सृजनशीलता व बुद्धिमता यांच्या आंतरक्रियात्मक परिणामांचा शोध घेणे.

**निष्कर्ष**

१. उच्च सृजनशीलता व बुध्दिमत्ता असलेल्या गटाचे भावनिक स्थैर्य चांगले आढळले.
२. उच्च बुध्दिमत्तेच्या गटाने कमी बुध्दिमत्तेच्या गटापेक्षा चांगली कामगिरी दर्शविली.

**२.४.१९ जाधव, पद्मा (२००७). शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षकांकडून अपेक्षा : एक चिंतन पीएच. डी., बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.**

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. औरंगाबाद शहारातील विविध शाळांमधील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांच्या आपल्या शिक्षकांकडून असलेल्या अपेक्षांचा शोध घेणे.
२. विद्यार्थ्यांच्या शिक्षकांकडून असलेल्या अपेक्षांचा शोध घेऊन शिक्षकांच्या भूमिकेचा आढावा घेणे .

**निष्कर्ष**

१. दर्जेदार अध्ययन अध्यापनाबरोबर स्पर्धात्मक युगातील आव्हाने पेलण्यासाठी समर्थ बनविण्याची अपेक्षा विद्यार्थी बाळगतात .
२. विद्यार्थ्यांचे भावविश्व फुलविण्यासाठी शिक्षकाने सहाय्य करावे.
३. विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजांची पूर्तता, प्रेरणा, मार्गदर्शन आणि आत्मविश्वास निर्माण करण्याची जवाबदारी शिक्षकांनी पार पाडावी.

**२.४.२० महाजन शशिकला (२०१०). माध्यमिक स्तरावरील एक अपत्य कुटुंबातील मुलामुलींच्या भावनिक परिपक्वतेचा तुलनात्मक अभ्यास. पीएच. डी., फैजपूर, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव,**

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. भावनिक परिपक्वता कसोटीच्या साहाय्याने एक अपत्य कुटुंबातील मुलांच्या भावनिक परिपक्वता अभ्यासणे.

२. भावनिक अपरिपक्क मुलांच्या भावनिक परिपक्कता विकासासाठी उपाययोजना सुचविणे.

**निष्कर्ष**

१. एक अपत्य असणा-या कुटुंबातील मुले व एक अपत्य असणा-या कुटुंबातील मुली यांच्या भावनिक परिपक्कवतेत सार्थ फरक पडत नाही.

**२.४.२१ देशमुख सुषमा (२००७). उच्च माध्यमिक स्तरातील भावनिक आपत्तीग्रस्त विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर मार्गदर्शन व समुपदेशनाच्या परिणामकारकतेचा अभ्यास, पीएच.डी., पुणे विद्यापीठ, शिक्षणशास्त्र विभाग, पुणे.**

**संशोधनाची उद्दिष्टे -**

१. भावनिक आपत्तीग्रस्त आपत्तीग्रस्ताची कारणांद्वारे विद्यार्थी ओळखणे.

२. भावनिक आपत्तीग्रस्त विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती अभ्यासणे.

३. भावनिक आपत्तीग्रस्त विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर मार्गदर्शन व समुपदेशनाचा परिणाम अभ्यासणे.

**निष्कर्ष -**

१. भावनिक आपत्तीची तीव्रता ही विद्यार्थी पालक यांचे संबंध तसेच शालेय व कौंटुंबिक वातावरण या घटकावर कमी जास्त असते.

२. भावनिक आपत्ती मार्गदर्शन समुपदेशनाने संपूर्णपणे नाहिशी करता येते. आपत्ती ओढावणारच नाही यासाठी कृती कार्यक्रम उपयोगी पडतो.

३. शैक्षणिक प्रगती व व्यक्तिमत्व विकासावर मार्गदर्शन व समुपदेशनाचा सकारात्मक परिणाम होतो.

**हिंदी भाषेतील पी.एचडी. स्तरावरील संबंधित संशोधनाचा आढावा**

**२.४.२२ कुमार बसंत (२००८). किशोरावस्था की लङकियों के शरीरिक और मानसिक परिवर्तन तथा समायोजन और व्यक्तित्व के**

**संबंधो का अध्ययन, पीएच. डी., शिक्षा विभाग, गुरू घासीदास केंद्रीय विश्व विद्यालय बिलासपूर, छात्तिसगड.**

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. किशोरावस्थेतील मुलींच्या मानसिक परिवर्तनाच्या व्यक्तिमत्व पैलूतील अंतर्मुखता आणि बहिर्मुखता यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

२. किशोरावस्थेतील मुलींच्या मानसिक परिवर्तनाचा व्यक्तीमत्वातील पैलू आत्मसंकल्पना स्वतंत्रता स्वभाव समायोजन आणि उत्तेजन यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

३. किशोरावस्थेतील मुलींच्या मानसिक परिवर्तनाचा समायोजनावरील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष**

१. किशोरावस्थेतील मुलींच्या मानसिक परिवर्तनाचा व्यक्तिमत्व पैलूतील अंतर्मुखता आणि बहिर्मुखता यांच्यात सार्थकता सहसंबंध आढळून येत नाही.

२. किशोरावस्थेतील पैलू आत्मसंकल्पना, स्वातंत्रता, स्वभाव समायोजन आणि उत्तेजना यांच्यात सार्थक स्तरावर सहसंबंध आढळून येत नाही.

३. किशोराअवस्थेतील मुलींच्या मानसिक परिवर्तनाचा समायोजनावर सार्थ परिणाम आढळून येत नाही.

**२.४.२३ पाढी सम्बितकुमार (२०१०). पूर्व माध्यमिक विद्यालय के विद्यार्थीयो के मानसिक अवसाद एवं शालेय वातावरण का अध्ययन |, पीएच. डी., छत्तिसगड विद्यापीठ बिलासपूर, छत्तिसगड**

**संशोधनाची उद्दिष्टे-**

१. विविध पूर्व माध्यमिक विद्यालयांच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक विपम समायोजनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

२. विविध पूर्व माध्यमिक विद्यालयातील शालेय वातावरणाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. पूर्व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मानसिक विषम समायोजन व शालेय वातावरण यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष**

१. शासकीय पूर्व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मानसिक विषम समायोजनामध्ये सार्थ अंतर आहे.

२. विद्यार्थ्यांच्या मानसिक विपम समायोजन व शालेय वातावरणाच्या मध्ये सहसंबंध निर्माण होत नाही.

**२.५ संशोधनाचे वेगळेपण**

वरील संशोधन विषयाशी संबंधित पुस्तकांमधून, संकेतस्थळावरून, विविध वर्तमानपत्रात प्रसिद्ध लेखांवरून, विविध साप्ताहिक व मासिकांमधून, विविध आयएसबीएन जर्नल मधील प्रकाशित रिसर्च पेपर द्वारे, तसेच विविध विद्यापीठांमध्ये सादर करण्यात आलेल्या संशोधनांचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले की, इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शिक्षणाचे माध्यम निवडताना पालकांमधील जागरूकतेचा अभ्यास, इंग्रजी माध्यमाच्या शाळेमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या भाषिक अडथळयामुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा शोध याकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते. शासकीय अनुदानित मराठी माध्यमांच्या शाळेत प्रवेश न घेण्यामागील कारणांचा शोध याकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते.

१. प्रस्तुत संशोधनामध्ये इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांची मानसिकता, शैक्षणिक विकास आणि पालकांची जागरूकता यांचा एकत्रित अभ्यास प्रथमच करण्यात आला आहे.

२. या संशोधनामध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच मराठी माध्यमातील मुख्याध्यापक व शिक्षक यांचा समावेश करून बहुआयामी दृष्टीकोन प्राप्त करण्यात आला आहे.

३. अभ्यासामध्ये शहरी व ग्रामीण भागातील इंग्रजी माध्यम शाळांचा तुलनात्मक विचार करण्यात आला आहे, ज्यामुळे सामाजिक-सांस्कृतिक फरक स्पष्टपणे जाणवतात.
४. या संशोधनातून पालकांच्या जागरूकतेचा विद्यार्थ्यांच्या मानसिकता व शैक्षणिक विकासावर होणारा परिणाम अभ्यासला गेला आहे, जो पूर्वीच्या संशोधनांमध्ये स्वतंत्ररीत्या आढळत नाही.
५. संशोधनामध्ये शैक्षणिक विकास व मानसिकतेशी निगडित बाह्य चलांचा विचार करून प्रत्यक्ष शैक्षणिक परिस्थितीचे वास्तव दर्शन घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.
६. या अभ्यासाचे निष्कर्ष इंग्रजी माध्यम शाळांच्या धोरणकर्त्यांना, पालकांना व शिक्षकांना शैक्षणिक गुणवत्तावर्धनासाठी मार्गदर्शक ठरतील.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा व कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास करणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शिक्षणाचे माध्यम निवडताना पालकांमध्ये जागरूकतेचा अभ्यास करणे, इंग्रजी माध्यमाच्या शाळेमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या भाषिक अडथळयामुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेणे, शासकीय अनुदानित मराठी माध्यमांच्या शाळेत प्रवेश न घेण्यामागील कारणांचा शोध घेऊन इंग्रजी माध्यमाच्या शाळेमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या भाषिक अडथळयांमुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्या विषयी संशोधिकेने "इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता आणि त्यांच्या शैक्षणिक विकासाबाबत बालकांच्या जागरूकतेचा चिकित्सक अभ्यास करणे" या विषयाकडे दुर्लक्ष होतांना दिसते म्हणून संशोधन विषयाची निवड हे संशोधनाचे वेगळेपण आहे.

## २.६ समारोप

कोणत्याही प्रकारचे संशोधनकार्याची सुरुवात करण्यापूर्वी झालेल्या संशोधनाचा अभ्यास करणे जरुरी असते कारण त्यामुळे संशोधनाची पुनरावृत्ती टाळता येऊन संशोधनातील त्रुटी दूर करता येतातच शिवाय संशोधनाला नवीन दिशा प्राप्त होते. हे लक्षात घेऊन या प्रकरणांमध्ये संशोधन विषयाशी संबंधित पुस्तकांमधून, संकेतस्थळावरून, विविध वर्तमानपत्रात प्रसिद्ध लेखांवरून, विविध साप्ताहिक व मासिकांमधून, विविध आयएसबीएन जर्नल मधील प्रकाशित रिसर्च पेपर द्वारे, तसेच विविध विद्यापीठांमध्ये सादर करण्यात आलेल्या संशोधनांचा आढावा घेतलेला आहे.

पुढील प्रकरण संशोधनाची कार्यपद्धती या अंतर्गत संशोधनाचा अर्थ, हेतू, संशोधनाच्या पद्धती, संशोधनाची साधने तंत्रे, नमुना निवड, संख्याशास्त्रीय साधने याविषयीची सविस्तर मांडणी करण्यात आलेली आहे.

***

# प्रकरण ३
# संशोधन कार्यपद्धती

## ३.१ प्रास्ताविक

आधुनिक काळात ज्ञानाचे क्षेत्र अत्यंत जलद गतीने विस्तारत आहे. भौतिक आणि सामाजिक क्षेत्रात ज्ञानाचा विलक्षण विस्तार झाला आहे. सर्वच क्षेत्रात नवनवीन संशोधन होत आहे. या संशोधनातून नवीन ज्ञान प्राप्त होत आहे. शैक्षणिक क्षेत्रात सतत संशोधन होत आहे. भौतिक प्रगतीबरोबरच समाजाची प्रगती झाली आहे. त्यामुळे नवनवीन समस्या शिक्षण क्षेत्रात निर्माण झाल्या आहेत. शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या समस्यांचे वस्तुनिष्ठ अध्ययन करुन त्याचे निराकरणाचे उपाय शोधणे अनिवार्य आहे. शिक्षणाचा केंद्रबिंदू असलेला विद्यार्थी, त्याची मानसिकता, बौद्धिक विकास, अवधान व ग्रहणक्षमता यांचा संबंध, शिकण्याच्या प्रक्रिया अध्ययनाचे नियम इत्यादीबाबतचे ज्ञान हे संशोधनानेच प्राप्त झाले आहे.

दैनंदिन जीवनात येणाऱ्या भौतिक गरजांच्या अडचणी सुलभतेने सोडविण्यासाठी व आपले जीवन अधिक फलदायी व आनंदी करण्यासाठी मनुष्य हा सतत प्रयत्नशील असतो. जीवनात आलेली समस्या सोडवितांना आपण उलट-सुलट विचार करुन विशिष्ट निर्णयात येतो व विचारपूर्वक घेतलेला निर्णय जर योग्य उपयुक्त व विश्वसनिय असेल तर आपले जीवन यशस्वी व फलदायी होते. या विचारातून आपणास नवे ज्ञानही प्राप्त होते. समस्या सोडविण्यासाठी केलेली विचार प्रक्रिया म्हणजे संशोधन होय.

थोडक्यात वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी एखाद्या विषयाच्या बारकाईने केलेला अभ्यास किंवा वैज्ञानिक चिकित्सा म्हणजे संशोधन होय.

## ३.२ संशोधनाचा अर्थ

संशोधन खालील गोष्टी संदर्भित करतो.

- ज्ञानाचा शोध
- विशिष्ट्य विषयावरील योग्य माहितीसाठी वैज्ञानिक आणि पद्धतशीर शोध संशोधन वैज्ञानिक तपासणीची कला आहे.
- संशोधन हे कुठल्याही ज्ञानशाखेतील घटनांची/वस्तुस्थितीची केलेली काळजीपूर्वक चौकशी विशेषत: शोध आहे.
- रेडमन आणि मेरी यांच्या म्हणण्याप्रमाणे, "संशोधन ज्ञानप्राप्तीचा पद्धतशीर प्रयत्न आहे."
- संशोधन ही ज्ञाताकडून अज्ञाताकडील चळवळ आहे.
- शोधाच्या दिशेने होणारा प्रवास म्हणजे संशोधन
- **क्लिफार्ड यांच्या मते**, संशोधनामध्ये परिभाषित आणि पुर्नपरिभाषित समस्या, तयार गृहीतके सुचविलेले उपाय, जमा केलेली मूल्यमापन, माहिती, कपात केलेली माहिती, गृहीतके निर्माण करण्यासाठी केलेले काळजीपूर्वक मूल्यमापन यांचा समावेश होतो.
- **स्टेसिंजर आणि स्टीफन्सन यांच्या मते**, "ज्ञान हे योग्य त्या सिद्धांतावर आधारीत आहे का हे पडताळून पाहण्यासाठी ते ज्ञान सामान्यीकरणातून तपासणी, दुरुस्तीच्या हेतूसाठी संकल्पना, प्रतिके हाताळणे म्हणजे संशोधन."
- आपल्याशी संबंधीत किंवा आपल्याला आवडणाऱ्या अपूर्व गोष्ट समजून घेण्यासाठी माहिती गोळा करून तिचे विश्लेषण करण्याची पद्धतशीर प्रक्रिया म्हणजे संशोधन.
- नविन ज्ञानप्राप्त करण्यासाठी केलेला सुव्यवस्थित प्रयत्न म्हणजे संशोधन होय.
- वस्तूस्थिती जाणून घेण्यासाठी एखाद्या विषयाचा बारकाईने केलेला समिक्षात्मक अभ्यास किंवा वैज्ञानिक चिकित्सा म्हणजे संशोधन होय.

## ३.३ शैक्षणिक संशोधन

शिक्षणाचे उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी या क्षेत्रात आलेल्या समस्यांचे विश्लेषण करुन त्याच्या निराकरणाचे उपाय शोधने आवश्यक असते. शिक्षण क्षेत्रातील विविध पैलूंशी संबंधित सुधारणेच्या कामी आवश्यक नियम उपयुक्त पद्धती आणि तत्त्वांचा शोध घेणे हेच शैक्षणिक संशोधनाचे प्रमुख ध्येय आहे. आपल्या देशातील शैक्षणिक गरजा कोणत्या, उद्दिष्ट्ये कोणती व ती साध्य कशा कराव्यात याचे ज्ञान प्राप्त करणे आवश्यक आहे व ते शिक्षण क्षेत्रात केल्या जाणाऱ्या संशोधनातूनच प्राप्त होते. असे ज्ञान मिळविण्याच्या पद्धतीलाच शैक्षणिक संशोधन म्हटल्या जाते.

मूल्यमापन, सूक्ष्म-अध्यापन, अभिक्रमित अध्ययन, अध्यापनाची प्रतिमाने, प्रणाली उपागम इ. शिक्षणक्षेत्रातील विविध पद्धती कितीही प्रभावी असल्या तरी त्याचे उगमस्थान हे पाश्चिमात्य राष्ट्रातील शिक्षणतज्ज्ञांना तत्कालीन परिस्थितीत भेडसावणाऱ्या विविध शैक्षणिक समस्यांत आहे. या व यांसारख्या सर्व पद्धती जशाच्या तशा आपल्या देशात राबविल्या तर त्या पूर्ण उपयोगी पडतीलच असे नाही. यासाठी आपल्या देशाच्या गरजा कोणत्या, उद्दिष्टे कोणती, समस्या कोणत्या व शिक्षणपद्धतीत बदल कसा करावा लागेल या प्रश्नांची उत्तरे माहीत असणे आवश्यक आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे शिक्षणक्षेत्रात सतत केल्या जाणाऱ्या संशोधनानेच माहीत होणार आहेत. शैक्षणिक संशोधनातून मिळालेल्या निष्कर्षांच्या आधारे केलेले शिक्षणविषयक बदलच अधिक यशस्वी ठरतात. वरील विवेचनातून भारतासारख्या विकसनशील व प्रचंड मानवी संपत्ती असलेल्या देशाला शैक्षणिक संशोधनाची आवश्यकता किती अधिक प्रमाणात आहे हे सिद्ध होते.

**३.३.१ व्याख्या –**

"Educational is that activity which is directed towards development of a science of behaviour in educational situations. The ultimate aim of such a science is to provide knowledge that will permit he educator to achieve his goals by the most effective methods.

**Robert M. W. Travers**

"नियोजनपूर्वक आणि पद्धतशीरपणे प्राप्त केलेल्या माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन करून समस्यांची विश्वासार्ह उत्तरे शोधण्याची प्रक्रिया."

**- मौले**

"शैक्षणिक संशोधन म्हणजे अशी कृती की जी शैक्षणिक परिस्थितीतील वर्तन विज्ञानाच्या विकासाचे दिशेने गतिमान झालेले असते. अशा विज्ञानाचा अंतीम उद्देश शिक्षकांना माहिती पुरविणे आहे."

**जॉन**

### ३.३.२ शैक्षणिक संशोधनाचे महत्त्व

संशोधन हा विषय फक्त विज्ञानविषयक संशोधनापुरता मर्यादित आहे, असा अनेकांचा समज अथवा गैरसमज असतो. याचे मुख्य कारण म्हणजे संशोधनक्षेत्रात अंतराळ विज्ञान, वैदयकीय संशोधन, पर्यावरणीय संशोधन व त्याच्याशी संबंधित पुरस्कार यांची चर्चा जास्त होते. शांततेच्या नोबेल पुरस्काराची चर्चा तर विषयांच्या नोबेल पुरस्कारांपेक्षा जास्त होत असते.

खरेतर शिक्षण ही सर्व विद्याशाखांची गंगोत्री असते. शिक्षणाच्या गुणवत्तेवर आणि दर्जावर इतर शाखांची गुणवत्ता अवलंबून असते; पण शिक्षण, शिक्षक आणि शिक्षणपद्धती यांनी मात्र शैक्षणिक संशोधनाला म्हणावे तसे महत्त्व दिले आहे असे म्हणवत नाही. एखादी आजारी व्यक्ती दवाखान्यात जाते, तेव्हा वैदय त्या व्यक्तीच्या आजाराचे आधी अचूकनिदान करतो. त्यासाठी लक्षणे, तपासणी, चाचण्या असे विविध मार्ग अवलंबून त्या रोगाचे मूळ कोणते हे जाणून घेतो आणि त्यांनतर योग्य ते रोग उपचार सुरू करतो. शिक्षणातसुद्धा हे घडायला हवे, तरच दुखणे समूळ नष्ट होईल. शैक्षणिक आरोग्य सुधारेल. शैक्षणिक संशोधन म्हणजे शिक्षण आणि शिक्षण प्रक्रियेशी संबंधित असलेल्या समस्या, प्रश्न आणि

कल्पनांचा शास्त्रय पद्धतीने अभ्यास करणे, माहिती गोळा करणे, विश्लेषण करणे आणि निष्कर्ष काढणे समाविष्ट होते.

शिक्षकाने केलेले संशोधन हे त्या एका विदयार्थ्याच्या प्रगतीपुरते मर्यादित न राहता देशभरात त्या प्रश्नाशी संबंधित विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांना मार्गदर्शक ठरू शकते. गणित, इंग्रजी, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, भाषा इतकेच नव्हे तर अगदी विदयार्थ्यांच्या भावनिक, मानसिक प्रश्नांची संशोधनाच्या माध्यमातून सहज उकल करता येते. एखादे मूल अचानक अभ्यासात मागे पडू लागले अथवा त्यांच्यातील वर्तन बदल लक्षात आले तर योग्य मार्गाने जाऊन त्याची व त्याच्यासारख्या अनेक विदयार्थ्यांची सोडवणूक करता येते. संशोधन एका अथवा अनेकांच्या समस्यांचे एकाचवेळी समाधान करत असल्याने त्याची उपयुक्तता दीर्घकालीन असते. एका शिक्षकाचे संशोधन वेगवेगळया स्थळी, वेगवेगळया काळातसुद्धा उपयुक्त ठरत असल्याने त्याचे महत्त्व वादातीत आहे.

शैक्षणिक संशोधन अनेक प्रकारांचे असू शकते, जसे की मूलभूत संशोधन, उपयोजित संशोधन आणि कृती संशोधन. समस्येची जाणीव, निरीक्षण, उपाययोजना, कार्यपद्धती, वस्तुनिष्ठ नोंदी आणि फलिते या पायऱ्यांमधून जाऊन त्याने प्रश्नांची तड लावायला हवी, तरच विदयार्थी आणि पालक, शिक्षक आणि शिक्षण, शिक्षण पद्धती आणि समाज यांच्यापुढील अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल. शिक्षण संशोधन हे शैक्षणिक धोरणे, उदिदष्ट्ये आणि निष्पत्ती यावर, परिणाम करते. शिक्षणाची गुणवत्ता आणि दर्जा सुधारेल तेव्हाच सामाजिक प्रगतीचा वेग वाढेल.

### ३.३.३ संशोधनाचे प्रकार

| **मूलभूत संशोधन (Fundamental Research)** | **उपयोजित संशोधन (Applied Research)** | **कृती संशोधन (Action Research)** |
|---|---|---|
| सिद्धात निर्मितीसाठी, | प्रात्यक्षिक समस्येची | शास्त्रीय पद्धतीच्या |

| | | |
|---|---|---|
| विस्तारासाठी किंवा मूल्यमापनासाठी मूलभूत माहिती गोळा करून तिचा उपयोग करणे म्हणजे मूलभूत संशोधन होय. | तात्काळ सोडवणूक करणे यालाच उपयोजित संशोधन असे म्हणतात. | उपयोगाद्वारे स्थानिक, प्रात्यक्षिक समस्येची सोडवणूक करण्याचा व्यावसायिकांचा प्रयत्न म्हणजे कृती संशोधन होय. |
| सिद्धांतभिमुख असते. | हे संशोधन व्यवहाराभिमुख असते. | स्वतःच्या समस्येची सोडवूणक करण्यासाठी सदर संशोधन केले जाते. उदा. शिक्षकाला वर्गात येणारी समस्या |
| नवीन ज्ञान प्राप्ती हे प्राथमिक उद्दिष्ट नवीन ज्ञान प्राप्त तर उपयोजन हे दुय्यम उद्दिष्ट असते. | या संशोधनाचे प्राथमिक उद्दिष्ट हे उपयोजन आणि दुय्यम उद्दिष्ट ज्ञान प्राप्ती असते. | समस्या दूर करण्यासाठी उपक्रमाची अमलबजावणी करणे. |
| कल्पना शक्तीतून समस्या निर्माण होते. | वास्तव परिस्थितीतून समस्या निर्मिती होते. | स्व समस्येतून समस्या निर्मिती होते. |
| संशोधन हे सर्वव्यापी असते. | सदर संशोधनात निष्कर्षांचे सामान्यीकरण ठराविक मर्यादिपुरतेच केलेले असते. | स्थानिक समस्या सोडविण्यापुरतेच असते. |

### ३.३.४ शैक्षणिक संशोधन पद्धती

संशोधनाची उद्दिष्ट्ये परिकल्पना, माहिती संकलनाचे तंत्र नियंत्रण तंत्र संसाधने क्षेत्र इत्यादी अनेक प्रकारच्या आधारवर शैक्षणिक संशोधनपद्धतीचे वर्गीकरण करण्यात येते. शैक्षणिक संशोधन पद्धतीचे वर्गीकरण खालील तीन गटात केले जाते.

१. ऐतिहासिक संशोधन पद्धती
२. प्रायोगिक संशोधन पद्धती
३. सर्वेक्षण संशोधन पद्धती

**प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

### ३.४ सर्वेक्षण संशोधन पद्धती

शैक्षणिक संशोधनाची एक प्रमुख पद्धती म्हणजे सर्वेक्षण पद्धती होय. शैक्षणिक संशोधनात या पद्धतीचा विशेष प्रमाणात उपयोग करुन घेण्यात आला आहे. असे असले तरीही तिच्या नावाच्या बाबतीत एकमत नाही. सर्वेक्षण Survey आदर्शमुलक सर्वेक्षण (Normative Survey) स्तर (Status) आणि वर्णनात्मक पद्धती (Descriptive Method) अशा विविध नावांनी ती प्रचलित आहेत. शब्दांच्या छटा भिन्न असल्या तरी त्या सर्वातून एक आशय स्पष्ट आहे की, अभ्यास वस्तुंची वर्तमान स्थिती कशी आहे हे पाहण्याकरीता वापरली जाणारी ती पद्धती आहे. म्हणजेच या पद्धतीमध्ये वर्तमानावर भर असतो. समस्या निराकरणाकरिता कोणती स्थिती अपेक्षीत आहे हे सर्वेक्षणाच्या आधारे कळते.

#### ३.४.१ सर्वेक्षणाच्या व्याख्या


वेबस्टरच्या विश्वकोशातील व्याख्या – "अचूक माहिती देणारी चिकित्सक तपासणी म्हणजे सर्वेक्षण होय."

"विशिष्ट ठिकाणच्या परिस्थितीचा केलेला अभ्यास म्हणजे सर्वेक्षण असे म्हणतात."

**इ.एस. बोगार्डस** यांच्या मते, "लोकांची कामाची व जीवन जगण्याची स्थिती या विषयी म्हणजे एखाद्या समाजातील लोकांविषयी जमविलेली माहिती म्हणजे सामाजिक सर्वेक्षण होय."


#### ३.४.२ सर्वेक्षणाची उद्दिष्ट्ये

**आकृती क्र. १**




### ३.४.३ सर्वेक्षणाचा अभ्यासविषय

**आकृती क्र. २**




### ३.४.४ सर्वेक्षणाचे स्वरूप

सामाजिक सर्वेक्षणास सामाजिक विज्ञानाच्या अध्ययनाची एक पद्धती मानली जाते. सामाजिक सर्वेक्षणाद्वारे केवळ सामाजिक समस्यांचे अध्ययन केले जात नाही तर सामाजिक समस्यांचे निराकरण करणे हा देखील सर्वेक्षणाचा उद्देश आहे. सामाजिक समस्यांचा शोध घेणे आणि त्यांच्या निराकरणाचे प्रयत्न करणे ह्या उद्देशाने निर्माण झालेली पद्धती म्हणजे सर्वेक्षण पद्धती होय. याचे निष्कर्ष हे वास्तविक निरीक्षण व परिक्षणावर आधारीत असतात. सर्वेक्षणातील निष्कर्ष सर्व दृष्टीकोनातून योग्य असतात.

सामाजिक संशोधन सर्वप्रथम फ्रेडरिक ले-प्ले या शास्त्रज्ञाने उपयोगात आणली. जॉन हॉवर्ड, फ्रेडरिक ले-प्ले आणि चार्लस वुथ हे सुरूवातीचे महत्वाचे सर्वेक्षणकर्ते होय. हॉवर्ड हे प्रसिद्ध लोककल्याणवादी, ले-प्ले हे अर्थशास्त्राचे विशेष ज्ञान असणारे, चार्लस हे वैज्ञानिक संख्याशास्त्रज्ञ होते. सामाजिक सर्वेक्षण व सुधारणा यांचा दृढ परस्पर संबंध असतो. सामाजिक सर्वेक्षणात सामाजिक घटनाचे अध्ययन, समस्याचे अध्ययन यांचा अभ्यास करण्यासाठी वापरतात. सामाजिक सर्वेक्षणाचा वापर समाज प्रगतीसाठी केला जातो.


### ३.४.५ सामाजिक सर्वेक्षणाचे प्रकार

**आकृती क्र. ३**



### ३.४.६ महत्त्वाचे सर्वेक्षण प्रकार

**आकृती क्र. ४**




### ३.४.७ प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पद्धती निवडण्याची कारणे

प्रस्तुत सर्वेक्षण हे वर्तमान काळाशी संबंधित असल्यामुळे, सद्यस्थितीचे वर्णन व लोकांची मते जाणून घेण्याकरिता, समस्या आणि समस्येचे कारण यांचा सहसंबंध दाखविण्याकरिता सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

**विवक्षित अध्ययन :** सर्वेक्षण करताना विवक्षित स्थान वा भौगोलिक क्षेत्र निश्चित करावे लागते. एखादा प्रश्न वा समस्या समजून घेण्यासाठी आणि वास्तववादी तथ्ये शोधून काढण्यासाठी संशोधकाला स्थान मर्यादा निश्चित करावी लागते.

**प्रत्यक्ष अध्ययन :** सर्वेक्षण हे प्रत्यक्ष स्वरुपातून तथ्ये संकलन करण्याचे एक तंत्र आहे. प्रत्यक्ष मुलाखत, निरीक्षण सूचीचा उपयोग करुन विविध लोकांची माहिती संकलित केली जाते. मूर्त आणि प्रत्यक्ष असे सामाजिक जीवनाचे एक अध्ययन आहे. येथे पुरावा असतो तो प्रत्यक्ष स्वरुपाचा.

**वर्तमान परिस्थिती** : सर्वेक्षण ही तथ्ये संकलित करण्याची अशी एक पद्धत आहे की ज्यामुळे प्रत्यक्ष वा वर्तमानकालीन परिस्थितीचे निरीक्षण व विवेचन करण्याची संशोधकाला मुभा असते. जे दिसते त्याचे निरीक्षण आणि जे दिसत नाही पण अंधुक कल्पना येते अशा बाबींची सर्वेक्षण करणाऱ्या व्यक्तीला आमने-सामने विचारण्याची माहिती असते.

**अभ्यास विषय :** सर्वेक्षणात प्रामुख्याने लोकसंख्या, सामाजिक परिवर्तन, जनमत व अभिवृत्ती आणि तद्वतच लोकांचे वर्तन व क्रिया या बाबींचा अभ्यास केला जातो. एवढेच नाही तर आरोग्यविषयक आणि विघटनात्मक समस्यांचे सुद्धा निरीक्षण आणि परीक्षण केले जाते. दारिद्य्र, बेकारी, वेश्या व्यवसाय, गुन्हेगारी यासारख्या विविध समस्यांचा अभ्यास सर्वेक्षण तंत्राद्वारे केला जात असतो.

**तुलनात्मक अभ्यास :** विविध जाती, धर्म वा व्यावसायिक लोकांच्या परस्परसंबंध आणि परिस्थितीचे तुलनात्मक अध्ययन सामाजिक सर्वेक्षण पद्धतीद्वारे केले जाते. व्यक्तीचा संबंध अनेकविध प्रकारचा असतो. तेव्हा व्यक्ती घटक प्रमुख समजून तिची प्रत्यक्ष माहिती संकलित करताना तिच्या समाजजीवनातील विविध संबंधांचे बारकावे सर्वेक्षणाद्वारे तपासले जातात.

**वस्तुनिष्ठता :** प्रत्यक्ष पुरावा हे या पद्धतीचे खास वैशिष्ट्य आहे. डोळयांनी निरीक्षण करणे आणि तोंडाने अपेक्षित माहिती विचारुन प्रश्नसूचीची पूर्तता करणे. संशोधकाकडे प्रमुख पुरावा असल्यामुळे जी माहिती मिळते, ती अत्यंत वस्तुनिष्ठ आणि तटस्थ स्वरुपाची असते.

**उपाय योजनात्मक स्वरुप** : ज्या विषयाचे सर्वेक्षण केले जाते आणि त्यातून जी काही तथ्ये संकलित केली जातात, त्या तथ्यांच्या निष्कर्षाच्या आधारे निर्माण झालेल्या प्रश्नावर उपाय सुचविणारी ही एकमेव पद्धत समजली जाते. एखादी समस्या का निर्माण झाली याची माहिती संकलित केल्यानंतर निष्कर्षाच्या आधारावर उपाय सुचविले की त्या समस्यांची तीव्रता कमी होत असते.

**सुसंगत वर्गीकरण :** सर्वेक्षण पद्धतीत प्रामुख्याने तथ्ये गोळा करण्यावर भर दिला जातो. प्रत्यक्ष माहितीच्या आधारावरुन ही तथ्ये गोळा केली जातात. गोळा वा संकलित केलेल्या तथ्यांचा व्यवस्थित क्रम लावून त्यांना एकत्रित करण्याची प्रक्रिया सर्वेक्षणाद्वारे केली जाते हे काम अवघड नसले तरी खूप सोपे आणि सरळ आहे असेही नाही. सुसंगत वर्गीकरणामुळे समस्यांची तीव्रता लक्षात येण्यास मदत होते.

**सामूहिक कार्य :** सर्वेक्षण हे असे तंत्र आहे की त्यात एका व्यक्तीने सर्वेक्षण करणे शक्य नाही. अनेक व्यक्तींच्या साहाय्याने सर्वेक्षण केले जाते. कारण सर्वेक्षणाचा अभ्यासविषय हा लोकसंख्या आणि भौगोलिक दृष्टीने व्यापक आणि विस्तृत असतो.

सर्वेक्षण पद्धतीत समस्या आणि समस्येचे कारण यांचा सहसंबंध दाखविण्यात येतो. यात शालेय सर्वेक्षणाला महत्त्व देण्यात येते. शिक्षणाच्या विविध स्तरांचा विचार करून त्यात शाळेशी संबंधित घटकांची संख्या अधिक असल्याने त्यास शालेय सर्वेक्षण असे म्हणतात .

या प्रकारचे संशोधन सदय:स्थितीचे वर्णन करते आणि सदय:स्थिती स्पष्ट करते. वर्तमान असलेले संबंध, प्रचलित परिपाठ, दिसून येणा-या निष्ठा, दृष्टिकोन आणि अभिवृत्ती सुरू असलेल्या प्रक्रिया जाणवणारे परिणाम विकसित होत असलेले विचार प्रवाह यांच्याशी ते संबंधित असते. त्यात मापन वर्गीकरण, अर्थनिर्वचन आणि मूल्यांकन यांच्या आधारे वर्णित विषयाचे स्पष्टीकरण तुलना व सार्थकता असते.

### ३.४.७.१ सर्वेक्षणाचा अभ्यासविषय

**लोकसंख्या :** सामाजिक सर्वेक्षणात लोकसंख्येचा अभ्यास केला जातो. यामध्ये लोकसंख्येचा वैज्ञानिकदृष्टीने अभ्यास करणाऱ्या लोकविज्ञानाची मदत घेतली जाते. लोकसंख्येची माहिती, लोकसंख्येचे परिणाम, स्वरुप, प्रदेशवार स्थिती, कुटुंबसंस्था, त्यांची रचना इत्यादींचा विचार केला जातो.

**सामाजिक पर्यावरण :** मानवी जीवनावर परिणाम करणारा एक महत्त्वाचा घटक म्हणजे सामाजिक पर्यावरण होय. लोक व मानवनिर्मित वस्तू यांचा सामाजिक पर्यावरणात समावेश होतो. मनुष्य मूर्त व अमूर्त अशा दोन्ही प्रकारच्या बाबी निर्माण करीत असतो. म्हणून यामध्ये घरे-दारे, कपडा-लत्ता, यंत्र - सामुग्री, अन्न-धान्य इत्यादी भौतिक वस्तूंबरोबरच रीतिरिवाज, प्रथा, परंपरा,

रुढी, विचार, नीती-कल्पना, धर्म, तत्वज्ञान, राज्यसंस्था, अर्थव्यवस्था आदी अभौतिक गोष्टींचा समावेश या घटकांचा अभ्यास म्हणजे लोक कसे जीवन जगत असतात याचेच विवरण होय.

**लोकांचे वर्तन व क्रिया :** सामाजिक सर्वेक्षणाचा वापर लोकांचे वर्तन व कृती आजमावण्यासाठी केलाजातो. लोकांची कृती व वर्तन यांचा अभ्यास समाजजीवन समजून घेण्याच्या दृष्टीने अत्यंत जरुरीचा असतो. त्यांच्या आर्थिक क्रियांचा म्हणजेच व्यवसायाचा अभ्यास सामाजिक पर्यावरणात केला जातो. पण लोकांना मिळणारा फावला वेळ, त्यांचे छंद, आवडी-निवडी, फिरण्याच्या सवयी, रेडिओ, टेलिव्हिजन पाहणे यासंबंधीची माहिती लोकजीवन अभ्यासताना असावी लागते.

**लोकांची मते व अभिवृत्ती** : एखादी घटना, व्यक्ती इत्यादींबद्दल लोकांची मते व त्यासंबंधित त्यांच्या प्रवृत्ती कोणत्या आहेत हे पाहण्यासाठी सामाजिक सर्वेक्षण हाती घ्यावे लागते. वर्तमानपत्रे लोकांची मते व अभिवृत्ती यांचा अभ्यास करीत असतात.

**सर्वेक्षणाची व्यापकता :** सामाजिक सर्वेक्षणात अभ्यास विषयाशी निगडित असणाऱ्या किती लोकांशी अगर घटकांशी संपर्क साधला जातो हे महत्त्वाचे असते. त्यावरुन वेगवेगळया सर्वेक्षणांमधील फरक स्पष्ट करता येतो. सर्वेक्षणाची आखणी करण्यापूर्वीच संशोधकाने त्यासंबंधी निर्णय घ्यावयास हवे. यावरुन हे ओघानेच स्पष्ट होते की संशोधकाला आपल्या निष्कर्षाची व्यापकता जेवढी असावी असे वाटते, तेवढ्या प्रमाणात अभ्यासविषयातील घटकांशी संशोधकाने संबंध प्रस्थापित करावयाचा हवा.

**३.५ जनसंख्या**

संशोधकाने नमुना ज्यातून निवडला आहे असा संपूर्ण भाग म्हणजे जनसंख्या. नमुन्याची गुणवैशिष्ट्ये ज्याच्याशी समान आहेत अशा व्यक्ती किंवा वस्तू म्हणजे जनसंख्या होय. नमुन्यावरून संशोधनाच्या अखेरीस काढलेले निष्कर्ष समान गुणवैशिष्ट्यांमुळे जनसंख्येलाही लागू पडतात. जनसंख्या निश्चित किंवा अनंत असू शकते.

### ३.६ नमुना-निवड

सामाजिक संशोधनात तथ्ये संकलित करावी लागतात. संकलित केलेल्या तथ्यांचे निष्कर्ष काढणे गरजेचे असते. त्याचे आकलन करुन निष्कर्ष काढण्यासाठी विविध तंत्रांचा वापर करावा लागतो. मुलाखत पद्धती, अनुसूची, सर्वेक्षण व ऐतिहासिक पद्धती, व्यष्टी अध्ययन पद्धती यासारख्या विविध तंत्रांचा उपयोग जसा तथ्य संकलनासाठी केला जातो, तसाच नमुना निवडीचा सुद्धा होत असतो. समाजशास्त्रीय अभ्यासात नमुना निवड पद्धतीला आत्यंतिक महत्त्व दिले जाते.

### ३.६.१ नमुना-निवड अर्थ

समूहाच्या सर्व सदस्यांशी अथवा एकमेकांशी संपर्क स्थापित करुन माहिती गोळा करणे या पद्धतीला जनगणना पद्धती असे म्हणतात. पण ही जनगणना पद्धत अथवा समग्र पद्धत समूह लहान असेल तरच शक्य असते. दुसऱ्या पद्धती समूहाचे प्रतिनिधित्व सदस्य म्हणून संपूर्ण समूहाच्या अथवा समग्राच्या आहेत असे मानणे या पद्धतीला नमुना निवड पद्धत असे म्हणतात. सारांश हाच की जेव्हा संपूर्ण जनसमूहावर एखाद्या कारकाचा काय परिणाम होतो हे माहित करुन घेण्यासाठी काही प्रातिनिधिक एकक निवडून त्या परिमाणाचे मापन केले जाते तेव्हा त्याला नमुना निवड पद्धत म्हणतात.

**व्याख्या :** नमुना-निवड याच्या शास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेल्या आहेत.

**गुडे आणि हरे** - नमुना त्यातील नावाप्रमाणेच एका विस्तृत समूहाचा लघुप्रतिनिधी आहे.

**बोगार्ड्स** - नमुना पद्धतीत पूर्वनिर्धारित योजनेप्रमाणे कोणत्याही एककाच्या एका समूहातील एक निश्चित प्रतिशत निवडणे होय.

**श्रीमती बंग** - एक सांख्यिकीय नमुना म्हणजे समूहाच्या किंवा समग्राचा एक निवडलेला भाग होय.

**फ्रँक मर्टन** - नमुना हा शब्दप्रयोग एखाद्या एककाच्या किंवा संपूर्ण समूहाच्या एका भागाला लागू पडतो.

### ३.६.२ नमुना पद्धतीचे स्वरुप

नमुना पद्धतीमध्ये समग्राचे प्रतिनिधी म्हणून लहान भाग निवडून संशोधन करण्यात येते. सहकारी साखर कारखान्यातील मानवी संबंधाचा अभ्यास करतांना महाराष्ट्रातील सर्वच म्हणजे ६८ सहकारी साखर कारखान्यांतील मानवी संबंधाचा अभ्यास करणे वेळ, पैसा, श्रम व इतर बाबींचा विचार करता केवळ अशक्यच म्हणणे भाग पडते. म्हणून या साखर कारखान्यांचे योग्य प्रतिनिधित्व करणाऱ्या काही सहकारी कारखान्यांची निवड करुन त्यातील मानवी संबंधाचा अभ्यास सखोलपणे करता येतो.

आपल्या दैनंदिन जीवनात कळत-नकळतपणे आपण नमुना-निवडीवरुनच काही निष्कर्ष मांडत असतो. शितावरुन भाताची परीक्षा हा नमुना-निवडीचाच प्रकार आहे. रोग्यांची रक्तपासणी त्याच्या शरीरातील रक्ताच्या काही थेंबांवरुन केली जाते. धान्याच्या पोत्यातील ओंजळभर धान्यावरुनच पोत्यातील संपूर्ण धान्यासंबंधी अटकळ बांधली जाते. तेव्हा दैनंदिन जीवनातील असंख्य घटनांवरुन हे स्पष्ट करता येते की वैश्विक चाचणीपेक्षा नमुना चाचणीचा वापर सर्रासपणे केला जातो.

ए. एल. बाहुले या विचारवंताने सामाजिकशास्त्रात प्रथम नमुना चाचणीचा वापर केला. इ.स. १९१२ मध्ये त्याने २० कुटुंबांमागे एका कुटुंबाची निवड केली व त्या निवडक कुटुंबांचा अभ्यास करुन काही निष्कर्ष काढले. या निष्कर्षाचे महत्त्व असे की चार्ल्स बूथ व राऊन ट्री या विचारवंतांनी कुटुंबांच्या व्यापक पाहणी करुन जे निष्कर्ष काढले होते. त्याच्याशी बाहुले यांचे निष्कर्ष अगदी जवळचे म्हणजे सुसंगत होते. तेव्हा योग्य नमुना चाचणीवरुन योग्य निष्कर्ष काढता येतात पण त्याचबरोबर कितीतरी वेळ, श्रम, पैसा वाचतो हे सिद्ध झाले. याचा इष्ट तोच परिणाम झाला. जगातील विचारवंतांचे लक्ष नमुना-चाचणीकडे वेधले गेले. आज तर संशोधन क्षेत्रात नमुना-चाचणी महत्त्वपूर्ण बनली आहे.

### ३.६.३ नमुन्याची वैशिष्ट्ये

नमुन्याची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे देता येतील.

१. नमुना हा संपूर्ण सामग्रीचा एक प्रतिनिधी अंश असावा.

२. नमुन्याचे स्वरुप समग्राच्या तुलनेने छोटे असावे.

३. नमुना हा पक्षपात व पूर्वग्रहदोष यापासून स्वतंत्र असावा.

४. नमुन्यात ठिकाणी निश्चितता किंवा शुद्धता अधिक प्रमाणात असावी.

५. नमुना हा अध्ययनविषयाला अनुकूल असावा.

### ३.६.४ नमुना निवडीचे आधार

सामाजिक संशोधनाचा एक अविभाज्य घटक म्हणूनच नमुना-चाचणीचा उल्लेख केला जातो. म्हणूनच तर नमुना चाचणीचे तंत्र व त्यातील बारकावे समजून घेण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात केला जातो. या तंत्रातील महत्त्वाची बाब म्हणजे नमुना निवडावयाचा कसा या प्रश्नाचे उत्तर शोधणे होय. नमुना-चाचणीचे नेमके आधार खालीलप्रमाणे होत.

**सजातीयता** - अनेक घटकांचे प्रतिनिधित्व करु शकणारे काही घटक निवडून त्यांचा सखोल अभ्यास नमुना चाचणीत केला जातो. त्यामुळे अभ्यासासाठी निवडलेले घटक व इतर असंख्य घटक यांच्यामध्ये काही समान वैशिष्ट्ये असलीच पाहिजेत. एका विशिष्ट गटाचे गुणधर्म, वैशिष्ट्यपूर्ण गटातील काही घटकांची निवड करतांना त्या गटाची वैशिष्ट्ये त्या घटकाजवळ असतील तरच त्यांची निवड सार्थ ठरेल.

**प्रातिनिधिकता** - नमुना-निवडीचा हा प्रमुख आधार आहे. ज्या समूहाचा सखोल अभ्यास करावयाचा आहे त्यातून काही नमुना-घटक निवडता येणे शक्य आहे याची खात्री अभ्यासकाला असली पाहिजे. काही प्रभेदक वैशिष्ट्ये नमुना-घटकांत असली पाहिजेत. ही वैशिष्ट्ये समूहातील प्रत्येक घटकांत आहेत असे जरी मानले तरी नेमके कोणते घटक संपूर्ण समूहाचे प्रतिनिधित्व करु शकतात हाही एक प्रश्न असतो.

**पर्याप्तता** - नमुना-निवड करीत असतांना विशिष्ट समूह गटाचे प्रतिनिधित्व करणारे घटक पुरेसेपणाचे ठरतात की नाहीत हे पाहणे महत्त्वाचे असते. तसे पाहिले तर सामाजिक घटकांपैकी काही

घटकांची निवड करतांना त्यामध्ये शंभर टक्के अचूकपणा असेल असे निश्चितपणे म्हणता येत नाही. नैसर्गिक विज्ञानात हा अचूकपणा गृहित धरता येतो. पण सामाजिक घटक इतक्या जटील असतात की अभ्यासकाला सरासरीवरच अवलंबून राहावे लागते. तेव्हा अभ्यासकाने हे गृहितच धरले पाहिजे की नमुना-घटकामध्ये समूहातील अधिकाधिक वैशिष्ट्यांचा अंतर्भाव असतो.

### ३.६.५ नमुना-पद्धतीचा उद्देश

सामाजिक संशोधनाच्या दोन पद्धती आहेत. एक, समग्रीचे संशोधन किंवा जनगणना पद्धती. जनगणना पद्धतीत अध्ययन विषयाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व एककांचा वेगळा अभ्यास केला जातो. उदाहरणार्थ, मजुरांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करावयाचा झाल्यास प्रत्येक मजुराच्या आर्थिक स्थितीचा शोध घ्यावा लागेल. पण सामान्यतः हे अशक्य असते. ते दीर्घवेळाचे, पैशांचे व श्रमाचे काम आहे. आजकाल विशाल क्षेत्राचे संशोधन नमुना निवड पद्धतीनेच केले जाते. या पद्धतीत सार समग्रापैकी काही एककांची निवड केली जाते. या एककांत सामग्रीचे सर्व विशेष विद्यमान असतात. म्हणून ते समग्राचे प्रतिनिधी समजून त्यांचा अभ्यास केला जातो व निष्कर्ष काढले जातात. या नमुना पद्धतीमुळे वेळ, श्रम, पैसा यांची बचत होते. कार्यकर्त्यांची संख्याही कमी लागते.

नमुना-पद्धतीचा दुसरा उद्देश होय. नमुना-पद्धतीमुळे काही निवडलेल्या एककांवर लक्ष केंद्रित केले जाते. त्यामुळेनमुना पद्धतीने केलेले अध्ययन सूक्ष्म व गहन असते. कोणत्याही संशोधकाला जनगणना या पद्धतीने जो वेळ, पैसा, परिश्रम आणि कार्यकर्त्यांचा फार मोठा चमू लागतो तो सर्व या पद्धतीने टाळता येतो. म्हणून नमुना पद्धतीचा वापर फार मोठ्या प्रमाणात होतो.

### ३.६.६ नमुना-निवडीचे प्रकार

नमुना-निवडीचे प्रकार पुढीलप्रमाणे देता येतील.

१. यादृच्छिक नमुना-निवड ९. सहेतुक नमुना निवड

२. बहुहिस्सा/कोटा नमुना पद्धत
३. पुनरावृत्ती नमुना पद्धती
४. स्वयंनियुक्त नमुना निवड पद्धत
५. क्षेत्र-नमुना निवड पद्धती
६. व्यवस्थाबद्ध नमुना
७. बव्हयवस्थीय नमुना
८. अनियमित अंकन पद्धती
१०. बहुस्तरीय नमुना पद्धत
११. सोयीस्कर नमुना पद्धत
१२. व्यापक नमुना निवड पद्धत
१३. दुहेरी नमुना पद्धत
१४. बहुपदी/एकक पूंज नमुना निवड
१५. नियमित अंकन पद्धती
१६. गैर संभाव्य नमुना निवड पद्धत

**प्रस्तुत संशोधनात खालील नमुना निवड पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.**

**नमुना निवड पध्दती**

| संभाव्यतेवर आधारित | असंभाव्यतेवर आधारित |
|---|---|
| लॉटरी नमुना निवड | सहेतुक नमुना निवड |

## ३.७ प्रस्तुत संशोधनातील नमुना निवड

संशोधकाने नमुना ज्यातून निवडला आहे असा संपूर्ण भाग म्हणजे जनसंख्या. नमुन्याची गुणवैशिष्ट्ये ज्याच्याशी समान आहेत अशा व्यक्ती किंवा वस्तू म्हणजे जनसंख्या होय. नमुन्यावरून संशोधनाच्या अखेरीस काढलेले निष्कर्ष समान गुणवैशिष्ट्यांमुळे जनसंख्येलाही लागू पडतात. जनसंख्या निश्चित किंवा अनंत असू शकते.

प्रस्तूत संशोधनासाठी समग्र जनसंख्येतून अकोला जिल्ह्यातील एकूण इंग्रजी माध्यमाच्या शाळा मधून नमुना निवड करण्यात आली. अकोला जिल्हयातील इंग्रजी माध्यमांच्या एकूण २८८ शाळांमधून तालुकानिहाय **30** टक्के शाळांची लॉटरी नमुना पध्दतीने निवड करण्यात आली.

### ३.७.१ नमुना निवड पद्धती –

**प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड पद्धती**

| घटक | नमुना | निश्चित नमुना | निश्चित त्रुटी |
|---|---|---|---|
| शाळा | ८५ | ८५ | ०० |
| विद्यार्थी (वर्ग ९ वी) | २१२५ | १८२७ | २९८ |
| पालक (वर्ग ७ वी तील विद्यार्थ्यांचे) | १२७५ | १०३३ | २४२ |
| इंग्रजी माध्यमाचे शिक्षक | १२७५ | १०८५ | १९० |
| इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक | ८५ | ७४ | ११ |
| मराठी माध्यमाचे शिक्षक | ३०० | ११३ | १८७ |

### ३.७.२ अकोला जिल्हयातील २८८ शाळांपैकी तालूकानिहाय निवड केलेल्या शाळांची संख्या दर्शविणारा तक्ता

| तालूक्याचे नांव | इंग्रजी माध्यमाच्या एकूण शाळा | निवड केलेल्या शाळांची संख्या |
|---|---|---|
| अकोला | 149 | 45 |
| अकोट | 41 | 12 |
| बाळापूर | 31 | 09 |
| बार्शिटाकळी | 11 | 03 |
| मुर्तिजापूर | 24 | 07 |
| पातूर | 14 | 04 |
| तेल्हारा | 18 | 05 |
| | **एकूण** | **85** |

### ३.७.३ नमुना निवडीची कार्यपद्धती

संशोधीकीने शाळेची निवड संभाव्यता पद्धतीतील यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने अकोला जिल्हयातील इंग्रजी माध्यमांच्या एकूण २८८ शाळांमधून तालुकानिहाय ३० टक्के शाळांची लॉटरी पध्दतीने निवड केली. शाळेच्या मुख्याध्यापकांची विनंती पत्र देवून परवानगी घेतली . संशोधकाने संशोधन विषयावाबत चर्चा केली.

सदर विषय विदयार्थ्यांना उपयुक्त असल्याने मुख्याध्यापकांनी प्रश्नावली कार्यक्रम रावविण्यास परवानगी दिली.

१. ८५ इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील वर्ग ९ वीतील एकूण विद्यार्थ्यांपैकी २५ विद्यार्थी यांची लॉटरी पध्दतीने निवड संभाव्यता पद्धतीतील सुगम यादृच्छिक पद्धतीतील लॉटरी पदधतीने निवड केली.
२. ८५ इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील वर्ग ७ वी तील विद्यार्थ्यांचे पालक. मुख्याध्यापक, शिक्षक यांची लॉटरी पध्दतीने निवड संभाव्यता पद्धतीतील सुगम यादृच्छिक पद्धतीतील लॉटरी पदधतीने निवड केली. विद्यार्थ्यांद्वारे पालकांना पालक प्रश्नावली घरी देवून सोडवून आणण्यास सांगण्यात आले.
३. मराठी माध्यमाच्या शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक प्रश्नावलीचे वितरण करण्यासाठी शिक्षकांची सहेतुक निवड केली. सदर निवड केलेल्या शिक्षकांना गुगुल फॉर्म प्रश्नावली मोबाईल वर व्हाट्सएप द्वारे पाठविण्यात आली.
४. इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता आणि त्यांच्या शैक्षणिक विकासाबाबत पालकांच्या जागरूकतेचा अभ्यास करण्यासाठी अकोल जिल्ह्यातील संभाव्यता पद्धतीतील यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने शाळांची निवड केली. इंग्रजी माध्यमाच्या २८८ शाळापैंकी सुगम यादृच्छिक पद्धतीने एकूण ८५ उच्च प्राथमिक व माध्यमिक विदयालयांची निवड केली.

### ३.८ संशोधनाची साधने

एखादी वस्तू, घटना, प्रसंग यासंबंधात वस्तुस्थिती दर्शविणारे विधान म्हणजे 'तथ्य' होय. संशोधनामध्ये संशोधकाला जो Data मिळतो. त्याला facts म्हणता येईल. संशोधनाची संपूर्ण प्रक्रिया यावर अवलंबून असते. म्हणजेच ही तथ्य संकलनाची प्रक्रिया संशोधनात अत्यंत महत्त्वाची असते. संशोधक मनामध्ये ठरावीक हेतू

ठेवून वैज्ञानिक पद्धतीने जी माहिती एकत्र करतो व त्याचा पडताळा खात्री करून घेतो ती तथ्ये.

**माहिती संकलनाची तंत्रे व साधने**

१) निरीक्षण तंत्र

२) मुलाखत तंत्र

३) प्रश्नावली तंत्र - यातील साधने अ) प्रश्नावली ब) शेड्यूल किंवा अनुसूची

क) पडताळा सूची ड) पदनिश्चयन श्रेणी इ) गुणांक पद्धती फ) मनोवृत्ती मापन

४) समाजमिती तंत्र - अ) ओळखा पाहू तंत्र ब) सामाजिक आंतरमापन श्रेणी

५) मानसशास्त्रीय कसोट्या - अ) प्रावीण्य कसोटी ब) अभियोग्यता किंवा विशिष्ट कार्यशक्ती कसोटी क) बुद्धिमापन कसोटी ड) अभिरुची शोधिका इ) व्यक्तिमत्त्व शोधिका फ) निर्मितीक्षमता कसोटी

मापनसाधनाचे प्राथमिक स्रोत, प्रत्यक्ष निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखती, शेड्यूल किंवा अनुसूची, पडताळा सूची, मनोवृत्तीमापन, समाजमिती, मानसशास्त्रीय कसोट्या ही साधने अनुभवजन्य असतात. संशोधकाने ही माहिती स्वतः जमा केलेली असते.

**३.८.१ पदनिश्चयन श्रेणी**

Barr, Davis and Johnson, "Rating is a term applied to expression of opinion or judgement regarding some situation, object or character. Opinions are usually expressed on a scale of values." माहितीच्या नोंदीचे हे गुणात्मक साधन आहे. एखाद्या व्यक्तीमध्ये एखादा गुण किंवा वैशिष्ट्य किती प्रमाणात उपलब्ध आहे हे समजून घेण्यासाठी या साधनाचा उपयोग केला जातो. यासाठी तीन, पाच, सात, नऊ असे बिंदू असलेल्या श्रेणी वापरता येतात. या श्रेणी पूर्वनियोजित असतात. जेवढ्या श्रेणी अधिक तेवढ्या प्रमाणात त्या गुणाच्या वा वैशिष्ट्याच्या विविधतेची किंवा भेदाची अधिक बारकाईने नोंद

करता येते; मध्यभागी सामान्य किंवा मध्यम श्रेणी येते, डाव्या बाजूस कनिष्ठ व उजव्या बाजूस श्रेष्ठ श्रेणी येतात.

### ३.८.२ प्रश्नावली

संशोधन कार्यात समस्या व साधने परस्पर पूरक असावी लागतात. प्रश्नावली सर्वांत अधिक प्रमाणात उपयोगात आणले जाणारे साधन आहे. संशोधनासाठी सामग्री गोळा करण्याचे प्रश्नावली हे सोपे व उपयुक्त साधन आहे. प्रश्नावलीमध्ये गृहितकृत्याच्या उद्दिष्टानुसार मूल्यमापन तंत्राचा अवलंब करून संशोधकाने काही प्रश्न काढलेले असतात. प्रश्नावली ज्यांच्याकडून सामग्री हवी आहे अशांना उत्तरे लिहिण्यासाठी देतात.

**ई. एस. बोगार्डसच्या मते,** 'ज्या प्रश्नांची उत्तरे निवेदकांनी स्वतःच भरावयाची असतात त्या प्रश्नांची यादी म्हणजे प्रश्नावली होय.'

**एज्युकेशनल रिसर्च अँड अप्रायल बाय बास्ट डैटजॉन्सन यांच्या मते,** 'प्रश्नावली हे साधन असे आहे की, जे परिश्रमपूर्वक तयार केले जाते. शब्दांचा वापर योग्य प्रकारे केला जातो.

अतिशय विनम्रपणे प्रतिसादकाला सादर केले जाते. त्याची भाषा कोणालाही दुखावणारी नसावी अतिशय विनम्रपणे प्रतिसादकाला सादर केले जाते. शास्त्रीय पद्धतीने प्रश्नांचे वर्गीकरण केले पाहिजे. त्याचा उपयोग पुढच्या संशोधनासाठी विश्लेषण किंवा अन्वयार्थ लावताना सोईस्कर असला पाहिजे. प्रश्नावलीची रचना, मांडणी व्यवस्थित असावी.या दोन्ही व्याख्यांकडून प्रश्नावलीची पुढीलप्रमाणे माहिती मिळते. प्रश्नावली म्हणजे प्रश्नांचे व्यवस्थित केलेले संकलन, हे प्रश्न नमुना गटास दिले जातात. त्या प्रश्नावल्या भरून आल्यानंतर त्याचे वर्गीकरण केले जाते व प्रत्येक प्रश्नांचा संख्याशास्त्रीय पद्धतीने विचार केला जातो.

### ३.९ प्रस्तुत संशोधन साधनाची निवड

संशोधकाने संशोधनासाठी जो विषय निवडला आहे, त्यासंबंधी विविध प्रकारची माहिती गोळा करावी लागते. ती

माहिती जमा करण्याची विविध साधने आहेत. या अनेक साधनांमधून संशोधकाने योग्य त्या सांधनांची निवड करणे आवश्यक असते. अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी विविध प्रकारची माहिती व आकडेवारी आवश्यक असते. तिचे विश्लेषण व निर्वाचन करूनच संशोधक संशोधनाचे निष्कर्ष मांडत असतो. त्यासाठी गुणात्मक व परिणात्मक अशी दोन्ही प्रकारची आधार सामुग्री आवश्यक असते. त्यासाठी विविध प्रकारची तंत्रे व पद्धती वापरल्या जातात, त्यांना संशोधनाची साधने म्हणतात. उपलब्ध व असलेली संशोधनाची साधने पुढीलप्रमाणे आहेत.

सदर संशोधनामध्ये वरील साधनांपैकी खालील साधनांची निवड केली आहे.

१. सदर विद्यार्थी पदनिश्चयन श्रेणी परिशिष्ट क्र. ५ मध्ये देण्यात आली आहे.
२. सदर पालकांसाठी प्रश्नावली श्रेणी परिशिष्ट क्र. ६ मध्ये देण्यात आली आहे.
३. सदर इंग्रजी माध्यमांच्या शिक्षकासाठी प्रश्नावली श्रेणी परिशिष्ट क्र. ७ मध्ये देण्यात आली आहे.
४. सदर मराठी माध्यमांच्या शिक्षकासाठी पदनिश्चयन श्रेणी श्रेणी परिशिष्ट क्र.८ मध्ये देण्यात आली आहे.

**३.१० प्रस्तुत संशोधन साधनांचे विश्लेषण तक्ते**

### ३.१०.१ उद्दिष्ट क्र. १ करिता संशोधन साधनांचा विश्लेषण तक्ता
### विद्यार्थी पदनिश्चयन श्रेणी

| | |
|---|---|
| I - विद्यार्थ्यांची मानसिकता संबधी प्रश्न<br>II - विद्यार्थ्यांचे सकारात्मक कौटुंबिक वातावरण संबधी प्रश्न<br>III -विद्यार्थ्यांचे नकारात्मक कौटुंबिक वातावरण संबधी प्रश्न<br>IV - विद्यार्थ्यांचे शालेय वातावरण संबधी प्रश्न<br>V - विद्यार्थ्यांच्या सवयी संबधी प्रश्न | एकूण प्रश्न १० (प्रश्न क्र. ०१ ते १०)<br>एकूण प्रश्न १३ (प्रश्न क्र. ११ ते २३)<br>एकूण प्रश्न ११ (प्रश्न क्र. २४ ते ३४)<br>एकूण प्रश्न ०८ (प्रश्न क्र. ३५ ते ४२)<br>एकूण प्रश्न ०८ (प्रश्न क्र. ४३ ते ५०)<br>**एकूण प्रश्न – ५०** |
| **विद्यार्थी पदनिश्चयन श्रेणी –** नेहमी, बरेचदा, कधीकधी, क्वचित, कधीच नाही या पंचपदीचा वापर केला. | |

### ३.१०.२ उद्दिष्ट क्र. २ करिता संशोधन साधनांचा विश्लेषण तक्ता
### पालक प्रश्नावली

| उद्दिष्टानुसार संशोधन साधने | | पालक नमुना | एकूण बहुपर्यायी प्रश्न | विश्लेषण साधन |
|---|---|---|---|---|
| **संशोधन उद्दिष्ट** | **संशोधन साधन** | | | |
| विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शिक्षणाचे माध्यम निवडतांना पालकांमधील जागरूकतेचा अभ्यास करणे. | संशोधक निर्मित प्रश्नावली | १२७५ | २५ | शेकडा प्रमाण |

### ३.१०.३ उद्दिष्ट क्र. ३ करिता संशोधन साधनांचा विश्लेषण तक्ता इंग्रजी माध्यमांच्या शिक्षकासाठी प्रश्नावली

| उद्दिष्टानुसार संशोधन साधने | | शिक्षक नमुना (इंग्रजी माध्यम) | एकूण बहुपर्यायी प्रश्न | विश्लेषण साधन |
|---|---|---|---|---|
| संशोधन उद्दिष्ट | संशोधन साधन | | | |
| इंग्रजी माध्यमांच्या शाळेमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या भाषिक अडथळयांमुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेणे. | संशोधक निर्मित प्रश्नावली | १३६० | २० | शेकडा प्रमाण |

### ३.१०.४ उद्दिष्ट क्र. ४ करिता संशोधन साधनांचा विश्लेषण तक्ता मराठी माध्यमांच्या शिक्षकासाठी पदनिश्चयन श्रेणी

| उद्दिष्टानुसार संशोधन साधने | | शिक्षक नमुना (मराठी माध्यम) | एकूण बहुपर्यायी प्रश्न | विश्लेषण साधन |
|---|---|---|---|---|
| संशोधन उद्दिष्ट | संशोधन साधन | | | |
| शासकीय, अनुदानित मराठी माध्यमांच्या शाळेत प्रवेश न घेण्यामागील कारणांचा शोध घेणे. | संशोधक निर्मित पदनिश्चयन श्रेणी | ३०० | ३५ | शेकडा प्रमाण |

### ३.११ प्रस्तुत संशोधनातील पथदर्शक अभ्यास

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने 'इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता आणि त्यांच्या शैक्षणिक विकासाबाबत पालकांच्या जागरूकतेचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी निवडलेल्या साधनांचे

निश्चितीकरण व प्रमाणीकरण साधनांचा पथदर्शक अभ्यास करण्यात आला.

प्रत्यक्ष संशोधन करताना येणाऱ्या अडचणींचा पूर्वीच अंदाज घेऊन त्या अडचणी दूर व्हाव्यात या हेतूने अत्यंत लहान प्रमाणात पण वैज्ञानिक पद्धतीने संपूर्ण संशोधन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पथदर्शक करण्यात आला.

प्रस्तुत संशोधनासाठी देखील संशोधकाने सर्व संशोधन प्रक्रिया अगदी लहान प्रमाणात पूर्ण केली. यामध्ये प्रतिसादकांची संख्या अगदी थोडी म्हणजे २५ ठेवली होती. या पथदर्शी अभ्यासासाठी संशोधकाने ब्लॉसम किड्स स्कूल, बाळापुर जि.अकोला या शाळेची निवड केली. त्याकरीता संशोधकाने निवड केलेल्या शाळेमध्ये जाऊन विनंती अर्ज सादर करुन आपल्या कार्याची पूर्व कल्पना मुख्याध्यापकांना देऊन परवानगी घेतली.

त्यानंतर विद्यार्थ्यांना यातील प्रश्नाचे स्वरुप व ते सोडविण्याची पद्धती समजावून सांगण्यात आली. पदनिश्चयन श्रेणी सोडविण्याकरीता विद्यार्थ्यांना एकूण ४५ मिनिटे दिला.

शाळेतील इयत्ता नववीच्या २५ विद्यार्थ्यांची निवड करून विद्यार्थ्यांमार्फत पदनिश्चयनश्रेणी सोडवून घेतली. इयत्ता ७ वीतील ३० विद्यार्थ्यांची निवड करून पालक प्रश्नावली विद्यार्थ्यांमार्फत त्यांच्या पालकांना वितरीत करून सोडवून घेतली. शाळेतील १० शिक्षकांची निवड करून शिक्षक प्रश्नावली सोडवून घेतली.

प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून निष्कर्षांची मांडणी केली. पथदर्शी अभ्यास राबविल्यामुळे संशोधनातील अडचणी लक्षात आल्याने प्रत्यक्ष संशोधन करताना अडचणी निर्माण झाल्या नाहीत.

## ३.१२ संशोधन कार्यवाहीचा प्रवाही तक्ता

आकृती क्र. ५

समस्या निवड

↓

संशोधनाची उद्दिष्टे निश्चिती

↓

संबंधित संशोधनाचा आढावा

↓

संशोधन गृहीतके व परिकल्पना

↓

जनसंख्या

↓

नमुना निवड

↓

माहिती संकलनाची साधने

↓

संशोधन साधनांचा विश्लेषण तक्ता

↓

पथदर्शक अभ्यास

↓

माहिती संकलन प्रक्रिया

↓

माहितीचे विश्लेषण व सांखिकी प्रक्रिया अर्थनिवचन

↓

निष्कर्ष व शिफारशीची मांडणी

↓

अंतिम संशोधन अहवाल लेखन

### ३.१३ संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही

वरील प्रवाही तक्त्यानुसार संशोधनाची कार्यवाही पुढीलप्रमाणे करण्यात आली. कोणत्याही संशोधन कार्यात संशोधकास आपल्या समस्येचे निराकरण करण्याकरीता माहिती संकलन करणे आवश्यक असते. त्याकरीता योग्य साधनांचा वापर करुन माहिती प्राप्त करावी लागते. त्याशिवाय पुढील कार्यवाही होऊ शकत नाही. समस्येचे निराकरण करण्याकरीता पुरावा म्हणून आधार सामुग्रीचे संकलन संशोधनात सर्वात महत्त्वाचे कार्य असते. आधार सामुग्री जितकी बिनचूक व समर्पक असेल तितकेच संशोधनाचे निष्कर्ष विश्वसनिय होण्याचा संभव जास्त असतो.

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने 'इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता आणि त्यांच्या शैक्षणिक विकासाबाबत पालकांच्या जागरूकतेचा चिकित्सक अभ्यास करणे' उद्दिष्ट क्र. १ इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता व कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास आधारीत स्वयंनिर्मित पदनिश्चयन श्रेणीचा वापर केला.

त्याकरीता त्यांनी निवड केलेल्या शाळेमध्ये जाऊन विनंती अर्ज सादर करुन आपल्या कार्याची पूर्व कल्पना मुख्याध्यापकांना देऊन त्यांच्या परवानगीने विद्यार्थ्यांना ह्या पदनिश्चयन श्रेणीचे प्रत्येक शाळेतील २५ विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

त्यानंतर विद्यार्थ्यांना यातील प्रश्नाचे स्वरुप व ते सोडविण्याची पद्धती समजावून सांगण्यात आली. पदनिश्चयन श्रेणी सोडविण्याकरीता विद्यार्थ्यांना एकूण ४५ मिनिटे दिला.

सर्व विद्यार्थ्यांचे सर्व प्रश्न सोडवून झाल्यानंतर चाचण्या गोळा करण्यात आले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापकांकडून पदनिश्चयन श्रेणी सोडून घेतल्याबाबत प्रमाणपत्र घेतले.

प्रस्तुत संशोधनातील उद्दिष्ट क्रमांक २ व उद्दिष्ट क्रमांक ३ करिता संशोधकाने अनुक्रमे पालक प्रश्नावली व शिक्षक / मुख्याध्यापक प्रश्नावली निर्माण केली. ही प्रश्नावली अकोला जिल्ह्यातील निवड केलेल्या ८५ शाळांमधील पालक व मुख्याध्यापक

/ शिक्षकांना वितरित करण्यात आली. संबंधित प्रश्नावली पालक व मुख्याध्यापक / शिक्षकांना वितरित करण्यापूर्वी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांचेकडे प्रश्नावली सोडून घेण्यासंदर्भात विनंती अर्जाद्वारे परवानगी घेण्यात आली. त्यानंतर ८५ शाळांमधील वर्ग ७ वी तील विद्यार्थ्यांचे पालक, प्रत्येक शाळेतील १५ पालक याप्रमाणे १२७५ पालकांना ही प्रश्नावली विद्यार्थ्यांमार्फत पालकांकडे वितरित करण्यात आली. वितरीत केलेल्या प्रश्नावालीपैकी १०३३ प्रश्नावली सोडवून परत आल्या. तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षक (प्रत्येकी १५ शिक्षक) याप्रमाणे एकूण १२७५ शिक्षक व ८५ शाळातील मुख्याध्यापक असे एकूण १३६० मुख्याध्यापक व शिक्षकांना शिक्षकांना प्रश्नावली वितरित करण्यात आली. वितरित केलेल्या प्रश्नावली सोडून झाल्यानंतर संकलित करण्यात आल्या. वितरीत केलेल्या प्रश्नावालीपैकी शिक्षकांच्या १०८५ व मुख्याध्यापकांच्या ७४ याप्रमाणे एकूण ११५९ प्रश्नावली सोडवून परत आल्या.

प्रस्तुत संशोधनातील उद्दिष्ट क्रमांक ४ करिता अकोला जिल्ह्यातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळातील ३०० शिक्षकांची सहेतुक नमुना निवड करण्यात आली. या शिक्षकांना संशोधकाने निर्मित केलेली गुगल फॉर्म पदनिश्चयन श्रेणी वितरित करण्यात आली. गुगल फॉर्म पदनिश्चयन श्रेणीची लिंक संबंधित शिक्षकांना मोबाईलवर पाठवून, त्यांनी ही लिंक भरावी असे विनंती करण्यात आली. त्यापैकी १०२ शिक्षकांनी प्रतिसाद दिला. त्यावरून गुगल फॉर्म पदनिश्चयन श्रेणी चे प्राप्त माहितीचे विश्लेषण व सांखिकीय प्रक्रिया अर्थनिवचन केले.

### ३.१४ निष्कर्ष व शिफारशीची मांडणी

प्राप्त माहितीचे विश्लेषण, सांखिकीय प्रक्रिया अर्थनिवचन करून प्राप्त निष्कर्षाची मांडणी प्रकरण ५ मध्ये सविस्तर करण्यात आलेली आहे.

### ३.१५ समारोप

कोणतेही संशोधन करताना सर्वात प्रथम संशोधन म्हणजे काय ?, संशोधनाचा अर्थ, संशोधनाचा हेतू या गोष्टी जाणून घेणे

महत्त्वाचे असते. या प्रकरणांमध्ये या गोष्टींचा उल्लेख करण्यात आला. या संशोधनासाठी निवड केलेली सर्वेक्षण संशोधन पद्धती, साधने व तंत्र, नमुना निवड याची माहिती, नमुना निवडीचा अर्थ, महत्व, उद्देश, प्रकार या सर्व गोष्टींचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात आला. प्रस्तुत संशोधनातील माहिती संकलनाची कोणती साधने वापरली, याचा उल्लेख करण्यात आला.

***

# प्रकरण ४
# संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

## ४.१ प्रस्तावना :

या प्रकरणात संकलित माहितीचे सादरीकरण आणि विश्लेषण केले आहे. या प्रकरणात निश्चित केलेल्या उद्दिष्टांसाठी संशोधन अभ्यासात संशोधिकीने सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर केला. या प्रकरणात संशोधिकीने सर्वेक्षणद्वारे डेटा संकलनासाठी संशोधन साधनांचे डेटा विश्लेषण सादर केले. सर्वेक्षणात संशोधिकीने नववीच्या विद्यार्थ्यांकडून डेटा गोळा करण्यासाठी विद्यार्थी पदनिश्चयन श्रेणी, शिक्षकांकडून डेटा गोळा करण्यासाठी स्व-निर्मित शिक्षक पदनिश्चयन श्रेणी, सातवीच्या पालकांकडून माहिती गोळा करण्याकरिता स्व-निर्मित पालक प्रश्नावलीचा वापर केला. प्रश्नावली निर्मिती पद्धतीचा वापर करून आणि शैक्षणिक तज्ञांकडून प्रमाणित करून घेऊन प्रश्नावली वैध आणि विश्वासार्ह बनवण्यात आलेल्या आहेत. या प्रकरणात संशोधिकीने पदनिश्चयन श्रेणी, प्रश्नावलीचे विश्लेषण सादर केले. तसेच सर्वेक्षणाद्वारे स्व-निर्मित प्रश्नावलीमध्ये गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण शेकडा प्रमाण (टक्केवारी) हे सांख्यिकीय साधन म्हणून या प्रकरणात उपयोग केला आहे.

## ४.२ विद्यार्थी पदनिश्चयन श्रेणी द्वारा प्राप्त माहितीचे विश्लेषण

इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता व कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थी पदनिश्चयन श्रेणी प्रश्नावली पद्धतीचा अवलंब करून प्रत्येक शाळेतील २५ विद्यार्थी याप्रमाणे ८५ शाळेतील एकूण २१२५ विद्यार्थ्यांना प्रश्नावली देण्यात आली. प्रत्येक विद्यार्थी पदनिश्चयन श्रेणी प्रश्नावलीत ५० प्रश्न विचारण्यात आलेले असून प्रतिसादकर्त्या विद्यार्थ्याला ५ पर्यायांपैकी सर्वात योग्य वाटत असलेल्या एका पर्यायासमोर टिक (√) करण्यास सांगण्यात आले.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता व कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास करण्यासाठी पदनिश्चयन श्रेणी उपयुक्त ठरणार होती. अशा उपयुक्त ठरणाऱ्या प्रश्नांना २१२५ पैकी १८२७ विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला, प्राप्त प्रतिसादानुसार या विद्यार्थी पदनिश्चयन श्रेणीचे तालुकानिहाय प्रश्ननिहाय प्रतिसादात्मक विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

**<u>उद्दिष्ट क्र. १ -</u>**


**इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता व कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास दर्शविणारी सारणी.**

**कोष्टक क्र. १**

| **विद्यार्थ्यांचे नकारात्मक कौटुंबिक वातावरण दर्शविणारी सारणी** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **प्रश्न क्रमांक** | **विद्यार्थ्यांचे नकारात्मक कौटुंबिक वातावरण संबंधी प्रश्न** | **नेहमी** | **बरेचदा** | **कधी कधी** | **क्वचित** | **कधीच नाही** |
| १ | माझ्या कुटुंबाची भाषा व शाळेतील भाषा वेगवेगळी असल्यामुळे अध्ययनात भाषिक अडथळे निर्माण होतात. | ८.८१ | १३.८२ | २९.२३ | १४.१ | ३४.०३ |
| २ | माझ्या पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा माझ्या मनावर ताण निर्माण होतो. | ००.०० | ४.३५ | ३०.४४ | ३०.४३ | ३४.७८ |
| ३ | परीक्षेत अपेक्षित गुण संपादन न केल्यास आई- | २७.२१ | १८.१३ | १९.३७ | १४.२७ | २१.०२ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | बाबा इतर मुलांशी माझी तुलना करतात. | | | | | |
| ४ | माझे बाबा एखाद्या कामात मग्न असतांना मी त्यांना काही प्रश्न विचारल्यास ते माझ्यावर रागावून मला हाकलून देतात. | १७.३९ | ४.३५ | ८.७० | ४.३४ | ६५.२२ |
| ५ | मी माझ्या मित्रांपेक्षाही अधिक चांगले गुण प्राप्त करावेत अशी माझ्या आई-बाबांची इच्छा आहे. | ६३.३० | १३.४४ | ८.९६ | ६.५४ | ७.७७ |

## विद्यार्थ्यांचे नकारात्मक कौटुंबिक वातावरण दर्शविणारा आलेख
## आलेख क्र. १



**विद्यार्थ्यांचे नकारात्मक कौटुंबिक वातावरण दर्शविणारी सारणी क्र. १ व आलेख क्र. १ चे प्रश्ननिहाय विश्लेषण**

**प्रश्न क्र. १ - माझ्या कुटुंबाची भाषा व शाळेतील भाषा वेगवेगळी असल्यामुळे अध्ययनात भाषिक अडथळे निर्माण होतात.**

वरील सारणी क्रमांक १ व आलेख क्रमांक १ मधील प्रश्न क्र. १ वरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांना कुटुंबाची भाषा व शाळेतील भाषा वेगवेगळी असल्यामुळे अध्ययनात भाषिक अडथळे निर्माण होतात. परंतु त्यांचे प्रमाण हे कमी जास्त असल्याचे दिसून येते.

कुटुंबाची भाषा व शाळेतील भाषा वेगवेगळी असल्यामुळे अध्ययनक भाषिक अडथळे 'कधीच निर्माण होत नसणाऱ्या' विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३४.०३ % आढळली. विद्यार्थ्यांना कुटुंबाची भाषा व शाळेतील भाषा वेगवेगळी असल्यामुळे अध्ययनात भाषिक अडथळे 'कधीकधी' निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २९.२३ % आढळून आली तर क्वचितपणे भाषिक अडथळे निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १४.१० % आढळली. १३.८२ % विद्यार्थ्यांना कुटुंबाची भाषा व शाळेतील भाषा वेगवेगळी असल्यामुळे अध्ययनात भाषिक अडथळे 'बरेचदा' निर्माण होतात. विद्यार्थ्यांना कुटुंबाची भाषा व शाळेतील भाषा वेगवेगळी असल्यामुळे अध्ययनात 'नेहमी'च भाषिक अडथळे निर्माण होणाऱ्यांची संख्या सर्वात कमी ८.८१ % आढळून आली.

थोडक्यात, कुटुंबाची भाषा व शाळेतील भाषा वेगवेगळी असल्यामुळे अध्ययनक भाषिक अडथळे 'कधीच निर्माण होत नसणाऱ्या' विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त आणि विद्यार्थ्यांना कुटुंबाची भाषा व शाळेतील भाषा वेगवेगळी असल्यामुळे अध्ययनात 'नेहमी'च भाषिक अडथळे निर्माण होणाऱ्यांची संख्या सर्वात कमी आढळून आली.

**प्रश्न क्र. २ - माझ्या पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा माझ्या मनावर ताण निर्माण होतो.**

वरील सारणी क्रमांक १ व आलेख क्रमांक १ मधील प्रश्न क्र. २ वरून असे दिसून येते की, पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा

विद्यार्थ्यांच्या मनावर ताण निर्माण होतो. परंतु त्यांचे प्रमाण हे कमी जास्त असल्याचे दिसून येते.

पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा मनावर ताण निर्माण 'कधीच न होणाऱ्या' विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त २७.७४ % आढळून आली आणि पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा विद्यार्थ्यांच्या मनावर 'नेहमी' ताण निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २४.४० % एवढी आढळून आली. २१.०९ % विद्यार्थ्यांना पालकांच्या अपेक्षांचा मनावर 'बरेचदा' ताण निर्माण होतो असे दिसते. तर 'कधीकधी' मनावर ताण निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १५.१३ % एवढी आढळून आली. सर्वात कमी 'क्वचित'पणे पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा मनावर ताण निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ११.६५ % आढळून आली.

थोडक्यात पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा मनावर ताण निर्माण 'कधीच न होणाऱ्या' विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त तर 'क्वचित'पणे पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा मनावर ताण निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी आढळून आली.

**प्रश्न क्र. ३ –परीक्षेत अपेक्षित गुण संपादन न केल्यास आई-बाबा इतर मुलांशी माझी तुलना करतात.**

वरील सारणी क्रमांक १ व आलेख क्रमांक १ मधील प्रश्न क्र. ३ वरून असे दिसून येते की, परीक्षेत अपेक्षित गुण संपादन न केल्यास आई-बाबा इतर मुलांशी विद्यार्थ्याची तुलना करतात. परंतु त्यांचे प्रमाण हे कमी जास्त असल्याचे दिसून येते.

परीक्षेत अपेक्षित गुण संपादन न केल्यास आई-बाबा इतर मुलांशी 'नेहमी' तुलना करतात असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त २७.२१ % आढळून आली तर २१.०२ % विद्यार्थ्यांचे आई-बाबा त्यांनी परीक्षेत अपेक्षित गुण संपादन न केल्यास इतर मुलांशी कधीच तुलना करत नाहीत. १९.३७ % विद्यार्थ्यांच्या मते 'कधीकधी' त्यांचे पालक इतर मुलांशी तुलना करतात. तर परीक्षेत अपेक्षित गुण संपादन न केल्यास आई-बाबा इतर मुलांशी तुलना 'बरेचदा' करणाऱ्या करतात असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १८.१३ % आढळली. परीक्षेत अपेक्षित गुण

संपादन न केल्यास आई-बाबा इतर मुलांशी 'क्वचित'पणे तुलना करतात असे मत असणाऱ्यांची संख्या सर्वात कमी १४.२७ % आढळली.

थोडक्यात, परीक्षेत अपेक्षित गुण संपादन न केल्यास आई-बाबा इतर मुलांशी 'नेहमी' तुलना करतात असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त आणि परीक्षेत अपेक्षित गुण संपादन न केल्यास आई-बाबा इतर मुलांशी 'क्वचित'पणे तुलना करतात असे मत असणाऱ्यांची संख्या सर्वात कमी आढळली.

**प्रश्न क्र. ४ – माझे बाबा एखाद्या कामात मग्न असतांना मी त्यांना काही प्रश्न विचारल्यास ते माझ्यावर रागावून मला हाकलून देतात.**

वरील सारणी क्रमांक १ व आलेख क्रमांक १ मधील प्रश्न क्र. ४ वरून असे दिसून येते की, एखाद्या कामात मग्न असतांना त्यांना काही प्रश्न विचारल्यास ते मुलांवर रागावून त्यांना हाकलून देतात. परंतु त्यांचे प्रमाण हे कमी जास्त असल्याचे दिसून येते.

एखाद्या कामात मग्न असतांना बाबांना काही प्रश्न विचारल्यास ते मुलांवर रागावून त्यांना 'कधीच हाकलून देत नाहीत' असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ६५.२२ % आढळून आली. तर १७.३९ % विद्यार्थ्यांचे बाबा एखाद्या कामात मग्न असतांना त्यांना काही प्रश्न विचारल्यास ते मुलांवर रागावून त्यांना हाकलून देतात. ८.७० % विद्यार्थ्यांच्या मते 'कधीकधी' त्यांचे बाबा एखाद्या कामात मग्न असतांना त्यांना काही प्रश्न विचारल्यास ते मुलांवर रागावून त्यांना हाकलून देतात. एखाद्या कामात मग्न असतांना बाबांना काही प्रश्न विचारल्यास ते मुलांवर रागावून त्यांना 'बरेचदा' व 'क्वचित'पणे हाकलून देणाऱ्या पालकांची संख्या समसमान व सर्वात कमी अनुक्रमे ४.३५ % व ४.३४ % आढळून आली.

थोडक्यात, एखाद्या कामात मग्न असतांना बाबांना काही प्रश्न विचारल्यास ते मुलांवर रागावून त्यांना 'कधीच हाकलून देत नाहीत' असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त आढळून आली तर एखाद्या कामात मग्न असतांना बाबांना काही प्रश्न

विचारल्यास ते मुलांवर रागावून त्यांना 'बरेचदा' व 'क्वचित'पणे हाकलून देणाऱ्या पालकांची संख्या समसमान व सर्वात कमी आढळून आली.

**प्रश्न क्र. ५ – मी माझ्या मित्रांपेक्षाही अधिक चांगले गुण प्राप्त करावेत अशी माझ्या आई-बाबांची इच्छा आहे.**

वरील सारणी क्रमांक १ व आलेख क्रमांक १ मधील प्रश्न क्र. ५ वरून असे दिसून येते की, मित्रांपेक्षाही अधिक चांगले गुण प्राप्त करावेत अशी विद्यार्थ्यांच्या आई-बाबांची इच्छा असते. परंतु त्यांचे प्रमाण हे कमी जास्त असल्याचे दिसून येते.

मित्रापेक्षाही अधिक चांगले गुण प्राप्त करावेत अशी आई-बाबांची इच्छा 'नेहमी' असते, असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ६३.३० % आढळली तर अशी इच्छा 'बरेचदा' आई-बाबांची असते असे मत मांडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १३.४४ % असल्याचे दिसून येते. ८.९६ % विद्यार्थ्यांच्या आई-बाबांना आपल्या मुलाने मित्रापेक्षाही अधिक चांगले गुण प्राप्त करावेत अशी इच्छा असते तर मित्रापेक्षाही अधिक चांगले गुण प्राप्त करावेत अशी आई बाबांची इच्छा 'कधीच नसते' असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ७.७७ % असल्याचे आढळून आले. मित्रापेक्षाही अधिक चांगले गुण प्राप्त करावेत अशी आई-बाबांची 'क्वचित'पणे इच्छा असते, असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ६.५४ % आढळून आली.

थोडक्यात, मित्रापेक्षाही अधिक चांगले गुण प्राप्त करावेत अशी आई-बाबांची इच्छा 'नेहमी' असते, असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त आणि मित्रापेक्षाही अधिक चांगले गुण प्राप्त करावेत अशी आई-बाबांची 'क्वचित'पणे इच्छा असते, असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी आढळून आली.

**४.३ पालक प्रश्नावली द्वारा प्राप्त माहितीचे विश्लेषण**

**उद्दिष्ट क्र. २ - विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शिक्षणाचे माध्यम निवडतांना पालकांमधील जागरूकतेचा अभ्यास करणे.**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शिक्षणाचे माध्यम निवडतांना पालकांमधील जागरूकतेचा अभ्यास करण्यासाठी पालक प्रश्नावली पद्धतीचा अवलंब करून ८५ शाळांतील वर्ग ७ वी तील विद्यार्थ्यांचे १५ पालक याप्रमाणे एकूण १२७५ पालकांना प्रश्नावली पाठविण्यात आली. पालक प्रश्नावलीत एकूण १५ प्रश्न विचारण्यात आलेले असून प्रतिसादकर्त्या पालकांना प्रश्नासमोर दिलेल्या पर्यायांपैकी सर्वात योग्य वाटत असलेल्या एका पर्यायासमोर टिक (√) करण्यास सांगण्यात आले. या प्रश्नावलीतील प्रश्न विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शिक्षणाचे माध्यम निवडतांना पालकांमधील जागरूकतेचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त ठरणार होती. १०३३ पालकांनी प्रतिसाद दिला, प्राप्त प्रतिसादानुसार या पालक प्रश्नावलीचे तालुकानिहाय प्रश्ननिहाय प्रतिसादात्मक विश्लेषनाचे एकत्रीकरण करून अकोला जिल्ह्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

**पालक प्रश्नावली प्रश्ननिहाय प्रतिसादात्मक विश्लेषण – अकोला जिल्हा**


**प्रश्न क्र. १ - पाल्यांच्या शिक्षणाचे माध्यम व कुटुंबातील भाषा वेगवेगळी असल्यास पाल्यांचा अभ्यास घेताना भाषिक अडचणी निर्माण होतात, याबाबत संकलित माहितीचे विश्लेषण दर्शविणारी सारणी**

**सारणी क्र. १**

| तालुका | नेहमी | कधी-कधी | कधीच नाही |
|---|---|---|---|
| अकोला | २२.०९ | ७३.४९ | ४.४२ |
| अकोट | ९.७६ | ६९.३० | २०.९४ |
| बाळापुर | ३२.९८ | ६०.७९ | ६.२३ |
| बार्शिटाकळी | १७.२४ | ४८.२८ | ३४.४८ |
| मूर्तिजापूर | १६.६७ | ५८.३३ | २५.०० |
| पातुर | २२.९२ | ५६.२५ | २०.८३ |
| तेल्हारा | ११.९० | ६९.०४ | १९.०६ |
| एकूण | १३३.५६ | ४३५.४८ | १३०.९६ |
| जिल्हा शेकडा प्रमाण | **१९.०८** | **६२.२१** | **१८.७१** |

**आलेख क्र. १**

**पाल्यांच्या शिक्षणाचे माध्यम व कुटुंबातील भाषा वेगवेगळी असल्यास पाल्यांचा अभ्यास घेताना भाषिक अडचणी निर्माण होतात, याबाबत संकलित माहितीचे विश्लेषण दर्शविणारा आलेख**




वरील सारणी क्रमांक १ व आलेख क्रमांक १ वरून असे दिसून येते की, पाल्यांच्या शिक्षणाचे माध्यम व कुटुंबातील भाषा वेगवेगळी असल्यास पाल्यांचा अभ्यास घेताना पालकांना भाषिक अडचणी निर्माण होतात. परंतु त्यांचे प्रमाण हे कमी जास्त असल्याचे दिसून येते.

पाल्यांचे शिक्षणाचे माध्यम व कुटुंब असतील भाषा वेगवेगळी असल्यास पाल्यांचा अभ्यास घेताना कधी कधी भाषिक अडचण निर्माण होणाऱ्या पालकांची संख्या सर्वात जास्त ६२.२१ % असल्याचे दिसून येते तर भाषिक अडचण नेहमी होणाऱ्या पालकांची संख्या १९.०८ % आढळून आली. पाल्यांचे शिक्षणाचे माध्यम व कुटुंबातील भाषा वेगवेगळी असल्यास पाल्यांचा अभ्यास घेताना भाषिक अडचण कधीच निर्माण न होणाऱ्या पालकांची संख्या सर्वात कमी १८.७१ % आढळून आली.

थोडक्यात, पाल्यांचे शिक्षणाचे माध्यम व कुटुंब असतील भाषा वेगवेगळी असल्यास पाल्यांचा अभ्यास घेताना कधी कधी भाषिक अडचण निर्माण होणाऱ्या पालकांची संख्या सर्वात जास्त

आणि पाल्यांचा अभ्यास घेताना भाषिक अडचण कधीच निर्माण न होणाऱ्या पालकांची संख्या सर्वात कमी आढळून आली.

**४.४ इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षक प्रश्नावली द्वारा प्राप्त माहितीचे विश्लेषण**

**<u>उद्दिष्ट क्र. ३</u> -_इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या भाषिक अडथल्यांमुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेणे.**

इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या भाषिक अडथल्यांमुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेण्यासाठी शिक्षक प्रश्नावली पद्धतीचा अवलंब करून ८५ शाळांतील १२७५ शिक्षक आणि ८५ मुख्याध्यापकांना प्रश्नावली पाठविण्यात आली. शिक्षक प्रश्नावलीत एकूण **२०** प्रश्न विचारण्यात आलेले असून प्रतिसादकर्त्या शिक्षकांना प्रश्नासमोर दिलेल्या पर्यायांपैकी सर्वात योग्य वाटत असलेल्या एका पर्यायासमोर टिक (√) करण्यास सांगण्यात आले. संशोधकाला हे २० प्रश्न इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या भाषिक अडथल्यांमुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेण्यासाठी उपयुक्त ठरणार होती. ११५९ शिक्षकांनी प्रतिसाद दिला, प्राप्त प्रतिसादानुसार या शिक्षक प्रश्नावलीचे तालुकानिहाय प्रश्ननिहाय प्रतिसादात्मक विश्लेषनाचे एकत्रीकरण करून अकोला जिल्ह्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

**इंग्रजी माध्यमाच्या शिक्षकांसाठी प्रश्नावलीचे प्रश्ननिहाय प्रतिसादात्मक विश्लेषण तक्ता – अकोला जिल्हा**


**प्रश्न क्र. १ - विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण होण्याचे कारण..., याबाबत संकलित माहितीचे विश्लेषण दर्शविणारी सारणी**

## <u>सारणी क्र. २</u>

| **तालुका** | शिक्षण क्षेत्रातील वाढत्या स्पर्धा | शाळेतील शिक्षणाच्या माध्यमाची भाषा | वाढती विषय संख्या | पालकांच्या वाढत्या अपेक्षा | यापेक्षा वेगळे. |
|---|---|---|---|---|---|
| अकोला | ४१.७३ | ११.०२ | १३.३९ | ३१.५० | २.३६ |
| अकोट | ३७.१६ | २.०२ | ३.३७ | ५७.४५ | ००.०० |
| बाळापुर | ३५.०० | ८.७५ | १३.७५ | ४१.२५ | १.२५ |
| बार्शिटाकळी | ४४.०० | १६.०० | ४.०० | ३६.०० | ००.०० |
| मूर्तिजापूर | ३६.२० | ८.६२ | १२.०६ | ४३.१२ | ००.०० |
| पातुर | ३४.४८ | ३७.९३ | १३.७९ | १३.८० | ००.०० |
| तेल्हारा | १४.२८ | ३०.९५ | १४.२९ | ४०.४८ | ००.०० |
| | **२४२.८५** | **११५.२९** | **७४.६५** | **२६३.६** | **३.६१** |
| जिल्हा शेकडा प्रमाण | **३४.६९** | **१६.४७** | **१०.६६** | **३७.६६** | **०.५२** |

## <u>आलेख क्र. २</u>

**विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण होण्याचे कारण..., याबाबत संकलित माहितीचे विश्लेषण दर्शविणारा आलेख**




वरील सारणी क्रमांक २ व आलेख क्रमांक २ वरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण होण्याचे कारण

अनेक असतात. परंतु त्यांचे प्रमाण हे कमी जास्त असल्याचे दिसून येते.

विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण होण्याचे सर्वात जास्त ३७.६६ % कारण पालकांच्या वाढत्या अपेक्षा हे असल्याचे आढळून आले तर ३४.६९ % विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रातील वाढत्या स्पर्धा यामुळे तणाव निर्माण होतो असे दिसून येते. विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण होण्याचे कारण शाळेतील शिक्षणाच्या माध्यमाची भाषा हे असल्याचे १६.४७ % शिक्षकांना वाटते तर १०.६६ % विद्यार्थ्यांना वाढती विषय संख्या यामुळे तणाव निर्माण होतो असे दिसून येते. विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण होण्याचे कारण यापेक्षा वेगळे असल्याचे मत सर्वात कमी ०.५२ % असल्याचे आढळून आले.

थोडक्यात, विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण होण्याचे सर्वात जास्त कारण पालकांच्या वाढत्या अपेक्षा हे असल्याचे आढळून आले तर विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण होण्याचे कारण यापेक्षा वेगळे असल्याचे सर्वात कमी असल्याचे आढळून आले.

**मराठी शाळा - मुख्याध्यापक व शिक्षक प्रश्नावली गुगल फॉर्म द्वारा प्राप्त माहितीचे विश्लेषण**

<u>**उद्दिष्ट क्र. ४ –**</u>

**मराठी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांच्या प्रवेश न घेण्यामागील कारणांचा शोध घेणे.**

मराठी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांच्या प्रवेश न घेण्यामागील कारणांचा शोध घेण्यासाठी मुख्याध्यापक व शिक्षक प्रश्नावली गुगल फॉर्म पद्धतीचा अवलंब करून मराठी माध्यमाच्या शाळेतील सहेतुक नमुना निवड केलेल्या ३०० मुख्याध्यापक, शिक्षक, यांना गुगल फॉर्म प्रश्नावली लिंक पाठविण्यात आली. गुगल फॉर्म प्रश्नावलीत एकूण ३५ प्रश्न विचारण्यात आलेले असून प्रतिसादकर्त्या मुख्याध्यापक, शिक्षक यांना दिलेल्या पर्यायांपैकी सर्वात योग्य वाटत असलेल्या एका पर्यायासमोर टिक (√) करण्यास सांगण्यात आले. संशोधकाला ३५ प्रश्न मराठी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांच्या प्रवेश न घेण्यामागील कारणांचा शोध घेण्यासाठी

उपयुक्त ठरणार होती. या प्रश्नांना ११३ मुख्याध्यापक, शिक्षकांनी प्रतिसाद दिला, प्राप्त प्रतिसादानुसार या मुख्याध्यापक व शिक्षक प्रश्नावली गुगल फॉर्म चे तालुकानिहाय प्रश्ननिहाय प्रतिसादात्मक विश्लेषनाचे एकत्रीकरण करून अकोला जिल्ह्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

**मराठी शाळा-मुख्याध्यापक व शिक्षक प्रश्नावली गुगल फॉर्म प्रश्ननिहाय प्रतिसादात्मक विश्लेषण आराखडा – अकोला जिल्हा**

**प्रश्न क्र. १ - मराठी माध्यमात शिकल्याने मुलाच्या प्रगतीत इंग्रजी भाषेची अडचण निर्माण होईल या भीतीमुळे पालक मुलांचा इंग्रजी माध्यमात प्रवेश घेतात, याबाबत संकलित माहितीचे विश्लेषण दर्शविणारी सारणी**


**<u>सारणी क्र. ३</u>**

**<u>आलेख क्र. ३</u>**

**मराठी माध्यमात शिकल्याने मुलाच्या प्रगतीत इंग्रजी भाषेची**

| सहमत | असहमत | पूर्णतः सहमत | पूर्णतः असहमत |
|---|---|---|---|
| ५९.३० | २२.१० | १५.९० | २.७० |

**अडचण निर्माण होईल या भीतीमुळे पालक मुलांचा इंग्रजी माध्यमात प्रवेश घेतात, याबाबत संकलित माहितीचे विश्लेषण दर्शविणारा आलेख**



वरील सारणी क्र. १ व आलेख क्र. १ प्रमाणे मराठी माध्यमात शिकल्याने मुलाच्या प्रगतीत इंग्रजी भाषेची अडचण निर्माण होईल या भीतीमुळे पालक मुलांचा इंग्रजी माध्यमात प्रवेश घेतात, परंतु त्याचे प्रमाण हे कमी जास्त असल्याचे दिसून येते.

मराठी माध्यमात शिकल्याने मुलाच्या प्रगतीत इंग्रजी भाषेची अडचण निर्माण होईल या भीतीमुळे पालक मुलांचा इंग्रजी माध्यमात प्रवेश घेतात, याबाबत 'सहमत' असे मत असणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५९.३० % आढळून आली तर 'असहमत' असे मत असणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या २२.१० % दिसून येते. मराठी माध्यमात शिकल्याने मुलाच्या प्रगतीत इंग्रजी भाषेची अडचण निर्माण होईल या भीतीमुळे पालक मुलांचा इंग्रजी माध्यमात प्रवेश घेतात, याबाबत 'पूर्णतः सहमत' असे मत असणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी १५.९० % आढळून आली तर 'पूर्णतः असहमत' असे मत असणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी २.७० % दिसून येते.

थोडक्यात, मराठी माध्यमात शिकल्याने मुलाच्या प्रगतीत इंग्रजी भाषेची अडचण निर्माण होईल या भीतीमुळे पालक मुलांचा इंग्रजी माध्यमात प्रवेश घेतात, याबाबत 'सहमत' असे मत असणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त, तर 'पूर्णतः असहमत' असे मत असणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी दिसून येते.


**प्रश्न क्र. २ - मराठी माध्यमाच्या शाळेचा दर्जा खालावत चालल्याने शिक्षक होण्याकडे व शिक्षक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेण्यास विद्यार्थी उत्सुक दिसत नाहीत, याबाबत संकलित माहितीचे विश्लेषण दर्शविणारी सारणी**

**सारणी क्र. २**

| सहमत | असहमत | पूर्णतः सहमत | पूर्णतः असहमत |
|---|---|---|---|
| ४९.६० | २३.०० | २३.९० | ३.५० |

## आलेख क्र. २

**मराठी माध्यमाच्या शाळेचा दर्जा खालावत चालल्याने शिक्षक होण्याकडे व शिक्षक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेण्यास विद्यार्थी उत्सुक दिसत नाहीत, याबाबत संकलित माहितीचे विश्लेषण दर्शविणारा आलेख**




वरील सारणी क्र. २ व आलेख क्र. २ प्रमाणे मराठी माध्यमाच्या शाळेचा दर्जा खालावत चालल्याने शिक्षक होण्याकडे व शिक्षक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेण्यास विद्यार्थी उत्सुक दिसत नाहीत, परंतु त्याचे प्रमाण हे कमी जास्त असल्याचे दिसून येते.

मराठी माध्यमाच्या शाळेचा दर्जा खालावत चालल्याने शिक्षक होण्याकडे व शिक्षक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेण्यास विद्यार्थी उत्सुक दिसत नाहीत, याबाबत 'सहमत' असे मत असणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ४९.६० % आढळून आली तर 'पूर्णतः सहमत' असे मत असणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या २३.९० % दिसून येते. मराठी माध्यमाच्या शाळेचा दर्जा खालावत चालल्याने शिक्षक होण्याकडे व शिक्षक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेण्यास विद्यार्थी उत्सुक दिसत नाहीत, याबाबत 'असहमत' असे मत असणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या २३.०० % आढळून आली. मराठी माध्यमाच्या शाळेचा दर्जा खालावत चालल्याने शिक्षक होण्याकडे व शिक्षक

प्रशिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेण्यास विद्यार्थी उत्सुक दिसत नाहीत, याबाबत 'पूर्णतः असहमत' असे मत असणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ३.५० % आढळून आली.

थोडक्यात, मराठी माध्यमाच्या शाळेचा दर्जा खालावत चालल्याने शिक्षक होण्याकडे व शिक्षक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेण्यास विद्यार्थी उत्सुक दिसत नाहीत, याबाबत 'सहमत' असे मत असणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त आढळून आली तर 'पूर्णतः असहमत' असे मत असणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी आढळून आली.

**समारोप**

**सदर ग्रंथाच्या पानांची मर्यादित संख्या लक्षात घेता संशोधनातील प्रकरण ४ – माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन मधील संपूर्ण प्रश्नांचे आलेख, सारणी व त्यांचे स्पष्टीकरण न करता मोजके, महत्वपूर्ण प्रश्न, सारणी व आलेख यांचेच सादरीकरण केलेले असून ज्या वाचकांना संशोधनातील पूर्ण प्रश्न, सारणी व आलेखांचे स्पष्टीकरण ज्ञात व वाचन करायचे असतील त्यांनी लेखिकेशी संपर्क साधावा.**

या प्रकरणात संकलित माहितीचे सादरीकरण आणि विश्लेषण केले आहे. या प्रकरणात निश्चित केलेल्या उद्दिष्टांसाठी संशोधन अभ्यासात संशोधीकीने सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर केला. या प्रकरणात संशोधीकीने सर्वेक्षणद्वारे माहिती संकलनासाठी संशोधन साधनांचे शेकडा प्रमाण हे सांखीकीय साधन वापरून विश्लेषण केले. या प्रकरणामध्ये प्राप्त माहितीचे विश्लेषण, सारनीकरण, आलेख, कोष्टक याद्वारे अर्थनिर्वचन केले आहे.

पुढील प्रकरणांमध्ये संशोधनाचा सारांश मांडण्यात आलेला आहे. तसेच संशोधनाचे उद्दिष्ट निहाय निष्कर्षांची मांडणी आणि संशोधनाच्या निष्कर्षाला अनुसरून उद्दिष्ट निहाय शिफारशी व उपाययोजना सविस्तर मांडण्यात आलेल्या आहेत.

***

# प्रकरण ५
# निष्कर्ष व शिफारशी

## ५.१ प्रास्ताविक

कोणत्याही देशाच्या विकासात महत्वपूर्ण भूमिका ही मानवसंसाधनाची असते. मानवसंसाधनाचा विकास हा त्या देशातील शिक्षण व्यवस्थेवर अवलंबून असतो म्हणजेच देशाच्या विकासात शिक्षणाची भूमिका अतिशय महत्वाची असते. जगामधील विकसीत देशांचा विकास त्या देशातील उत्कृष्ट शिक्षणव्यवस्थेमुळे झालेला आहे. म्हणूनच शिक्षणपध्दती, शैक्षणिक धोरण, राष्ट्रीय धोरण यावर राष्ट्रीय गरजांचे प्रतिबिंब पडलेले आपल्याला जाणवते. कालानुरुप या गरजा बदलतात. त्यानुसार शिक्षणाची पुनर्रचना करणे ही आवश्यक बाब ठरते. शिक्षण हा मानवी विकासासाठी अतिशय महत्वाचा घटक आहे. शिक्षणामुळेच व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो. शिक्षणाबाबत अनेक तज्ज्ञांनी आपली मते व्यक्त केली आहेत. देशात दिले जाणारे शालेय शिक्षण हे देशाचा पाया असते. पाया मजबूत असल्याशिवाय इमारत मजबूत असू शकत नाही. आजचे अजाण बालक हे उद्याचे जबाबदार नागरीक असतात. देशातील नागरीक हे राष्ट्रीय मुल्य जपणारे, राष्ट्राभिमानी, साहसी, जिज्ञासू, सर्जनशील, राष्ट्रप्रेम जोपासणारे असावे, असे नागरीक घडवणारी परिपूर्ण शिक्षण व्यवस्था निर्माण करणे हे देशाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक असते.

**भारतातील प्राचीन शिक्षण प्रणाली**

आपली भारतीय संस्कृती जशी प्राचीन आहे, तशीच आपली शिक्षण प्रणाली सुद्धा प्राचीन कालखंडापासून प्रचलित आहे. या

काळात गुरुकुल शिक्षण पद्धती होती. इ.स. पूर्व बाराशे पर्यंतचा कालखंड हा साधारणतः या शिक्षण प्रणालीचा होता. या कालखंडालाच 'ऋग्वेद काल' असेही म्हणतात. या कालखंडात शिक्षण सर्वांसाठी मुक्त म्हणजे खुले होते ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चारही वर्णातील व्यक्तींना शिक्षण घेण्याचा अधिकार होता. पुरुषाप्रमाणेच स्त्रियांनाही शिक्षणाचा अधिकार होता. ऋग्वेदकालीन शिक्षण प्रणालीत शिक्षणाची ध्येय अत्यंत व्यापक होती. तत्कालीन शिक्षण केवळ पोटार्थी नव्हते, तसेच ते निव्वड पुस्तकी नव्हते. व्यक्तीला अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जाणे हे शिक्षणाचे ध्येय होते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे, सत्य, सेवा, नम्रता, शिस्त, संयम, कष्टाची सवय, धर्मपालनवृत्ती इत्यादी गुणांचे संवर्धन करून विद्यार्थ्यांचा मानसिक व शारीरिक विकास साधने हे शिक्षणाचे ध्येय मानले जाई. गुरुचे गुरुकुलातच वास्तव्य असे. गुरु हा ज्ञानी, चारित्र्यसंपन्न, निपक्षपाती असावा, अशी अपेक्षा असे. शिष्यांची ओळख त्याच्या गुरुवरून होई. शिष्यांच्या चांगल्या वाईट वर्तनाची जबाबदारी गुरुवर टाकली जाई.

**उत्तर वैदिक काळातील शिक्षण**

हा कालखंड सुमारे इ. स. पूर्व १२०० ते इ. स. पूर्व ६०० पर्यंतचा मानला जातो. या काळात धार्मिक, राजकीय व सामाजिक जीवनात मोठे बदल घडून आले. या काळात ब्राह्मणांचे महत्त्व वाढले. यज्ञ, धार्मिक विधींचे महत्त्व वाढले. वर्णव्यवस्था ठार झाली. स्त्रियांचे स्थान व दर्जा घसरला. शिक्षण पद्धतीतही महत्त्वाचे बदल घडून आले. या काळात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला. स्त्रियांच्या शिक्षणावर अनेक निर्बंध घालण्यात आले. त्यानंतर गुरुकुल पद्धती जाऊन आश्रम पद्धती विकसित झाली. आश्रमात वेदशास्त्राबरोबरच नितिशास्त्र, इतिहास, युद्धशास्त्र असे विविध विषय शिकवले जात. आश्रमातील विद्यार्थी आपल्या वर्णाला अनुसरून शिक्षण घेत. या काळात स्त्री शिक्षणाचा मात्र उत्तरोत्तर

संकोच होत गेला. राजघराण्यातील स्त्रिया शिक्षण घेत. सामान्य स्त्रिया मात्र शिक्षणापासून वंचित राहिलेल्या दिसतात.

**बौद्धकालीन शिक्षण प्रणाली**

प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीच्या विकासातील या कालखंडाला बौद्धकालीन शिक्षण पद्धतीचा कालखंड म्हणतात. साधारणता गौतम बुद्धाच्या बौद्ध धर्माच्या स्थापनेपासून तर सम्राट हर्षवर्धनाच्या राजवटीपर्यंत मानला जातो. हा कालखंड प्राचीन भारतीय शिक्षणात महत्त्वाचा मानला जातो. या काळात प्राथमिक शिक्षण बुद्ध मठात दिले जाई. उच्च शिक्षणासाठी या कालखंडात तक्षशिला, नालंदा, विक्रमशीला इत्यादी मोठ-मोठी विद्यापीठे स्थापन झाली. विद्यापीठांची स्थापना ही प्राचीन भारतीय शिक्षणाच्या विकासातील सर्वात प्रगत टप्पा मानला जातो. या विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना 'द्वार परीक्षा' नावाची अत्यंत कठीण परीक्षा द्यावी लागत असे. बौद्ध संघातून सर्वांच्या संमतीने निवडलेल्या विद्वान व चारित्र्यसंपन्न अशा भिक्षूकडे विद्यापीठाची प्रशासकीय सूत्रे दिली जात. बौद्ध विद्यापीठातून बौद्ध धर्माची शिकवण, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, शिल्पकला, संगीत, खगोलशास्त्र, व्याकरण तसेच इतर धर्माची शिकवण इत्यादी विषय शिकवले जात. हिंदू विद्यापीठात वेदविद्या, खगोल, संस्कृत, व्याकरण, धर्मशास्त्र, कला यांचे शिक्षण दिले जाई. या विषयाव्यतिरिक्त हस्तकला, वास्तुकला, शिल्पकला, विज्ञान, तंत्रज्ञान, औषधोपचार, शल्यचिकित्सा यांचेही शिक्षण दिले जाई. या विद्यापीठात देश विदेशातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असत. या काळातील काही प्रवाशांच्या प्रवासवर्णावरून असा संदर्भ मिळतो की, या विद्यापीठात जवळजवळ ४००० ते ५००० विद्यार्थी शिक्षण घेत असत.

**मध्ययुगीन कालखंड**

साधारण इ. स. १२०० ते इंग्रज भारतात येण्यापूर्वीचा कालखंड हा मध्ययुगीन कालखंड मानला जातो. या काळात शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात आकुंचन झालेले दिसते. ब्राह्मणांच्या

वर्चस्वामुळे सर्वसामान्यांना अज्ञानाच्या अंधारात खितपत पडावे लागले. तंत्र-मंत्र व जादूटोणा यांचे प्रस्थ वाढले. अनिष्ट चालीरीती, प्रथा, परंपरा व कट्टर धार्मिक विधी, होम-हवन यांचे प्रमाण वाढले. स्त्रियांच्या वरची बंधने जास्तच घट्ट झाली. त्यांना शिक्षणाची द्वारे पूर्णपणे बंद केली गेली. सर्वसामान्यांचे जीवन अज्ञानामुळे अघोरी प्रथांच्या आहारी गेले. हा कालखंड अंधाकारमय कालखंड म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या काळात महाराष्ट्रात विविध थोर संत होऊन गेले. त्यांनी अज्ञानात खितपत पडलेल्या समाजाला जागृत करण्याचे कार्य केले.

ब्रिटीश राजवटीत आधुनिक शिक्षणपध्दतीचा पाया इ.स. १८१३ च्या सनदेने घातला. हा सनदी कायदा म्हणजे चार्ल्स ग्रँटने केलेल्या आंदोलनातून मान्यता पावलेला ‘चार्टर ॲक्ट’ होय. या कायद्यानुसार भारतीयांच्या शिक्षणाची जबाबदारी ईस्ट इंडिया कंपनीकडे सोपविण्यात आली. भारताचे प्रशासकीय अधिकारी लॉर्ड बेंटिक यांनी शैक्षणिक समितीचे अध्यक्ष म्हणून लॉर्ड मेकॉले यांची नेमणूक केली. लॉर्ड मेकॉले यांनी शिक्षणविषयक पाझर सिध्दांत मांडला. या सिध्दांतानुसार शिक्षण फक्त उच्च वर्णीयांना द्यायचे व ते हळूहळू झिरपत झिरपत खालच्या वर्गापर्यंत पोहचेल. त्याचा मुख्य उददेश असा होता की, व्यक्तिचा अशा प्रकारचा समूह तयार करायचा जो की रक्तानी आणि रंगानी भारतीय पण त्यांची आवड, विचारसरणी, नैतिकता, बुद्धिमत्ता इंग्लिश (ब्रिटीश) स्वरुपाची असावी. ब्रिटीश राजवटीत राष्ट्रीय विकास हा शिक्षणाचा हेतू कधीच नव्हता. नोकरदार वर्ग तयार करण्यासाठी शैक्षणिक धोरण आखले गेले. भारतीय शिक्षण व्यवस्था पुर्णपणे बदलून टाकली. राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठी त्यांनी इंग्रजी शिक्षणाचा प्रसार केला आणि भारतीयांनी त्या शिक्षणाचा स्विकार सुध्दा केला.

भारतामध्ये आजही इंग्रजांनी निर्माण केलेल्या शिक्षणव्यवस्थेचे प्रतिबिंब बघायला मिळते.

आपल्या देशाला ब्रिटीश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष उलटून सुध्दा आपल्या शिक्षण व्यवस्थेत इंग्रजी भाषेचा प्रभाव कायम आहे. भारतीयांच्या मनात इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिकाधिक वाढलेला दिसतो. पालकांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून बालकांना शिक्षण देणे म्हणजे आपण आधूनिक, प्रगत विचारांचे आहोत अशी भावना वाढीस लागलेली बघायला मिळते.विद्यार्थी शिक्षणव्यवस्थेचा केंद्रबिंदू असून शिक्षण हे 'विद्यार्थी केंद्री' असावे. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करणारी शिक्षण पध्दती असावी. विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, तर्कशक्ती, जिज्ञासा, आकलन क्षमता वाढीस लावणारी पध्दती आवश्यक आहे. हे उदिष्ट इंग्रजी माध्यमांद्वारे पूर्ण होण्यात अडथळे येतात. विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण देणे हे अधिक परिणामकारक असते. शिक्षणातील संकल्पना विद्यार्थ्यांना स्वभाषेतून लवकर समजतात. त्यांच्यातील जिज्ञासा जागृत होते. आकलन क्षमता विकसीत होते. विद्यार्थ्यांच्या कुटूंबातील व परिसरातील भाषेत शिक्षण दिल्यामुळे अध्ययन सहज, आनंदी होते. विद्यार्थ्यांना ताण येत नाही. जगभरात भाषा व शिक्षणतज्ञांनी केलेले विविध अभ्यास असे दर्शवितात की, मातृभाषेतून मूलभूत शिक्षण मिळाल्यास विद्यार्थी अधिक चांगली प्रगती करतात.

वर्तमानकाळात मराठी माध्यमांच्या शाळेची पालक पाल्याकरिता निवड करत नाहीत. शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातील पालकसुद्धा आपल्या पाल्याचे भविष्य उज्ज्वल व सुरक्षित करण्याच्या आशेने इंग्रजी माध्यमाच्या शाळेची निवड प्रवेशासाठी करतात. मराठी माध्यमाचा शाळेचा दर्जा, गुणवत्ता व भौतिक

सुविधा यावर प्रश्नचिन्ह निर्माण करून इंग्रजी माध्यमांच्या शाळा आपल्या व्यवसायाच्या कक्षा रुंदावत आहे. 'गाव तिथे जिल्हा परिषदेची मराठी शाळा' असे चित्र असणारे महाराष्ट्र राज्यात आज 'गाव तिथे इंग्रजी शाळा' असे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. त्याचबरोबर शहरी भागातसुद्धा प्रशस्त मोठमोठ्या शाळांच्या बिल्डिंग बहुतेक सुविधा पालकांना आकर्षित करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा ओढा शहराकडे स्थलांतर अगदी प्राथमिक स्तरापासून येताना दिसतो, ही बाब चिंतेची आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतल्यानंतर निर्माण होणारे शैक्षणिक समस्या, भाषिक अडथळे यांविषयी प्रवेश घेताना कुठलाही पालकांमार्फत विचार केलेला नसतो. शालेय शिक्षण मातृभाषेतून घेतल्यामुळे बालकांच्या आकलनशक्तीस भरपूर चालना मिळते. संकल्पना लवकर समजतात व इंग्रजीसह सर्व विषयांचे उत्तम आकलन होते. मातृभाषेतून शिकल्यामुळे वाचनाची आवड निर्माण होऊन उत्तम ज्ञान, जिज्ञासा निर्माण होते. संशोधन वृत्ती व अभिरुची संपन्न व्यक्तिमत्व तयार होते. याउलट जर बालकांना इतर भाषेतून शिक्षण दिल्यामुळे अध्ययनात अडचणी येऊन बालकांना मानसिक ताणतणाव येतो. याबद्दल पालक जागरूक नसतात. प्रस्तुत संशोधनात स्थानिकभाषा व मातृभाषा शिक्षणासाठी परिणामकारक असते याविषयी जाणीव निर्माण करणे, देशाचा उज्ज्वल भविष्यसाठी उत्तम मनुष्यबळ, व्यक्तिमत्व निर्माण करण्यासाठी प्रस्तुत संशोधन करणे महत्त्वाचे ठरेल. प्राथमिक शिक्षक हा अतिशय महत्त्वाचा टप्पा असतो. त्यात मुलांचा बौद्धिक, मानसिक, भावनिक, शारीरिक विकास होत असतो. त्यामुळे तरुण व प्रौढावस्थेतील अनेक समस्या आपण टाळू शकतो. पण या वयात मुलांना शैक्षणिक ताणतणावाला सामोरे जावे लागते. पालकांच्या अपेक्षा, शिक्षकांची अपेक्षा, शाळेतील गृहपाठ, शिकवणीवर्ग, परीक्षेचे दडपण, स्पर्धेच्या युगात टिकण्याचा ताण, मित्रांचा ताण अशा अनेक गोष्टींचा मुलांवर ताण

आलेला असतो. बऱ्याच वेळा मुलं पालकांसोबत शिक्षणाबाबत खुल्या मनाने संवाद करत नाहीत. मनातल्या मनात कुढत राहतात. याकरिता मुलांची मानसिक स्थिती पालकांनी व शिक्षकांनी वेळीच ओळखणे व त्यावर उपाययोजना करणे आवश्यक असते. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये जर काही ताणतणाव किंवा भाषिक अडथळे निर्माण होत असतील तर ते दूर करण्यासाठी यथोचित उपायोजना करून मुलांना तनावमुक्त करणे, यासाठी पालकांमध्ये दृष्टिकोन निर्माण होण्याची आवश्यकता आहे. आज पालकांची मुलांच्या शिक्षणावर भरपूर पैसा खर्च करण्याची मनस्थिती आहे. परंतु पैशाबरोबर मुलांच्या शैक्षणिक प्रगतीत स्वतः वेळ देण्याची आवश्यकता आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना विद्यार्थ्यांची मातृभाषा व शिक्षणाचे माध्यम वेगवेगळे असल्यामुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेण्यासाठी संशोधन कार्य केले. प्रस्तुत संशोधनामुळे विद्यार्थ्यांना अध्ययन करताना कोणत्या शैक्षणिक समस्या जाणवतात याविषयीची वस्तुस्थितीदर्शक माहिती मिळण्यास मदत झाली. तसेच या संशोधनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आकलन, जिज्ञासा, चिकित्सक विचार प्रक्रिया व व्यक्त होण्यात अडथळा निर्माण होऊन संभाषण कौशल्य विकसित न होण्यामागील कारणांचा शोध घेतला. विद्यार्थ्याची मातृभाषा व शिक्षणाच्या माध्यमाची भाषा वेगवेगळी असल्यामुळे निर्माण होणाऱ्या भाषिक अडथळयांची माहिती आणि विद्यार्थ्याची मातृभाषा व शिक्षणाच्या माध्यमाची भाषा वेगवेगळी असल्याने निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेतला. शिक्षण विषयक कुठल्याही योजनेच्या केंद्रस्थानी शिक्षकच असतो. कोणतिही शिक्षण योजना शिक्षकाशिवाय राबवली जाऊ शकत नाही म्हणनू शिक्षकांचे संबंधीत सर्व विषयावर त्याचे सखोल चिंतन हवे. त्यासाठी भरपूर वाचन भरपूर श्रवण करायला हवे. आपल्या दैनंदिन अध्यापनात त्याचा वापर करावा. शिक्षक ही केवळ व्यक्ती नसून संस्काराचे एक विद्यापीठ आहे. विद्यार्थी घडवून एक संवेदनशील नागरिक घडवणे

आणि अशा नागरिकांच्या माध्यमातुनू राष्ट्रनिर्मिती व मनुष्य निर्माणाचे कार्य करून शिक्षक खऱ्या अथाने सृजनात्मक साधक असतो.

प्रस्तूत संशोधनात इंग्रजी माध्यमाच्या शाळेत अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना जाणवणाऱ्या समस्यांचा शोध घेणे, इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता आणि त्यांच्या शैक्षणिक विकासाबाबत पालकांच्या जागरुकतेचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला. मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश न घेण्यामागील कारणांचा शोध घेण्यात आला. विद्यार्थी संख्येच्या गळतीमुळे शिक्षक अतिरिक्त होतात. त्यामुळे नवीन शिक्षक भरती न झाल्यामुळे शिक्षक बेरोजगारीची समस्या वाढली. वंचित घटकातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल बालकांना मोफत मिळणारे शिक्षण देणाऱ्या शाळांची दुरवस्था झाल्यामुळे या शाळा बंद पडत आहेत. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल बालकांना शिक्षणापासून वंचित राहण्याची समस्या निर्माण झाली. करीता प्रस्तुत विषयावर संशोधन करणे आवश्यक आहे.

## ५.३ संशोधनाचे निष्कर्ष

### ५.३.१ <u>उद्दिष्ट क्र. १ -</u>

**इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता व कौटुंबिक वातावरणाचा अभ्यास या उद्दिष्टानुसार विद्यार्थी पदनिश्चयन श्रेणीद्वारे प्राप्त निष्कर्ष.**

१. जेव्हा मूड असतो, तेव्हा मुले अभ्यासासाठी 'बरेचदा' बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वात जास्त ३६.९२ टक्के आढळून आले तर 'कधीच न' बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वात कमी ३.९९ टक्के आढळून आले.

यावरून अभ्यासाची सवय विदार्थ्यांच्या मानसिक मूडवर अबलंबून असल्याचे दिसून येते. (कोष्टक क्र. १)

२. अभ्यास करताना मोबाईल किंवा टीव्ही सुरू असतो, तेव्हा 'कधीच नाही', असे मत नोंदवीणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वात जास्त ४६.२० टक्के आढळून आले तर 'नेहमी' अभ्यास

करावासा वाटतो, असे मत नोंदवीणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वात कमी ६.४३ टक्के आढळून आले.

मोबाईल, टी.व्ही. सुरु असल्यास विद्यार्थ्यांना अभ्यासत व्यत्यय निर्माण होतो, असे स्पष्ट होते. (कोष्टक क्र. १)

३. अभ्यास करताना 'बरेचदा' झोप येते, असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वात जास्त ४८.४० टक्के आढळून आले तर अभ्यास करताना 'कधीच झोप न येणाऱ्या' विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वात कमी २.७९ टक्के आढळून आले.

यावरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रतेचा अभाव असतो. (कोष्टक क्र. १)

४. कठीण जाणाऱ्या विषयांचा अभ्यास करण्यासाठी "कधीकधी" कंटाळा येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३०.२८ टक्के तर "क्वचित" कठीण जाणाऱ्या विषयांचा अभ्यासचा कंटाळा येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी १४.६० टक्के आढळून आली.

यावरून असे स्पष्ट होते की, कठीण विषय विद्यार्थ्यासाठी नकारात्मक मानसिकता तयार करतात. (कोष्टक क्र. १)

५. अभ्यास करताना एकटे बसल्यापेक्षा मित्रांसोबत 'कधीच नाही' नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वात जास्त ४७.१४ टक्के तर अभ्यास करताना एकटे बसल्यापेक्षा मित्रांसोबत 'बरेचदा' अभ्यास करायला आवडत असणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वात कमी २.१९ टक्के आढळून आले. (कोष्टक क्र. १)

यावरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे अभ्यास करणे अधिक पसंत आहे.

६. कठीण घटकाचे वाचन केल्यावर 'बरेचदा' विस्मरण होऊन दडपण येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त २९.८८ टक्के आढळून आली तर कठीण घटकांचे वाचन केल्यावर विस्मरण

होऊन दडपण 'कधीच नाही' असे नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी १३.६९ टक्के आढळून आली.

यावरून असे स्पष्ट होते की, कठीण विषय विद्यार्थ्यांना तणावग्रस्त करतात.(कोष्टक क्र. १)

७. वाढलेली जागतिक स्पर्धा व विषयांची वाढती संख्या यामुळे 'कधीकधी' मानसिक ताण निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त २४.५८ टक्के आणि सर्वात कमी 'क्वचित' मानसिक ताण निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १२.१० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, वाढलेली जागतिक स्पर्धा व विषयांची वाढती संख्या यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर परिणाम होत आहे. (कोष्टक क्र. १)

८. पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा मनावर ताण निर्माण 'कधीच नाही' असे नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त २७.७४ टक्के तर 'क्वचित' पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा मनावर ताण निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ११.६५ टक्के आढळून आली.

यावरून असे स्पष्ट होते की, पालकांच्या अपेक्षा काही विद्यार्थ्यांना मानसिक दडपण आणतात, तर काही विद्यार्थ्यांवर पालकांच्या अपेक्षांचा परिणाम होत नाही. (कोष्टक क्र. १)

९. पालकांशी अभ्यासात येणाऱ्या अडचणी विषयी बोलताना भीती वाटत 'कधीच नाही' असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३५.०० टक्के आणि पालकांशी अभ्यासात येणाऱ्या अडचणी विषयी बोलताना 'नेहमी' भीती वाटते, असे नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी १०.५३ टक्के आढळून आली.

यावरून असे दिसते की, बहुतेक विद्यार्थी पालकांशी संवाद साधताना सकारात्मक दृष्टिकोन बाळगतात. (कोष्टक क्र. १)

१०. अभ्यासत येणाऱ्या अडचणी, पडलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतःलाच 'बरेचदा' शोधावी लागणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३३.४४ टक्के आणि अभ्यासात येणाऱ्या अडचणी, पडलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतःला 'कधीच शोधावी लागत नाहीत' असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ६.१७ टक्के आढळून आली.

यावरून विद्यार्थी स्वयंअध्ययन व स्व-संशोधनाकडे अधिक प्रवृत्त असल्याचे दिसते. (कोष्टक क्र. १)

११. अभ्यास करत असतांना पालक मध्येच कामानिमित्त उठवत नाहीत 'कधीच नाही' असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ७०.८३ टक्के आढळली.

यावरून विद्यार्थ्यांच्या अभ्यासाला पालकांची आडकाठी आणणारी हस्तक्षेपात्मक वृत्ती कमी असल्याचे दिसते. (कोष्टक क्र. २)

१२. आई बाबा रागावतील म्हणून अभ्यासाला बसणाऱ्या 'कधीच नाही' विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३३.२४ टक्के आढळून आली तर 'क्वचित' रागावतील म्हणून अभ्यासाला बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वात कमी ९.६२ टक्के आढळून आले.

यावरून पालकांच्या रागामुळे अभ्यास करणारी वृत्ती विद्यार्थांमध्ये फारशी दिसत नाही. (कोष्टक क्र. २)

१३. नियमित गृहपाठ केल्यावर पालकांकडून बक्षीस 'कधीच मिळत नाही' असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ५८.३४ टक्के आढळून आली तर नियमित गृहपाठ केल्यावर पालकांकडून बक्षीस 'क्वचित' मिळणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वात कमी ४.१६ टक्के आढळून आले.

यावरून पालकांचे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रोत्साहन मर्यादित प्रमाणात असल्याचे दिसून आले. (कोष्टक क्र. २)

१४. घरी वर्तमानपत्र इंग्रजी भाषेतील 'कधीच नसते' असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ५६.५२ टक्के

आढळून आली तर घरी वर्तमानपत्र इंग्रजी भाषेतील 'नेहमी' असते असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वात कमी ००.०० टक्के आढळून आले.

यावरून विद्यार्थ्यांच्या घरी इंग्रजी भाषेतील वर्तमानपत्र नसल्याचे दिसून आले. (कोष्टक क्र. २)

१५. घरात अभ्यासासाठी पोषक, शांत, आनंदी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न आई-बाबा 'नेहमी' करतात असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ६९.५७ टक्के आढळली तर घरात अभ्यासासाठी पोषक, शांत, आनंदी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न आई-बाबा 'कधीच करत नाहीत' असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ००.०० टक्के एवढी आढळून आली.

यावरून असे दिसते की, घरात अभ्यासासाठी पोषक, शांत, आनंदी वातावरण निर्माण करण्याची पालकांची प्रवृत्ती दिसून येते. (कोष्टक क्र. २)

१६. पालक आपल्या मुलांची पाढे, गणितीय सूत्रे, समीकरणे, संज्ञा यांची चाचणी स्वतः 'नेहमी' आणि 'कधीकधी' घेतात असे समसमान मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त २६.०९ टक्के आढळून आली तर पालक आपल्या मुलांची पाढे, गणितीय सूत्रे, समीकरणे, संज्ञा यांची चाचणी स्वतः 'कधीच घेत नाहीत' असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी १३.०४ टक्के आढळून आली.

यावरून पालक आपल्या मुलांची पाढे, गणितीय सूत्रे, समीकरणे, संज्ञा यांची चाचणी घेवून मुलांची प्रगती माहित करून घेतात हे स्पष्ट होते. (कोष्टक क्र. २)

१७. पाल्याविषयी शैक्षणिक अडचण निर्माण झाल्यास पालक शिक्षकांना भेटून त्याविषयी 'कधीकधी' चर्चा करतात असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३४.७८ टक्के

आढळून आली तर पाल्याविषयी शैक्षणिक अडचण निर्माण झाल्यास पालक शिक्षकांना भेटून त्याविषयी 'क्वचित' चर्चा करतात असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ४.३५ टक्के आढळली.

यावरून असे दिसते की, पाल्याविषयी शैक्षणिक अडचण निर्माण झाल्यास पालक शिक्षकांना भेटून चर्चा करून समस्या दूर करतात. (कोष्टक क्र. २)

१८. पालक शिक्षण क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेचा मुलांच्या मानसिकतेवर होणाऱ्या परिणामाविषयी 'बरेचदा' जागरूक आहेत असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ४३.४८ टक्के आढळून आली तर पालक शिक्षण क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेचा मुलांच्या मानसिकतेवर होणाऱ्या परिणामाविषयी 'क्वचित' जागरूक आहेत असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ४.३५ टक्के आढळून आली.

यावरून पालक शिक्षण क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेचा मुलांच्या मानसिकतेवर होणाऱ्या परिणामाविषयी जागरूक असल्याचे स्पष्ट होते. (कोष्टक क्र. २)

१९. आई-वडील कामात असतांना सुद्धा अभ्यासातील अडचणी 'नेहमी' ऐकून घेतात असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ५६.५२ टक्के आढळून आली तर आई-वडील कामात असतांना सुद्धा अभ्यासातील अडचणी 'कधीच ऐकून घेत नाहीत' असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ००.०० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसते की, पालक कामात असतांना सुद्धा पाल्यांच्या अडचणी समजून घेवून त्या सोडविण्यात पुढाकार घेतात. (कोष्टक क्र. २)

२०. विद्यालयातील कार्यक्रमांना पाहण्याकरिता पाल्यांचे आई-बाबा 'नेहमी' आवर्जून येतात असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ६०.८७ टक्के आढळून आली तर विद्यालयातील कार्यक्रमांना पाहण्याकरिता पाल्यांचे आई-

बाबा 'क्वचित' येतात असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ००.०० टक्के आढळून आली.

यावरून असे स्पष्ट होते की, पाल्यांना शैक्षणिक प्रगतीबरोबर इतर सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहन देतात. (कोष्टक क्र. २)

२१. शिक्षणातील गरजांची पूर्तता आई-बाबा अतिशय आनंदाने 'नेहमी' करतात असे मत सर्वात जास्त ७०.८० टक्के विद्यार्थ्यांनी नोंदविले तर शिक्षणातील गरजांची पूर्तता आई बाबा 'कधीच करत नाहीत' असे मत व्यक्त नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी २.०० टक्के आढळून आली.

यावरून पाल्याच्या शिक्षणातील गरजांची पूर्तता पालक आनंदाने पूर्ण करतात हे स्पष्ट होते. (कोष्टक क्र. २)

२२. विद्यार्थी जेव्हा क्षमतेपेक्षा अधिक कठीण काम करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा सर्वात जास्त ६३.९७ टक्के आई-बाबा त्यांना 'नेहमी' पाठबळ देत असल्याचे आढळून आले आणि विद्यार्थी जेव्हा क्षमतेपेक्षा अधिक कठीण काम करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा 'क्वचित' पाठबळ देणाऱ्या आई-बाबांची संख्या सर्वात कमी ५.५० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसते की, क्षमतेपेक्षा अधिक कठीण काम करण्यास पालक पाल्यांना प्रोत्साहन देतात. (कोष्टक क्र. २)

२३. अभ्यास कसा करावा ? याविषयी आई-बाबा मुलांना मार्गदर्शन कधीच करत नाहीत असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ५६.५२ टक्के आढळली तर अभ्यास कसा करावा ? याविषयी आई-बाबा मुलांना 'बरेचदा' मार्गदर्शन करतात असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ४.३५ टक्के आढळली.

यावरून असे स्पष्ट होते की, अभ्यास कसा करावा याविषयी पालक पाल्यांना मार्गदर्शन करत नाहीत. (कोष्टक क्र. २)

२४. कुटुंबाची भाषा व शाळेतील भाषा वेगवेगळी असल्यामुळे अध्ययनात भाषिक अडथळे 'कधीच निर्माण होत नाहीत' असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३४.०३ टक्के आणि विद्यार्थ्यांना कुटुंबाची भाषा व शाळेतील भाषा वेगवेगळी असल्यामुळे अध्ययनात 'नेहमी' भाषिक अडथळे निर्माण होते असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्याची संख्या सर्वात कमी ८.८१ टक्के आढळून आली.

यावरून विद्यार्थ्यांना कुटुंबाची भाषा व शाळेतील भाषा वेगवेगळी असल्यामुळे अध्ययनात भाषिक अडथळे निर्माण होत नाहीत हे स्पष्ट होते. (कोष्टक क्र. ३)

२५. पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा मनावर ताण निर्माण 'कधीच नाही' होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३४.७८ टक्के तर 'क्वचित' पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा मनावर ताण निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३०.४३ टक्के आढळून आली.

यावरून असे दिसते की, पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा काही विद्यार्थ्यांच्या मनावर ताण निर्माण नाही तर काहींच्या मनावर ताण निर्माण होतो. (कोष्टक क्र. ३)

२६. परीक्षेत अपेक्षित गुण संपादन न केल्यास आई-बाबा इतर मुलांशी 'नेहमी' तुलना करतात असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त २७.२१ टक्के आणि परीक्षेत अपेक्षित गुण संपादन न केल्यास आई-बाबा इतर मुलांशी 'क्वचित' तुलना करतात असे मत नोंदवणाऱ्याची संख्या सर्वात कमी १४.२७ टक्के आढळली.

यावरून असे स्पष्ट होते की, पाल्याने परीक्षेत अपेक्षित गुण संपादन न केल्यास पालक इतर मुलांशी तुलना करतात. (कोष्टक क्र. ३)

२७. एखाद्या कामात मग्न असतांना बाबांना काही प्रश्न विचारल्यास ते मुलांवर रागावून त्यांना हाकलून देत 'कधीच नाही असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त

६५.२२ टक्के आढळून आली तर नेहमी असा प्रतिसाद नोंदविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १७.३९ टक्के आढळून आली.

यावरून पालकांची कामात मग्न असतांना सुद्धा पाल्यांच्या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची प्रवृत्ती आढळून आली. (कोष्टक क्र. ३)

२८. मित्रांपेक्षाही अधिक चांगले गुण प्राप्त करावेत अशी आई-बाबांची इच्छा 'नेहमी' असते, असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ६३.३० टक्के आढळून आली आणि मित्रापेक्षाही अधिक चांगले गुण प्राप्त करावेत अशी आई-बाबांची 'क्वचित' इच्छा असते, असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ६.५४ टक्के आढळून आली आढळून आली.

यावरून असे दिसते की, पाल्याने मित्रांपेक्षाही अधिक चांगले गुण प्राप्त करावेत अशी पालकांची इच्छा असते. (कोष्टक क्र. ३)

२९. अभ्यासाच्या बाबतीत मित्रांसमवेत आई 'कधीकधी' टाकून बोलते असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त २५.५४ टक्के आढळून आली तर अभ्यासाच्या बाबतीत मित्रासमवेत आई 'क्वचित' टाकून बोलते असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी विद्यार्थ्यांची संख्या १३.३८ टक्के आढळून आली.

यावरून असे स्पष्ट होते की, अभ्यासाच्या बाबतीत कुटुंबाकडून अपमानास्पद वागणूक देण्याचे प्रकार घडतात. (कोष्टक क्र. ३)

३०. मातृभाषेतील शब्दाला शिक्षणाच्या माध्यमातून शब्द कोणता ? हे 'कधीकधी' सांगू न शकणाऱ्या पालकांची संख्या सर्वात जास्त विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त २४.२० टक्के आढळून आली तर मातृभाषेतील शब्दाला शिक्षणाच्या

माध्यमातून शब्द 'क्वचित' सांगू न शकणाऱ्या पालकांची संख्या सर्वात कमी विद्यार्थ्यांची संख्या १४.३१ टक्के आढळून आली.

यावरून पालकांमध्ये इंग्रजी भाषेचा शब्दसाठा कमी आढळून येत असल्याचे हे स्पष्ट होते. (कोष्टक क्र. ३)

३१. विद्यार्थी जेव्हा कोणत्याही गोष्टीबद्दल वडिलांना प्रश्न विचारतात तेव्हा ते तो प्रश्न आईवर ढकलून देत 'कधीच नाही' असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३२.४० टक्के आढळून आली आणि जेव्हा कोणत्याही गोष्टीबद्दल वडिलांना प्रश्न विचारतात तेव्हा ते तो प्रश्न 'क्वचित' आईवर ढकलून देतात असे मत सर्वात कमी विद्यार्थ्यांची संख्या १०.७५ टक्के आढळून आली विद्यार्थ्यांचे दिसून येते.

यावरून असे दिसते की, पालकांमध्ये पाल्यांचे प्रश्न एकमेकांवर ढकलून देण्याची वृत्ती आढळून आली. (कोष्टक क्र. ३)

३२. कुटुंबात असूनही एकटेपणाचा अनुभव 'कधीच नाही' करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त २९.४० टक्के आणि विद्यार्थी कुटुंबात असूनही एकटेपणाचा अनुभव 'कधीकधी' करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २८.६६ टक्के आढळून आली.

यावरून असे स्पष्ट होते की, मुलांना कुटुंबात असूनही एकटेपणाचा सकारात्मक व नकारात्मक परिणाम आढळून येतो. (कोष्टक क्र. ३)

३३. परीक्षेत आई-बाबांच्या इच्छेनुरूप गुण प्राप्त न झाल्यास ते 'नेहमी' दुःखी होतात असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त २४.७६ टक्के आणि परीक्षेत आई-बाबांच्या इच्छेनुरूप गुण प्राप्त न झाल्यास 'क्वचित' अत्यंत दुःखी होणाऱ्या पालकांची संख्या सर्वात कमी १३.६२ टक्के आढळून आली.

यावरून पालक पाल्यास परीक्षेत इच्छेनुरूप गुण प्राप्त न झाल्यास दुःखी होतात हे स्पष्ट होते. (कोष्टक क्र. ३)

३४. अभ्यासात येणाऱ्या अडचणी, पडलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतःलाच 'बरेचदा' शोधावी लागणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३३.४४ टक्के आणि अभ्यासात येणाऱ्या अडचणी, पडलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतःला 'कधीच नाही' शोधावी लागत असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ६.१७ टक्के आढळून आली.

यावरून असे दिसते की, विद्यार्थ्यांना अभ्यासात येणाऱ्या अडचणी स्वतःलाच सोडवाव्या लागतात. (कोष्टक क्र. ३)

३५. अभ्यास करताना एखादा भाग, संकल्पना समजली नाही तरीही ती संकल्पना "नेहमी" पाठ करण्याचा प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३९.४० टक्के तर "कधीच नाही" पाठ करण्याचा प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ७.४९ टक्के आढळून आली.

यावरून असे स्पष्ट होते की, विद्यार्थ्यांमध्ये पाठांतर करण्याची वृत्ती आढळते. (कोष्टक क्र. ४)

३६. अभ्यास करताना आवश्यकता पडल्यास शब्दांचे अर्थ समजण्यासाठी डिक्शनरीचा उपयोग 'बरेचदा' करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३४.७८ टक्के आढळून आली तर अभ्यास करताना आवश्यकता पडल्यास शब्दांचे अर्थ समजण्यासाठी डिक्शनरीचा उपयोग 'कधीच नाही' करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ००.०० टक्के आढळून आली.

यावरून विद्यार्थी शब्दांचे अर्थ समजण्यासाठी डिक्शनरीचा उपयोग करतात हे स्पष्ट होते. (कोष्टक क्र. ४)

३७. विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसाद अनुसार, अभ्यासाबरोबरच चित्रकला व हस्तकला, गायन, नृत्य इत्यादी छंद जोपासण्यासाठी विद्यार्थ्यांना वेळ 'कधीकधी' मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त २६.०९ टक्के आढळून आली

तर ‘कधीच नाही’ असे मत नोंदविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी १७.४१ टक्के आढळून आली.

यावरून असे दिसते की, छंद जोपासण्यासाठी विद्यार्थ्यांना कमी वेळ मिळतो. (कोष्टक क्र. ४)

३८. शाळेत बोलण्यासाठी इंग्रजी भाषेचाच उपयोग ‘कधीकधी’ करावा लागतो असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ५६.५२ टक्के आढळून आली.

यावरून असे स्पष्ट होते की, विध्यार्थी शाळेत बोलण्यासाठी इंग्रजी भाषेचा उपयोग करतात. (कोष्टक क्र. ४)

३९. विद्यार्थ्यांना शिक्षकांसोबत बोलताना ‘कधीकधी’ दडपण येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त २३.७४ टक्के आणि शिक्षकांसोबत बोलताना ‘क्वचित’ दडपण येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी १४.५० टक्के आढळून आली.

यावरून विद्यार्थ्यांना शिक्षकांसोबत बोलताना दडपण येते हे स्पष्ट होते. (कोष्टक क्र. ४)

४०. अभ्यासाबरोबर इतरही क्षेत्रामध्ये नैपुण्य मिळवावे अशी विद्यार्थ्याच्या आई-बाबाची इच्छा ‘नेहमी’ असते असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ६०.८७ टक्के आढळून आली तर अभ्यासाबरोबर इतरही क्षेत्रामध्ये नैपुण्य मिळवाव अशी विद्यार्थ्याच्या आई-बाबाची इच्छा ‘कधीच नाही’ असे मत नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ००.०० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसते की, अभ्यासाबरोबर इतरही क्षेत्रामध्ये नैपुण्य मिळवावे अशी विद्यार्थ्याच्या पालकांची इच्छा असते. (कोष्टक क्र. ४)

४१. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकलेल्या घटकाविषयी तो घटक मातृभाषेतून समजून घेण्यासाठी पालक ‘नेहमी’ मार्गदर्शन करतात असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३९.१३ टक्के आढळून आली आणि ‘कधीच नाही’

असे मत नोंदविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४.३४ टक्के आढळून आली.

यावरून असे स्पष्ट होते की, पालकांचा पाल्यांना मार्गदर्शन करण्याकडे कल आढळून येतो. (कोष्टक क्र. ४)

४२. इंग्रजी माध्यमातून शाळेत सांगितलेल्या शब्दांचे मातृभाषेत अर्थ समजण्यासाठी 'नेहमी' घरी पालकांना विचारणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३५.३३ टक्के आणि इंग्रजी माध्यमातून शाळेत सांगितलेल्या शब्दांचे मातृभाषेतून अर्थ समजण्यासाठी घरी पालकांना 'कधीच नाही' विचारणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ७.४५ टक्के एवढी असल्याचे आढळून आली.

यावरून विद्यार्थ्यांजवळ मातृभाषेतील शब्दसाठा कमी असल्याचे स्पष्ट होते. (कोष्टक क्र. ४)

४३. आवडीच्या विषयांचा अभ्यास कितीतरी तासांपर्यंत 'नेहमी' करतात, अशा विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ४४.६५ टक्के आढळून आली तर आवडीच्या विषयांचा अभ्यास कितीतरी तासांपर्यंत करणाऱ्या 'क्वचित' करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ३.०४ टक्के आढळून आली.

यावरून असे दिसते की, आवडीच्या विषयांचा अभ्यास विद्यार्थी स्वयं प्रेरणेने करतात. (कोष्टक क्र. ५)

४४. मुलांनी अभ्यासाची दैनंदिन वेळ निश्चित केलेली आहे. त्याकरिता नियोजित वेळ व नियोजित जागेचा 'नेहमी' वापर करतात, अशा विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ५२.१७ टक्के आढळून आली तर अभ्यासासाठी दैनदिन नियोजित वेळ व नियोजित जागेचा 'कधीच नाही' करत अशा विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ४.३५ टक्के आढळून आली.

यावरून असे स्पष्ट होते की, विद्यार्थी अभ्यासासाठी नियोजित वेळ व नियोजित जागेचा वापर करण्यास प्राधान्य देतात. (कोष्टक क्र. ५)

४५. गृहपाठ (होमवर्क) करताना दुसऱ्यांच्या नोटबुकचा उपयोग 'क्वचित' करतात, अशा विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ४३.४९ टक्के आढळून आली.

यावरून विद्यार्थ्यांमध्ये गृहपाठ (होमवर्क) स्वतः करण्याची वृत्ती असल्याचे दिसून येते. (कोष्टक क्र. ५)

४६. अभ्यासाला बसले असता भूक लागते त्यावेळी 'बरेचदा' मध्येच उठून काहीतरी खातात, अशा विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त २६.३० टक्के आढळून आली. अभ्यासाला बसले असता भूक लागते त्यावेळी 'नेहमी' मध्येच उठून काहीतरी खातात, अशा विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी १५.१४ टक्के आढळून आली.

यावरून असे दिसते की, विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाच्या बाबतीत एकाग्रतेचा अभाव आढळून येतो. (कोष्टक क्र. ५)

४७. कोणत्याही विषयातील विविध घटकांचा व संकल्पनांचा अभ्यास व माहिती मिळवण्यासाठी युट्युब व गुगलचा उपयोग 'बरेचदा' करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३१.६५ टक्के तर उपयोग 'कधीच नाही' करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ३.५२ टक्के आढळून आली.

यावरून असे स्पष्ट होते की, विद्यार्थ्यांमध्ये विविध घटकांचा व संकल्पनांचा अभ्यास व माहिती मिळवण्यासाठी बाह्य साधनांचा उपयोग करण्याकडे कल वाढत आहे. (कोष्टक क्र. ५)

४८. अंथरुणावर लोळत पडून किंवा झोपून पुस्तके 'कधीच नाही' वाचणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ३१.६८ टक्के तर अंथरुणावर लोळत पडून किंवा झोपून 'कधीकधी' पुस्तके वाचणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २७.०७ टक्के आढळली.

यावरून विद्यार्थांमध्ये अभ्यास करावयाच्या चांगल्या सवयी असल्याचे स्पष्ट होते. (कोष्टक क्र. ५)

४९. अभ्यास संपल्यावर अभ्यासाचे साहित्य जसे वह्या, पुस्तके, पेन, दप्तर ‘नेहमी’ व्यवस्थित ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ८२.६१ टक्के आढळून आली तर अभ्यास संपल्यावर अभ्यासाचे साहित्य जसे वह्या, पुस्तके, पेन, दप्तर व्यवस्थित ‘कधीच नाही’ ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ००.०० टक्के आढळून आली.

यावरून विद्यार्थांमध्ये निटनेटकेपणाच्या चांगल्या सवयी असल्याचे स्पष्ट होते.(कोष्टक क्र. ५)

५०. स्वतःचे विचार मातृभाषेतून प्रभावीपणे ‘नेहमी’ व्यक्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त ४७.८३ टक्के आढळून आली तर स्वतःचे विचार मातृभाषेतून प्रभावीपणे ‘क्वचित’ व्यक्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ००.०० टक्के आढळून आली.

यावरून असे स्पष्ट होते की, इंग्रजी माध्यमातील विद्यार्थी स्वतःचे विचार मातृभाषेतून प्रभावीपणे व्यक्त करतात. (कोष्टक क्र. ५)

**५.३.२ उद्दिष्ट क्र. २ –**

**विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शिक्षणाचे माध्यम निवडतांना पालकांमधील जागरूकतेचा अभ्यास करणे या उद्दिष्टानुसार पालक प्रश्नावलीद्वारे प्राप्त निष्कर्ष.**

१. मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या पालकांची संख्या सर्वात जास्त ६९.६२ टक्के तर इतर माध्यमातून शिक्षण घेतलेल्या पालकांची संख्या सर्वात कमी १.८० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या पालकांची संख्या सर्वात जास्त आहे.(सारणी क्र. ४.३.१)

२. शिक्षणाची वेगवेगळे माध्यम उपलब्ध असताना पालक म्हणून पाल्याच्या शिक्षणासाठी इंग्रजी माध्यमाची शाळा निवड करणाऱ्या पालकांची सर्वात जास्त ६९.६५ टक्के तर इतर

माध्यमाच्या शाळेची निवड करणाऱ्या पालकांची संख्या सर्वात कमी ०.५६ टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, पाल्याच्या शिक्षणासाठी इंग्रजी माध्यमाची शाळा निवड करतात. (सारणी क्र. ४.३.२)

३. पाल्याच्या प्रवेशासाठी शिक्षणाचे माध्यम निवडताना कधीकधी संभ्रम असणाऱ्या पालकांची सर्वात जास्त ३८.७० टक्के आणि नेहमी संभ्रम असणाऱ्या पालकांची संख्या सर्वात कमी २८.६२ टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, पाल्याच्या प्रवेशासाठी शिक्षणाचे माध्यम निवडताना पालकांमध्ये संभ्रम असतो. (सारणी क्र. ४.३.३)

४. पाल्यांचे शिक्षणाचे माध्यम व कुटुंब असतील भाषा वेगवेगळी असल्यास पाल्यांचा अभ्यास घेताना कधीकधी भाषिक अडचण निर्माण होणाऱ्या पालकांची संख्या सर्वात जास्त ६२.२१ टक्के आणि पाल्यांचा अभ्यास घेताना भाषिक अडचण कधीच नाही निर्माण होणाऱ्या पालकांची संख्या सर्वात कमी १८.७१ टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, पाल्यांचा अभ्यास घेताना पालकांना भाषिक अडचण निर्माण होते. (सारणी क्र. ४.३.४)

५. पाल्यांचे शिक्षणाचे माध्यम निवडताना कोणती माध्यम निवडले म्हणजे समाजात प्रतिष्ठा व मानसन्मान वाढेल याचा कधीच नाही विचार नोंदवणाऱ्या पालकांची संख्या सर्वात जास्त ३९.७९ टक्के आणि कधीकधी विचार नोंदवणाऱ्या पालकांची संख्या सर्वात कमी २१.६६ टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, पाल्यांचे शिक्षणाचे माध्यम निवडताना समाजात प्रतिष्ठा व मानसन्मान वाढेल याचा विचार पालक करत नाहीत. (सारणी क्र. ४.३.५)

६. एक पालक म्हणून शिक्षणाचे माध्यम निवडताना शिक्षण तज्ञांनी माध्यम निवडीबाबत मांडलेल्या निष्कर्षाबाबत पालक जागरूक असल्याचे प्रमाण सर्वात जास्त ९०.०० टक्के आणि

जागरूक नसल्याचे प्रमाण सर्वात कमी १०.०० टक्के आढळून आले.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, शिक्षणाचे माध्यम निवडताना शिक्षण तज्ज्ञांनी माध्यम निवडीबाबत मांडलेल्या निष्कर्षाबाबत पालक जागरूक आहेत. (सारणी क्र. ४.३.६)

७. शिक्षणाचे माध्यम निवडताना शाळेमार्फत मुलांमधील क्षमतांची पूर्वचाचणी घेण्यात येते असे मत नोंदवणाऱ्या पालकांची संख्या सर्वात जास्त ७२.८० टक्के आणि पूर्वचाचणी घेण्यात येते नाही असे मत नोंदवणाऱ्या पालकांची संख्या सर्वात कमी २७.२० टक्के आढळली.

यावरून असे दिसून येते की, शिक्षणाचे माध्यम निवडताना शाळेमार्फत मुलांमधील क्षमतांची पूर्वचाचणी घेण्यात येते. (सारणी क्र. ४.३.७)

८. पाल्याचे शिक्षणासाठी माध्यम निवडताना निवडावयाच्या माध्यमातून नातेवाईकांनी त्या शाळांच्या माध्यमाची शाळा निवडलेली असते हा निकष सर्वात जास्त ३८.६१ टक्के आणि सर्वच निकष लावत असलेल्या पालकांची संख्या सर्वात कमी २.४७ टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, पाल्याचे शिक्षणासाठी नातेवाईकांनी निवडलेल्या शाळांच्या माध्यमाची शाळा पालक निवडतात. (सारणी क्र. ४.३.८)

९. शाळेतील शिक्षणाचे माध्यम व कुटुंबातील भाषा वेगवेगळी असल्यास विषयातील संकल्पना किंवा घटक समजणे कठीण जाते ही समस्या सर्वात जास्त ३९.४३ टक्के आणि पाल्यांचा अभ्यास घेण्यात टाळाटाळ करणे ही समस्या निर्माण होणाऱ्या पालकांची संख्या सर्वात कमी १.३० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, शाळेतील शिक्षणाचे माध्यम व कुटुंबातील भाषा वेगवेगळी असल्यास विषयातील संकल्पना किंवा घटक समजणे कठीण जाते. (सारणी क्र. ४.३.९)

१०. शिक्षणाचे माध्यम निवडताना पाल्याच्या निवडलेल्या माध्यमातून शिक्षण प्रक्रियेत सहभाग घेताना ६२.१४ टक्के पालकांना सर्वात जास्त शैक्षणिक अभ्यासक्रमातील अडचणी जाणवतात तर या व्यतिरिक्त इतर समस्या जाणवणाऱ्या पालकांची समस्या संख्या सर्वात कमी १.८४ टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, पाल्याच्या निवडलेल्या माध्यमातून शिक्षण प्रक्रियेत सहभाग घेताना पालकांना शैक्षणिक अभ्यासक्रमातील अडचणी जाणवतात. (सारणी क्र. ४.३.१०)

११. शिक्षणाचे माध्यम निवडतेवेळी पाल्याच्या विकासासाठी शाळेत प्रवेश घेताना शाळेसंदर्भात पालकांशी संवाद सत्र या संदर्भातील माहिती सर्वात जास्त ५०.२१ टक्के पालक तपासतात तर शाळांची परवडणारी फी या संदर्भातील माहिती सर्वात कमी ८.९९ टक्के पालक तपासतात.

यावरून असे दिसून येते की, शाळेत प्रवेश घेताना पालक शाळेसंदर्भात पालकांशी संवाद सत्र या संदर्भातील माहिती तपासतात. (सारणी क्र. ४.३.११)

१२. माध्यम निवडताना शाळेची इमारत व परिसर कसा आहे या शाळेशी संबंधित गोष्टीकडे सर्वात जास्त ४५.८५ टक्के पालक आवर्जून पाहतात तर माध्यम निवडताना शाळेशी संबंधित सर्वात कमी १.२० टक्के इतर गोष्टींकडे पालक आवर्जून पाहतात असे दिसून येते.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, माध्यम निवडताना शाळेची इमारत व परिसर कसा आहे या शाळेशी संबंधित गोष्टीकडे पालक आवर्जून पाहतात. (सारणी क्र. ४.३.१२)

१३. पाल्यासाठी शाळा निवडताना प्रशिक्षित शिक्षक वर्ग व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी देणारी शाळा या बाबीचा विचार सर्वात जास्त ४४.८५ टक्के पालक करतात तर घरापासून कमी

अंतरावर असलेली शाळा या बाबीचा विचार सर्वात कमी ८.३१ टक्के पालक करत असल्याचे दिसून येते.

यावरून असे दिसून येते की, पाल्यासाठी शाळा निवडताना प्रशिक्षित शिक्षक वर्ग व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी देणारी शाळा या बाबीचा विचार पालक करतात. (सारणी क्र. ४.३.१३)

१४. मुलांमध्ये ताणतणाव निर्माण होण्यामागील सर्वात जास्त कारण शाळेतील शिक्षकांच्या शैक्षणिक प्रशिक्षणाचा अभाव हे ६१.३० टक्के पालकांना वाटते तर सर्वात कमी कारण मातृभाषा व शिक्षणाच्या माध्यमातून भाषा वेगवेगळी असणे हे असल्याचे ९.१९ टक्के पालकांना वाटते.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, मुलांमध्ये ताणतणाव निर्माण होण्यामागील कारण शाळेतील शिक्षकांच्या शैक्षणिक प्रशिक्षणाचा अभाव हे आहे. (सारणी क्र. ४.३.१४)

१५. मुलांमध्ये काही शैक्षणिक समस्या जाणवल्यास शाळेमार्फत विद्यार्थ्यांकडे स्वतः पालकांनी लक्ष देणे ही सूचना सर्वात जास्त ४७.४२ टक्के सुचविण्यात येते तर मुख्याध्यापकामार्फत शाळेत बोलाविणे येत असल्याचे सर्वात कमी ६.६४ टक्के पालकांना सुचविण्यात येते.

यावरून असे दिसून येते की, मुलांमध्ये काही शैक्षणिक समस्या जाणवल्यास शाळेमार्फत विद्यार्थ्यांकडे स्वतः पालकांनी लक्ष देणे ही सूचना सुचविण्यात येते. (सारणी क्र. ४.३.१५)

**५.३.३ उद्दिष्ट क्र. ३ –**

**इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या भाषिक अडथल्यांमुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेणे या उद्दिष्टानुसार शिक्षक प्रश्नावलीद्वारे प्राप्त निष्कर्ष.**

१. विद्यार्थी वर्गात संभाषण साधताना सर्वात जास्त ४६.६५ टक्के 'इंग्रजी' या भाषेचा वापर करतात तर 'इतर भाषेचा' वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात कमी ००.०० टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, विद्यार्थी वर्गात संभाषण साधताना इंग्रजी या भाषेचा वापर करतात. (सारणी क्र. ४.४.१)

२. वर्ग अध्यापन करताना सर्वात जास्त ६२.६९ टक्के शिक्षक 'इंग्रजी' भाषेचा उपयोग करतात तर सर्वात कमी 'इतर भाषेचा' वापर करणाऱ्या शिक्षकांची संख्या १.९५ टक्के आढळून आली.
   यावरून असा निष्कर्ष निघतो की, वर्ग अध्यापन करताना शिक्षक इंग्रजी भाषेचा उपयोग करतात. (सारणी क्र. ४.४.२)

३. ३८.४४ टक्के विद्यार्थ्यांना विषयातील संकल्पना सर्वात जास्त 'मराठी' भाषेत लवकर समजतात तर 'इतर भाषेत' लवकर समजतात असे मत असणाऱ्या शिक्षकांची संख्या सर्वात कमी ३.१४ टक्के आढळून आली.
   यावरून असा निष्कर्ष निघतो की, विद्यार्थ्यांना विषयातील संकल्पना मराठी भाषेत लवकर समजतात. (सारणी क्र. ४.४.३)

४. ३७.६६ टक्के विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण होण्याचे सर्वात जास्त कारण 'पालकांच्या वाढत्या अपेक्षा' हे असल्याचे आढळून आले तर विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण होण्याचे कारण 'यापेक्षा वेगळे' असल्याचे सर्वात कमी ०.५२ टक्के असल्याचे आढळून आले.
   यावरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण होण्याचे कारण पालकांच्या वाढत्या अपेक्षा हे आहे. (सारणी क्र. ४.४.४)

५. ३३.७४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये सर्वात जास्त 'अवघड विषय घटकांचा ताण' आढळतो तर 'इतर विविध घटकांचा ताण' आढळून येण्याचे प्रमाण सर्वात कमी ०.३४ टक्के आढळून आले.
   यावरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांमध्ये अवघड विषय घटकांचा ताण आढळतो.
   (सारणी क्र. ४.४.५)

६. विद्यार्थ्यांवर आलेला शैक्षणिक ताण सर्वात जास्त ५०.०९ टक्के शिक्षक दूर करण्याचा प्रयत्न करतात तर कौटुंबिक ताण सर्वात कमी २.९१ टक्के शिक्षक दूर करण्याचा प्रयत्न करतात.
यावरून असा निष्कर्ष निघतो की, विद्यार्थ्यांवर आलेला शैक्षणिक ताण शिक्षक दूर करण्याचा प्रयत्न करतात. (सारणी क्र. ४.४.६)

७. ज्यांचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून झाले आहे असे विद्यार्थी सर्वात जास्त ४०.६६ टक्के जीवनाच्या विविध क्षेत्रात यशस्वी होतात तर ज्यांचे प्राथमिक शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले आहे ते विद्यार्थी जीवनाच्या विविध क्षेत्रात सर्वात कमी ११.८० टक्के यशस्वी होतात असे आढळून येते. यावरून असा निष्कर्ष निघतो की, ज्यांचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून झाले आहे असे विद्यार्थी जीवनाच्या विविध क्षेत्रात यशस्वी होतात. (सारणी क्र. ४.४.७)

८. मनमोकळेपणाने स्पष्ट व्यक्त न होणाऱ्या विद्यार्थ्यांना भाषिक अडथळे निर्माण झाल्याचे सर्वात जास्त ३१.५१ टक्के ओळखता येते तर 'सतत विचारात मग्न असणाऱ्या' विद्यार्थ्यांना सर्वात कमी ११.३१ टक्के भाषिक अडथळे निर्माण झालेले आहेत असे ओळखता येते.
यावरून असे दिसून येते की, मनमोकळेपणाने स्पष्ट व्यक्त न होणाऱ्या विद्यार्थ्यांना भाषिक अडथळे निर्माण होतात. (सारणी क्र. ४.४.८)

९. इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या ४६.२९ टक्के विद्यार्थ्यांना सर्वात जास्त भाषिक अडथळा मातृभाषा व शिक्षणाच्या माध्यमातून भाषा वेगवेगळी असल्यामुळे निर्माण होतो तर इतर माध्यमातून शिकलेल्या भाषेंच्या उपयोजनाचा अभाव यामुळे सर्वात कमी ७.८८ टक्के निर्माण होतो असे आढळून आले. यावरून असा निष्कर्ष निघतो की, इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भाषिक अडथळा मातृभाषा व

शिक्षणाच्या माध्यमातून भाषा वेगवेगळी असल्यामुळे निर्माण होतो. (सारणी क्र. ४.४.९)

१०. भाषिक अडथळे निर्माण झालेले दूर करण्यासाठी शिक्षकांमार्फत पालकांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देण्याबाबत सूचना देणे ही उपाययोजना सर्वात जास्त ५५.९२ टक्के प्रमाणात सुचविण्यात येते तर शिक्षणाचे माध्यम बदलविण्यास सांगणे ही उपाययोजना सर्वात कमी ७.४७ टक्के सुचविण्यात येते.

यावरून असे दिसून येते की, भाषिक अडथळे निर्माण झालेले दूर करण्यासाठी शिक्षकांमार्फत पालकांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देण्याबाबत सुचविण्यात येते. (सारणी क्र. ४.४.१०)

११. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड व आकलन शक्तीस चालना मिळण्यात कुटुंबातील भाषा व शिक्षणाच्या माध्यमाची भाषा वेगवेगळी असणे यामुळे सर्वात जास्त ४३.२२ टक्के प्रमाणात अडथळा येत असल्याचे आढळून आले.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, विद्यार्थ्यांना वाचनाची आवड व आकलन शक्तीस चालना मिळण्यात कुटुंबातील भाषा व शिक्षणाच्या माध्यमाची भाषा वेगवेगळी असल्यामुळे अडथळा निर्माण होतो. (सारणी क्र. ४.४.११)

१२. विद्यार्थ्यास आकलन झालेल्या ज्ञानाचे प्रत्यक्षात उपयोजन करण्यात प्राप्त केलेल्या भाषेतील ज्ञान व संपर्क भाषा वेगवेगळी असणे या कारणामुळे सर्वात जास्त २८.७५ टक्के अडथळा निर्माण होतो तर सर्वात कमी १९.३३ टक्के अडथळा विद्यार्थ्यांची मातृभाषा व शिक्षणाची भाषा वेगवेगळी असल्यामुळे निर्माण होतो.

यावरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यास आकलन झालेल्या ज्ञानाचे प्रत्यक्षात उपयोजन करण्यात प्राप्त केलेल्या भाषेतील ज्ञान व संपर्क भाषा वेगवेगळी असणे या कारणामुळे अडथळा निर्माण होतो. (सारणी क्र. ४.४.१२)

१३. ३३.१३ टक्के विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाचे माध्यम व मातृभाषा वेगवेगळी असल्यामुळे निर्माण झालेला भाषिक अडथळा या कारणामुळे सर्वात जास्त जिज्ञासा व चिकित्सक विचार प्रक्रिया निर्माण होण्यात अडथळा येतो तर सर्वात कमी १६.२९ टक्के इतर माध्यमाच्या भाषेतून प्रोत्साहन पर उपक्रम न राबविणे या कारणामुळे जिज्ञासा व चिकित्सक विचार प्रक्रिया निर्माण होण्यात अडथळा निर्माण होतो.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाचे माध्यम व मातृभाषा वेगवेगळी असल्यामुळे निर्माण झालेला भाषिक अडथळा यामुळे जिज्ञासा व चिकित्सक विचार प्रक्रिया निर्माण होण्यात अडथळा येतो. (सारणी क्र. ४.४.१३)

१४. विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यात अडथळा निर्माण होऊन संभाषण कौशल्य विकसित न होण्यामागील सर्वात जास्त कारण ४१.३७ टक्के शिक्षकांना विचार क्षमतेचा तसेच शब्द साठांचा अभाव असणे हा असल्याचे आढळून आले तर सर्वात कमी इतर माध्यमातून शिक्षण घेतलेला यांचा संपर्क नसणे या कारणामुळे विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यात अडथळा निर्माण होऊन संभाषण कौशल्य विकसित होत नसल्याचे १०.४२ टक्के शिक्षकांना वाटते.

यावरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यात अडथळा निर्माण होऊन संभाषण कौशल्य विकसित न होण्यामागे विचार क्षमतेचा तसेच शब्द साठांचा अभाव असणे हे कारण आहे. (सारणी क्र. ४.४.१४)

१५. विद्यार्थ्यांचा अभ्यास घेण्यात मुलांच्या अडचणी विषयी पालक शाळेत येऊन चर्चा करणे या पद्धतीने पालकांचा सहभाग असल्याचे सर्वात जास्त ३६.८४ टक्के शिक्षकांना वाटत असल्याचे आढळून आले तर पालक मुलांच्या अभ्यासातील प्रगती तपासू शकत नाही असे सर्वात कमी १६.३७ टक्के शिक्षकांना आढळून आले.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, विद्यार्थ्यांचा अभ्यास घेण्यात मुलांच्या अडचणी विषयी पालक शाळेत येऊन चर्चा करणे या पद्धतीने पालक सहभागी होतात. (सारणी क्र. ४.४.१५)

१६. मातृभाषा व शिक्षणाचे माध्यम वेगवेगळे असल्याने मुलांना व्यक्त होता येत नाही याबाबतीत ३५.६९ टक्के पालक सर्वात जास्त जागरूक दिसत नसल्याचे आढळले तर इतर भाषेतून शिक्षण दिल्यामुळे विद्यार्थ्यांना ताणतणाव येतो याबाबतीत जागरूक नसल्याचे सर्वात कमी १७.४५ टक्के शिक्षकांना वाटत असल्याचे आढळून आले.

यावरून असे दिसून येते की, मातृभाषा व शिक्षणाचे माध्यम वेगवेगळे असल्याने मुलांना व्यक्त होता येत नाही याबाबतीत पालक जागरूक नाहीत. (सारणी क्र. ४.४.१६)

१७. पालक भारतातील इंग्रजी माध्यमाचा प्रभाव वाढत आहे याबाबत बाबतीत अनभिज्ञ असल्याचे सर्वात जास्त ३०.५१ टक्के शिक्षकांना आढळले तर सर्वात कमी युरोपातील प्रगत व प्रगतीशील देशात मातृभाषेतूनच शिक्षण दिले जाते याबाबतीत पालक अनभिज्ञ असल्याचे १९.५८ टक्के शिक्षकांना वाटत असल्याचे आढळून आले.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, पालक भारतातील इंग्रजी माध्यमाचा प्रभाव वाढत आहे याबाबत बाबतीत अनभिज्ञ आहेत. (सारणी क्र. ४.४.१७)

१८. पालक शिक्षकांजवळ सर्वात जास्त विद्यार्थ्यांच्या सतत मोबाईल व टीव्ही बघणे या समस्येबाबत सांगत असल्याचे ४७.८२ टक्के शिक्षकांना आढळून आले तर कुटुंबातील सदस्यांसोबत संवाद टाळणे या समस्येविषयी सर्वात कमी ९.७४ टक्के सांगत असल्याचे आढळून आले.

यावरून असे दिसून येते की, पालक शिक्षकांजवळ विद्यार्थ्यांच्या सतत मोबाईल व टीव्ही बघणे या समस्येबाबत सांगतात. (सारणी क्र. ४.४.१८)

१९. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्याविषयी पालकांना सांगितल्यावर सर्वात जास्त ४०.८९ टक्के पालक योग्य उपाययोजना करण्याची तयारी दर्शवितात तर सर्वात कमी १०.१६ टक्के शिक्षकांना पालक सांगितलेल्या समस्येचा अस्वीकार करतात असे आढळून आले.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्याविषयी पालक योग्य उपाययोजना करण्याची तयारी दर्शवितात. (सारणी क्र. ४.४.१९)

२०. विद्यार्थ्यांना अध्यापन करताना शिक्षकांना विद्यार्थ्यांची मातृभाषा व शिक्षणाचे माध्यम वेगळे असल्याने विद्यार्थ्यांना घटकांचे आकलन होण्यास अडथळे जाणवतात ही समस्या सर्वात जास्त ४१.३८ टक्के शिक्षकांना जाणवत असल्याचे आढळून येते तर विद्यार्थ्यांना अध्यापन करताना यापेक्षा वेगळी समस्या सर्वात कमी ३.५७ टक्के शिक्षकांना जाणवत असल्याचे आढळून येते.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, विद्यार्थ्यांची मातृभाषा व शिक्षणाचे माध्यम वेगळे असल्याने विद्यार्थ्यांना घटकांचे आकलन होण्यास अडथळे जाणवतात. (सारणी क्र. ४.४.२०)

**५.३.४ उद्दिष्ट क्र. ४ –**

**मराठी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांच्या प्रवेश न घेण्यामागील कारणांचा शोध घेणे या उद्दिष्टाकरिता मराठी शाळा - मुख्याध्यापक व शिक्षक पदनिश्चयन श्रेणी द्वारा प्राप्त निष्कर्ष.**

१. मराठी शाळांच्या परिस्थितीला चतुर्थ पासून तर प्रथम श्रेणीचे शासकीय कर्मचारी आणि उच्चपदस्थ अधिकारी जवाबदार आहेत, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ४५.१० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ७.१० टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, मराठी शाळांच्या परिस्थितीला चतुर्थ पासून तर प्रथम श्रेणीचे शासकीय

कर्मचारी आणि उच्चपदस्थ अधिकारी जवाबदार आहेत. (सारणी क्र. ४.५.१)

२. शासनाकडून वेतन घेणारे शिक्षक आपल्या मुलांच्या प्राथमिक शिक्षणासाठी खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेची निवड करतात, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५४.०० टक्के आढळून आली तर पूर्णतः सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी २.७० टक्के आढळून आली.
यावरून असे दिसून येते की, शासनाकडून वेतन घेणारे शिक्षक आपल्या मुलांच्या प्राथमिक शिक्षणासाठी खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेची निवड करतात. (सारणी क्र. ४.५.२)

३. मराठी माध्यमाच्या परिस्थितीला आजचे पालकच जबाबदार आहेत, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ४४.२० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ९.७० टक्के आढळून आली.
यावरून असा निष्कर्ष निघतो की, मराठी माध्यमाच्या परिस्थितीला आजचे पालकच जबाबदार आहेत. (सारणी क्र. ४.५.३)

४. जागतिकीकरणामुळे इंग्रजी भाषेचे महत्त्व वाढले आहे. पालकांना असे वाटते की इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतल्याने त्यांच्या मुलांना भविष्यात अधिक संधी मिळतील, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५७.५० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ३.५० टक्के आढळून आली.
यावरून असे दिसून येते की, जागतिकीकरणामुळे इंग्रजी भाषेचे महत्त्व वाढल्यामुळे इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतल्याने मुलांना भविष्यात अधिक संधी मिळतील. (सारणी क्र. ४.५.४)

५. इंग्रजी माध्यमाच्या शाळा समाजात प्रतिष्ठेच्या मानल्या जातात. त्यामुळे पालक मुलांचा इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश घेतात, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ६९.०० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी १.९० टक्के आढळून आली.
यावरून असा निष्कर्ष निघतो की, इंग्रजी माध्यमाच्या शाळा समाजात प्रतिष्ठेच्या मानल्या जात असल्यामुळे पालक मुलांचा इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश घेतात. (सारणी क्र. ४.५.५)

६. खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये अधिक चांगल्या सुविधा, तंत्रज्ञान आणि आधुनिक शिक्षण पद्धती उपलब्ध असतात, ज्या मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये कमी असतात, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५७.५० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ९.७० टक्के आढळून आली.
यावरून असा निष्कर्ष निघतो की, खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये अधिक चांगल्या सुविधा, तंत्रज्ञान आणि आधुनिक शिक्षण पद्धती उपलब्ध असतात, ज्या मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये कमी असतात. (सारणी क्र. ४.५.६)

७. पालक शिक्षणाच्या गुणवत्तेबद्दल अधिक जागरूक झाले आहेत आणि ते आपल्या मुलांसाठी चांगला पर्याय म्हणून इंग्रजी माध्यमाच्या शाळांची निवड करतात, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५१.३० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ३.५० टक्के आढळून आली.
यावरून असे दिसून येते की, पालक शिक्षणाच्या गुणवत्तेबद्दल अधिक जागरूक झाले आहेत त्यामुळे मुलांसाठी चांगला पर्याय

म्हणून इंग्रजी माध्यमाच्या शाळांची निवड करतात. (सारणी क्र. ४.५.७)

८. पालकांची आर्थिक स्थिती नसूनही पाल्य शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून इंग्रजी माध्यमाचे न झेपणारे भरमसाट शुल्क भरतात, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५९.३० टक्के आढळून आली तर तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ००.०० टक्के दिसून येते.
यावरून असा निष्कर्ष निघतो की, पालकांची आर्थिक स्थिती नसूनही पाल्य शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून इंग्रजी माध्यमाचे न झेपणारे भरमसाट शुल्क भरतात. (सारणी क्र. ४.५.८)

९. मराठी माध्यमात शिकल्याने मुलाच्या प्रगतीत इंग्रजी भाषेची अडचण निर्माण होईल या भीतीमुळे पालक मुलांचा इंग्रजी माध्यमात प्रवेश घेतात, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५९.३० टक्के, तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी २.७० टक्के दिसून येते.
यावरून असे दिसून येते की, मराठी माध्यमात शिकल्याने मुलाच्या प्रगतीत इंग्रजी भाषेची अडचण निर्माण होईल या भीतीमुळे पालक मुलांचा इंग्रजी माध्यमात प्रवेश घेतात. (सारणी क्र. ४.५.९)

१०. मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेणे पालकांना कमीपणाचे वाटणे हाच विचार मराठी माध्यमामध्ये प्रवेश न घेण्यास कारणीभूत आहे, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ४२.५० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात ९.७० टक्के कमी दिसून येते.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेणे पालकांना कमीपणाचे वाटणे हाच विचार मराठी माध्यमामध्ये प्रवेश न घेण्यास कारणीभूत आहे. (सारणी क्र. ४.५.१०)

११. प्राथमिक शिक्षण मातृभाषेतच घ्यावे असा जगातील सर्वच शिक्षणज्ञांचा सल्ला आहे, म्हणून मातृभाषा पक्की करून नंतर इतर माध्यमातून शिक्षण अधिक परिणामकारक होते, याबाबत पूर्णतः सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५१.३० टक्के आढळून आली.
यावरून असे दिसून येते की, मातृभाषा पक्की करून नंतर इतर माध्यमातून शिक्षण अधिक परिणामकारक होते. (सारणी क्र. ४.५.११)

१२. इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे मराठीचे ज्ञान मर्यादित राहते व इंग्रजी सुद्धा चांगली होत नाही, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ४५.१० टक्के आढळून आली तर पूर्णतः सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ७.१० टक्के आढळून आली.
यावरून असा निष्कर्ष निघतो की, इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे मराठीचे ज्ञान मर्यादित राहते व इंग्रजी सुद्धा चांगली होत नाही. (सारणी क्र. ४.५.१२)

१३. उच्च शिक्षण इंग्रजी भाषेत अधिक प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे पालक प्राथमिक शिक्षणापासूनच मुलांचा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतात, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ६०.२० टक्के आढळून आली तर पूर्णतः सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ३.५० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, उच्च शिक्षण इंग्रजी भाषेत अधिक प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे पालक प्राथमिक शिक्षणापासूनच मुलांचा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतात. (सारणी क्र. ४.५.१३)

१४. शासकीय मराठी माध्यमाच्या शाळेत सेमी इंग्रजी हे माध्यम सुरु केल्यामुळे मराठी बरोबर इंग्रजीही मुले तितक्याच आवडीने शिकतात, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५९.३० टक्के आढळून आली तर पूर्णतः सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ०.९० टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, शासकीय मराठी माध्यमाच्या शाळेत सेमी इंग्रजी हे माध्यम सुरु केल्यामुळे मराठी बरोबर इंग्रजीही मुले तितक्याच आवडीने शिकतात. (सारणी क्र. ४.५.१४)

१५. मराठी शाळेचा दर्जा वाढावा व मराठी माध्यमांतील शाळा बंद पडू नये म्हणून अनेक गोष्टी केल्या जाऊ शकतात, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५३.१० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ०.९० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, मराठी शाळेचा दर्जा वाढावा व मराठी माध्यमांतील शाळा बंद पडू नये म्हणून अनेक गोष्टी केल्या जाऊ शकतात. (सारणी क्र. ४.५.१५)

१६. मुलांना इंग्रजी भाषा आली पाहिजे म्हणून सरसकट इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घेणे चुकीचे आहे, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ४८.७० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ३.५० टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, मुलांना इंग्रजी भाषा आली पाहिजे म्हणून सरसकट इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घेणे चुकीचे आहे. (सारणी क्र. ४.५.१६)

१७. परकीय भाषेतून कोणत्याही संकल्पना व विचार समजून घेणे मातृभाषेपेक्षा अधिक कठीण असते, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५८.४० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी २.७० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, परकीय भाषेतून कोणत्याही संकल्पना व विचार समजून घेणे मातृभाषेपेक्षा अधिक कठीण असते. (सारणी क्र. ४.५.१७)

१८. कुटुंब व परिसरातील भाषा आणि शाळेतील शिक्षणाची भाषा वेगवेगळी असल्यामुळे मुलांना भाषिक अडथळा निर्माण होऊन शैक्षणिक ताणतणाव निर्माण होतो, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५८.४० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी २.७० टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, कुटुंब व परिसरातील भाषा आणि शाळेतील शिक्षणाची भाषा वेगवेगळी असल्यामुळे मुलांना भाषिक अडथळा निर्माण होऊन शैक्षणिक ताणतणाव निर्माण होतो. (सारणी क्र. ४.५.१८)

१९. इंग्रजी व मराठी माध्यमाऐवजी फक्त सेमी-इंग्रजी माध्यम शासनाने सुरु ठेवल्यास अनुदानित मराठी शाळांची विद्यार्थी पटसंख्या गळतीची समस्या थांबविता येईल, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५७.५० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत

नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी २.७० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, इंग्रजी व मराठी माध्यमाऐवजी फक्त सेमी-इंग्रजी माध्यम शासनाने सुरु ठेवल्यास अनुदानित मराठी शाळांची विद्यार्थी पटसंख्या गळतीची समस्या थांबविता येईल. (सारणी क्र. ४.५.१९)

२०. महाराष्ट्रात मराठी वाचून कोणाचेही अडत नाही, यामुळे मराठी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थी संख्या कमी होत आहे, याबाबत असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ४१.६० टक्के आढळून आली तर पूर्णतः सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ९.७० टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, महाराष्ट्रात मराठी वाचून कोणाचेही अडत नाही, यामुळे मराठी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थी संख्या कमी होत आहे. (सारणी क्र. ४.५.२०)

२१. स्थानिक स्वराज्य संस्थेचे पदाधिकारी, मानधन किंवा वेतन घेणारे कर्मचारी यांची अपत्ये मराठी माध्यमाच्या शाळेत शिक्षणासाठी प्रवेश घेण्याची अट लागू केल्यास मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या संख्येत भर पडणार आहे, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५६.६० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ५.३० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, स्थानिक स्वराज्य संस्थेचे पदाधिकारी, मानधन किंवा वेतन घेणारे कर्मचारी यांची अपत्ये मराठी माध्यमाच्या शाळेत शिक्षणासाठी प्रवेश घेण्याची अट लागू केल्यास मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या संख्येत भर पडणार आहे. (सारणी क्र. ४.५.२१)

२२. एकविसाव्या शतकात इंग्रजीला पर्याय नाही, आणि म्हणून पालकांची धाव हि मोठ्या प्रमाणावर इंग्रजी शाळांकडे सुरु झाली आहे यामुळे मराठी शाळा बंद पडत आहेत, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५३.१० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी १.८० टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, पालकांची धाव मोठ्या प्रमाणावर इंग्रजी शाळांकडे सुरु झाल्यामुळे मराठी शाळा बंद पडत आहेत. (सारणी क्र. ४.५.२२)

२३. प्रत्येक प्राथमिक शिक्षक आपल्या पाल्यासाठी शासकीय अनुदानित मराठी शाळेची निवड करतील तेंव्हाच मराठी शाळेच्या पटसंख्या गळतीची समस्या सोडवता येईल, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५२.२० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ६.२० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, प्रत्येक प्राथमिक शिक्षकाने आपल्या पाल्यासाठी शासकीय अनुदानित मराठी शाळेची निवड केल्यास मराठी शाळेच्या पटसंख्या गळतीची समस्या सोडवता येईल. (सारणी क्र. ४.५.२३)

२४. मातृभाषेबरोबर इंग्रजी भाषेवर प्रभूत्व असलेच पाहिजे. ज्या शाळा मुलांना त्यासाठी तयार करणार नाहीत त्या मराठी शाळा मागे पडतील, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ६१.९० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी २.७० टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, ज्या शाळा मुलांचे मातृभाषेबरोबर इंग्रजी भाषेवर प्रभूत्व तयार करणार नाहीत, त्या मराठी शाळा मागे पडणार आहेत. (सारणी क्र. ४.५.२४)

२५. मध्यम, नवमध्यम आणि नवश्रीमंत वर्गाने मराठी शाळांमध्ये प्रवेश घेणे बंद केल्यामुळे मराठी शाळामधील प्रवेश कमी झाले, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ६५.५० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ५.३० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, मध्यम, नवमध्यम आणि नवश्रीमंत वर्गाने मराठी शाळांमध्ये प्रवेश घेणे बंद केल्यामुळे मराठी शाळामधील प्रवेश कमी झाले आहेत. (सारणी क्र. ४.५.२५)

२६. मराठी शाळेत विद्यार्थ्यांनी प्रवेश न घेतल्यामुळे मराठी शाळांचा दर्जा अधिक घसरत आहे, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ३७.२० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ८.०० टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, मराठी शाळेत विद्यार्थ्यांनी प्रवेश न घेतल्यामुळे मराठी शाळांचा दर्जा अधिक घसरत आहे. (सारणी क्र. ४.५.२६)

२७. मराठी शाळांचा दर्जा वाढवण्यास राज्यकर्ते, शिक्षणतज्ञ व पालक यांच्याकडून विशेष प्रयत्न होतांना दिसत नाहीत, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ४६.९० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी २.७० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, मराठी शाळांचा दर्जा वाढवण्यास राज्यकर्ते, शिक्षणतज्ञ व पालक यांच्याकडून विशेष प्रयत्न होतांना दिसत नाहीत. (सारणी क्र. ४.५.२७)

२८. मराठी शाळांचा दर्जा वाढवण्यासाठी पालक काहीही न करून सुद्धा मराठी शाळा चांगल्या नाहीत अशी बोम्ब ठोकतात, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५५.८० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी २.७० टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, मराठी शाळांचा दर्जा वाढवण्यासाठी पालक काहीही न करून सुद्धा मराठी शाळा चांगल्या नाहीत अशी बोम्ब ठोकतात. (सारणी क्र. ४.५.२८)

२९. मराठी माध्यमाच्या शाळेत मोफत मिळणाऱ्या शिक्षणाकडे पालकांनी पाठ फिरवल्यामुळे अनुदानित मराठी शाळांची पटसंख्या कमी होऊन शिक्षकांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे नवीन शिक्षक भरती होत नाही, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ४६.९० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ००.०० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, मराठी माध्यमाच्या शाळेत मोफत मिळणाऱ्या शिक्षणाकडे पालकांनी पाठ फिरवल्यामुळे अनुदानित मराठी शाळांची पटसंख्या कमी होऊन शिक्षकांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे नवीन शिक्षक भरती होत नाही. (सारणी क्र. ४.५.२९)

३०. मराठी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांना मोफत मिळणाऱ्या सुविधा जसे- शिक्षण, गणवेश, पोषण आहार, विविध शिष्यवृत्या तसेच शिक्षकांचा वेतन खर्च इ. शासनाचा खर्च मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत असल्याने बचत होत आहे,

त्यामुळे ही बचत अशीच सुरु राहावी म्हणून शासन मराठी माध्यमाच्या शाळांच्या सुविधांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ४०.७० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ५.३० टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, मराठी माध्यमाच्या शाळेवर शासनाच्या होणाऱ्या खर्चाची बचत सुरु राहावी म्हणून शासन मराठी माध्यमाच्या शाळांच्या सुविधांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. (सारणी क्र. ४.५.३०)

३१. मराठी माध्यमाच्या शाळेचा दर्जा खालावत चालल्याने शिक्षक होण्याकडे व शिक्षक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेण्यास विद्यार्थी उत्सुक दिसत नाहीत, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ४९.६० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ३.५० टक्के आढळून आली.

यावरून असे दिसून येते की, मराठी माध्यमाच्या शाळेचा दर्जा खालावत चालल्याने शिक्षक होण्याकडे व शिक्षक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेण्यास विद्यार्थी उत्सुक दिसत नाहीत. (सारणी क्र. ४.५.३१)

३२. मालकांची मुलं जर इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिकणार असतील तर कामगार वर्ग त्यांचेच अनुकरण करणार. अशा अनुकरणाने मराठी माध्यमाची दुरवस्था झाली आहे, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५८.४० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी ३.५० टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, मालकांची मुलं जर इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिकणार असतील तर कामगार वर्ग

त्यांचेच अनुकरण करणार. अशा अनुकरणाने मराठी माध्यमाची दुरवस्था झाली आहे. (सारणी क्र. ४.५.३२)

३३. शासनाचे वेतन घेणाऱ्या कर्मचारी व शिक्षकांना ज्याप्रमाणे त्यांची मुले मराठी माध्यमाच्या शाळेत शिकविण्याचा विचार मांडला जातो, त्याप्रमाणेच शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या पालकांना त्यांची अपत्ये मराठी मध्यामच्या शाळेत शिकविण्याची अट घातल्यास मराठी शाळांची विद्यार्थी संख्या वाढेल, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ६०.२० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी १.८० टक्के आढळून आली.
यावरून असे दिसून येते की, शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या पालकांना त्यांची अपत्ये मराठी मध्यामच्या शाळेत शिकविण्याची अट घातल्यास मराठी शाळांची विद्यार्थी संख्या वाढेल. (सारणी क्र. ४.५.३३)

३४. मोठ्या प्रमाणावर स्वयंअर्थसहाय्यित इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मान्यता देण्यात येत असल्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत, याबाबत सहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात जास्त ५२.२० टक्के आढळून आली तर पूर्णतः असहमत असे मत नोंदवणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांची संख्या सर्वात कमी १.८० टक्के आढळून आली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, मोठ्या प्रमाणावर स्वयंअर्थसहाय्यित इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मान्यता देण्यात येत असल्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत. (सारणी क्र. ४.५.३४)

## ५.४ शिफारशी

### ५.४.१ विद्यार्थ्यांकरिता शिफारशी (संदर्भ : विद्यार्थी पदनिश्चयनश्रेणी द्वारा प्राप्त निष्कर्षावरून)

१. जेव्हा मूड असतो तेव्हा अभ्यासासाठी बसावे. (कोष्टक क्र.१)
२. मोबाईल किंवा टीव्ही सुरू असतांना अभ्यास कधीच करू नये. (कोष्टक क्र.१)
३. झोप येत असतांना अभ्यास कधीच करू नये. (कोष्टक क्र.१)
४. कठीण जाणाऱ्या विषयांचा अभ्यास करण्यासाठी कंटाळा न करता त्यामध्ये आवड निर्माण करून अभ्यास करावा. (कोष्टक क्र.१)
५. अभ्यासाला एकटे बसून शांततेत व निवांतपणे अभ्यास करावा. (कोष्टक क्र.१)
६. कठीण घटकाचे वाचन केल्यावर विस्मरण झाल्यास दडपण घेऊ नये. (कोष्टक क्र.१)
७. वाढलेली जागतिक स्पर्धा व विषयांची वाढती संख्या यांचा मानसिक ताण येऊ देवू नये.
(कोष्टक क्र.१)
८. पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा मानसिक ताण निर्माण होणार नाही याबाबत दक्ष राहावे.
(कोष्टक क्र.१)
९. पालकांशी अभ्यासात येणाऱ्या अडचणी विषयी बोलताना भीती वाटू न देता मनमोकळेपणाने पालकांशी याबाबत चर्चा करावी. (कोष्टक क्र.१)
१०. अभ्यासात येणाऱ्या अडचणी, पडलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतः शोधण्याचा प्रयत्न कारावा.
(कोष्टक क्र.१)
११. अभ्यास करत असतांना मध्येच कोणत्याही अनावश्यक कामानिमित्त उठू नये. (कोष्टक क्र.२)
१२. आई बाबा रागावतील म्हणून अभ्यासाला न बसता स्वतःहून अभ्यासाला बसावे. (कोष्टक क्र.२)
१३. गृहपाठ केल्यावर पालकांकडून बक्षीसाची अपेक्षा न करता नियमित गृहपाठ करावा. (कोष्टक क्र.२)

१४. इंग्रजी वाचन, शब्दसाठा वाढावा याकरिता इंग्रजी वर्तमानपत्र नियमित वाचावे. (कोष्टक क्र.२)

१५. घरात अभ्यासासाठी पोषक, शांत, आनंदी वातावरण निर्माण करण्याच्या आई-बाबांच्या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद द्यावा. (कोष्टक क्र.२)

१६. पाढे, गणितीय सूत्रे, समीकरणे, संज्ञा यांची पालक चाचणी घेत असल्यास त्यांना योग्य प्रतिसाद द्यावा. (कोष्टक क्र.२)

१७. शैक्षणिक अडचण निर्माण झाल्यास पालकांची वर्गशिक्षकांसोबत भेट घेऊन शैक्षणिक अडचण दूर करावी. (कोष्टक क्र.२)

१८. शिक्षण क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेचा स्वतःच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम होणार नाही याबाबत जागरूक राहावे. (कोष्टक क्र.२)

१९. आईवडील कामात असतांना सुद्धा अभ्यासातील अडचणी ऐकून घेतात हे लक्षात ठेऊन त्यांना आपल्या अडचणी विचारण्यात संकोच करू नये. (कोष्टक क्र.२)

२०. विद्यालयातील कार्यक्रमांना पाहण्याकरिता आई-बाबा आवर्जून उपस्थित राहण्यास सांगावे. (कोष्टक क्र.२)

२१. शिक्षणातील गरजांची पूर्तता आई-बाबा अतिशय आनंदाने करतात याविषयी नेहमी सजग राहावे. (कोष्टक क्र.२)

२२. क्षमतेपेक्षा अधिक कठीण काम करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा आई-बाबांचे पाठबळ मिळतेच, याविषयी नेहमी सकारात्मक राहावे. (कोष्टक क्र.२)

२३. अभ्यास कसा करावा ? याविषयी आई-बाबांचे मार्गदर्शन नियमित घ्यावे. (कोष्टक क्र.२)

२४. कुटुंबाची भाषा आणि शाळेतील भाषा वेगवेगळी असल्यामुळे अध्ययनात भाषिक अडथळे निर्माण होणार नाहीत याबाबतीत काळजी घ्यावी. (कोष्टक क्र.३)

२५. पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा मनावर ताण निर्माण होऊ देवू नये. (कोष्टक क्र.३)

२६. परीक्षेत अपेक्षित गुण संपादन न केल्यास इतर मुलांशी होणाऱ्या तुलनेचा ताण न घेता अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. (कोष्टक क्र.३)

२७. एखाद्या कामात मग्न असतांना बाबांना काही प्रश्न विचारल्यास ते हाकलून न देता आपल्या प्रश्नाचे उत्तर देतातच, यावर विश्वास ठेवावा. (कोष्टक क्र.३)

२८. मातृभाषेतील शब्दाला शिक्षणाच्या माध्यमातून शब्द कोणता ? हे स्वतः शोधण्याचा प्रयत्न करावा. (कोष्टक क्र.३)

२९. अभ्यास करताना एखादा भाग, संकल्पना समजली नाही तरीही ती संकल्पना पाठ न करता समजून घेण्याचा करण्याचा प्रयत्न करावा. (कोष्टक क्र.३)

३०. अभ्यासासाठी दैनदिन निश्चित वेळ व नियोजित जागेचा उपयोग करावा. (कोष्टक क्र.३)

**५.४.२ पालकांसाठी शिफारशी**

१. मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या पालकांनी इंग्रजी भाषेचे ज्ञान वाढवावे.(सारणी क्र. ४.३.१)

२. कौटुंबिक व शिक्षणाची भाषा वेगवेगळी असल्यास विद्यार्थ्यांना निर्माण होणाऱ्या समस्या बाबत जागरूक असावे. (सारणी क्र. ४.३.२)

३. पाल्याच्या प्रवेशासाठी शिक्षणाचे माध्यम निवडताना पालकांनी संभ्रम दूर करावा.
(सारणी क्र. ४.३.३)

४. पाल्यांना भाषिक अडचण निर्माण झाल्यास शिक्षकांना भेटून उपाययोजना कराव्यात.
(सारणी क्र. ४.३.४)

५. समाजात प्रतिष्ठा व मानसन्मान वाढेल याचा विचार न करता पाल्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष केंद्रित करावे. (सारणी क्र. ४.३.५)

६. शिक्षणाचे माध्यम निवडताना शिक्षण तज्ञांनी माध्यम निवडीबाबत मांडलेल्या निष्कर्षाबाबत पालकानी जागरूक असावे. (सारणी क्र. ४.३.६)
७. शिक्षणाचे माध्यम निवडताना शाळेमार्फत मुलांमधील क्षमतांची पूर्वचाचणी घेण्यात येते याबाबत जागरूक राहावे. (सारणी क्र. ४.३.७)
८. पाल्याचे शिक्षणासाठी नातेवाईकांनी निवडलेल्या शाळेची निवड करण्यापेक्षा जी शाळा दर्जेदार शिक्षण देते त्या शाळेची निवड करावी. (सारणी क्र. ४.३.८)
९. शाळेतील शिक्षणाचे माध्यम व कुटुंबातील भाषा वेगवेगळी असल्यास विषयातील संकल्पना किंवा घटक समजणे कठीण जात असल्यास त्याविषयी उपाययोजना कराव्यात.
(सारणी क्र. ४.३.९)
१०. पालकांनी पाल्याच्या शैक्षणिक अभ्यासक्रमातील अडचणी विषयी शिक्षकांसोबत चर्चा करावी. (सारणी क्र. ४.३.१०)
११. शाळेत प्रवेश घेताना पालक शाळेसंदर्भात पालकांशी संवाद सत्र या संदर्भातील माहिती आवर्जून तपासावी. (सारणी क्र. ४.३.११)
१२. शाळेची इमारत व परिसर यापेक्षा माध्यम निवडताना दर्जेदार शिक्षण देणारी शाळा निवडावी. (सारणी क्र. ४.३.१२)
१३. पाल्यासाठी शाळा निवडताना प्रशिक्षित शिक्षक वर्ग व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी देणारी शाळा निवडण्याबाबत जागरूक असावे. (सारणी क्र. ४.३.१३)
१४. मुलांमध्ये ताणतणाव निर्माण हाताळण्याकरिता शाळेतील शिक्षकांना शैक्षणिक प्रशिक्षण देण्याची संस्थेकडे मागणी करावी. (सारणी क्र. ४.३.१४)
१५. मुलांमध्ये काही शैक्षणिक समस्या जाणवल्यास शाळेमार्फत येणाऱ्या सूचनांकडे पालकांनी लक्ष लक्ष द्यावे. (सारणी क्र. ४.३.१५)

**५.४.३ इंग्रजी माध्यमाच्या शिक्षकांकरिता शिफारसी –**

**(संदर्भ : इंग्रजी माध्यमातील शिक्षक पद निश्चयनश्रेणी द्वारा प्राप्त निष्कर्षावरून)**

१. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विषयातील संकल्पना भाषांतरित करून मराठी भाषेत सांगाव्यात. (सारणी क्र. ४.४.३)

२. विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण होणार नाही याबाबत पालकांशी चर्चा करावी.
(सारणी क्र. ४.४.४)

३. विद्यार्थ्यांवर आलेला शैक्षणिक ताण दूर करण्याबरोबर मानसिक ताणतणाव दूर करण्याचा शिक्षकांनी प्रयत्न करावा. (सारणी क्र. ४.४.६)

४. मनमोकळेपणाने स्पष्ट व्यक्त न होणाऱ्या विद्यार्थ्यांना बोलण्यास प्रोत्साहन द्यावे.
(सारणी क्र. ४.४.८)

५. इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भाषिक अडथळा निर्माण होणार नाही अशा अध्यापन पद्धत विकसित करवी. (सारणी क्र. ४.४.९)

६. भाषिक अडथळे निर्माण झालेले दूर करण्यासाठी शिक्षकांमार्फत पालकांना उपाययोजना करण्यास सांगावे. (सारणी क्र. ४.४.१०)

७. विद्यार्थ्यांचा अभ्यास घेण्यात मुलांच्या अडचणी विषयी शिक्षकांनी पालकांना उपाययोजन सुचवाव्यात. (सारणी क्र. ४.४.१५)

८. मातृभाषा व शिक्षणाचे माध्यम वेगवेगळे असल्याने मुलांना व्यक्त होता येत नाही याबाबतीत पालकांना माहिती देण्यात यावी. (सारणी क्र. ४.४.१६)

९. सतत मोबाईल व टीव्ही बघण्यामुळे निर्माण होणारे दुष्परिणामाविषयी विद्यार्थायांमध्ये जाणीव निर्माण करून या समस्येबाबत शिक्षकांनी उपाययोजना व बोधात्मक कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी. (सारणी क्र. ४.४.१८)

### ५.४.४ मराठी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांचे प्रवेश वाढविण्याकरिता शिफारशी

**(संदर्भ : मराठी माध्यमातील शिक्षक पद निश्चयनश्रेणी – प्राप्त निष्कर्षावरून)**

१. मराठी शाळांच्या परिस्थिती सुधारण्याकरिता चतुर्थ पासून तर प्रथम श्रेणीचे शासकीय कर्मचारी आणि उच्चपदस्थ अधिकारी यांनी जवाबदारीने शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी. (सारणी क्र. ४.५.१)

२. शासनाकडून वेतन घेणारे शिक्षकांनी आपल्या मुलांच्या प्राथमिक शिक्षणासाठी शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मराठी माध्यमाच्या शाळेची निवड करावी. (सारणी क्र. ४.५.२)

३. मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये अधिक चांगल्या सुविधा, तंत्रज्ञान आणि आधुनिक शिक्षण पद्धती उपलब्ध करण्यात याव्यात. (सारणी क्र. ४.५.६)

४. मराठी माध्यमात शिकल्याने मुलाच्या प्रगतीत इंग्रजी भाषेची अडचण निर्माण होईल या भीतीमुळे पालक मुलांचा इंग्रजी माध्यमात प्रवेश घेतात, प्राथमिक शिक्षण मातृभाषेतच घ्यावे असा जगातील सर्वच शिक्षणज्ञांचे मत आहे, याबाबत समाजात जनजागृती करण्यात यावी. (सारणी क्र. ४.५.९)

५. मुलांना इंग्रजी भाषा आली पाहिजे म्हणून सरसकट इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घेणे चुकीचे आहे, परकीय भाषेतून कोणत्याही संकल्पना व विचार समजून घेणे मातृभाषेपेक्षा अधिक कठीण असते, कुटुंब व परिसरातील भाषा आणि शाळेतील शिक्षणाची भाषा वेगवेगळी असल्यामुळे मुलांना भाषिक अडथळा निर्माण होऊन शैक्षणिक ताणतणाव निर्माण होतो याबाबत जनजागृती करण्यात यावी. (सारणी क्र. ४.५.१६)

६. स्थानिक स्वराज्य संस्थेचे पदाधिकारी, मानधन किंवा वेतन घेणारे कर्मचारी यांची अपत्ये मराठी माध्यमाच्या शाळेत शिक्षणासाठी प्रवेश घेण्याची अट लागू करावी, त्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या संख्येत भर पडण्यास मदत होणार आहे. (सारणी क्र. ४.५.२१)

७. मध्यम, नवमध्यम आणि नवश्रीमंत वर्गाने मराठी शाळांमध्ये प्रवेश घेणे बंद केल्यामुळे मराठी शाळामधील प्रवेश कमी झाले. विद्यार्थ्यांनी प्रवेश न घेतल्यामुळे मराठी शाळांचा दर्जा अधिक घसरत आहे. मराठी शाळांचा दर्जा वाढवण्यासाठी पालक काहीही न करून सुद्धा मराठी शाळा चांगल्या नाहीत अशी बोम्ब ठोकतात. मराठी शाळांचा दर्जा वाढवण्यास राज्यकर्ते, शिक्षणतज्ञ व पालक यांनी विशेष प्रयत्न करावेत. (सारणी क्र. ४.५.२५)

८. विद्यार्थ्यांना मोफत मिळणाऱ्या सुविधा जसे- शिक्षण, गणवेश, पोषण आहार, विविध शिष्यवृत्या, शिक्षकांचा वेतन खर्च इ. शासनाचा खर्च कमी करण्याकरिता शासनाने जाणीवपूर्वक मराठी माध्यमाच्या शाळेकडे दुर्लक्ष करू नये. मोठ्या प्रमाणावर स्वयंअर्थसहाय्यित इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मान्यता देण्यात येवू नये. (सारणी क्र. ४.५.३०)

**५.४.५ शासनाकरिता शिफारशी –**

**(संदर्भ : मराठी माध्यमातील शिक्षक पद निश्चयनश्रेणी द्वारा प्राप्त निष्कर्षावरून)**

१. जागतिकीकरणामुळे इंग्रजी भाषेचे महत्त्व वाढलेले असले तरी शासनाने मराठी माध्यमातून शिक्षण घेतल्याने मुलांना संधी निर्माण कराव्यात. (सारणी क्र. ४.५.४)

२. पालकांची आर्थिक स्थिती नसूनही पाल्य शिक्षणापासून वंचित घटकातील विद्यार्थ्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणाऱ्या मराठी शाळांची दुरवस्था थांबविण्याकरिता उपाययोजना राबवाव्यात. (सारणी क्र. ४.५.८)

३. मराठी माध्यमांच्या शाळेत उच्च शिक्षण मातृभाषेत देण्यासाठी अभ्यासक्रमाची निर्मिती करावी. (सारणी क्र. ४.५.१३)

४. मराठी शाळेचा दर्जा वाढावा व मराठी माध्यमांतील शाळा बंद पडू नये म्हणून योजना राबवाव्यात. (सारणी क्र. ४.५.१५)

५. इंग्रजी व मराठी माध्यमाऐवजी फक्त सेमी-इंग्रजी माध्यम शासनाने सुरु ठेवल्यास अनुदानित मराठी शाळांची विद्यार्थी पटसंख्या गळतीची समस्या थांबविण्याकरिता उपाययोजना राबवाव्यात. (सारणी क्र. ४.५.१९)

६. मराठी शाळांचा दर्जा वाढवण्यास राज्यकर्ते, शिक्षणतज्ञ व पालक यांच्याकडून विशेष प्रयत्न करावेत. (सारणी क्र. ४.५.२७)

७. शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या पालकांना त्यांची अपत्ये मराठी मध्यामच्या शाळेत शिकविण्याची अट घालावी. (सारणी क्र. ४.५.३३)

८. मोठ्या प्रमाणावर स्वयंअर्थसहाय्यित इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मान्यता देण्यावर निर्बंध घालावेत. (सारणी क्र. ४.५.३४)

## ५.५ संशोधनाचे शैक्षणिक योगदान व उपयुक्तता

१. आजच्या तंत्रज्ञान आणि संगणकाच्या युगात इंग्रजी भाषेचे महत्व वाढले आहे. मराठी आणि सेमी इंग्रजी माध्यम उपलब्ध असतांनाही मुलांचे भविष्य सुरक्षित आणि उज्वल करण्यासाठी पालक इंग्रजी माध्यमाची शाळा निवडतांना दिसतात. प्रत्येक माध्यमाचे फायदे-तोटे वेगळे आहेत. याबाबत विद्यार्थी, पालक व समाजामध्ये जनजागृती करणे.

२. शाळा आणि शिक्षणाचे माध्यम निवडताना पालकांमध्ये जागरुकता निर्माण करणे.

३. मुलांच्या शैक्षणिक विकासासह मानसिक विकासाकडे पालकांचे लक्ष वेधणे, जागरूकता निर्माण करणे.

४. मुलांच्या शैक्षणिक समस्या, ताणताणाव, मुलांची मानसिकता, मुलांच्या अभ्यास सवयी, नैराश्य आणि स्वास्थ याबद्दल पालकांमध्ये जागरूकता निर्माण करणे. मुलांच्या सकारात्मक आणि नकारात्मक कौटुंबिक वातावरणाचा त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होणाऱ्या परिणामाविषयी जागरुकता निर्माण करणे.

५. मुलांच्या शैक्षणिक विकासावर मोठा पैसा खर्च करण्यापेक्षा मुलांच्या मानसिक विकासाबाबत पालक आणि समाजामध्ये जागृती निर्माण करणे.

६. विद्यार्थ्यांना अभ्यासातील निखळ आनंद मिळेल, कंटाळा येणार नाही तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणात निर्भिड आनंद व आवड निर्माण होणारी शिक्षण प्रक्रिया राबवण्याबाबत उपाययोजना करण्यासाठी शाळा, शिक्षक आणि शैक्षणिक संस्था यांना प्रस्तुत संशोधन अत्यंत उपयुक्त.

७. विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण होण्याचे कारण, तसेच कोणत्या घटकांचा ताण आढळतो व तो ताण शाळा व शिक्षकामार्फत दूर करण्याचा प्रयत्न व उपाययोजना राबविण्याकरिता उपयुक्त.

८. मातृभाषा, परिसरातील व शाळेतील शिक्षणाच्या माध्यमाची भाषा वेगवेगळी असल्यामुळे भाषिक अडथळे निर्माण झालेले विद्यार्थी ओळखण्यासाठी तसेच भाषिक अडथळा निर्माण होण्यामागील कारणांचा शोध व त्यावरील उपाययोजना राबविणे. याविषयी पालकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याकरिता उपयुक्त.

९. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासातील पालकांचा सहभाग वाढवण्याबाबत, पालकांची शैक्षणिक अनभिज्ञता दूर करून जागृती निर्माण करण्याकरिता संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

१०. मराठी शाळेची होत असलेली दुरावस्था, इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षणाने समाजात प्रतिष्ठा मिळते हा वाढत जाणारा गैरसमज, इंग्रजी माध्यमांच्या वाढत्या शाळेचे समाजावर होत असलेले नकारात्मक परिणाम, शिक्षण क्षेत्रातील वाढती शिक्षक

बेरोजगारी व त्याचबरोबर मोफत उत्कृष्ट मिळणाऱ्या शिक्षण व्यवस्थेला बाधा निर्माण करणाऱ्या घटकावर लक्ष वेधण्याकरिता प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

११. प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच घ्यावे असा जगातील सर्वच शिक्षण तज्ज्ञांचा सल्ला आहे याविषयी समाजात जनजागृती निर्माण करून मातृभाषेतील शिक्षणाकडे कल वाढण्यासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

१२. शासकीय, अनुदानित मराठी माध्यमांच्या शाळेत पूर्ण अशा भौतिक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे पालकांचा ओढा सहाजिकच इंग्रजी माध्यमाकडे वाढत आहे. यावर उपाय म्हणून शासकीय, मराठी माध्यमांच्या शाळेत सेमी इंग्रजी हे माध्यम सुरू करून चांगल्या सुविधा, तंत्रज्ञानयुक्त आधुनिक शिक्षण पद्धती उपलब्ध केल्यास शिक्षण क्षेत्रातील पाया भक्कम करण्याकरिता या संशोधनाची उपयुक्तता आहे.

१३. बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अशिशियम, 2009 मधील समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये साधण्यासाठी सहा ते चौदा वर्षेवयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरवण्याची, त्यांना शाळेमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी पार पडण्याण्यासाठी शिक्षक, शाळा, शैक्षणिक संस्था आणि समाज यांना प्रवृत्त करण्यासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त आहे.

**५.६ पुढील संशोधनासाठी विषय**

१. इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे अवधान व शैक्षणिक प्रगती यांचा तुलनामात्म अभ्यास

२. इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेत असलेल्या ग्रामीण विद्यार्थी व शहरी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि कौटुंबिक वातावरणाचा तुलनात्मक अभ्यास

३. इंग्रजी माध्यमातील पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर होणाऱ्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास
४. शिक्षकांची मातृभाषा व अध्यापनाचे माध्यम वेगवेगळे असल्यामुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास
५. मराठी शासकीय अनुदानित शाळेतील शिक्षक व इंग्रजी माध्यमांच्या विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या मानसिकतेचा तुलनात्मक अभ्यास
६. शिक्षणाचे माध्यम वेगवेगळे असल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांविषयी जनजागृती कार्यक्रमाची निर्मिती व त्याची परिणामकारकता- एक अभ्यास
७. शालेय शिक्षण इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून घेणाऱ्या बालकांना पाठ्य घटकातील संकल्पना समजण्यात येणाऱ्या अडचणी मधून निर्माण होणारा ताण तणावाचा शैक्षणिक व व्यक्तिमत्त्वावर होणाऱ्या परिणामाबाबत पालकांमधील जागृतीचा चिकित्सक अभ्यास

## ५.७ समारोप

प्रस्तुत संशोधन "इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता आणि त्यांच्या शैक्षणिक विकासाबाबत पालकांमधील जागृतीचा चिकित्सक अभ्यास" या विषयावर लेखाकाद्वारे संशोधन करण्यात आले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा शिक्षणाचा मुख्य हेतू आहे. शिक्षणाच्या सर्व स्तरावर गुणवत्ता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले जातात. शिक्षणाची गुणवत्ता ठरविण्याचे परिणाम म्हणजे त्यातून निर्माण होणारी गुणवान पिढी. ही पिढी घडवण्याचे कार्य शिक्षक, समाज व कुटुंबातून होत असते. देशातील मनुष्यबळाच्या जडणघडणीत आणि देशाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीत शिक्षणाचा फार मोठा वाटा आहे. कोणत्याही देशाचा दर्जा हा त्या देशात दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो.

वर्तमानकाळात मराठी माध्यमांच्या शाळेची पालक पाल्याकरिता निवड करत नाहीत. शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातील पालकसुद्धा आपल्या पाल्याचे भविष्य उज्ज्वल व सुरक्षित करण्याच्या आशेने इंग्रजी माध्यमाच्या शाळेची निवड प्रवेशासाठी करतात. मराठी माध्यमाचा शाळेचा दर्जा, गुणवत्ता व भौतिक सुविधा यावर प्रश्नचिन्ह निर्माण करून इंग्रजी माध्यमांच्या शाळा आपल्या व्यवसायाच्या कक्षा रुंदावत आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतल्यानंतर निर्माण होणारे शैक्षणिक समस्या, भाषिक अडथळे याविषयी प्रवेश घेताना कुठलाही पालकांमार्फत विचार केलेला नसतो. प्रस्तुत संशोधनात स्थानिकभाषा व मातृभाषा शिक्षणासाठी परिणामकारक असते याविषयी जाणीव निर्माण करणे, देशाचा उज्ज्वल भविष्यसाठी उत्तम मनुष्यबळ, व्यक्तिमत्व निर्माण करण्यासाठी प्रस्तुत संशोधन उपयुक्त आहे.

शाळा व शिक्षणाचे माध्यम निवडतांना समाजात जागरुकता निर्माण करणे, मुलांच्या शैक्षणिक विकासाबरोबर मानसिक विकासाकडे पालकांचे लक्ष वेधणे, मुलांच्या शैक्षणिक समस्या, नैराश्य आणि आवड याबद्दल पालकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यास प्रस्तून संशोधन उपयुक्त ठरणार आहे. आधुनिक पालक मुलांच्या शैक्षणिक विकासावर प्रचंड पैसा खर्च करतात. त्यापेक्षा त्यांनी मुलांच्या शिक्षण व मानसिक विकासासाठी स्वतःचा वेळ देणे सर्वात महत्त्वाचे आहे. याविषयी समाजात व पालकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यास प्रस्तूत संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

***

# संदर्भ सूची

**पुस्तकांचा संदर्भ**


१. आफळे, रा. रा., आणि बापट, भा. वे., (१९७३). शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान, पुणे, श्रीविद्या प्रकाशन,

२. उपासनी, ना. के. आणि कुलकर्णी, के. वि., (१९८७).नवे शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र, पुणे, श्रीविद्या प्रकाशन

३. कुंभोजकर ग. वि., (१९८९). संशोधन पद्धती व संख्याशास्त्र. (सुधारित तिसरी आवृत्ती), कोल्हापूर, फडके प्रकाशन,.

४. कोली लक्ष्मीनारायण, २००३, रिसर्च मेथॉडॉलॉजी, Agra, Y.K. Publisher's

५. कुंभोजकर जी. व्ही., १९८२, संशोधन पद्धती व संख्याशास्त्र, कोल्हापूर, एम.व्ही फडके अॅन्ड कं.

६. कऱ्हाडे बी.एम. (२०१८), शास्त्रीय संशोधन पद्धती, नागपूर, पिंपळापुरे पब्लिकेशन्स

७. कदम चा. प., (२००७), शैक्षणिक संख्याशास्त्र, , पुणे, नित्य नूतन प्रकाशन

८. खरात, आ. पां., (१९८२). प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र. (द्वितीयावृत्ती), , पुणे, श्रीविद्या प्रकाशन,

९. गावंडे सुषमा, जून २००५, माहिती तंत्रज्ञान आणि माहिती प्रक्रिया, नागपूर, पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स.

१०. घोरमोडे के. यू. आणि घोरमोडे कला. (२००८). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, नागपूर, विद्या प्रकाशन,

११. घाटोळे रा. ना., पाचवी आवृत्ती १९९२, समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे आणि पद्धती, नागपूर, मंगेश प्रकाशन.

१२. चव्हाण, दीपक आणि मुळे, संदीप. (२०१०). शैक्षणिक संशोधन आराखडा, नाशिक, इनसाईट पब्लिकेशन्स.
१३. जरारे विजय एल., (२२ ऑक्टो.२००४), सामाजिक शास्त्राची संशोधन प्रणाली, अकोला, अद्वैत प्रकाशन
१४. दांडेकर वा. ना. (१९८५), शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र, पुणे, श्री विद्या प्रकाशन.
१५. नाडगोंडे गुरुनाथ, (द्वितीय आवृत्ती ऑक्टो. १९९९), सामाजिक संशोधन पद्धती, कोल्हापूर, फडके प्रकाशन.
१६. ननवरे, एस., रंगरेज, ए, शिंदे, एस. (२०१५). संशोधन पद्धती आणि आयसीटी. सोलापूर, विसक्राफ्ट अँड पब्लिकेशन डिस्ट्रीब्युशन प्रा. लिमिटेड.
१७. पंडित, बन्सीबिहारी आणि मोरे, लता. (२०१०). शिक्षणशास्त्र संशोधनात संख्याशास्त्रीय परीक्षिकांचा उपयोग, नागपूर, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.
१८. पंडित, बन्सीबिहारी. (२००७). शिक्षणातील संशोधन (संख्यात्मक आणि गुणात्मक), पुणे, नित्यनूतन प्रकाशन.
१९. पाटील, वा. भा. (२०१०) संशोधन पद्धती, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स.
२०. पोखरापूरकर, द. खं. (राजा) आणि चव्हाण, बबन. (१९९९). संशोधनासाठी संदर्भ साहित्याचा उपयोग, नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
२१. पारसनिस न. रा., (द्वितीय आवृत्ती जाने. १९९७), शिक्षणाची तात्त्विक व व समाजशास्त्रीय भूमिका, पुणे, नूतन प्रकाशन.
२२. पारसनिस हेमलता, देशपांडे लिना, (प्रथम आवृत्ती १९९४), शैक्षणिक कृती संशोधन, पुणे, नूतन प्रकाशन
२३. पंडित ब. बी., (१९९७), शिक्षणातील संशोधन (संकल्पनात्मक परिचय), पुणे, नूतन प्रकाशन.

२४. बापट, भा. गो. (१९८८). शैक्षणिक संशोधन. (तृतीयावृत्ती), पुणे, नूतन प्रकाशन, पुणे.
२५. बी. आर. जोशी (२००७). डायमंड सामाजिक ज्ञानकोश, खंड - २, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स.
२६. बोरूडे रा.र., सप्टें. २००५, संशोधन पद्धतीशास्त्र, पुणे, विद्यार्थीगृह प्रकाशन.
२७. भिंताडे, वि. रा. (२०११). शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नित्यनूतन प्रकाशन.
२८. भिंताडे, वि. रा. आणि जगताप, ह. ना. आणि बोंदार्डे, कै. मु. (२००७). पुणे, आशययुक्त अध्यापन पद्धती, नित्यनूतन प्रकाशन.
२९. भांडारकर पु. ल. (तृतीय आवृत्ती १९८७), सामाजिक संशोधन पद्धती महाराष्ट्र विद्यापीठ, नागपूर, ग्रंथनिर्मिती मंडळ.
३०. भगाडे सुप्रिया, जुलै २००५, संगणक मूलतत्त्वे आणि कार्यप्रणाली, नागपूर, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.
३१. भिंताडे वि.रा., (१९९४), शैक्षणिक संशोधन पद्धती, प्रथम प्रतिरूप आवृत्ती, पुणे, नूतन प्रकाशन.
३२. भारंबे इंदुमती टि., (२०१४), शैक्षणिक संख्याशास्त्र, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स.
३३. मस्के, टी. ए. (२००७). शैक्षणिक संख्याशास्त्र. (तृतीयावृत्ती), नाशिक, इनसाईट पब्लिकेशन्स.
३४. मुळे, रा. शं. आणि उमाठे, वि. तु. (१९८७). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, (द्वितीयावृत्ती), नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.
३५. मेहेंदळे, सुहास. (१९९९). साधननिर्मितीद्वारे संशोधन, नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

३६. महाजन धर्मविर, महाजन कमलेश, (२००५), सामाजिक अनुसंधान की पद्धतियाँ, जवाहरनगर, दिल्ली, विवेक प्रकाशन.
३७. मुखर्जी रवींद्रनाथ, १९९८, सामाजिक शोध व सांख्यिकी, जवाहरनगर, दिल्ली, विवेक प्रकाशन, दिल्ली
३८. य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक, (१९९९), संशोधन मार्गदर्शक मालिका पुष्प १ ते १५, नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
३९. शेटे, शा. शं. आणि केसकर, पु. दि. (१९७२). शालेय संशोधन प्रकल्प, कोल्हापूर, महाराष्ट्र ग्रंथ भांडार.
४०. हरिश्चंद्र उपाध्ये, १९९०, सामाजिक सर्वेक्षण, अनुसंधान एवं सांख्यिकी, नवी दिल्ली, एटलांटिक पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रीब्युटर्स.
४१. त्रिपाठी लालबचन, १९८३, मनोवैज्ञानिक अनुसंधान पद्धती आगरा, हरिप्रसाद भार्गव.

**प्रस्तुत संशोधनात संदर्भ साहीत्याचा घेतलेला आढावा**

१. अन्नदाते अमोल, जानेवारी २०१३, कधीतरी हे बोलायलाच हवे, , पुणे, मनोविकास प्रकाशन.
२. अग्रवाल विजय, जून २०१३, योग्य निर्णय कसे घ्यावे ?, पुणे, मिरर पब्लिशिंग.
३. कोरगांवकर मनोहर द., मे २०१०, शिक्षण-वाटा आणि वळणे, पुणे, मुक्तांगण प्रकाशन.
४. काटदरे लता, डिसेंबर २००७, शिक्षणयात्रा, गिरगांव मुंबई, मौज प्रकाशन गृह.
५. चोरघडे श्रीकांत, डिसेंबर २०१०, संगोपन पालकत्वाचे, पुणे, सकाळ प्रकाशन.

६. जोशी अंजली, एप्रिल २०११, विवेकी पालकत्व, मुबई, शब्द पब्लिकेशन.
७. दांडेकर रेणू, जानेवारी २०१७, मुल घडताना – घडवितांना, पुणे, मनोविकास प्रकाशन.
८. पटेल नसरीन, २०१३, आपल्या मुलांच्या समस्या आणि उपाय, पुणे, साकेत प्रकाशन प्रा.लिमी.
९. पहिनकर गो. द., २००७, मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी, छत्रपती संभाजीनगर, साकेत प्रकाशन प्रा.लिमी,
१०. पहिनकर गो. द., २००९, मुलांना बनवा ऑलराउंडर, पुणे, साकेत प्रकाशन प्रा.लिमी.
११. पानसे श्रुती, एप्रिल २००७, मुलांचे ताण – जबाबदारी पालकांची, पुणे, उन्मेष प्रकाशन.
१२. पाटील लीला, आक्टोंबर १९९५, परिवर्तनशील शिक्षणे, पुणे, उन्मेष प्रकाशन.
१३. बर्वे राजेंद्र, जानेवारी २०२२, कथा पालकांच्या – व्यथा मुलांच्या, पुणे, मनोविकास प्रकाशन.
१४. भंडारी चंद्रकांत, डिसेंबर २००७, कुडाळकरांची शाळा, पुणे, अक्षर मानव प्रकाशन.
१५. भागवत शोभा, २०१५, सार काही मुलांसाठी, छत्रपती संभाजीनगर, साकेत प्रकाशन प्रा.लिमी.
१६. व्यवहारे रामानंद बापूराव, २००७, दिशा करिअरच्या, छत्रपती संभाजीनगर, साकेत प्रकाशन प्रा.लिमी.
१७. विवेकानंद स्वामी, २०१०, आदर्श शिक्षण, नागपूर, रामकृष्ण मठ.
१८. साठे शांता, साठे अनंत. जानेवारी २००६, काय सांगू ? कस सांगू ?, पुणे, राजहंस प्रकाशन प्रा.लिमी.

१९. साही जेन (अनुवाद – भागवत शोभा), डिसेंबर २०१६, शिक्षण आणि शांती, पुणे, मनोविकास प्रकाशन.

**नियतकालिक/मासिकांचा संदर्भ**

१. काटकर तात्यासाहेब शिवाजी, ऑगस्ट २०२५, मुलांना गुणांच्या मृगजळात अडकवू नका, शिक्षण संक्रमण, पुणे, म.रा.माध्य.व उच्च माध्य. शिक्षण मंडळ.

२. घेवरीकर उमेश, मे-जून २०२५, शिक्षण आणि संशोधन, शिक्षण संक्रमण, पुणे, म.रा.माध्य.व उच्च माध्य. शिक्षण मंडळ.

३. जोशी मिलिंद, फेब्रुवारी २०२३, तेवती ठेवूया मराठीची ज्योत, शिक्षण संक्रमण, पुणे, म.रा.माध्य.व उच्च माध्य. शिक्षण मंडळ.

४. परांजपे प्र.ना., फेब्रुवारी २०२४, मराठीचे विद्यापीठ कसे असावे, शिक्षण संक्रमण, पुणे, म.रा.माध्य.व उच्च माध्य. शिक्षण मंडळ.

५. भगत भारती, सप्टेंबर २०२४, मातृभाषेतून शिक्षण गरज व व्याप्ती, शिक्षण संक्रमण, पुणे, म.रा.माध्य.व उच्च माध्य. शिक्षण मंडळ.

६. मालाणी नितिन, जुलै २०२५, दहा दिवस दप्तरमुक्त शाळा, शिक्षण संक्रमण, पुणे, म.रा.माध्य.व उच्च माध्य. शिक्षण मंडळ.

७. वाघ विनोद, जुलै २०२२, विद्यार्थी : गुणवत्ता वाढ उपक्रम, शिक्षण संक्रमण, पुणे, म.रा.माध्य.व उच्च माध्य. शिक्षण मंडळ.

**वर्तमानपत्रांचा संदर्भ**

१. केळकर अमोल, (४ फेब्रुवारी, २०२३), तुमचे मुल अभ्यासाचे टेन्शन घेत नाही ना ?,  दैनिक लोकमत

२. चिंचोळकर गौरी चंद्रशेखर, (२७ फेब्रुवारी, २०२२), मराठी भाषा संवर्धन आणि जागरुकता, अकोला, दैनिक मातृभूमी..
३. थोरात सुखदेव, (९ मार्च, २०२५), इंग्रजी शाळांना परवानगीच देऊ नका !, दैनिक लोकमत.
४. देवर्जनकर बालाजी, (११ मार्च, २०२५), सरकारी शाळांना 'टाळे' लावण्याचा 'करेक्ट कार्यक्रम', दैनिक लोकमत.
५. परब प्रकाश, (१६ मार्च, २०२५), शिक्षणाची भाषा कोणती ?, दैनिक लोकमत.
६. बळी किशोर, (२३ फेब्रुवारी, २०२५), सरकारी शाळा टिकणार कशा, दैनिक लोकमत.
७. बच्छाव उमा, (१० एप्रिल, २०२५), स्वमग्न मुलांचा प्रेमळ स्वीकार !, दैनिक लोकमत.
८. बनकर रोशन विनायक, (५ सप्टेंबर, २०२५), पंचतारांकित शाळा आणि थकलेला गुरुजी, दैनिक देशोन्नती.
९. भोसले वसंत, (१९ जानेवारी, २०२५), बहुजनांचे उच्चशिक्षण संपले, दैनिक लोकमत.
१०. मोरे रुपेश, शाळा टिकल्या तर भाषा बहरेल.
११. लोकमत परिचर्चा, (२८ फेब्रुवारी, २०२५), तर शाळा संकटात, शिक्षकांच्या नोकऱ्या धोक्यात !, दैनिक लोकमत.
१२. वृत्तपत्र बातमी, (१ सप्टेंबर, २०२५), खाजगी शाळांनी खिसा केला रिकामा, मग सरकरीत शिका, दैनिक लोकमत.

## BIBLIOGRAPHY

1. Aggarwal, J. C.(1994). Landmarks in the History of Modern Indian
2. Bajpai S.R., 1987, Methods of Social Survey and Research, Kanpur, Kitab Ghar

3. Bajpai, S. R. (1974). Methods of Social Survey and Research. Kanpur, Kitab Ghar.
4. Best, John W. (1982). Research in Education. (Fourth Edition): New Delhi, Prentice Hall of India Private Limited.
5. Best, John W. and Kahn, James V. (1996). Research in Education. (Seventh Edition): New Delhi, Prentice Hall of India Private Limited.
6. Bhintade, V. R. (1986). A Critical Study of Educational Problems of the Textile Mill Workers' Children studying in the secondary schools in Solapur city with a view to suggesting Probable Solutions: Ph. D. Thesis. The University of Poona.
7. Biswas, A. and Aggarwal, J.C. (1987). Encyclopaedic Dictionary and Directory of Education, Vol. II. (Second Edition): New Delhi, The Academic Publishers (India).
8. Bordens, Kenneth S.and Abbott, Bruce B. (2007). Research Design and Methods (Sixth Edition): New Delhi, Tata McGraw Hill Publishing Company Limited.
9. Borg, Walter R. (1963). Educational Research an Introduction: David Mckay Company Inc.
10. Buch, M. B. (Editor) (1974). A Survey of Research in Education Baroda: Centre of Advanced Study in Education.
11. Creswell, John W. (2011). Educational Research. (Fourth Education): New Delhi, PHI Learning Private Limited.
12. Deshpande, Dr. Prakash M. and Patole, Dr. N. K. (1993). Research Methods. Nashik, Yashwantrao Chavan Maharashtra Open University.
13. Education. (Second revised edition),Vikas Publishing House Pvt. Ltd.
14. Foskett, D. J. (1965). How to Find out Educational Research. London, Pergamon Press Ltd.

15. Garrett, Henry E. Statistics in Psychology and Education. (fifth Edition) Vakils, Bombay, Feffer and Simons Pvt. Ltd.
16. Good, Carter V. (1966). Essentials of Educational Research. New York, Meredith Publishing Company.
17. Good, Carter V. and Barr, A.S. and Scates Douglas. The Methodology of Educational Research. Appleton, New York, Centure Crofts Inc.
18. Goode William, J. & Hatt Paul R., 1981, Methods in Social Research, New Delhi, McGraw-Hill International Book Comp.
19. Khan, Mohd. Shariff. (1990). Educational Research. : New Delhi, Ashish Publishing House.
20. Kothari, C. R. (1993). Research Methodology, Methods & Techniques. (Second Edition) Wiley Eastern Limited.
21. Kothari C.R., 1985, Research Methodology : Methods and Techniques, New Delhi, Wiley Eastern.
22. Koul, Lokesh. (1984). Methodology of Educational Research. New Delhi, Vani Educational Books.
23. Kumar A., 1997, Social Research Method, New Delhi, Anmol Publication, Pvt. Ltd.
24. Lulla, Dr. B. P. and Murty and Janeja (1978).Essentials of Educational Research., Chandigarh, Mohindra Capital Publishers.
25. Mahajan Y. R., 1991, Problems is Statistics, Nagpu, Pimplapure & Co. Publishers.
26. Mason, Emanuel J. and Bramble, William J. (1978). Understanding and Conducting Reserach., New York, Mcgraw-Hill Book Company.
27. NCERT. (1970). Education and National Development, 1964-66 Report of the Education Commission- Vol. 3.
28. Page, Terry and Thomas, J. B. with Marshall, A. R.(1979). International Dictionary of Education., London, Pitman Publishing Ltd. ELBS Edition.

29. Pandya, Shefali R. (2010) Educational Research. New Delhi, APH Publishing Corporation.
30. Parsons, C. J. (1973) Theses and Project Work: London, George Allen & Unwin Ltd.
31. Radha, Mohan. (2011). Research Methods in Education, Hyderabad, Neelkamal Publication Pvt. Ltd.
32. Rohilla, Pradeep. (2010). Research Methodology, New Delhi, APH Publishing Corporation.
33. Sadhu A.N. and Singh Amarjit, 1980, Research Methodology in Social Science New Delhi, Himalaya Publication.
34. Samant, D. G. (1966). The Making of Educational Research, Bombay, Popular Prakashan.
35. Sharma, R.A. (84-85). Fundamentals of Educational Research, Meerut, International Publishing House.
36. Sharma, S.R. (1994). History of Educational Research, New Delhi, Anmol Publications Pvt. Ltd.
37. Sharma R.D., 1990, Research Method is Social Science, New Delhi, Nationals Book Organizaion.
38. Sharma K.R., 2002, Research Methodology, Jaipur, National Publishing House.
39. Sidhu, Kulbir Singh. (1987). Methodology of Research in Education. (Second Edition), New Delhi, Sterling Publishers Pvt. Ltd.
40. Singh, K. Technique and Method of Social Survey, Research and Statistics, Lucknow, Prakashan Kendra.
41. Stodola, Quentin and Stordah, Kalmer. (1972). Basic Educational Tests and Measurement, New Delhi, Thomson Press (India).
42. Sukhia, S.P. and Mehrotra, P.V. and Mehrotra, R. N. (1974). Elements of Educational Research. (Third Edition), Bombay, Allied Publishers.
43. Travers, Robert M. W. (1971). An Introduction to Educational Research. (Third Edition, Fourth Printing), London, The MacMillan Ltd.

44. Young Pauline V., 1982, Scientific Social Surveys and Research, New Delhi, Prentice Hall of India Pvt. Ltd.

**WEBLIOGRAPHY**

1. dnyantarangini.com
2. DreamEducation.org
3. https://www.pradipjadhao.com/2021/12/shikshak-vidyarthi-palak-yanchya-Badalatya-manasikatecha-shikshan-prakriyevar-honara-parinam.html
4. https://maitri2012.wordpress.com/2018/09/02/
5. https://www.aksharnama.com/client/author_articles
6. http://scholar.lib.vt.edu/ejournals/JTE/vgnl
7. http://en.wikipedia.org/wiki/multidisciplonarity
8. rdthakur78.wordpress.com
9. study.com